# उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-४.२.२००२.

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक ४.२.२००२ रोजी दुपारी १२.३०वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

१. मा.सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.

| | |
|---|---|
| २. श्री. आयलानी कुमार | सदस्य |
| ३. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ४. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ५. श्रीमती. वेलकर सुरेखा | सदस्या |
| ६. श्रीमती.सोनावणे यमुना | सदस्या |
| ७. श्रीमती. राधवानी आशा | सदस्या |

तर

मा. १. श्रीमती. कुंदनानी लविना ,२. श्री. पारवानी रामचंद ,३ श्री. बहरानी ठाकुरदास ,४. श्री.टाले प्रमोद ,५. श्री. कैलास तेजी, ६ श्रीमती. राजानी भारती ,७. श्री.वनवारी किशोर ,८. श्रीमती. पदमा वलेचा ,९ श्री.केणी जयकुमार
हे सदस्य/ सदस्या सभेस अनुपस्थितीत होते/ होत्त्या.

दुपारी १२.५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव :-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. ३१.१२.२००१ रोजीचे इतिवृत कायम करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-**मागील सभेचे दि. ३१.१२.२००१ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.**

मा. सचिव :-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.**

मा. सचिव :-विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-**सदरचा**

**प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.**

--१०--

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. रमेश चव्हाण :-</u>ही कामे कोणत्त्या निधीतील आहेत?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>मा. महापौर, उपमहापौर व नगरसेवक निधी अशा सर्व निधीतील ही कामे आहेत.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>म्हणजेच सर्वसाधारण निधीतील कामे नाहीत ना?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>काही कामे सर्वसाधारण निधीतीलही आहेत.

<u>मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-</u>यामध्ये सर्वसाधारण निधीतील काही कामे असतील तर आमच्या प्रभागातील सुध्दा कामे सर्वसाधारण निधीतून केली जावीत.

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>ही जी काही कामे आहेत. त्यांना यापुर्वीच मंजुरी दिलेली आहे. कोण कोणती कामे आहेत त्याची यादी सोबत दिलेली आहे. स्थायी समितीच्या फक्त माहितीसाठी आपणांसमोर ठेवली आहेत. ही सर्व कामे आयुक्तांनी यापुर्वीच मंजुर केलेली आहेत.

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा.वि):-</u>या कामांबाबत करार झालेला आहे. फक्त माहितीसाठी स्थायी समिती समोर ठेवली आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--१९--

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>हा प्रस्ताव निवडणुक आचारसंहितेला बाधा आणत असल्याने सदरचा विषय सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. १६ मध्ये ब्लॉक ए. ३२७ ते ३५९ पर्यंत बी.एम आणि ए.सी व रस्त्यालगतची नाली बनविणे कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-याबाबते कोण स्पष्टीकरण करेल?टेबल खुर्च्या काय लावल्या आहेत. टेबल, खुर्च्या काय काय भाडयाने घेणार आहात?हे काम कुणाला दिले आहे?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-निविदा प्रक्रिया चालु असतानाच्या दरम्यान एक एजंसी मेसर्स आर. एम. भुत्तर यांनी थेट भेट घेऊन सदरचे काम करण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली. सिव्हिल कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा सात टक्के कमी दराने तसेच विद्युत कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार चे दर त्यांनी या अटीवर दिले आहेत की, सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर त्याचे देय दि.२५.२.२००२ पर्यंत अदा केले जावे.

मा.सदस्य श्री. रमेश चव्हाणः-या कामाची प्राकलनिय रक्कम किती आहे?टाऊन हॉल आता आपणांस कामास येत आहे ना?या सगळया बाबी तेथे आहेत ना?
महापालिकेचे पैसे वाचत आहेत ना?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- महानगरपालिका निवडणुका २००२ साठी पार्टीशन, टेबल, खुर्च्या तसेच मतदान केंद्रावर मंडप उभारणे कामी व तात्पुरत्त्या दिवाबत्ती व्यवस्थेसाठी प्रशासनास मे.आर.एम. बुत्तर यांच्याशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

--२०--

प्रस्तावना :-

महानगरपालिकेने निवडणूका-२००२ साठी पार्टीशन, टेबल, खुर्च्या इत्त्यादी तसेच मतदान केंद्रावर मंडप उभारणेकरीता भाडे तत्त्वावर घेण्यासाठी निविदा सार्वजनिक बांधकाम खात्त्याने मागविली होती. तसेच तात्पुरत्त्या विद्युत व्यवस्थेसाठी वेगळया निविदा विद्युत विभागाने मागविल्या होत्त्या दोन्ही निविदेत आलेले दर अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १५ टक्के ते ५० टक्के पर्यंत जास्त होते. याकरिता जे कमी दराचे निविदाकार होते त्यांना वाटाघाटीकरिता बोलविण्यांत आले होते, तसेच दुस-या निविदाकारांना कमी दर करण्यासाठी देखील बोलविण्यांत आले होते. परंतु सदरचे दर कमी करण्यास नकार दिल्यामुळे सर्व निविदाकारांकडून बंद लखोटयांत निविदा मागविण्यात आले. ते बंद लिफाफे दिनांक ३१.१.२००२ रोजी दुपारी १.३० वाजता उघडण्यात आले. (अ) सिव्हील कामाचे निविदा धारकांचे दर खालील प्रमाणे प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १ | मे.जी. जी. इंटरप्राईजेस | अंदाजपत्रकित दराने |
| २ | मे.आशा डेकोरेटर्स | पुर्वी ५० टक्के दरापेक्षा ३० टक्के चा दर कमी करून एकंदरीत सुधारीत दर २० टक्के पेक्षा जास्त दर भरण्यात आले होते. |

| | | |
|---|---|---|
| ३ | मे.किरीट डेकोरेटर्स | खाडाखोड केली असून अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास तयार आहे. तसेच सदर कामाचे देयक सात दिवसांचे आंत दिल्यास परत १ टक्के कमी दराने काम करण्यास तयार आहे. |
| ४ | मे.रॉयल डेकोरेटर्स | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ६ टक्के कमी दराने काम करण्यांस तयार असून सदर कामाचे देयक सात दिवसांचे आत दिल्यास परत १ टक्के कमी दराने करण्यास तयार आहे. |

सिलबंद लिफाफ्यात दिलेले दर भरलेले होते त्यांनी देखील सदर कामात अपेक्षित कमी दर भरलेला नसल्यामुळे महानगरपालिकेला दरात फायदा होत नाही.
ब) विद्युत विभागातील दोन निविदा धारकांपैकी १ निविदा धारक मे.जी.जी. इंन्टरप्राईजेस यांनी फक्त बंद लखोटयात त्यांचे दर सादर केले व ते दर पण अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा अधिक होत आणि काम पुर्ण झालेनंतर ७ दिवसांचे आंत देयकच्या अटीवर १ टक्के सुट देण्याचे कबुल केले.

वरील तुलनात्त्मक तक्त्त्यानुसार सिव्हील कामाचे जे कार्य होते त्याच्या दरात अपेक्षेपेक्षा कमी दर आले परंतु विद्युत कामाच्या दरात कोणतीही कमी अथवा फेरबदल दर आले नाही. या बाबीबाबत असे आवश्यक वाटते की, विद्युत विभागाचे अंदाजपत्रक बहुतेक डी.एस. आरच्या दराप्रमाणे तयार



करण्यांत आले होते, व सिव्हील कामाचे अंदाजपत्रक बाजारातून दर पत्रक मागवून कमी दराच्या आधारावर बनविण्यात आलेले होते.

सार्वजनिक बांधकाम खात्त्याचे कामाचे व विद्युत विभागाचे कामाचे अपेक्षित दर प्राप्त झाले नसल्यामुळे मा. आयुक्तांना निविदा वाटाघाटी सदस्यांशी चर्चा करून असे ठरविले की, सिलबंद लखोटयाव्दारे बोलावलेले निविदेचे दरातील सर्व निविदा रदद करावे व सदरचे दर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ (२) अंतर्गत सदरचे काम तातडीने करावे व तसा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी पाठवावे.

त्या दरम्यान एक एजंन्सी मे.आर. एम. भुत्तर यांनी थेट भेट घेऊन सदरचे काम करण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली त्यानुसार त्यांनी खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

१) सिव्हील कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ७ टक्के कमी दर.
२) विद्युत कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कमेनुसार चे दर त्यांनी या अटीवर दिले आहे की, सदरचे काम पुर्ण झालेनंतर त्यांचे देयक दिनांक २५/२/२००२ पर्यंत अदा करण्यात येईल.

सदर एजंन्सीने या प्रकारचे अनेक कामे पुर्ण केले आहे. अशा परिस्थितीत निविदा वाटाघाटी समितीचे असे मत झाले की, या एजंन्सीचे दर स्विकृत करणे महानगरपालिकेच्या दृष्टीने हितावह व निवडणूकीचे काम मुदतीत सुव्यवस्थित योग्य त-हेने पार पाडणे योग्य राहील.

वरील सर्व बाब लक्षात घेता सिव्हील व विद्युत खात्त्याचे निविदा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२) अंतर्गत मे.आर. एम. भुत्तर यांचे नांव थेट संविदा करण्यासाठी स्थायी समिती सभेपूढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.८३ दिनांकः-४ . २. २००२

सुचकाचे नाव :-श्रीमती. यमुनाबाई सोनावणे.
अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. सुरेखा वेलकर.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार सर्व परिस्थिती आणि महानगरपालिकेचा फायदा विचारात घेता महानगरपालिका निवडणुक २००२ साठी पार्टीशन, टेबल, खुर्च्या तसेच मतदान केंद्राला मंडप उभारणे कामी व तात्पुरती दिवाबत्ती व्यवस्थेसाठी मागविलेल्या निविदा न स्विकारता प्रशासनास मे.आर. एम. भुत्तर या लघुत्तम दराच्या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>
अनुमोदकाची <u>सही/-</u>
<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१२--

दुपारी १. ०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

<u>दिनांक</u>:-८.३.२००२.

### <u>उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ८. ३.२००२ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठसीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

<u>१. मा.सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.</u>

२. श्रीमती. कुंदनानी लविना सदस्या
३. श्री. वहरानी ठाकुरदास सदस्य

४. श्री. टाले प्रमोद सदस्य
५. श्री.तलरेजा विनोद सदस्य
६. श्री. केणी जयकुमार सदस्य

तर

१. श्री. आयलानी कुमार,२. श्री. रमेश चव्हाण, ३. श्रीमती. भारती राजानी, ४. श्रीमती. यमुना सोनावणे,५. श्री. पारवानी रामचंद,६ श्री. कैलास तेजी, ७ श्रीमती. वेलकर सुरेखा, ८ श्री.वनवारी किशोर,९ श्रीमती. पदमा वलेचा,१० श्रीमती. राधवानी आशा हे सदस्यों सदस्या सभेस अनुपस्थितीत होतो होत्त्या.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांच्या आदेशानुसार श्री. दत्ता भडकवाड उपायुक्त मुख्यालय हे आयुक्तांच्या अनुपस्थितीत स्थायी समितीतील त्त्यांच्या आसनावर आसनस्थ होते.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u> सभेचे कामकाज चालु करण्यापुर्वी मी एक शोक प्रस्ताव मांडू इच्छितो. महापालिकेच्या नुकत्त्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्र. २४ अ मधुन निवडुन आलेले आमच्या राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाचे तरूण नगरसेवक श्री. पहलाज छाबरीया यांचे बारा दिवसापुर्वीच अकस्मित निधन झाले. तसेच स्थायी समितीचे सदस्य व सभागृह नेते श्री. किशोर वनवारी यांची मावशी श्रीमती सावित्रीबाई डोडेजा यांचे दोन दिवसापुर्वीच निधन झाले या दोघांनाही श्रध्दांजली वाहण्यासाठी आपण सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहावे अशी मी विनंती करतो.

यावेळी स्थायी समिती सभेत उपस्थित असलेल्या सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून मौन पाळून श्री. पहलाज छाब्रीया व श्रीमती. सावित्रीबाई फगुनमल डोडेजा यांना श्रध्दांजली अर्पीत केली.

सायंकाळी ४.५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

--२--

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. ४.२.२००२ रोजीचे इतिवृत कायम करणे बाबत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>**मागील सभेचे दि. ४.२.२००२ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.**

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.**

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील पाणीपुरवठा विभागांतर्गत १८
विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदा माहिती
याची नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना :-</u>

उल्हासनगर शहराच्या विविध भागात खाली नमूद केलेली कामे वित्तिय अंदाज पत्रक सन २००१-२००२ मधून करण्यासाठी नगरसेवक यांनी विनंती केली आहे.

---

| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
| --- | --- | --- | --- | --- |
| १. | उल्हासनगर १ मध्ये मधुबन हॉटेल ते अे ब्लॉक रोड पर्यंत व्हालसाठी चेंबर बांधणेबाबत. (सर्वसाधारण निधी) (नगरसेवक निधीतुन) | रू. २१,५६०/- | २३.७.२००१ | मे.ज्योती मजुर का. स. |
| २. | उल्हासनगर ३ वार्ड ६८ मध्ये निवअेरा हायस्कुल ते हिरा सोसायटी पर्यंत ५० मी. मी. व्यासाची जलवाहीनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधीतुन) | रू.७५,०५०/- | २४.७.२००१ | मे. आरती आदिवासी मे. म. का.स.संस्था |
| ३ | दुषित पाण्याची तक्रार दुर करणे साठी रिगल मेडिकल स्टोअर्स ते गौतमवाडी उल्हासनगर-३ करीता ५०मी.मी. व्यासाची नवीन जी. आय. जलवाहिनी टाकणे बाबत. (सर्वसाधारण निधीतुन) | रू.२३,७६८/- | १०.८.२००१ | मे. कार्तिकम.का. स. सं. |



| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
| --- | --- | --- | --- | --- |
| ४. | उल्हासनगर ३ येथे प्रभाग ८ साठी अस्तित्त्वात असलेली ८० मी.मी. व्यासाची जलवाहिनीतून ५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी मध्ये क्रॉस कनेक्शन करणे बाबत. ( नगरसेवक निधी) | रू.११,८२०/- | १३.९.२००१ | मे.बजरंगबली म.का.स. संस्था |
| ५. | उल्हासनगर २ वार्ड ६७ मध्ये बॅ.क्र. ५३५ ते बॅ.क्र.५४५ पर्यंत मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधीतुन) | रू. १४,०५०/- | २०.९.२००१ | मे. बजरंगबली म. का.स.संस्था. |

६. उल्हासनगर-१ येथे बिर्ला गार्डन रू.९७,२१०/- २१.९.२००१ मे.ज्योती म.का.स.
ते बॅरेक नं.१२७ पर्यंत ८० मी.मी. संस्था
व्यासाची जलवाहिनी टाकणे बाबत.
वार्ड क्र. ३६ (नगरसेवक निधी)

७. उल्हासनगर ३ येथे बॅरेक नं. ८९२
ते ९०३पर्यंत सेक्शन २० साठी
५० मी.मी. व्यासाची जी. आय. रू.५१,०२८/-२४.९.२००१ मे.कार्तिक म.का.
५७ जलवाहिनी टाकणे बाबत.
वार्ड क्र.१७(नगरसेवक निधी)

८. उल्हासनगर ३ येथे अशोक स्टुडिओ ते
बॅरेक नं. ९३७ पर्यंत सेक्शन-२१ साठी
५० मी. मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी
टाकणे बाबत.
(नगरसेवक निधितून) रू.६७,४६९/- २४.९.२००१मे. कार्तिक म. का.स.संस्था

९. उल्हासनगर-१ वार्ड ३४ मध्ये भिमनगर
करिता ५० मी. मी. व्यासाची
जलवाहिनी टाकणे बाबत. रू. ६१,९०६/- २५.९.२००१ मे. अनंत म.का.स.
(नगरसेवक निधितून)

१०. उल्हासनगर २येथे पी.व्ही.सी. टाकीला
एम.एम. एन्गलच्या स्टॅंड बसविणे रु.२१,११०/- १७.१०.२००१मे.कार्तिक म.का.
बाबत.प्र.क्र.७ (नगरसेवक निधितून)

११. उल्हासनगर-३, प्र.क्र.१२ मध्ये धरम
पॅलेस ते बॅ.क्र. १०६४ पर्यंत ५०
मीमी व्यासाची रु५०,७००/- २७.११.२००१मे.वंदना मजूर म.का.स.
जलवाहिनी टाकणे बाबत.(नगरसेवक निधितून)



| अ.क्र | कामाचे नाव | प्राकलनिय रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|

१२. उल्हासनगर ३ येथिल प्र. क्र.१२ मध्ये बॅ.क्र.
१०६४,१०६५,आर्शिवाद रु.१,९९,१००/-१५.१२.२००१मे. शिवशक्ती म.का.स.
सोसायटी करीता ५० मीमी व ८०
मीमी व्यासाची जलवाहिनी टाकणे
बाबत.(नगरसेवक निधितून)

१३. उल्हासनगर १एम. एण्ड.आर. टु
उल्हासनगर पाणी पुरवठा बॅ.क्र.३२२
जवळ म्सुलिनिपल गार्डन रु १,९९,९५०/- २८.११.२००१ मुंब्रादेवी म.का.
२० मीमी व्यासाची लाईन टाकणे बाबत.
(उप.महापौर निधितून)

१४. उल्हासनगर १ येथिल प्र. क्र३७मध्ये
बॅ.नं. २०५ ते २५७ पर्यंत आणि
जी.एस.आर.ते किंग पॅलेस पर्यंत
५०मीमी व्यासाची रु. २४,७९०/- २९.१२.२००१मे.आरती आदिवासी म. का
जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधितून)

१५. उल्हासनगर १ येथिल प्र.क्र.३४
बॅ. क्र.१ ,८ व दत्तवाडी साठी २५
मी मी , ५० मीमी व ८० मीमी
व्यासाची, रु. ४६,५५५/- ३१.१२.२००१मे. आरती आदिवासी म. का
जीआय पाईप लाईन
टाकणे बाबत. (नगरसेवक निधितून)

१६. उल्हासनगर येथिल प्र. क्र.१०मध्ये
अस्तित्त्वात असलेल्या पाईप लाईनचे
खोदकाम करुन टाकणे रु. २०,७५०/-३१.१२.२००१ मे. शिवमुद्रा म. का
बाबत. (नगरसेवक निधितून)

१७. उल्हासनगर ३ येथे प्र. क्र.१३मध्ये
सिध्दार्थ बालवाडी ते सम्राट अशोक चौक
आर.पी.आय. ऑफिस पर्यंत १५० मीमी व्यासाची एम.एस.
पाईप लाईन टाकणे बाबत. रु. ८६,०५५/- ३१.१२.२००१मे. लुंगदेव म. का
(नगरसेवक निधितून)

१८. उल्हासनगर ३ येथे प्र. क्र.८मध्ये
धोबीघाट ते जी.एस.आर.टेकडी रु. २३,६७९/- २१.२००१मे. वंदना म. का.स.
जवळ वडार कॉलनी करीता आजादनगर
येथे ५० मीमी व्यासाची जी.आय.जलवाहिनी
टाकणे बाबत. (नगरसेवक निधितून)

---

--५--

उपरोक्त कामांना मा. आयुक्त, यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे कलम ७३ डी अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपनिबंधक, ठाणे यांचेकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करुन देण्यासाठी शिफारस केली होती त्यानुसार उप-निबंधक ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर मजूर कामगार सहकारी संस्था यांचेशी करारनामा करण्यांत आला आहे. तरी सदर माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यांत येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.८४ दिनांक:-८.३.२००२

सुचकाचे नाव :- श्री. ठाकुरदास बेहरानी.

अनुमोदकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील पाणीपुरवठा विभागांतर्गत वर नमुद केलेल्या १८ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदा माहिती याची आजच्या कार्यवृत्तात नोंद करीत आहे.

**सुचकाची** सही/-

**अनुमोदकाची** सही/-

एकमताने मंजुर

**सभापती / पिठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

मा. सचिव :-विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.**

विषय :- उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००२ चे छपाई साहित्य पुरविणे कामी प्रशासनाने मे. श्रुती प्रिंटर्स व मे. कैलाश एन्टरप्रायझेस यांच्याशी केलेल्या संविदा माहिती याची नोंद करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेचे भांडार विभागाने सार्वत्रिक निवडणुक-२००२ करिता विविध मतदान केंद्रावर छपाई साहित्य पुरविणकामी, राज्यस्तरावरील दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्त्या. त्यानुसार विहित कालावधीत खालील निविदा धारकांचे निविदा प्राप्त झाल्या होत्त्या.



१. मेसर्स श्रुती प्रिंटर्स उल्हासनगर.
२. मेसर्स कैलाश इंटरप्राईजेस उल्हासनगर.

उपरोक्त निविदाधारकामध्ये मेसर्स श्रुती प्रिंटर्स यांचे बाबत क्र. १३,४,५,६,७ व १० तसेच मेसर्स कैलाश इंटरप्रायजेस यांचे बाब क्र. २,८,९,११ व १२ साठी वाटाघाटी केलेनंतर लघुत्तम दर असून त्यांस अनुक्रमांकाने रूपये ६५,७००/- व रूपये ६६,९३५/- असा एकूण १,३२,६३५/- रूपये इतका खरेदी खर्च येणार असून सार्वत्रिक असून सार्वत्रिक निवडणूक २००२चे डी-१ या लेखाशिर्ष खालील तरतुदीमधून खर्च करावयाचा असून त्यासाठी मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता संविदास दिलेली असून त्यानुसार मेसर्स श्रुती प्रिंटर्स व मेसर्स कैलाश इंटरप्रायजेस यांचेकडून करारनामा करून काम सुरू करण्यात आलेले होते.

तरी सदर कामाची माहिती स्थायी समिती सभेपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ८५ दिनांकः-८ . ३ . २००२

सुचकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००२ करीता छपाई साहित्त्य पुरविणे कामी एकुण रू. १ ,३२ ,६३५/- रू. खर्चाची प्रशासनाने अनुक्रमाने वर नमुद केलेल्या लघुत्तम दराच्या निविदाकार मे.श्रुती प्रिंटर्स व मे. कैलाश एन्टरप्रायझेस यांच्याशी केलेल्या संविदा माहिती याची आजच्या सभेच्या कार्यवृत्तात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.**

--७--

विषय :- सन २००१-२००२ या सालाकरिता विविध प्रकारचे औषधे पुरविणे कामी प्रशासनाने मे. भारत एन्टरप्रायझेस व डायमंड एन्टरप्रायझेस यांच्याशी केलेल्या संविदा माहिती याची नोंद करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेचे भांडार विभागाव्दारे सन २००१-२००२ या सालाकरिता विविध प्रकारचे औषधे खरेदी करणेसाठी, फ्रि प्रेस जनरल (इंग्लिश)व नवशक्ती (मराठी) या दैनिक राज्यस्तरावरील वर्तमान पत्रामध्ये जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या त्यानुसार विहित कालावधीत खालील निविदाधारकांचे निविदा प्राप्त झाले.

१. मे.सुंदर इंटरप्राईजेस - उल्हासनगर-१.

२.	मे. भारत इंटरप्राईजस	- उल्हासनगर-३
३.	मे. डायमंड डिस्ट्रीब्युटर	- उल्हासनगर-४

दिनांक २२.१०.२००१ रोजी उपरोक्त निविदाधारकांचे निविदा उघडले असता. त्यांनी आवश्यक कागदपत्राची पुर्तता न केल्याने, निविदातील पुढील कारवाई करण्यात आली नाही परंतु त्यापैकी मे.भारत इंटरप्राईजेस व मे.डायमंड डिस्ट्रीब्युटर उल्हासनगर-४ यांनी नव्याने धंदा चालू केला असल्याने आवश्यक कागदपत्रे देण्यास असमर्थ असल्याने कळविले होते व त्यानुसार तसेच मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांचे अभिप्रायानुसार सदरहु दोन्ही निविदा उघडण्याबाबत निर्देश दिल्याने त्यानुसार मे.भारत इंटरप्राईजेस उल्हासनगर-३ यांची बाब क्र.१ ते ४६ ते ४८ ते ६२, ६४ ते ६८, ७० ते ७७ व ७९ ते ८० करिता तसेच मे.डायमंड डिस्ट्रीब्युटर उल्हासनगर बाब क्र. ४७,६३,६९ व ७८ साठी निविदा उघडून त्यातील लघुत्तम दर असून त्यासाठी एकूण रूपये ७५,५०९-०५ व रूपये ३,१९७/- इतका खरेदी खर्च येणार असून लेखाशिर्ष सी-२ (१) या तरतूदी मधून सदर खर्च करावयाचा आहे व या कामासाठी मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता संविदास दिलेली असून त्यानुसार मेसर्स भारत इंटरप्राईजेस व डायमंड डिस्ट्रिब्युटर उल्हासनगर यांचेकडून कामाचा करारनामा करून औषधे पुरविणेचे काम सुरू करण्यात आले आहे.

तरी सदर कामाची माहिती स्थायी समिती सभेपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ८६</u>		<u>दिनांक:-८. ३. २००२</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

**अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकुरदास बेहरानी.**

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार सन २००१-२००२करीता विविध प्रकारचे औषधे पुरविणे कामी वर नमुद केलेल्या खर्चाच्या प्रशासनाने मे. भारत



एन्टरप्रायझेस व मे. डायमंड डिस्ट्रीब्युटर या लघुत्तम दराच्या निविदाकारांशी केलेल्या संविदा माहिती याची आजच्या सभेच्या कार्यवृत्तात नोंद करीत आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

**अनुमोदकाची** <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

**सभापती / पिठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**

मा. सचिव :-विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.**

विषय :- उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००२ साठी रबर स्टॅम्प पुरविणेकामी मे. प्रशासनाने मे . डॉट कॉम ग्राफीक्स व मे. मोहिनी एन्टरप्रायझेस यांच्याशी केलेल्या संविदा माहिती याची नोंद करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेचे भांडार विभागव्दारे सन्-२००२ चे सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान केंद्रावर वाटप व उपयोगात आणण्यासाठी विविध प्रकारचे रबर स्टॅम्प (ऐरो क्रॉस मार्क व मतदान केंद्र क्रमांक स्थितीचे) खरेदीसाठी राज्यस्तरावरील दैनिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्त्या. त्यानुसार विहित कालावधीत खालील निविदा धारकांचे निविदा प्राप्त झाल्या.

१. मेसर्स डॉटकॉम ग्राफिक्स उल्हासनगर.
२. मेसर्स मोहिनी इंटरप्राईजेस उल्हासनगर.

**उपरोक्त निविदाधारकामध्ये बाबत क २ साठी समान लघुत्तम दर प्रस्तुत झाल्याने दोघांना समान कामाचे वाटप करण्यात आले. तसेच बाब क १ साठी मे. मोहिनी इंटरप्राईजेस उल्हासनगर यांचे लघुत्तम दर असून एकूण ४२५२०/-रू. इतका खर्च येणार आहे. सार्वत्रिक निवडणुक-२००२ डी-१ (१) या लेखाशिर्ष खालील तरतुदी मधून सदर खर्च करावयाचा आहे. व सदरहु कामासाठी मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता संविदास दिलेली असून त्यानुसार मेसर्स डॉटकॉम ग्राफिक्स व मेसर्स मोहिनी इंटरप्राइजेस यांचे कडून कामाचा करारनामा करून काम करण्यात आले होते.**



**तरी सदर कामाची माहिती स्थायी समिती सभेपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.**

स्थायी समिती ठराव क्र. ८७ दिनांक:-८. ३. २००२

**सुचकाचे नाव :-श्री. ठाकुरदास बेहरानी.**

**अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.**

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निविडणूक २००२ करीता रबर स्टॅम्प पुरविणे कामी वर नमुद केलेल्या खर्चाच्या प्रशासनाने मे. डॉटकॉम ग्राफिक्स व मे. मोहिनी एन्टरप्रायझेस या लघुत्तम दरांच्या निविदाकारांशी केलेल्या संविदा माहिती याची आजच्या सभेच्या कार्यवृत्तांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. १६ मध्ये ब्लॉक ए. ३२७ ते ३५९ पर्यंत बी.एम आणि ए.सी व रस्त्यालगतची नाली बनविणे कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना :-

उल्हासनगर-४ येथील प्र. क्र. १६ मध्ये ब्लॉक ए, ३२७ ते ३५९ पर्यंत बी.एम. आणि ए.सी. व रस्त्यालगतची नाली बनविणे कामाचे अंदाजपत्रक रूपये ७६६५८४/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करण्यात आले असून सदर काम दलित वस्ती योजने अंतर्गत (शासकीय अ०नुदान) सहा. संचालक, नगररचना, जिल्हा ठाणे यांनी प्रस्तावास मंजुरी दिलेली असून अटी व शर्ती नुसार नगररचनाकार, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सदर काम करून घेण्यासाठी शिफारस केली आहे. सदर कामाचे निविदा मागविण्यात आले होते. परंतु निविदाकारांकडुन योग्य प्रतिसाद म्हणजे निविदा भरल्या



नसल्यामुळे निविदा निश्चित करण्यात आले नाही. व शासकीय अनुदानाचा योग्य तो वापर व्हावा या दृष्टीने मा. आयुक्त यांनी सदरचे काम तातडीने घेण्यात येण्यासाठी महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२)(२) अन्वये काम करण्याची शिफारस केली आहे.

मुख्यलेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी सदरचे काम ५ (२)(२) अंतर्गत करून घेण्यासाठी शिफारस केली आहे. तरी सदर कामाच्या प्राकलनिय रूपये ७६६५८४/- यांस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२)(२)नुसार मंजुरी मिळणे साठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.८८ दिनांक:-८ . ३ . २००२

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठाकुर बेहरानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार दलित वस्ती योजनेतर्गंत शासकीय अनुदानातुन उल्हासनगर-४ येथील प्रभाग क्र. १६ मध्ये ब्लॉक ए ३२७ ते ३५९ पर्यंत बी. एम आणि ए.सी. व रस्त्यालगतची नाली बनविणे कामी एकूण रूपये. ७,६६,५८४/-अंतर्भुत खर्चाची निविदाशिवाय थेट संविदा प्रशासनास आवश्यक वाटेल व महापालिकेला फायदेशिर त्या ठेकेदाराशी करण्यास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-हा प्रस्ताव समंत केला जावा. त्याचबरोबर या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता. या प्रस्तावाबाबत, ठरावाबाबत कार्यवाही करण्यांत यावी. तशी ठरवात नोंद घेण्यात यावी.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा यांच्या सुचनेच्या समावेशासह सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर-४येथील गोकूलधाम ब्लॉक सी-१३ समोरील महापालिकेच्या कब्जात असलेल्या जागेवर ब्रम्हकुमारीज यांना स्वखर्चावर बगीचा विकसित करणे व साभांळणे कामी परवाना देणे बाबत.

--११--

प्रस्तावना :-

उल्हासनगर महानगरपालिकेला वर्ल्डस्पिटिच्युअल ट्रस्ट या संस्थेने त्यांच्याकडिल दिनांक ६.१२.२००१ च्या पत्रानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने कुंपण घालून बंदीस्त केलेली ब्लॉक सी-१३ गोकूळधाम समोरील, देवसमाज हॉल च्या लगतची जागा बगीचा विकसित करून त्याचा सांभाळ करण्याकरिता त्यांचे ताब्यात देण्याकरिता मागितलेली आहे. वर्ल्ड स्पिटिच्युअल ट्रस्ट या संस्थेकडे उल्हासनगर-१ येथील गोलमैदान उद्यान हे विकसित करून सांभाळण्यासाठी यापुर्वी दिलेले आहे. व त्यांचेतर्फे सदर बगीच्याची देखभाल समाधानकारक रित्त्या होत आहे. सदर बगीच्याची देखभाल समाधानकारक रित्त्या होत आहे. आता वर्ल्डस्पिटिच्युअल ट्रस्ट ने उपरोक्त उल्हासनगर-४ येथील मागितलेल्या जागेवर अनाधिकृत बांधकामापासून बचाव व्हावा या उददेशाने तत्त्कालीन नगरपालिकेने सुमारे २० वर्षापुर्वी भीतीचे कुंपण घालून बंदीस्त केलेली आहे. तेव्हापासून सदर जागेचा ताबा उल्हासनगर महानगरपालिकेकडे व त्यापश्चात नगरपालिकेचे महानगरपालिकेत रूपांतर झाल्यानंतर या महानगरपालिकेकडे आहे.

वर्ल्डस्पिटिच्युअल ट्रस्ट यांच्या दिनांक ६.१२.२००१ च्या पत्रानुसार सार्वजनिक बांधकाम खात्याने सदर प्रकरण सादर केले असता या महानगरपालिकेचे नगररचनाकार यांनी जागेचे कागदोपत्री हस्तांतरण होणेकरिता उप-विभागीय अधिकारी, उल्हासनगर यांना त्यांचे कडिल पत्र क्र. उमपा/नरवि/जी आर/११९, दिनांक १.३.२००२ नुसार कळविलेले आहे. सदर नगररचनाकार यांच्या पत्राबाबत या महानगरपालिकेचे विधी अधिकारी यांचे कडून अभिप्राय मागविण्याकरिता मा. आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार विधी अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ४.३.२००२ रोजी अभिप्राय दिलेले असून त्यात विधी अधिकारी यांनी सदर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात मागील २० वर्षापासून असल्याने त्याचा विकास करणेकरिता कराराचे दिवसापासून १ वर्षाकरिता लायसन्स देणेकरिता शिफारस केलेली आहे.

तरी सदर जागा वर्ल्डस्पिटिच्युअल ट्रस्ट यांना १ वर्षाकरिता सार्वजनिक बगिच्या करीता विकसित करून ते सांभाळण्याकरिता (डंपदजंपदे) साठी लायसेन्स गोलमैदान येथील बगीचा ज्या अटी शर्तीवर दिलेला आहे. त्या अटी शर्तीवर देण्याकरिता प्रस्ताव मंजुरीकरिता स्थायी समितीकडे सादर करण्यास प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.८९ दिनांक:-८.३.२००२

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर-४ येथिल गोकुळधाम ब्लॉक सी- १३ समोरील महापालिकेच्या कब्जात असलेल्या जागेवर प्रजापिता ब्रम्हाकुमारीज या संस्थेला स्वखर्चावर बगीचा विकसित करणे व देखभाल दुरूस्ती करणे कामी १ वर्षाच्या कालावधीसाठी आयुक्त ठरवतील, अशा अटी व शर्तीवर जागा वापर परवाना देणेस मान्यता देत आहे.

तसेच आयुक्तांच्या समाधानकारतेच्या अधीन राहून सदरचा परवाना एका वर्षापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधी वेळोवेळी नुतनीकरण करणेसाठी आयुक्तांना प्राधिकृत



करण्यात येत आहे. तसेच सदरचा ठराव इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्वरीत अंमलात आणण्यात यावा.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. ०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-२८.३.२००१.

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक २८.३.२००१ रोजी दुपारी १२.४५ वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

१. मा.सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.

| | |
|---|---|
| २. श्रीमती. कुंदनानी लविना | सदस्या |
| ३. श्री. पारवानी रामचंद | सदस्य |
| ४. श्री. चव्हाण रमेश | सदस्य |
| ५. श्री. वहरानी ठाकुरदास | सदस्य |
| ६. श्री. टाले प्रमोद | सदस्य |
| ७. श्री.तलरेजा विनोद | सदस्य |
| ८. श्री. वनवारी किशोर | सदस्य |
| ९. श्रीमती. राघवानी आशा | सदस्या |
| १०. श्री. केणी जयकुमार | सदस्य |

तर

१. श्री. आयलानी कुमार ,२ श्री. कैलास तेजी, ३ श्रीमती. राजानी भारती, ४. श्रीमती. पदमा वलेचा ,५. श्रीमती. वेलकर सुरेखा, ६. श्रीमती. सोनावणे यमुना हे सदस्य/ सदस्या सभेस अनुपस्थितीत होते/ होत्त्या.

दुपारी १२.४५ वाजता सभेची सुरूवात करण्यांत आली.

**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-**आजच्या सभा सूचनेवर काही महत्त्वपुर्ण विषय असल्याने त्यावर आपसात सखोल विचार विनिमय करण्यासाठी ह्या सभेचे कामकाज अर्ध्या तासासाठी स्थगित करण्यांत यावे.

**मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-**मा. सदस्य श्री. किशोर वनवारी यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे या सभेचे कामकाज अर्ध्या तासासाठी स्थगित करण्यांत येत आहे.

दुपारी १२.४५ वाजता सभा अर्ध्या तासासाठी स्थगित करण्यांत येत असल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्थगित करण्यांत आलेल्या सभेचे कामकाज दुपारी १.३० वाजता पुन्हा सुरू करण्यांत आले.

--२--

**मा.सचिव :-**कृपया सर्वांनी लक्ष दया, मा. पिठासिन अधिकारी यांचा अनुरोध आहे की, यासभेचे कामकाज दि. ३०.३.२००२ रोजी सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत येत आहे.

दुपारी १.३० वाजता सभेचे कामकाज स्थगित करण्यांत येत असल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक:-३० ३ २००२ .

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक २८ ३ २००२ रोजी दुपारी १२ . ४५ वाजता आयोजित करण्यांत आली होती सदर सभा स्थगित करून ती शनिवार दिनांक ३० ३ २००२ रोजी दुपारी ४ . ३० वाजता महापालिका प्रशासकिय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यात आली. सदर सभेत माननीय सभापती श्रीमती. ज्योती कालानी हया पिठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्त्या. तसेच खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या सभेस उपस्थित होते / होत्त्या.

१ . मा.सभापती :- श्रीमती. ज्योती कालानी.

२ . श्रीमती. कुंदनानी लविना सदस्या
३ . श्री. पारवानी रामचंद सदस्य
४ . श्री. बहरानी ठाकुरदास सदस्य
५ . श्री.तलरेजा विनोद सदस्य
६ . श्री. वनवारी किशोर सदस्य
७ . श्रीमती. राधवानी आशा सदस्या
८ . श्री. केणी जयकुमार सदस्य

तर

१ श्री. आयलानी कुमार, २ श्री. चव्हाण रमेश, ३ श्री. टाले प्रमोद ,४ श्री. कैलास तेजी, ५ श्रीमती. राजानी भारती, ६ . श्रीमती. पदमा वलेचा, ७ . श्रीमती. वेलकर सुरेखा,
८ . श्रीमती. सोनावणे यमुना हे सदस्य / सदस्या सभेस अनुपस्थितीत होते / होत्त्या.

सांयकाळी ४ . ४५ वाजता सभेची सुरूवात करण्यांत आली.

मा. सचिव:- विषय क्र. १ वाचून दाखवितात.

मागील सभेचे दिनांक ४ ३ २००२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- मागील सभेचे दिनांक ४ ३ २००२ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव :- **विषय क्र. २ वाचून दाखवितात.**

काही सदस्य :-**पास. पास.**

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- **सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.**

--४--

विषय :-उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००२ मतमोजणीचे दिवशी कॅटरिंग सर्व्हिसेस पुरविणे कामी एकूण रू. १,३२,०००/- अंतर्भूत खर्चाची प्रशासनाने मेसर्स श्री. साई विश्वास सर्व्हिसेस मुंबई यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेचे भांडार विभागाने सार्वत्रिक निवडणूक २००२ चे मतमोजणीचे दिवशी व संपेपर्यंत टाऊन हॉल येथे कार्यरत अधिकारी/कर्मचारी /सुरक्षा यंत्रणा इत्यादीसाठी कॅटरींग सर्विस पुरविणेसाठी राज्यस्तरावरील दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहिर निविदा मागविणेसाठी प्रसिध्द करण्यात आले होत्त्या. त्यानुसार विहित कालावधीत खालील निविदा धारकांचे निविदा प्राप्त झाल्या होत्त्या.

१) मे.साई विश्वास कॅटरिंग --- मुंबई
२) मे. साई समर्थ भोजनालय ---मुंबई

उपरोक्त निविदाधारकांमध्ये मेसर्स श्री. साई विश्वास कॅटरिंग सर्विस मुंबई यांचे उपरोक्त कामासाठी निविदातील दर रुपये १०२ =५० होते व वाटाघाटी केलेनंतरचे दर रुपये ९५/-प्रति व्यक्ती असे लघूत्तम दर असून त्यास एकूण रु. १,३२,०००/- इतका खर्च येणार असून सार्वत्रिक निवडणूक २००२ चे डी-१ (१) या लेखा शिर्ष खालील तरतूदीमधून खर्च करावयाचा आहे. त्यासाठी मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता संविदास दिलेली असून त्यानुसार मेसर्स श्री. साई विश्वास कॅटरिंग सर्विस, मुंबई यांचेकडुन करारनामा करुन काम सुरु करण्यात आलेले होते.

तरी सदर कामाची माहिती स्थायी समिती सभेपूढे सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र.९० दिनांक:- ३०. ३. २००२.

**सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.**
**अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.**

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००२ मतमोजणीचे दिवशी कॅटरिंग सर्व्हिसेस पुरविणे कामी मतमोजणीचे दिवशी कॅटरिंग सर्व्हिसेस पुरविणे कामी एकूण रू. १,३२,०००/-अंतर्भूत खर्चाची प्रशासनाने मे.साई विश्वास कॅटरिंग सर्व्हिसेस मुंबई यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती आजच्या कार्यवृत्तात नोंद करीत आहे.

**सुचकाची** सही/-
**अनुमोदकाची** सही/-

एकमताने मंजुर

**सभापती / पिठासीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**

मा. सचिव:- विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

काही सदस्य :-पास. पास.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २००२ साठी मतदार यादयांचे छपाई कामी एकुण रू. ६ ,९६ ,०००/- अंर्तभूत खर्चाची प्रशासनाने मे. विशाल प्रिंटर व मेसर्स सिध्दराज सेल कॉपोरेशन यांच्याशी केलेल्या संविदांची माहिती नोंद करणे बाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेचे भांडार विभागाचे सार्वत्रिक निवडणूक-२००२ चे मतदार यादया छपाई करून घेणेसाठी राज्यस्तरावरील दैनिक वर्तमान पत्रामध्ये जाहिर निविदा मागविणेसाठी प्रसिध्द करण्यात आले होत्त्या त्यानुसार विहित कालावधीत खालील निविदा धारकांचे निविदा प्राप्त झाल्या होत्त्या.

१. मेसर्स विशाल प्रिंटर्स-खामगांव
२. मेसर्स सिधराज सेल कॉरपोरेशन - पुणे
३. मेसर्स श्रीराम मुद्रण मंरिद - पुणे
४. मेसर्स राज प्रिंटर्स

उपरोक्त निविदाधारकांपैकी मे.विशाल प्रिंटर्स व मे.सिधराज सेल कॉपोरेशन यांचे समान लघुत्तम दर रूपये ११७.२४ होते त्यांना उपरोक्त कामासाठी वाटाघाटी केले नंतरचे लघुत्तम दर रूपये ५८/- प्रत्त्येक पानास असे किमान प्रत्त्येकी ६० संच साठी असून एकूण रूपये ६९६०००/- इतका खर्च येणार असून सार्वत्रिक निवडणूक २००२ चे डी-१ या लेखाशिर्ष खालील तरतुदी मधून खर्च करावयाचा आहे. त्यासाठी मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता संविदास दिलेली असून त्यानुसार मे.विशाल प्रिंटर्स खामगांव व मे. सिधराज सेल्स कॉर्पोरेशन पुणे यांचेकडून करारनामा करून काम सुरू करण्यात आलेले होते.

तरी सदर कामाची माहिती स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९१ दिनांक:- ३० ३. २००२.

सुचकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००२ साठी मतदार यादयांचे छपाईकामी एकूण रू. ६,९६,०००/-अंर्तभुत



खर्चाची प्रशासनाने मे. विशाल प्रिटर्स व मेसर्स सिधराज सेल कार्पोरेशन यांच्याशी केलेल्या सांविदांची आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

**सभापती / पिठसीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

<u>मा. सचिवः-</u> **विषय क्र. ४ वाचून दाखवितात.**

<u>काही सदस्य :-</u>**पास. पास.**

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.**

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी भाडे तत्त्वावर खाजगी टॅकरने पाणी पुरविणे कामीचे प्राकलनास प्रशासकिय व <u>वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेने आपल्या हददीत पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी खाजगी टॅकरने आवश्यकतेनुसार पाणी पुरवठा करणे सुरू आहे. कारण उल्हासनगर शहराची भौगोलिक स्थिती उंचसखल असून शहरातील काही भाग पिण्याचे पाणी वितरण व्यवस्थेच्या टोकाशी असून सदर भागातील नागरिकांना पाणी पुरवठा करणे क्रम प्राप्त असल्याने पर्यायी व तात्त्पुरर्ती उपाययोजना म्हणुन जुन्याच मंजुर फेरी स्थायी समिती ठराव क्र. १८३ दि. २४.२.१९९९ अन्वये दिनांक ६.३.९९ पासुन आवश्यकतेनुसार सध्या तीन ठेकेदारांमार्फत गरजेनुसार सुरू आहे. आता परत नवीन निविदा सुचना काढून उपरोक्त मंजूर वाहतुक खर्च दर आणि ठेकेदार नियुक्त करणे अत्त्यंत गरजेचे आहे.

आता सध्याची १४० टॅकर खेपांची दररोज गरज लक्षात घेता पुढील कामासाठी (एप्रिल २००२ ते मार्च २००३) सदर टॅकर संख्या सरासरी गृहीत धरून या कार्यालयात या कामाचे अंदाजीत प्राकलन रू. <u>२०३/-</u> x १४० टॅकर x ३६५ दिवस = एकुण रू. १०३,७३७००/- या रक्कमेचे तयार केलेले आहे. सदर बाब लेखा शाखा तसेच लेखा परिक्षण शाखा यांचेकडे अभिप्रायसाठी सादर केली होती त्यांची निविदा सुचना काढण्यास अनुमती दिलेली असून मा. आयुक्त यांनी सदर प्रकरण अंदाजीत प्राकलन आणि या कामाच्या जाहिर निविदा सुचना काढणे इत्त्यादी बाबींना प्रशासकीय आणि वित्तिय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती सभेत ठेवण्यास सुचीत केलेले आहे.

सध्या पाणी पुरवठयाची स्थिती आणि नागरिकांची वाढती मागणी लक्षात घेता सदर तात्पुर्ती उपाय योजना आणखी काही दिवस सुरू ठेवणे आवश्यक आहे



म्हणुन या कामाचे पुढील वर्षासाठीचे रू. १,०३,७३३००/- अंदाजित प्राकलनास प्रशासकीय आणि वित्तिय मान्यता देणे आणि आता प्रथम फक्त सहा महिन्यासाठी जाहिर निविदा सुचना काढुन योग्य ठेकेदार निश्चित करणे आणि पुढे आवश्यकता वाटल्यास परत निविदा सुचना काढून सदर तात्पुर्ती पर्यायी उपाय योजना सुरू ठेवणे इत्यादी बाबीसाठी मान्यता मिळणेकरिता सदर प्रकरण स्थायी समिती सभेत पाठविण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ९२</u>　　　　<u>दिनांकः- ३०.३.२००२.</u>

**सुचकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.**

**अनुमोदकाचे नाव :-श्री. केणी जयकुमार.**

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील पाणी टंचाईच्या विविध ठिकाणी भाडे तत्त्वावर खाजगी टॅकरने पाणी पुरविणे कामीचे उपरोक्त रक्कमेच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

तसेच पूढील स्थायी समिती कडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता वरील ठरावा अंतर्गतचा निर्णय अंतीम राहील.

**सुचकाची** <u>सही/-</u>
**अनुमोदकाची** <u>सही/-</u>

<u>एकमताने मंजुर</u>

**सभापती / पिठसीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**उल्हासनगर महानगरपालिका**

<u>मा. सचिवः-</u> **विषय क्र. ५ वाचून दाखवितात.**

<u>काही सदस्य :-</u>**पास. पास.**

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u> **सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.**

<u>विषय :-</u> सन २००१-२००२करिता अग्निशमन साहित्त्य पुरविणे कामी एकूण रू. १,६२,९५०/- अंर्तभूत खर्चाची प्रशासनाने मे.मोहिनी इंन्टरप्राईजेस व मे. सिंन्थोक यांच्याशी केलेल्या संविदांची माहिती नोंद करणे बाबत.

_ उल्हासनगर महानगरपालिकेचे भांडार विभागाने सन २००१-२००२ या वार्षिक कालावधीसाठी अग्नीशमन विभागाचे मागणीनुसार, अग्नीशमन साहित्य खरेदी करणेसाठी राज्यस्तरावरील दैनिक वर्तमानपत्रामध्ये जाहिर निविदा मागविणेसाठी प्रसिध्द



सुचना करण्यात आल्या होत्त्या त्यानुसार विहित कालावधीत खालील निविदा धारकांचे निविदा प्राप्त झाल्या होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | मेसर्स मोहिनी इंटरप्राइझेस | उल्हासनगर |
| २. | मेसर्स ब्रीजबासी सेफ्टेक | नवी दिल्ली |
| ३. | मेसर्स झेनिथ फायर सर्विस | घाटकोपर |
| ४. | मेसर्स सिन्थोक | घाटकोपर |
| ५. | मेसर्स उमा इंटरप्राईझेस | उल्हासनगर |

उपरोक्त निविदा धारकांमध्ये मेसर्स मोहिनी इंटरप्राईझेस उल्हासनगर यांचे बाब क्र. २ साठी तसेच मसर्स सिन्थोक,घाटकोपर यांचे बाब क्र१ ,३ ,४ , व ६ साठी लघुत्त्तम दर असून बाब क्र. ५ साठी अंदाजित दरापेक्षा अवाजवी भाव प्राप्त झाल्याने सदरहू बाब निविदा मधून वगळण्यात आली असून इतर बाबीसाठी अनुक्रमांकाने रूपये ४५५००/- व रूपये ११७४५०/- असा एकुण रूपये १६२९५०/- इतका खरेदी खर्च येणार असून त्यास बी-२ ( १११)या लेखाशिर्ष खालील तरतुदी मधून खर्च करावयाचा असून त्यासाठी मा. आयुक्त उल्हासनगर-१ महानगरपालिका यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता संविदास दिलेली असून त्यानुसार मेसर्स मोहिनी इंटरप्राईझेस व मेसर्स सिन्थोक यांचेकडून करारनामा करून काम सुरू करण्यात आलेले होते.

तरी सदर कामाची माहिती स्थायी समिती सभेपुढे माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९३ दिनांकः- ३०.३.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. ठाकुर बेहरानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार वर नमुद केलेल्या कालावधी करिता अग्निशमन साहित्य पुरविणे कामी एकूण रू. १,६२,९५०/- अंर्तभूत खर्चाची प्रशासनाने मे. मोहिनी इंन्टरप्राईजेस व मे.सिन्थोक यांच्याशी केलेल्या संविदांची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

मा. सचिव:- विषय क्र ६ वाचून दाखवितात.

--९--

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-पास. पास.

मा. सदस्य श्री. ठाकुरदास बेहरानी:-काय आहे ते तर कळु दया.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-माहितीची नोंद करणे बाबत आहे काम कधीच झाले आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय :- महानगरपालिकेचे भंगार साहित्त्याची विल्हेवाट लावणेकामी मान्यता देणेबाबत.

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात पडून असलेल्या भंगार सामानांची विल्हेवाट लावणेसाठी खालील प्रमाणे तक्ता तयार केला असून व भंगार सामानाचे अंदाजित वजन व त्याची होणारी किंमत खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | अंदाजित एकूण वजन | दर रू. | अंदाजित किंमत |
|---|---|---|---|
| १) | २०० किलो | ८.०० | १६०० |

तसेच मुख्यलेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक देखिल सामानाची सदर किंमतीस विल्हेवाट लावणेसाठी संमती दिलेली आहे. वरील प्रमाणे तूटलेल्या खुच्या आणि टेबलांचे अंदाजित वजन २०० किलो येत असून त्यांची अंदाजित किंमत रू. १६००/- इतकी होत आहे. सदर खुर्च्यांची व टेबलांची विल्हेवाट लावण्यासाठी स्थायी समितीची मंजूरी मिळणेसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र.९४ दिनांक:- ३०.३.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.
अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उपरोक्त भंगार साहित्त्याची विल्हेवाट लावणे कामी मान्यता देत आहे.

तसेच पूढील स्थायी समिती कडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता वरील ठरावा अंतर्गतचा निर्णय अंतीम राहील.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठसीन अधिकारी

मा. सचिवः- विषय क्र.७ वाचून दाखवितात.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :- शहरातील पाणी टंचाईच्या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे टॅंकरने पाणी पुरवठा करणे कामी वाहतूक खर्च आकारणेस मान्यता देणे बाबत.

मा. सचिवः- विषय क्र.८ वाचून दाखवितात.

काही सदस्य :-पास. पास.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः- सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय :- मेसर्स गुरुकृपा कन्स्ट्रक्शन यांना आपल्या स्वखर्चावर उल्हासनगर -१ येथिल बॅरेक क्र. ३१ बी जवळील चौकात वाहतूक बेट विकसित व सुशोभित करणे कामी परवाना देणे बाबत.

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार उल्हासनगर-१ येथील मे.गुरूकृपा कंन्स्ट्रक्शन हे बॅ. क्र. ३१ बी उल्हासनगर यांनी त्यांच्या कडील दि. ३०.८.२००१ च्या पत्राने उल्हासनगर-१ येथील बॅ. क्र. ३१ बी व बगीच्या या दरम्यानच्या रस्त्याच्या चौकात वाहतूक बेट बांधून देण्यास त्यांच्या खर्चाने तयार असल्याचे कळविले आहे. या कामासाठी उल्हासनगर वाहतूक शाखेचे पोलीस उप-निरिक्षक यांनी मे. गुरूकृपा कंन्स्ट्रक्शन यांनी तयार केलेल्या नकाशाप्रमाणे त्रिकोणी आकाराचे वाहतूक बेट चौकाच्या मधोमध तात्पुरत्त्या स्वरूपात बांधणेकरिता ना हरकत दाखला दिलेला आहे. सदर वाहतुक बेटाचे बांधकाम स्थायी स्वरूपाचे होणार असल्याने या महानगरपालिकेने वाहतूक शाखेतर्फे तात्पुरत्त्या स्वरूपात ना हरकत दिल्याबददल त्यांचेकडे इकडील पत्र क्र. उमपा/साबा/शआ/८ दिनांक ४.३.२००२ नुसार अभिप्राय मागितला होता. परंतु याबाबत त्यांचेकडून स्पष्टीकरण आलेले नाहीत. त्यामुळे वाहतूक विभागाकडून तात्पुरत्त्या स्वरूपात सदर वाहतूक बेट उभारण्यास ना हरकत असल्याचे या महानगरपालिकेतर्फेही मे. गुरूकृपा कंन्स्ट्रक्शन यांना तात्पुरत्त्या स्वरूपात सदर बेट उभारण्याकरिता परवानगी देण्याचे, व जेव्हा कधी महानगरपालिका अथवा वाहतूक शाखा सदर वाहतूक बेट तोडण्याकरिता सूचना देईल, तेव्हा मे.गुरूकृपा कंनस्ट्रक्शन हे त्यांच्या स्वखर्चाने कोणत्त्याही प्रकारचा हक्क न दाखवता तोडून देतील या अटीवर परवानगी देण्याकरिता प्रस्ताव स्थायी समितीकडून मंजुरी मिळण्यासाठी प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९५ दिनांकः- ३०.३.२००२.

सुचकाचे नाव :-श्री. किशोर वनवारी.
अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार आयुक्त ठरवतील अशा अटी व शर्तीवर मे.गुरूकृपा कंन्स्ट्रक्शन यांना आपल्या स्वखर्चावर उल्हासनगर-१ येथील

बॅरेक क्र. ३१ बी, जवळ व बगीच्या जवळील चौकात वाहतुक बेट बांधणे, विकसित व देखरेख करणे कामी आणि सुशोभित परवाना देणेस मान्यता देत आहे.



तसेच आयुक्तांच्या समाधानकारकतेस अधिन राहून सदरचा परवाना एका वर्षापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीसाठी वेळोवेळी नुतनीकरण करण्यासाठी आयुक्तांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

तसेच पूढील स्थायी समिती कडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता वरील ठरावा अंतर्गतचा निर्णय अंतीम राहील.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः- विषय क्र.९ वाचून दाखवितात.

मा. सदस्या श्रीमती आशा राधवानीः- आयुक्तांना अधिकार दया.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-नव्या निविदा मागवा. तोपर्यंत त्यांना मुदतवाढ दया.

मा. सदस्य श्री. रामचंद पारवानीः-नव्या निविदा मागवा तोपर्यंत त्यांना १५ दिवसाची मुदतवाढ दया.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-आयुक्तांना तर अधिकार आहेत त्यांनी लवकरात लवकर निविदा मागवाव्यात.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-एक महिन्याच्या आत निविदा मागवा.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-स्थायी समितीने ठरवावे.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः-३१ मार्चच्या आत त्यांनी निविदा मागवायला पाहिजे होत्त्या. हे लोक आता हे स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी आणत आहेत. यांना माहित होते ३१ मार्चला मुदत पुर्ण होते. त्यांनी १ मार्च पासुन कार्यवाही सुरू करायला पाहिजे होती. मार्चच्या शेवटी ते परमिशनसाठी म्हणुन स्थायी समिती पुढे आणतात. आता निविदा मागविणार पुढील कार्यवाही होणार असाच एक महिना निघुन जाईल. विभागास माहित असते की ३१ मार्चला बजेट सादर केले जाते. त्यांनी या आधीच निविदा मागवायला पाहिजे होत्त्या.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-आता तरी एका महिन्याच्या आत निविदा मागवा.

काही सदस्य :-पास. पास.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--१२--

विषय :- शहरातील कचरा वाहतुकीच्या कामी पुढील निविदेची प्रक्रिया पूर्ण होईतोपर्यंत सद्या कार्यरत असलेल्या ठेकेदाराच्या मुदतवाढीस मंजूरी देणेबाबत.

सद्याचे कचरा वाहतूक कामाची मुदत दि. ३१.३.२००२ रोजी संपत आहे. तरी सन २००२-२००३ या सालातील आर्थिक वर्षात शहरातील घन कचरा उचलण्याच्या कामासाठी अनुभवी ठेकेदाराकडून नव्याने निविदा मागविणे आवश्यक आहे.

खालील शर्ती व अटी पूर्ण करणा-या निविदा दारांकडून नविन निविदा दर मागवियात यावीत.

१)त्याचे स्वतःचे मालकीचे कमीत कमी ४० ट्रक्सांडंम्पर्स तसेच जेसीबी मशीन व प्रोकलेन मशिन असल्याबाबतचे कागदपत्र सादर करणे आवश्यक राहील.
२) वाहनावर त्यांनी स्वतःचे पुरेसे मजूर पुरविणे आवश्यक राहील.
३) त्यांचेकडे दररोज ३०० ते ४०० टन घन कचरा उचलण्याचा कामाचा दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
४)त्यांची वार्षिक प्राकनाचा अर्ध्या रक्कमेची १.२ कोटी रूपये आर्थिक पत (क्षमता) असणे आवश्यक आहे.

तरी सदर कामाची निविदा मागवून नविन एजंन्सी कार्यरत होईपर्यंत मे.व्ही. आर. पनवेलकर यांचे कामास मुदत वाढ देणे बाबतचे आवश्यक ती मंजूरी मिळणेसाठी तसेच प्रशासकीय व वित्तिय मंजूरीसाठी मा. स्थायी समिती समोर प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ९६ दिनांकः- ३०.३.२००२.

**सुचकाचे नाव :-श्रीमती. लविना कुंदनानी.**

**अनुमोदकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.**

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार शहरातील कचरा वाहतुकीच्या कामी पुढील निविदेची प्रक्रिया पुर्ण होईतोपर्यंतच्या आवश्यक त्या कालावधीसाठी सध्या कार्यरत असलेले ठेकेदार श्री. व्ही. आर. पनवेलकर यांना दि. १.४.२००२ पासुन त्या प्रयोजनार्थ एक महिन्याची मुदत वाढ देणेस व प्रशासनास त्यांच्याशी पुर्वीच्या संविदेतील अटी,शर्ती व दरावर निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करित आहे.

तसेच पूढील स्थायी समिती कडून कार्यवृत्त कायम होण्याची वाट न पहाता वरील ठरावा अंतर्गतचा निर्णय अंतीम राहील.

**सुचकाची** सही/-
**अनुमोदकाची** सही/-

एकमताने मंजुर

**सभापती / पिठसीन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. १० वाचुन दाखवितात.

<u>काही सदस्य :-</u>पास.

<u>मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषयः- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम अंतर्गतचे सात विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदांची माहिती <u>नोंद करणे बाबत</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००१-२००२ च्या निधीतून कामे करणेसाठी मा. महापौर /नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामांचे नाव | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर-४ येथिल प्र.क्र. ५५ मध्ये भिमनगर मध्ये रस्ता एम-२५०ने बांधणे. (गलिच्छ वस्ती) २९०१ | १,९९,९९०/- | ११.३.२००२ | शिवानी म.का.सोसा. |
| २. | उल्हासनगर-४ येथिल प्र.क्र.१७ मध्ये सिध्दार्थनगर वसाहतीच्या रहीवाशांसाठी सहा बैठकीचे सार्वजनिक शौचालय बांधणे. (दुर्बल घटक) २९९४ | २,४४,०७५/- | ११.३.२००२ | बिस्मील्ला म.का.सोसा. |
| ३. | उल्हासनगर- येथिल प्र.क्र. ३२ मध्ये हॅपी होम बंगला बाळकिशन नगर आणि विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा आणि नाली बांधणे.(नगरसेवक निधी) ३०२५ | १,९८,७७५/- | ११.३.२००२ | मुंब्रादेवी म.का.सोसा. |
| ४. | प्र.क्र. ३३ मध्ये बॅ.नं.३८६,३८७ महान कॉटेज जवळ व विविध ठिकाणी सी. सी. पायवाटा आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधी) ३०२६ | १,९८,७००/- | ११.३.२००२ | मुंब्रादेवी म.का.सोसा. |
| ५. | उल्हासनगर-येथे प्र.क्र.६३ मध्ये सिंघानी हेमराडरी बॅ. नं. ७० ते ७६ आणि विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा, नाली बांधणे. (नगरसेवक निधी) | | | |

३०५९        १,९९,९५०/-   ११.३.२००२ शिवानी म.का.सोसा.



६. उल्हासनगर- येथिल
प्र.क्र. ६५ मध्ये बॅ. नं.
३२० आणि ३१७ आणि विविध
ठिकाणी सिमेंट रस्ता बनविणे.
(नगरसेवक निधी)
३०६१        १,४९,८७०/-    ११.३.२००२ रेणुकामाता म.का.सोसा.

७. प्र.क्र. ४ मध्ये गवळी सिंग हाऊस ते
मेनगेट गार्डन येथे एम.२५० ने रस्ता
बांधणे व धोबीघाट येथे मधूरदास यांचे
घराजवळ संरक्षण भिंत बांधणे.
(नगरसेवक निधी)
३०६७        १,९९,३५०/-    ११.३.२००२  आशा म.का.सोसा.

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिकम महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.९७</u>                <u>दिनांकः- ३०.३.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. केणी जयकुमार.

अनुमोदकाचे नाव :-श्री. ठकुरदास बेहरानी.

हि स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील वर नमुद केलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गतचे ७ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदांची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांतात नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव</u> :-सभा संपली का?

मा. सदस्य श्री. किशोर वनवारी:-नाही. आता आमच्या अध्यक्षा काही बोलु इच्छितात.



मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-मा. आयुक्त व सर्व सन्माननिय स्थायी समिती सदस्य व विभाग प्रमुख आज मी तुम्हा सर्वांचे आभार मानते. आजची ही या कार्यकालाची शेवटची सभा आहे. आपण सर्व पदावरून सेवा निवृत्त होत आहोत. तुम्ही ज्याप्रमाणे आम्हाला सहयोग दिला त्याचप्रमाणे नविन येणा-या बॉडीला पण तसेच सहकार्य दयावे. मी विपक्षाचे पण आभार मानते त्यांनी आम्हाला सहकार्य दिले असेच सहकार्य पुढे पण देतील अशी आशा ठेवते.

मा. सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:-मी तीन वर्ष स्थायी समिती सदस्य म्हणुन आहे. मला भाभी ज्योती कालानी व सर्वांनी चांगले सहकार्य केले त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :- मी ज्योती भाभींना विनंती करतो की फुल देऊन सर्वप्रथम आयुक्तांचे स्वागत करावे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी आयुक्तांचे फुल देऊन स्वागत केले.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:- आता सचिव साहेबांचे फुल देऊन स्वागत करावे.

मा. सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-मी सचिव साहेबांचे आभार मानते त्यांनी सर्व पक्षीयांना पक्षपात न करता चांगले सहकार्य दिले. त्यांचा यात जास्त सहयोग आहे. असे म्हणुन श्रीमती ज्योती कालानी यांनी फुल देऊन त्यांचे स्वागत केले.

अशात-हने मा. श्री. दत्ता भडकवाड साहेब,श्री. चिजवानी साहेब,श्री. पाटणकर साहेब, श्री. कारचे साहेब यांचे फुल देऊन स्वागत करण्यांत आले.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-आता आमचे मुख्य लेखा अधिकारी व शेंडे साहेब यांचे स्वागत करा.

श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-आता तर मी इथुन जाणार आहे, चार वर्ष झाली आहेत, थोडे दिवस उरले आहेत.

मा.सदस्या श्रीमती. ज्योती कालानी:-आम्ही तुमची इतकी प्रशंसा करतो आणि तुम्ही आमच्यावर आरोप ठेऊन जाता की आम्हाला तुम्हाला पाठवत आहे अशाने आम्हाला दुःख होते असा आरोप ठेऊन जाऊ नका.

श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-माझा कार्यकाल पुर्ण झाला असल्याने माझी प्रशासकीय स्तरावर बदली झाली आहे मी तुमच्या वर आरोप ठेवत नाही.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारी:-कुणीही असो आम्ही कुणाला दुखवले नाही सर्वांना मान दिला आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः- आम्ही विद्युत विभाग आयलानी साहेब यांचे धन्यवाद मानतो कारण सर्वात कमी तक्रारी विद्युत विभागाच्या आहेत. त्यांनी प्रत्त्येकाला



सहकार्य दिले आहे. आता श्री. बालकृष्ण साहेब, श्री. गोपाळ साहेब, श्री. लाल पिंजानी साहेब यांचे स्वागत करावे.आशा ठेवतो श्री. लाल पिंजानी वसुलीत जास्तीत जास्त वाढ करतील. अशात-हेने श्री. दशोरे कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग, श्री. ठाणेकर यांचे फुल देऊन स्वागत करण्यात आले.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-आता आमचे इतिवृत्त लिहिणारे लिपिक सौ. प्राजक्ता कुलकर्णी, श्री. टी.एन. पतंगराव , सौ. नर्गिस खान, श्री. वसंत निकम इतर कर्मचारी यांचे फुल देऊन स्वागत केले जावे.

अशात-हेने श्रीमती. ज्योती कालानी यांनी फुल देऊन स्वागत केले.

त्यानंतर मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी स्थायी समिती सदस्य श्री. किशोर वनवारी, श्री. ठाकुर बेहरानी, श्री. रामचंद्र पारवानी, श्रीमती. आशा राधवानी, श्री. जयकुमार केणी, श्री. विनोद तलरेजा यांचे फुल देऊन स्वागत केले.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः-मी आयुक्तांना विनंती करतो की, त्यांनी येणा-या अर्थसंकल्पात कागदाची जास्तीत जास्त तरतुद करून ठेवावी कारण की आज काल पी.सी दोन-तीन कागदा ऐवढी मर्यादित न राहता बावन्न-त्रेपन्न पाने २०० पाने ऐवढी कागदे लागतात. दहादा पी.सी.ची शेरा मारून ये-जा होत असते. पुर्वी ऐवढे कागद लागायचे नाहीत आता ये-जा वाढल्यामुळे जास्तीत जास्त कागद लागतात म्हणुन अंदाजपत्रकात कागदासाठी जास्तीत जास्त तरतुद ठेवण्यांत यावी.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):- असे कोण म्हणतो की ऐवढी कागदे लागतात.

मा. सदस्य श्री. किशोर वनवारीः- साहेब माझी एक स्वतःची पी.सी आहे २०० पानाची.

मा. आयुक्त (श्री. बी. आर. पोखरकर):-दाखवा मला ती.

त्यानंतर मा. आयुक्त श्री. रामचंद पारवानी, श्रीमती. आशा राधवानी श्री. ठाकुर बेहरानी,श्री. किशोर वनवारी यासर्वांनी श्रीमती. ज्योती कालानी यांचे फुल देऊन स्वागत केले.

मा.सदस्य श्री. किशोर वनवारीः- जे सदस्य आले नाहीत त्यांना पण आम्ही धन्यवाद देऊन स्वागत करतो.

सायंकाळी ५.०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

दि:-४.७.२००१.

इतिवृत्त

## दि. ४.७.२००१ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ४.७.२००१ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

१ श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु):- सभापती

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
४. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
९. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाछोमल
१० श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
११ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
१२ श्री. शर्मा कमला गंगाधर
१३ श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

तर

मा. १. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम , २. श्रीमती. मोकल सिमा चंदाराम, ३. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल , हे सदस्य सभेस अनुपस्थितीत होते.

मा. आयुक्त श्री. बा. र. पोखरकर हे स्थायी समिती सभेत अनुपस्थितीत होते त्यांच्या अनुपस्थितीत स्थायी समितीतील त्यांचे आसनावर श्री.दत्ता भडकवाड, उपायुक्त (मुख्यालय) हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणून आसनस्थ होते.

सायंकाळी ४. ५० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव :-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. २४.५.२००१, ११.६.२००१ सह १४.६.२००१ चे इतिवृत्त कायम करणे बाबत.

दि. १४.६.२००१ रोजीच्या स्थायी समिती सभेत मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल या अनुपस्थित होत्त्या परंतु इतिवृत्तांत त्याच्या नावाची नोंद उपस्थित व

अनुपस्थित अशा दोन्ही ठिकाणी आलेली आहे. उपस्थित सदस्यांच्या नोंदीतील त्यांच्या नावाची नोंद वगळावी लागेल.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-</u>दि. २४.५.२००१ रोजीच्या स्थायी समिती सभेत श्री. अजिज कारचे उपआयुक्त आरोग्य यांनी असे सांगितले होते की, साईकृपा नगर ते मोरया नगरी या नाल्याबाबत आपणांबरोबर मी प्रत्यक्ष भेट देवून पहाणी करेन, आयुक्तांनी ही याबाबत आपणास निर्देश दिले होते त्याचे काय झाले?

<u>श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-</u>साईकृपानगर मोरया नगरी या नाल्याची मी प्रत्यक्ष पहाणी केली.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आपणांस माझ्या बरोबर यायचे होते.

<u>श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-</u>या नाल्याची पहाणी करायची होती.
<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपंचदानी:-</u>दि. २४.५.२००१ च्या स्थायी समितीचे इतिवृत्त काढा.... त्यातील नोंद पहा. त्यात अशी नोंद आली आहे की, तुम्ही व मी त्याठिकाणी पहाणी करण्यास जावू व हे आयुक्तांसमोर झाले होते.

<u>श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-</u>साईकृपानगर मध्ये मी प्रत्यक्ष भेट देवून आलो आहे. तेथे सी.सी पायवाटा, स्ट्रीट लाईट फिटींग, नळ इत्त्यादी कामे महानगरपालिकेने केली आहेत. तेथील नाला माणसे लावून साफ करून घेतला आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मोर्या नगर कुठे आहे? आपल्या महानगरपालिका क्षेत्रात आहे काय?

<u>श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-</u>मी त्याठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली आहे तेथे भुयारी गटार योजनेचे चेंबर्स आहेत, सार्वजनिक दिवाबत्तीची सोय महापालिकेने केलेली आहे, तो नाला आपल्या हद्दीमध्ये येतो की नाही या बाबतच्या आपल्या हरकतीमुळे सदरचा नाला प्रोक्लेन मशिनने साफ न करता कामगार लावून साफ करून घेण्यांत आला. तो नाला आपल्या महानगरपालिकेने तयार केलेला आहे, रस्त्त्यापर्यंतचा चेंबर आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेचा आहे, येथील वस्तीमध्ये दिलेल्या नळ जोडण्या आपल्या महानगरपालिकेने दिलेल्या आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आपण दुसरा प्रस्ताव दिला होता. प्रोक्लेन मशिनने साफ करावयाच्या १५ नाल्याच्या यादीमध्ये या नाल्याचाही समावेश आपण केला होता. आपण प्रोक्लेन मशिनने नाला साफ केला का?

<u>श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-</u>नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>का नाही?

<u>श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-</u>आपल्या हरकतीमुळे आम्ही तो नाला प्रोक्लेन मशिनने साफ न करता कामगार लावून साफ करून घेतला त्यामुळे सद्या तेथे काही अडचण नाही.



<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>तर मग १५ नाल्यांची जी आपण यादी दिली होती ती बोगस होती?

श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-ती कशी?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आपण त्या नाल्यांची प्रत्यक्ष भेट देवून पहाणी केली? माणसे लावून सफाई करून घेतली, मग प्रोक्लेन मशिनने साफ करावयाच्या नाल्याची जी यादी आपण दिलीत ती बोगस होती, आपण त्या नाल्याची प्रत्यक्ष पहाणी केली नाही? नाला सफाईचा आपण प्रस्ताव दिला होता त्यामध्ये काय नोंद होती?

श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-मा. सभापती महोदया, मी साईकृपा नगर, मोर्या नगर येथील नाल्याची साफसफाई करून घेतली तेथील नगरसेविका श्रीमती. भावना खिलनानी यांनी अनेक वेळा याबाबतची मागणी केली होती, या विभागातील अनेक नागरिकांच्या तक्रारी होत्त्या, पहिले जेव्हा तेथील नाला सफाईचे काम केले बरोबर झाले नव्हते त्यामुळे दुस-या वेळी पुन्हा जावून हा नाला चांगल्या प्रकारे साफ करून घेण्यांत आला.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-त्यांनी कोणत्त्या नाल्याचे काम करण्यासाठी नाव दिले होते? व कोणत्त्या नाल्याचे काम केले?

श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-साईकृपा नगर व मार्यानगर या दोन्हींचा त्यात समावेश आहे साईकृपा नगरमध्ये जी घरे तयार झाली आहेत तेथे सीसी पॅसेज स्ट्रीट लाईट इत्त्यादी सोयी / सुविधा महापालिकेने उपलब्ध करून दिलेल्या आहेत नाल्याच्या पूढे मोकळी जागा आहे तेथून कल्याण डोंबिवली महानगरपालिका हददीत नाल्याचा प्रवाह जातो. या नाल्याचे पाणी थांबुन मागे येत होते त्यामुळे नाला साफ करून घेतला.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी काय हरकत घेतली होती?

श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-त्त्यांची हरकत अशी होती की तो नाला आपल्या महानगरपालिकेच्या हददीमध्ये नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आपण म्हणू शकता का तो नाला आपल्या हददीमध्ये आहे म्हणुन? व नाल्याचे पाणी मागे येत होते म्हणुन असे जे आपण म्हणालात तर तो नाला प्रोकलेन मशिनने का साफ केला नाही?

श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-मी नाही म्हणत? तेथे आपल्या महानगरपालिकेने सी सी पॅसेज तयार केला आहे. स्ट्रीट लाईटची सोय आपल्या महानगरपालिकेने केली आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:- यांनी तेथील नाला कामगार लावून साफ करून घेतला. मात्र यांनी प्रस्ताव दिला होता प्रोक्लेन मशिनने साफ करून



घ्यावयाच्या नाल्यामध्ये या नाल्याचा समावेश होता. यावरून मी सिध्द करू शकतो की ती यादी बोगस कशी आहे ती?

*श्री. अजिज कारचे (उपआयुक्त आरोग्य विभाग):-*ती कशी?

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-*तेथे प्रोक्लेन मशिन का लावली नाही? अशी त्याची हरकत आहे. परंतु आता तेथील नाल्याची सफाई तर झाली आहे ना?

*मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-*आता त्यांच्या काय अडचणी आहेत?

*मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-*माझे म्हणणे असे आहे की, या नाल्याची सफाई प्रोक्लेन मशिनने केली पाहिजे.

*मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-*ठिक आहे. पुन्हा एकदा भेट देवून पहाणी करा.

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-*दि. २४.५.२००२ , दि. ११.६.२००२ चे इतिवृत्त जसे आहे तसे व दि. १४.६.२००२ रोजीच्या इतिवृत्तांत उपस्थित सदस्यामध्ये आलेली श्रीमती. सिमा मोकल यांच्या नावाची नोंद वगळून उर्वरित इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

*मा. सचिव:-*विषय क्र. २ वाचून दाखवितात.

विषय :- सार्वत्रिक निवडणूक २००२ करिता व्हिडीओ शुटींग कामी प्रशासनाने मे. भरत जैन डोंबिवली यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

*मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-*काय आहे? कसे केले?कोणत्त्या दराने? काय आहे ते? आमचा एक सुध्दा फोटो आला नाही. कार्योत्तर मंजुरी आहे का?

*श्री. टी. जे. बाळकृष्ण (खरेदी अधिकारी):-*निवडणूक कामासाठी व्हिडीओ शुटींग करण्यांत आली होती.

*मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-*कोणाच्या अधिकाराने?

*श्री. टी. जे. बाळकृष्ण (खरेदी अधिकारी):-*आयुक्त साहेबांच्या....
*मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-*किती रक्कमेचे बिल आहे?

*श्री. टी. जे. बाळकृष्ण (खरेदी अधिकारी):-*दोन लाख सत्तावीस हजाराचे.

*मा. सचिव:-*१० लाखापर्यंतच्या खर्चास मंजूरी देण्याचे आयुक्तांना अधिकार आहेत ना?
हा प्रस्ताव फक्त माहितीसाठी आपणापूढे ठेवलेला आहे.



*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-*सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- सार्वत्रिक निवडणूक २००२ करिता व्हिडीओ शुटींग कामी प्रशासनाने मे. भरत जैन डोंबिवली यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकांचे भांडार विभागाने सार्वत्रिक निवडणूक २००२ करिता, मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी व शहरातील पाच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे अधिपत्त्याखालील निवडणूक सुरळीतपणे होणेसाठी व्हिडीओ शुटिंगचे प्रत्येकी एक संच प्रमाणे एकूण सहा संचासाठी राज्य स्तरावरील दैनिक वर्तमानपत्रात जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आले होत्त्या त्यानुसार विहित कालावधीत खालील निविदा धारकांचे निविदा प्राप्त झाल्या होत्त्या.

१ मे. जे.के. व्हिडीओ- विरार

२. मे. भरत जैन - डोंबिवली

३ मे. पटेल फोटोज - डोंबिवली

४. मे. साई कांचन फोटो स्टुडिओ उल्हासनगर

५ मे. रिगल फोटो स्टुडिओ -उल्हासनगर

उपरोक्त निविदाधारकांमध्ये मेसर्स भरत जैन, डोंबिवली यांचेशी वाटाघाटी केलेनंतर प्रत्येक संचासाठी रू. १०२५/- प्रमाणे एकूण २७ दिवस असे सहा संचासाठी लघुत्तम दर मान्य केले. त्यावर एकुण रूपये २,२७,५५०/- इतका खर्च अपेक्षित होता. तसेच पोलिस स्टेशनचे मागणीनुसार तातडीने ४ व्हिडीओ संच पुरविणे जरूरीचे असल्याने मे. पटेल फोटोज, डोंबिवली यांचेशी थेट वाटाघाटी मा. आयुक्त यांनी करून दिनांक १५.१.२००२ ते १३.२.२००२ या ३० दिवसाच्या कालावधीसाठी प्रति व्हिडिओ संचास रूपये ९००/- प्रति दिवस या दराने काम देण्यात आले. त्यांचेकडुन एकूण ४ व्हिडीओ संच घेण्यात आले. यावर एकूण रू. १,०८,०००/- खर्च अपेक्षित होता.

वरील प्रमाणे एकूण १० व्हिडिओ संचासाठी खर्च रूपये ३,३५,५५०/-अपेक्षित आहे. सदर खर्च निवडणूक २००२ चे डि-१ (१) या लेखाशिर्ष अंतर्गत तरतुदीमधुन खर्च करावयाचा असून त्यासाठी मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी मुं. प्रां.म.अ.१९४९ चे कलम ७३ (डी)अंतर्गत प्रशासकी व वित्तिय मान्यता दिले नुसार मे. भरत जैन , व मे. पटेल फोटोज यांचेकडून काम करून घेण्यात आलेले होते.

सदर कामाची माहिती स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

--६--

स्थायी समिती ठराव क्र.१८ दिनांक:- ४. ७. २००२.

सुचकाचे नाव :-श्री. सुर्यकांत लिंगे.

अनुमोदकाचे नाव :-श्री. पमनानी ईश्वर.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २००२ करिता व्हिडीओ शुटींग कामी प्रशासनाने मेसर्स भरत जैन डोंबिवली या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

<u>विषय :-.</u> शहरातील पाणी टंचाईच्या ठिकाणी टॅकरने पाणी पुरवठा करणे कामी मे. श्वेता ट्रान्सपोर्ट, मनीष नगर, कल्याण या लघुत्तम निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-</u>उल्हासनगर शहरात पाणी टंचाईच्या ठिकाणी, जेथे नळाने पाणी पुरवठा पुरेश्या प्रमाणात होत नाही, जो भाग जलवाहिनीच्या शेवटच्या टोकाला आहे अशा ठिकाणी नळाव्दारे पाणी पुरवठा होत नाही तेथील पाण्याची गरज भागविण्याकरिता टॅकरव्दारे पाणी पुरवठा केला जातो, टॅकरव्दारे पाणी पुरवठा करण्याकरिता निविदा मागविण्यांत आल्या होत्या, प्राप्त झालेल्या ४ निविदांमध्ये मे. श्वेता ट्रान्सपोर्ट, मनीष नगर, कल्याण यांची निविदा सर्वात लघुत्तम दराची असल्याने प्रशासकीय व वित्तिय मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे ठेवण्यांत आली आहे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>पाण्याचे टॅकर कसे पाठविले जातात? जेथे जरूरी नाही तेथे सुध्दा ते पाठविले जातात, हे टॅकर ठराविक अशा प्रभागात जात



असतील ना? टॅकरने करावयाच्या पाणी पुरवठयाची प्रत्येक प्रभागात किती जरूरत आहे?

<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-</u>गोल मैदान सारखा विभाग आहे जो विभाग जलवाहिनीच्या शेवटच्या टोकाला येतो अशाठिकाणी नळाव्दारे पुरसा पाणी पुरवठा होत नाही. अशा ठिकाणी टॅकरने पाणी पुरवठा केला जातो.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-हा ठेकेदार कुठला आहे?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-कल्याण मधील आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-त्यांचे टॅंकर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत सुध्दा कार्यरत आहेत.

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-त्यांचे बाबत अशी हरकत होती की, त्यांचे टॅंकर कल्यण डोंबिवली महानगरपालिकेत सुध्दा चालतात तेथील कार्यकारी अभियंत्त्यांकडून मी माहिति मागविली होती. मे श्वेता ट्रान्सपोर्ट यांच्याकडे १२टॅंकर आहेत. कमीत कमी ७ टॅंकर असावेत अशी आपली अट होती त्यांनी आपणास जे टॅंकर नंबर्स दिलेले आहेत ते नंबर्स कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला सुध्दा दिलेले आहेत. त्यांचे काम समाधानकारक आहे असे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यकारी अभियंत्त्यांनी आपणांस कळविले आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः- एकच ठेकेदार दोन्हीकडे काम करू शकतो काय?

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-ठेकेदाराचे कमीत कमी ७ टॅंकर्स असावेत अशी अट घालण्यांत आली होती.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :-जेथुन पाणी पुरवठा केला जातो. तेथे आपल्या महानगरपालिकेचा कुणी कर्मचारी बसत नाही. लोक मोर्चा काढतील हे सुध्दा खराब आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-आपल्या शहरात पाण्याची समस्या आहे, अशा परिस्थितीत एकाच ठेकेदार दोन्ही महापालिकांमध्ये पाणी पुरवठ्याचे काम कसा करेल? मला तर अशी ही माहिति मिळाली आहे की, त्या ठेकेदाराच्या नावावर दुसराच कुणी तरी काम करित आहे. जो ब्लॅक लिस्ट मध्ये आहे या प्रकरणाची पूर्ण चौकशी करावी तो पर्यंत हा प्रस्ताव पूढे ढकलला जावा.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :-. शहरातील पाणी टंचाईच्या ठिकाणी टॅंकरने पाणी पुरवठा करणे कामी मे. श्वेता ट्रान्सपोर्ट, मनीष नगर, कल्याण या लघुत्तम निविदाकाराशी संविदेस मान्यता देणे बाबत.



मा. सचिवः-विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

विषय :- उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमधील मे. गिगा सॉल्यूशन प्रा. लि. पाणी पुरवठा विभाग, विद्युत मंडळ यांनी खोदलेले रस्ते पुर्ववत करण्यासाठी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण :-किती पैसे आलेत?

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून किती रूपये प्राप्त झाले आहेत?*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून पैसे आलेले नाहीत.*

*मे. गिगा सोल्युशन प्रा. लि. भारत संचार निगम यांनी केबल टाकण्यासाठी खोदलेल्या रस्त्याचे दुरूस्तीसाठी रू. ६१,७५,९५०/- इतकी रक्कम महापालिकेस उपलब्ध झालेली असून त्यातून या रस्त्याची दुरूस्ती करावयाची आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आपण कसे प्रस्तााति केले, आम्ही मंजूरी देण्यास बसलो आहोत, आम्हास वाटते की, शहरातील रस्त्याची दुरूस्ती होवो, महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडुन याकामी किती रूपये येणे बाकी आहेत, महापालिकेला किती रूपये मिळणार आहेत?*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>सर्व रस्त्यावरील दुरूस्तीची कामे एकाच वेळी व्हावीत असे आम्हाला वाटते म्हणुन आम्ही हया रस्त्यावरील कामे प्रस्तावित केली आहेत.*

*सविस्तर माहिती सद्या आमच्याकडे येथे उपलब्ध नाही, ही माहिती काढून नंतर आपणास देतो.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>ज्या रस्त्याची दुरूस्ती करणार आहात त्यांच्यावर किती खर्च होणार आहे? आमची पण इच्छा आहे रस्ते तयार व्हावेत.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>एकुण २० रस्ते आहेत त्यांच्यावरील दुरूस्ती करण्यांत येणार आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>त्यांची सविस्तर माहिती आहे का?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>२० रस्त्यांवरील कामे प्रस्तावित केली आहेत त्याकामी ६७ लाख रूपये खर्च अंदाजित करण्यांत आलेला आहे. खोदाई कामाच्या ४० टक्के रक्कम जमा आहे त्यातून हे काम करायचे आहे. विविध ऐजंन्सीज कडून ही कामे करून घेणार आहोत.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>शहरात रिलायन्स कंपनीचे काम चालु आहे. त्यांनी जे रस्ते खोदले, जेवढे रस्ते खोदले त्याबाबत ६७ लाख रूपये त्यांनी महापालिकेस दिले आहेत त्या पैशातुन त्या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम*



*प्रस्तावित करण्यात आले आहे. जागो जागी मातीचे ढिग व खड्डे असल्याने लोकांना जा ये करणे मुश्किलीचे होत आहे. वाहतुकीसही त्रासाचे होत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>शिवाजी नगर येथे मोठया टाकीचे काम चालु झाले आहे. त्या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम या कामामध्ये घेतले जावे.*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>कोणी खोदले आहेत?*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-</u>श्री. दशोरे साहेबांना माहित आहे.*

**श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-**जलवाहिनी टाकण्याचे काम चालु आहे. महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने ४ लाख रूपये व इतर काही रक्कम एमआयडीसी ला भरली आहे.

**मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-**श्री. दशोरे, आपण एमआयडीसीला याबाबत पत्र लिहा. व श्री. गायकवाडजी आपण सुध्दा पत्र लिहुन आपल्या स्तरावर प्रयत्न करा.

**मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-**या रस्त्यांव्यतिरिक्त जे रस्ते खड्डे भरण्याचे राहतील ते रस्ते पूढील सभेत मंजूरीसाठी आणले जातील गिगा सोल्युशन यांनी जेवढे रस्ते खोदले होते ते पूर्ववत करण्यासाठी, त्यांच्यावरील खड्डे भरण्यासाठी मंजूरीसाठी स्थायी समिती समोर आणले आहेत.

**मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-**पावसाळयामध्ये रस्ते खोदाईची परवानगी देवू नये असे असताना आपण त्यांना रस्ते खोदण्यास परवानगी कशी दिलीत? कधी पर्यंतची परवानगी दिली होती? त्यांनी शहरातील रस्त्यांची खराबी केली आहे, असे होता कामा नये, यापूढे असे होता कामा नये. ३१ मे ते १५ जुन पर्यंत रस्ते खोदण्यास आपण परवानगी कशी दिली? शहरात रस्त्यांची स्थिती ऐवढी खराब असताना.

**मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-**सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

**विषय :-** उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमधील मे. गिगा सॉल्यूशन प्रा. लि. पाणी पुरवठा विभाग, विद्युत मंडळ यांनी खोदलेले रस्ते पुर्ववत करण्यासाठी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील रस्ते भारत संचार निगम, पाणी पुरवठा विभाग, गिगा सोल्युशन प्रा. लि. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, दिवाबत्ती विभाग अशा विविध विभागांनी केबल, पाणी पुरवठा लाईन, टाकण्याकरिता खोदले होते.



सदर रस्ते दुरूस्ती खर्च संबंधित खात्त्याकडून चालू आर्थिक वर्षात या महानगरपालिकेस मिळालेला आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.

१. धनादेश क्रमांक व दिनांक

२. विभागाचे नांव

३. मिळालेली रक्कम

| | | |
|---|---|---|
| ६.१.२००१ | दुरभाष विभाग | १७२५०००.०० |
| १२.१.२००१ | दुरभाष विभाग | ३३८६७००.०० |
| २३.१.२००१ | दुरभाष विभाग | ५७१५००.०० |
| १३.३.२००१ | दुरभाष विभाग | २४८५००.०० |
| २५.६.२००१ | दुरभाष विभाग | १०६५०००.०० |
| १३.३.२००२ | दुरभाष विभाग | ३७०३५७.०० |

१६ . ४ २००२ गिगा सोल्युशन प्रा. लि. ............................

एकुण जमा झालेली रक्कम १३५४३००७. ००

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार मेसर्स गिगा सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड यांना महानगरपालिका हददीतील रस्ते खोदण्याकरिता परवानगी दिलेली आहे. त्याप्रित्यर्थ ८५१३ मीटर रस्त्यांच्या खोदाईनंतर दुरूस्तीसाठी ६१७५९५०/- इतकी रक्कम महानगरपालिकेकडे उपलब्ध झालेली आहे.

मेसर्स गिगा सोल्युशन प्रा. लि. भारत संचार निगम यांनी केबल टाकण्याकरिता व पाणी पुरवठा विभागाने पाण्याच्या लाईन टाकण्याकरिता खोदलेल्या खालील रस्त्याचे त्यासमोर दर्शविलेल्या लांबी प्रमाणे दुरूस्ती करण्याकरिता प्राकलने तयार केलेली आहेत.

| अ. क्र. | रस्त्याचे नाव | कॅटेगरी ऑफ रोड | गिगा (लेन्थ इन मीटर) | बी.एस. एन.एल | एम.जे.पी | लाईट | प्राकलनिय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर १ येथील शहाड रेल्वे क्रॉसिंग ते नाका हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | २३० . ०० | | | | ६०५१० . ०० |
| २ | उल्हासनगर १ येथील शहाड आर ओ बी ते शिवाजी रोड हा रस्ता मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | २४५.०० | | | | १७५०५० .०० |
| ३ | उल्हासनगर १ येथील शिवाजी रोड ते महात्मा फुले रोड हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | २४० .०० | | | | १३८८७५ .०० |
| ४ | उल्हासनगर १ येथील महात्मा फुले रोड ते डी टी कॉलेज चौक हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | ४६० .०० | | | | ३२८७०० .०० |
| ५. | उल्हासनगर ३ येथील डी.टी. कॉलेज ते मधुबन हॉटेल | | ३९० .०० | ५५० .०० | | | ६८४८७६ .०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | टेलिफोन एक्सचेंज समोर सी ब्लॉक चौक हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | | | | | |
| ६ | मधुबन हॉटेल चौक ते नेहरू चौक गोल मैदान मार्गे हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | ५५० .०० | | | | २६४१०० .०० |
| ७. | उल्हासनगर येथील राधास्वामी सतसंग हॉल ते ओटी हा विद्युत विभाग एम.जे. पी यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | | | २. ८० | ७२ .७० | ८५८५५ .०० |
| ८ | नेहरू चौक ते शिवाजी चौक हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | ७१४ .०० | | | | ४२४९२० .०० |
| ९ | मधुबन चौक ते पवन दिप अपार्टमेंट हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | ७२४ .०० | | | | ५११३५० .०० |
| १० | शिवाजी चौक ते साईबाबा मंदिर हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | १३९०. ०० | | | | ९९३२३० .०० |
| ११ | यु.एम.सी ते प्रकाश ऑटो हा विद्युत विभाग एम जे पी (युएमसी)यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | | | ३५ .९० | २४०. ०० | १९७८०० .०० |
| १२ | उल्हासनगर ४ येथील ओटी चौक ते विनस सिनेमा जंगल हॉटेल मार्गे लिंक ते मुक्ती अपार्टमेंट हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी | | १०८९. ०० | | | | ४८६५५८ .०० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | | | | | |
| १३ | उल्हासनगर४ येथील सुर्या हॉटेल ते कॅम्प नं. ५ ओटी चौक हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | ६७६.०० | | | | ३८३९०९.०० |
| १४ | उल्हासनगर ४ येथील जकात नाका प्रेम फुट फॅक्टरीजवळ ते सुर्या हॉटेल हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | २४०.०० | | | | १७३८२५.०० |
| १५ | उल्हासनगर ४ येथील विनस सिनेमा ते नेताजी चौक हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | ३५५.०० | | | | १६७२३८.०० |
| १६ | उल्हासनगर-४ येथील नेताजी चौक ते युएमसी नाका ते कालीमाता मंदिर मार्गे हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | १७८०. ०० | | | | १२७१८०५. ०० |
| १७ | उल्हासनगर ४ येथील बॅक ऑफ महाराष्ट्र ते कोयंडे पुतळा हा पाणी पुरवठा विभाग यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | | | ७२.०० | | ५०७९४.०० |
| १८ | युएमसी ते प्रकाश ऑटो हा विद्युत विभाग एमजेपी (युएमसी) यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे बाबत. | | | | ३५.९० | २४०. ०० | १९७८००.०० |
| १९. | उल्हासनगर ३ येथील राधास्वामी सतसंग हॉल ते ओटी हा विद्युत विभाग एम.जे.पी (युएमसी) यांनी | | | | २८० | ७२.७० | ६५८५५.०० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | | | | |
| १० | उल्हासनगर २ येथील बँक ऑफ बडोदा ते बलराम अपार्टमेंट हा पाणी पुरवठा विभाग यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | | ३००.०० | | ६०७२०.०० |

दि. ३१.५.२००२ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, मूख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांच्या उपस्थितीत बैठकीत मा. आयुक्त यांनी सदर रस्ते एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गतील रस्त्याच्या संबंधित ठेकेदारास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे प्रकरण ५ चे कलम २ (२) नुसार प्राकलनिय दरापेक्षा १० टक्के कमी दराने देण्याबाबत सुचविले होते. सदर सूचना मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेख परिक्षक यांनी ग्राहय धरलेले आहे.

त्याप्रमाणे उपरोक्त कामे कोणत्त्या एजन्सीला देणे आहे हे खालील यादीत नमुद आहे. एकंदर २० कामे असुन प्रत्येक कामासमोर कोणत्त्या एजंन्सीला काम देणे प्रस्तावित कलेले आहे हे नमुद आहे.

--१४--

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | प्राकलनिय किंमत | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर १ येथील शहाड रेल्वे क्रॉसिंग ते नाका हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ६०५१०. ०० | एम.सी.चंदनानी |
| २ | उल्हासनगर १ येथील शहाड आर ओ बी ते शिवाजी रोड हा रस्ता मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | १७५०५०.०० | एम.सी.चंदनानी |
| ३ | उल्हासनगर १ येथील क्षिवाजी रोड ते महात्त्मा फुले रोड हा मे गिगा सोल्युक्षन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | १३८८७५.०० | एम.सी.चंदनानी |
| ४ | उल्हासनगर १ येथील महात्त्मा फुले रोड ते डी टी कॉलेज चौक हा मे गिगा सोल्युक्षन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ३२८७००.०० | जयहिंद कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. |
| ५ | उल्हासनगर ३ येथील डी.टी. कॉलेज ते मधुबन हॉटेल टेलिफोन एक्सचेंज समोर सी ब्लॉक चौक हा मे गिगा सोल्युक्षन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ६८४८७६.०० | जे. एम. म्हात्रे |
| ६ | मधुबन हॉटेल चौक ते नेहरू | २६४१००.०० | शंकर महादेव |

| | | | |
|---|---|---|---|
| | चौक गोल मैदान मार्गे हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | ॲन्ड कं. |
| ७ | उल्हासनगर येथील राधास्वामी सतसंग हॉल ते ओटी हा विद्युत विभाग एम.जे.पी यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ८५८५५.०० | प्रकाश कंन्स्ट्रक्शन |
| | नेहरू चौक ते शिवाजी चौक हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ४२४९२०.०० | शंकर महादेव ॲन्ड कं. |
| ९ | मधुबन चौक ते पवन दिप अपार्टमेंट हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ५११३५०.०० | सुमन कंन्स्ट्रक्शन |
| १० | शिवाजी चौक ते साईबाबा मंदिर हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ९९३२३०.०० | जय भारत कंन्स्ट्रक्शन |
| ११ | यु.एम.सी ते प्रकाश ऑटो हा विद्युत विभाग एम जे पी (युएमसी)यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | १९७८००.०० | स्वाराज्य कंन्स्ट्रक्शन |
| १२ | उल्हासनगर ४ येथील ओटी चौक ते विनस सिनेमा जंगल हॉटेल मार्गे लिंक ते मुक्ती अपार्टमेंट हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ४८६५५८.०० | जकनुरा कंन्स्ट्रक्शन |
| १३ | उल्हासनगर४ येथील सुर्या हॉटेल ते कॅम्प नं. ५ ओटी चौक हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ३८३९०९.०० | डी.एस. कंन्स्ट्रक्शन |
| १४ | उल्हासनगर ४ येथील जकात नाका प्रेम फुट फॅक्टरीजवळ ते सुर्या हॉटेल हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | १७३८२५.०० | डी.एस. कंन्स्ट्रक्शन |
| १५ | उल्हासनगर ४ येथील विनस सिनेमा ते नेताजी चौक हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | १६७२३८.०० | डी.एस. कंन्स्ट्रक्शन |
| १६ | उल्हासनगर-४ येथील नेताजी चौक ते युएमसी नाका ते कालीमाता मंदिर मार्गे हा मे गिगा सोल्युशन प्रा. लि. यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | १२७१८०५.०० | जयहिंद कंन्स्ट्रक्शन |
| १७ | उल्हासनगर ४ येथील बँक ऑफ महाराष्ट्र ते कोयंडे पुतळा हा | ५०७९४.०० | व्ही.एम. कंन्स्ट्रक्शन |

| | | | |
|---|---|---|---|
| | पाणी पुरवठा विभाग यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | | |
| १८. | युएमसी ते प्रकाश ऑटो हा विद्युत विभाग एमजेपी (युएमसी) यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे बाबत. | १९७८००.०० | स्वाराज्य कंन्स्ट्रक्शन |
| १९. | उल्हासनगर ३ येथील राधास्वामी सतसंग हॉल ते ओटी हा विद्युत विभाग एम.जे.पी (युएमसी) यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ६५८५५.०० | प्रकाश कंन्स्ट्रक्शन |
| २० | उल्हासनगर २ येथील बँक ऑफ बडोदा ते बलराम अपार्टमेंट हा पाणी पुरवठा विभाग यांनी खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे. | ६०७२०.०० | जयभारत कंन्स्ट्रक्शन |
| एकुण प्राकलनिय किंमत -------- ६७४३८७०.०० | | | |

वरील प्रमाणे २० कामीच्या रू. ६७४३८७०.०० खर्चाच्या प्राकलनांना प्रशासकीय व वित्तिय मान्यते करिता व उपरोक्त यादी सूचविल्याप्रमाणे सदर कामे प्रस्तावित केल्याप्रमाणे एजन्सीकडून करून घेणेकरिता मुंबई प्रांतिक



महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २ (२) अंतर्गत स्थायी समितीकडुन मंजुरी मिळणे करिता प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.१९</u> <u>दिनांक:- ४. ७. २००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलेरजा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. रूपचंदानी बच्चाराम.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर महानगरपालिका हददीमधील मे. गीगा सोल्युशन प्रा. लि. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांनी खोदलेले रस्ते पूर्ववत करणे कामी एकुण रक्कम रू. ६७,४३,८७०/- यांस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे. तसेच उपरोक्त प्रत्येक कामा समोर दर्शाविलेल्या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस आयुक्तांना प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

*<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. ७ वाचून दाखवितात.*

*<u>विषय :-</u>शिवशक्ती अपार्टमेंट उल्हासनगर-१ या उपभोक्त्याचे पाणी बिलामध्ये बिगर घरगुती ऐवजी घरगुती असे फेरबदल करण्याकरिता मान्यता देणे बाबत.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. किरण माने :-</u>हे एकच का?*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-</u>कुणा विषयीचा आहे?*

*<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-</u>मे. शिवशक्ती अपार्टमेंट उल्हासनगर-१ या उपभाक्त्याकडे ३ नळजोडण्या असून त्यापैकी एक नळजोडणी घरगुती व दोन नळजोडण्या बिगर घरगुती आहेत, सन १९९३मध्ये या इमारतीचे बांधकाम चालु असताना पाण्याचा वापर बांधकामासाठी होत होता. ऑक्टोबर ९३ मध्ये या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर त्यांनी या नळजोडणी वरील पाण्याचा वापर घरगुती वापरासाठी चालू केला आहे. अशा आशयाचे २० रू. स्टॅम्प पेपरवर सत्त्यप्रतिज्ञापत्र सादर केले आहे, पुराव्या खातर गॅसच्या पावत्त्या, करारपत्राच्या झेरॉक्स प्रति, शिधावाटप पत्रिकेच्या छायांकित प्रती लाईट बिलाच्या छायांकित प्रती जोडल्या आहेत.*



*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-</u>१९९३ पासुन तो वापर करतो आहे. आपण त्या इमारतीस मिळकत कर का नाही लावला? असेसमेंन्ट का नाही केली? त्यांनी मिळकत कराच्या पावत्त्या दाखविल्या का?*

*तसेच बिगर घरगुती पाणी बिलाची घरगुती दराने आकारणी करण्याचे आम्हास (स्थायी समितीस) अधिकार आहेत का?*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचदांनी:-</u>याबाबतचे अधिकार आयुक्तांना आहेत त्यांच्यावर सोपवा.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>स्थायी समितीपुढे आणण्यासाठी अशा प्रकारची किती तरी प्रकरणे पडुन असतील...*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी / श्रीमती. किरण माने :-</u>अशा प्रकारची वादातीत प्रकरणे किती तरी आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-</u>त्या इमारतीच्या मिळकत कराबाबत कोण जबाबदार आहे? त्या इमारतीची ॲसेसमेंन्ट का करण्यांत आली नाही.*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u> सचिव साहेब, विधी अधिकारी या नात्त्याने मार्गदर्शन करा.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>बिगर घरगुतीचे घरगुती करण्यासाठी स्थायी समितीला अधिकार आहेत का? हे अधिकार आयुक्तांना आहेत.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>याबाबत आयुक्तांना अधिकार आहेत.*

मा. सचिव :-कोणत्त्या कलमानुसार आपण हा प्रस्ताव स्थायी समितीपूढे प्रस्तावित केलात ते सांगा.

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-कायदयात, तरतुद नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-तर मग स्थायी समितीपुढे आपण हा प्रस्ताव कसा आणला.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-आपला असा काही वेगळा ॲक्ट आहे का?

मा. सचिव:-आपण प्रस्ताव कसा सादर केला जस्टीफाय करा.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-अधिकार त्यांना आहेत. कलम त्यांचे नसेल एकच प्रकरण आहे का? अशा किती तरी केसेस असतील? त्या केसेस त्यांनी स्थायी समितीपूढे का नाही आणल्या?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- याकामी स्थायी समिती आयुक्तांना पूर्ण अधिकार देत आहे. आयुक्तांनी याकामी निर्णय घ्यावा.



मा. सचिव:-मुख्यलेखा परिक्षक श्री. काळे साहेब म्हणतात की, आम्ही या कामी शिफारस केलेली नाही, ते काय म्हणतात?

श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक):-आम्ही याबाबत शिफारस केलेली नसतानाही गोषवा-यामध्ये थेट आमच्या नावाची नोंद केलेली आहे. बिगर घरगुती वापराचे बिलात घरगुती वापर असा बदल करण्यापुर्वी करावयाच्या कार्यवाही बाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. तसेच शिवशक्ती अपार्टमेंन्ट यांचेकडे बांधकाम पूर्णत्त्वाचा दाखला नाही आहे. सदर उपभोक्त्याकडून पाणी बिलाची रक्कम अण्डर प्रोटेस्ट् घ्यायची आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-आमच्या असे ऐकण्यात आहे की, याच मुददयावर आपण श्री. शेख नावाच्या अधिक्षकास कामावरून काढून टाकले होते.

श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि):-त्यांनी कोणतीही, कोणाचीही मंजूरी न घेता पाणी वापराचे बिगर घरगुती बिल घरगुती वापर असे बदली केले होते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :- यामध्ये असे लिहिले आहे की, आयुक्तांना अधिकार आहे असे असताना हा मुददा आमच्या समोर यावयास नको होता.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-अशा प्रकारचा बदल करण्याची तरतुद कोणत्त्या कायदयात आहे? अशी तरतुद असेल तर आम्ही पूर्ण शहरातील अशा प्रकारच्या प्रकरणांबाबत निर्णय घेवू, सांगा.

मा. सदस्य श्री. विनोद तलेरजा :-इतिवृत्तांत याची स्पष्टपणे नोंद दया की, याबाबत आयुक्तांना अधिकार आहेत त्यांनी निर्णय घ्यावा आम्ही त्यांना अधिकार देण्याचा प्रश्नच नाही, आम्ही कसे त्यांना अधिकार देणार?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-कोणत्त्या कायदयानुसार?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-अशा प्रकारच्या एका प्रकरणामध्ये आयुक्तांनी एका कर्मचा-यास सेवेतून निलंबित केले असताना असे प्रकरण आमच्या समोर (स्थायी समिती समोर) आणल्याने आम्हाला यामध्ये संशय येतो.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-आयुक्त साहेब कुठे आहेत.

श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-ट्रेनींगसाठी गेले आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-त्यांना ट्रेनींगची काय जरूरत आहे? ते स्वतः हुशार आहेत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- या प्रस्तावाबाबत सर्वानुमते पूढील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

--१९--

विषय :-शिवशक्ती अपार्टमेंट उल्हासनगर-१ या उपभोक्त्याचे पाणी बिलामध्ये बिगर घरगुती ऐवजी घरगुती असे फेरबदल करण्याकरिता मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उपरोक्त विषयान्वये उल्हासनगर-१ या भागातील शिवशक्ती अपार्टमेंट, बॅरेक २५२, उल्हासनगर-१ या ठिकाणी सन ९३ मध्ये इमारतीचे बांधकाम सुरू असताना व पाण्याचा वापर बांधकामासाठी होत असल्याने नळजोडण्यांची आकारणी बिगरघरगुती दराने करण्यात आली होती व इमारतीचे बांधकाम माहे ऑक्टोबर ९३ मध्ये पुर्ण झाले असून अदयापही सदर नळजोडण्याच्या बिलांची आकारणी बिगरघरगुती दरानेच सुरू आहे. म्हणुन सेक्रेटरी (सदस्य) यांनी नमुद नळजोडण्यांची आकारणी बिगरघरगुती ऐवजी घरगुती दराने करण्याबाबतचा विनंती अर्ज दि. २५.९.२००१ रोजी सादर केला असून अर्जासोबत रू. २०/-च्या स्टॅम्पपेपरवर इमारतीचे बांधकाम माहे ऑक्टोबर ९३ मध्ये पुर्ण झाले असुन त्यानंतर नळजोडण्यांव्दारे पाण्याचा वापर पिण्यासाठी होतो अशा आशयाचा ''सत्त्य प्रतिज्ञा लेख''तसेच सप्टेंबर ९४ या वर्षातील इमारतीमधील सदनिका धारकाने इमारतीच्या नावे असलेल्या गॅसच्या जोडणीची फीच्या पावतीची झेरॉक्स सप्टेंबर ९४ चे अॅग्रीमेंट ची प्रत, ऑक्टोबर ९४च्या रेशन कार्डाची प्रत व सन ९४-९५ च्या लाईट बिलांच्या झेरॉक्स प्रति सादर केल्या आहेत.

अर्जदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने संबंधित शाखा अभियंता यांनी दि. २८.९.२००१ रोजी प्रत्यक्ष इमारतीची पाहणी करून सदर इमारतीचे बांधकाम अंदाजे ६-७ वर्षापुर्वीच पुर्ण झाले असुन पाण्याचा वापर फक्त पिण्यासाठीच होतो व इमारतीमध्ये एकुण १५ फ्लॅटस असल्याचे त्यांचे पत्र क्र. १०८ दि. २८.९.२००१ अन्वये कळविले आहे. या इमारतीमध्ये अधिकृत एकुण तिन नळजोडण्या असुन त्यापैकी एक नळजोडणी क्र.यु/१/३८ घरगुती असुन सदर नळजोडणीपोटी माहे मार्च २००१ पर्यंत रू.१४५६३ + ४३५२ = रू.१८९८६/- (विलंब आकारासहीत माहे डिसेंबर २००१ पर्यंत) एवढी थकबाकी असुन सदर नळजोडणीस प्रतिमाह १,३५,००० लि. सरासरीप्रमाणे बिलांची आकारणी करण्यात आलेली आहे. उर्वरीत दोन नळजोडण्या क्र.यु/१/३८६८ व यु/१/३३१६ बिगरघरगुती असुन या नळजोडण्यांना १९.१२.९४

पासुन प्रतिमहिना १,३५,००० लिटर प्रमाणे बिलांची आकारणी होत असुन सदर नळजोडण्यांपोटी माहे ऑगस्ट २००१ पर्यंत रू. ४,७५,९३८/- एवढी थकबाकी आहे.

दि. १३.९.२००१ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार अशा वादग्रस्त इमारतीमधील (बिगरघरगुती ते घरगुती) पाणीपट्टीची वसुली होण्याच्या दृष्टीने सदनिकांच्या संख्येप्रमाणे व पुर्विच्या दरांनुसार आकारणी करून तेवढया रक्कमेच्या (अंडर प्रोजेक्ट) भरणा करून घ्यावा असे ठरले आहे. इमारतीमधील प्रत्येक सदनिकेमध्ये ५ व्यक्ती राहतात व दरडोई दरदिवशी १५० लिटर्स पाण्याचा वापर गृहीत धरून नमुद इमारतीसाठी पाण्याचा वापर खालीलप्रमाणे होईल.

प्रतिदिवशी पाण्याचा वापर -- १५ x ७५० -- ११२५० लिटर
प्रतिमाह पाण्याचा वापर -- ३० x११२५० -- ३,३७,५०० लिटर
-- ३,४०,००० लिटर

परंतु इमारतीमधील घरगुती नळजोडणीस प्रतिमाह १,३५,००० लि. सरासरीने मार्च २००० पर्यंत आकारणी केली असल्याने व इमारतीचे बांधकाम १९.१२.९४



पुर्वीच पुर्ण झाले असल्याने उर्वरीत दोन नळजोडण्यांना १९.१२.९४ पासुन प्रतिमाह २,०५,००० लि. (३,४०,०००-१३५००० लि) पाणी वापर विचारात घेता पाणीपट्टी आकरणीची रक्कम खालीलप्रमाणे होईल.

| कालावधी | एकुण पाण्याचा वापर लिटर मध्ये | दर प्रतिहजार लि. | रक्कम |
|---|---|---|---|
| १९.१२.९४ ते ३१.१२.९४ | ८८,८३५ | रू. ३. ०० | २६७. ०० |
| १.१.९५ ते ३१.३.९७ | ५६,१०,००० | रू. ३.०० | १६८००.०० |
| १.४.९७ ते ३१.३.९८ | २४,९५,००० | रू६.०० | १४,९७०.०० |
| १.४.९८ ते ३१.३.९९ | २४,९५,००० | रू३.०० | ७,४८६.०० |
| १.४.९९ ते ३१.३.२००० | २४,९५,००० | रू४. ५० | ११,२२८.०० |

विलंब आकार :- दोन्ही नळजोडण्यांवरील एकुण रक्कमेच्या एक तृतियांश
एकुण रक्कम - रू. ९६,०९१ + रू.९३,७५४= १,८९,८४५ x १/३
=६३,२८८.००
नळ जोडणी क्र. यु/१/३८ची एकुण थकबाकी =१८,९८६.००
क्र.१४५६३ + रू४४२३ (विलंब आकार)

..............................................................

एकुण रक्कम रू. १,३३,०२४.००

नळजोडणी क्र. यू/१/३८६८ पोटी दि. १९.८.९७ रोजी रू. १०,००० व २६.१०.९९ रोजी रू. २५,०००/- असे एकुण रू.३५,०००/- भरणा केला असुन नळजोडणी क्र. यु/१/३३१६ पोटी दि. २६.१०.९९ रोजी रू. १७,०००/- व २८.१०.९९ रोजी रू. ८०००/- व दि. १९.८.९७ रोजी रू.१०,०००/- चा भरणा केला असुन दोन्ही नळजोडण्यांपाटी एकुण रू. ७०,०००/- चा भरणा केला आहे. सदर नळ जोडण्यांपोटी माहे ऑगस्ट २००१ पर्यंत रूपये ४,७५,९३८/- एवढी थकबाकी आहे. मा. आयुक्त यांचे दालनात दि. २७.११.२००२ रोजी झालेल्या चर्चेनुसार व स्थायी समितीच्या अंतिम निर्णयास अधिन राहुन प्रस्तावित रक्कमेचा रू. १,३३,०२४/- रू. ७०,०००रू. =रू. ६३०२४/- एवढया रक्कमेचा भरणा करून

घेण्यासाठी मंजुरी मिळावी त्यामुळे थकबाकीच्या एकुण रक्कमेतील जादा आकारणी झालेली बिलाची रक्कम रू३ ,४२ ,९१४/- कमी होणार आहेत.

या प्रस्तावास मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असुन मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार प्रस्तावित रक्कम रू. ६३०२४/- चा भरणा करून घेणेसाठी व नळजोडणी क्र. यु/१/३८६८ व यु/१/३३१६ ची बिले १९.१२.९४ पासुन घरगुती दराने आकारणी करणेसाठी मान्यतेकरीता स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यास मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>२० <u>दिनांकः- ४. ७. २००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी.



ही सभा शिवशक्ती अपार्टमेंट उल्हासनगर. १ या उपभोक्त्याचे पाणी बिलामध्ये बिगर घरगुती ऐवजी घरगुती असे फेरबदल करणेचा प्रस्ताव स्विकृत करत नाही. कारण याकामी आयुक्त सक्षम असुन ते आवश्यक निर्णय घेऊ शकतात.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> श्री. जयरामदास किशोनमल उल्हासनगर. ३ या उपभोक्त्यास आकारलेले जादा पाणी बिल कमी करणे बाबत.

हा विषय सुध्दा याच प्रकारचा आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>या प्रस्तावाबाबत सर्वानुमते पूढील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> श्री. जयरामदास किशोनमल उल्हासनगर. ३ या उपभोक्त्यास आकारलेले जादा पाणी बिल कमी करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये श्री. जयरामदास किशोनमल बॅरेक १०३५/१ उल्हासनगर-३ यांची १५ मी. मी व्यासाची घरगुती नळजोडणीची पाणी बिले फेब्रुवारी-९७ पर्यंत प्रत्यक्ष मिटर वाचनाप्रमाणे गेलेली असून त्यानंतरची पाणी बिले

माहे जुन -९९ पर्यंत समान मिटर वाचत दाखविल्यामुळे महिना ८३,०९९ लिटर प्रति माह सरासरीने गेलेली आहेत. त्यामुळे तक्रारदार तर्फे खालील प्रमाणे तक्रार अर्ज सादर करणेत आली आहे. घरात एकूण पाच माणसे पाणी वापर करीत असतांना कार्यालयातर्फे जादा सरासरीने पाणी बिल आकारणी केली जात असल्याचे नमूद केले असून अर्जासोबत रेशन कार्डची झेरॉक्स प्रत जोडलेली आहे. तसेच दि.११.१२.२००१ रोजी पावती नं. १३६६३२ नुसार रू.११,०००/- या पाणी बिल भरणा केलेली असल्याची झेरॉक्स प्रत सादर केलेली आहे.

अर्जदाराच्या अर्जाच्या अनुषंगाने संबंधित शाखा अभियंता यांनी दि.३१.१२.२००१ रोजी प्रत्यक्ष साईट पहाणी करून खातरजमा केली असता, सदर कुटूंबामध्ये एकूण पाच माणसे असुन पाणी वापर कमीत कमी आकारणीनुसार दुरूस्ती करण्यास हरकत नसल्याचे नमुद केलेले आहे करिता दि. २०.१२.९४ ते २/९७ पर्यंत प्रत्यक्ष मिटर वाचनाप्रमाणे पाणी बिले गेलेली असून त्यानुसार जास्तीत जास्त प्रतिमहिना सरासरी वापर १६,००० लिटर प्रति महिना येत असल्याचे आढळेल.



दि. १४.३.२००२ रोजी मा. आयुक्त यांनी दिलेले आदेशानुसार दि. २०.१२.९४ ते २/९७ पर्यंत प्रत्यक्ष मीटर प्रमाणे बिल आकारणी असल्याने त्या कालावधीची पूर्ण रक्कम वसूल करावी. त्या नंतरच्या कालावधीसाठी प्रतिकुटूंब प्रतिदिन (५ x १५०=७५०लिटर्स ) प्रमाणे पाणी वापरले असे गृहीत धरून आकारणी करून वसुली करावी.

उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने सदर प्रकरणामध्ये मागिल सरासरी ८३,०९९ लिटर्स प्रती महिना नुसार गेलेली बिले मार्च-२००० पर्यंतची एकूण थकबाकी स्टेटमेंट वरून रूपये १३,९३२.०० इतकी आहे. त्याचप्रमाणे ५ x १५० = ७५०लिटर्स प्रति दिन म्हणजे २२,५०० लिटर्स प्रति माह प्रमाणे सुधारित विलंब शुल्कासह आकारणी मार्च २००२ पर्यंत रूपये ९९७९ इतकी आहे. मधल्या कालावधीत सदर नळधारकाने दिनांक ११.१२.२००१ रोजी ११००० रूपयाचा भरणा केलेला आहे. सदर भरणा केलेली रक्कम वजा करून मार्च २००२ पर्यंतची एकूण थकबाकी रूपये १६४६.०० इतकी रक्कम होती. मा. आयुक्त यांच्या दि. १२.४.२००२ रोजीच्या आदेशानुसार नळधारकांनी दि. १६.४.२००२ रोजी पावती नं. १३१२६८ नुसार रूपये १६४६.०० भरणा केली आहे.

या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार नळ जोडणी क्र. यु/३/५९५१ ची ३/९७ नंतरची पुढील पाणी बिले सरासरीनुसार २२५०० लिटर्स प्रति माह नुसार आकारणी करणेसाठी मान्यतेकरिता स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यास मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.२१</u> <u>दिनांकः- ४.७.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. कमला शर्मा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी.

ही सभा श्री. जयरामदास किशोनमल उल्हासनगर-३ या उपभोक्त्यास आकारलेले जादा पाणी बिल कमी करणेचा प्रस्ताव स्विकृत करत नाही. कारण याकामी आयुक्त सक्षम असुन ते आवश्यक निर्णय घेऊ शकतात.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे सात विविध कामी प्रशासनाने केलेल्या <u>संविदेची माहिती नोंद करणे बाबत.</u>

--२३--

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>या प्रस्तावाबाबत सर्वानुमते पूढील प्रमाणे ठराव समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गतचे सात विविध कामी प्रशासनाने केलेल्या <u>संविदेची माहिती नोंद करणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे केलेले कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००१-२००२च्या निधितून कामे करणेसाठी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनीय किंमत | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर-५ येथिल प्र.क्र. २० मध्ये हिल लाईन पोलिस स्टेशन संतोषी माता मंदिर जवळ सी.सी. पायवाटा बांधणे आणि शौचालय दुरुस्ती करणे.(उप-महापौर निधी, २८२८) | १,५०,०००/- | ५/४/२००२ | सिध्दनाथ म.का. सोसायटी |
| २. | उल्हासनगर-३ येथिल प्र.क्र. ५९ मध्ये मोनटी पॅलेस ते गुरुद्वारा रोड साईड नाली बनविणे. (नगरसेवक निधी,२८५४) | ६९,०००/- | ५/४/२००२ | श्री. विनायक म. का.सोसा. |
| ३. | उल्हासनगर-४ येथिल प्र.क्र. ५३ मध्ये आर्शिवाद हॉस्पीटल ते ममता अपार्टमेंट बॅ.नं. १३१७ ते १३२२ पर्यंत नाली बांधणे बॅ.नं. १३१४ जवळ आणि विविध ठिकाणी | १,५१,२००/- | ५/४/२००२ | श्री. विनायक म. का.सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | शौचालय दुरुस्ती आणि सी. सी. आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधी ,३०४८) | | | |
| ४. | उल्हासनगर-३ येथिल प्र.क्र. ५७ मध्ये बॅ.नं. ९००-९०१ जवळ सी.सी. पायवाटा आणि नाली बांधणे (नगरसेवक निधी ,३०५२) | ६३ ,०००/- | ५/४/२००२ | श्री. विनायक म. का.सोसा. |
| ५. | उल्हासनगर-३ येथिल प्र.क्र. ५७ मध्ये बॅ.नं. ९४७ जवळ समाजमंदिर बांधणे.(नगरसेवक निधी ,३०५३) | १ ,९८ ,५३०/- | ५/४/२००२ | श्री. विनायक म. का.सोसा. |
| ६. | उल्हासनगर-४ येथिल प्र.क्र. २५ मध्ये महादेव नगर येथे सी.सी. एम-२५० ने रस्ता व नाली बांधणे.(उप-महापौर निधी ,३०८५) | १ ,९९ ,८२०/- | ५/४/२००२ | श्री. विनायक म. का.सोसा. |
| ०७. | उल्हासनगर-३ येथिल प्र.क्र. २८ मध्ये विठ्ठलवाडी झोपडपट्टी येथे उद्यानाला संरक्षक भिंत बांधणे व उद्यान विकसित करणे.(उद्यान विकसित करणे) | ३ ,६५ ,५२४/- | ३०/४/२००२ | मा. शेरावाली कन्स्ट्रक्शन |

उपरोक्त कामे करण्यासाठी २००२-२००३ मध्ये तरतूद केलेली आहे. सदर कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी)अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करुन देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक ,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजूर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिति ठराव क्र.</u>     २२     <u>दिनांक:- ४. ७. २००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. मोहनदास रामरख्यानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. श्यामसुंदर रोहडा.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गतचे वरील ७ कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही-
अनुमोदकाची सही-

**एकमताने मंजुर**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा. सचिव :-**विषय क्र. ८ वाचून दाखवितात.
**विषय :-** अग्निशमण विभागासाठी अशोक लेलॅण्ड कॉमेट अल्कोची चेसीस थेट सरकार मान्य दरा नुसार कंपनी कडुन खरेदी करणेस प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

--२५--

**श्री. गिते (अग्निशमन अधिकारी):-**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सद्या दोन अग्निशमन केंन्द्र स्वतंत्रपणे कार्यरत आहेत. कॅम्प ४-५ साठी उल्हासनगर -५ येथे व उल्हासनगर कॅम्प १ ,२ व ३ साठी एक अशा प्रकारे दोन अग्निशमन केंन्द्रे कार्यरत आहेत.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-**(अग्निशमन दलात) नविन गाडी आली आहे. तीचा काय उपयोग आहे.

**श्री. गिते (अग्निशमन अधिकारी):-**शहराची वाढती लोकसंख्या, कारखानदारी व व्यापारी पेठ लक्षात घेता कॅम्प १ , २ व ३ साठी एकच अग्निशमन बंब कार्यरत असल्याने आणखी एक अग्निशमन बंब खरेदी करणे आवश्यक आहे.

**मा. सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुरः-**मागे एक गाडी अशीच मागविली होती ती अशीच पडुन आहे.

**श्री. गिते (अग्निशमन अधिकारी):-**त्या गाडीची अदयाप नोंदणी झालेली नाही.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-**मग हा प्रस्ताव पण असाच पारीत करायचा का?

**मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-**आपल्या कडे किती अग्निशमन केंन्द्र आहेत?

**श्री. गिते (अग्निशमन अधिकारी):-**२ , कॅम्प ५ येथे एक व मुख्यालयामागे एक असे दोन.

**मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-**कॅम्प ५ मध्ये एक व मुख्यालयामध्ये एक?

**मा. सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुर :-**''फायर फायटर'' एक गाडी बाहेर सडत पडली आहे तिचे काय?

**श्री. गिते (अग्निशमन अधिकारी):-**ती गाडी काम करू शकत नाही कारण त्या गाडीची नोंदणी झालेली नाही.

**मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-**तर त्या गाडीचे काय करत आहात?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-या गाडया कुणाच्या देखरेखी खाली आहेत कोण सांभाळते? संबंधित उपआयुक्त कोण आहे?

मा. सदस्य श्री. श्री. गिते (अग्निशमन अधिकारी):-कार्यालयिन कार्यवाही चालु आहे. वहान विभाग प्रमुख याबाबत सविस्तर सांगु शकतील.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :-ज्या कंपनीने ही गाडी तयार केली त्यांनी नोंदणीसाठी आवश्यक ती कागदपत्र आपणास दिली नाहीत का?

श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-त्या गाडीच्या नोंदणीसाठी आम्ही आर.टी.ओ कडे गेलो होतो त्यांनी सांगितले की, गाडीची ब्लू प्रींन्ट (आराखडा पाहिजे)



याबाबत आम्ही कंपनीस पत्राव्दारे २-३ वेळा कळविले, आराखडा एक दोन दिवसात देतो असे कंपनीने पत्रान्वये कळविले परंतु अदयाप त्यांनी तो दिला नाही.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने :-पासिंग नाही झाली म्हणुन अशीच पडुन आहे?

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :-त्या गाडीची किंमत किती आहे?

श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-यागाडीची किंमत २० लाख रूपये आहे, गाडी तयार करताना तीचा आराखडा तयार केला जातो. तो आराखडा नोंदणीसाठी आवश्यक असतो तो त्यांनी आपणांस दिला नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-वीस लाख असेच गेले? त्यास जबाबदार कोण?

मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे :-तर मग टाटा कंपनीवर केस करा. त्यांच्यावर कारवाई करा.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-तर आपण ती गाडी कशी खरेदी केली? याबाबत आपण अहवाल दिला होता का आयुक्तांना? कि थेट कंपनीस कळविले? तुमचा कुणीतरी वरीष्ठ अधिकारी असेल ना?

श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-आम्ही कंपनीला अहवाल दिला होता, आम्ही कंपनीस दोन-तीन पत्र लिहिली, एक दोन दिवसात देतो असे कंपनीने आपणास कळविले प्रत्यक्षात त्यांनी ती अदयाप दिली नाही तसेच या गाडीची विक्री करायची आहे असे पुणे, पिंपरी, चिंचवड, नासिक, नागपुर इत्यादी महानगरपालिकांना आम्ही कळविले होते यापैकी कोणत्याही महानगरपालिकेने ही गाडी खरेदी करण्यास इन्टरेस्ट दाखविला नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आपण आयुक्त व स्थायी समितीला अहवाल सादर केला होता का?

श्री. तुकाराम तारदाळकर (वाहन विभाग प्रमुख):-तत्त्कालीन मुख्याधिका-यांना अहवाल सादर केला होता. त्यांच्याच स्वाक्षरीने कंपनीशी पत्रव्यवहार केला आहे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-आयुक्त साहेबांना, पोखरकर साहेबांना हे माहित आहे का?

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर :-ती गाडी सडत ठेवण्यापेक्षा तीचा लिलाव केला जावा.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-लिलाव केला तर काय किंमत येणार आहे?

मा. सचिव:-भंगार मध्ये विकली तर १ लाख रूपये येतील.
श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-काही ना काही करू, पण पहिल्यांदा एक गाडी घेवू या, पासिंग होईल.

--२७--

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-पासींगची जबाबदारी तुम्ही घ्याल, असे तर नाही याचे पण असेच होईल? याची इतिवृतांत नोंद घ्या की, पासींगची जबाबदारी घेण्यास भडकवाड तयार आहोत.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने :-सडत पडलेल्या त्या जून्या गाडीचे काही तरी करा.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- अग्निशामण विभागासाठी अशोक लेलॅण्ड कॉमेट अल्कोची चेसीस थेट सरकार मान्य दरा नुसार कंपनी कडुन खरेदी करणेस प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेत अग्निशमन केंद्रामध्ये सद्या दोन स्वतंत्र अग्निशमन बंब असून चालु स्थितीत आहे. अग्निक्षमन अधिकारी यांच्या दिनांक २.७.२००१ रोजी सादर केलेल्या अर्जानुसार नविन फायर इंजिन खरेदीसाठी लेखी प्रस्ताव दिला असून त्या अर्जानुसार मा. आयुक्त, मा. मुख्य लेखाअधिकारी, मा. मुख्य लेखा परिक्षक यांच्या मान्यतेनुसार शहराची वाढती लोकसंख्या, कारखानदारी व व्यापारी पेठ इत्यादीचा विचार करता सध्या अस्तित्त्वात असलेले अग्निक्षमन बंब अपुरे आहेत. कॅम्प नं. ५ येथील कॅम्प ४ व ५ साठी सध्या अग्निक्षमन केंद्रामध्ये फक्त एकच वाहन कार्यरत आहे. तसेच उल्हासनगर ३ येथे कॅम्प नं. १ , २ , व ३ करिता एकच अग्निक्षमन बंब कार्यरत आहे. कॅम्प नं. ३ मधील अग्निक्षमन केंद्रात दोन अग्निक्षमन बंब सुसस्य ठेवणे गरजेचे आहे या बाबीचा विचार करता. मेसर्स ऑटो मेटीव्ह मॅन्युफॅक्चरर लिमिटेड यांच्याकडून सरकारी दर कराराच्या दरानुसार व मा. आयुक्त साहेब यांचे आदेशानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) अंतर्गत थेट चेसिस खरेदी करावी लागणार आहे. मेसर्स ऑटो मेटीव्ह मॅन्युफॅक्चरर लिमिटेड यांनी अशोक लेलॅण्ड कॉमेट अल्को १६११ या गाडयाचे चेसिसची किंमत रूपये ६६०१६२.७९/- इतकी दिली असून सदरच्या दरपत्रकानुसार अशोक लेलॅण्ड चेसिस खरेदी करणेसाठी प्रस्तावास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी सादर तसेच मा. आयुक्त साहेब यांच्या आदेशान्वये सदर मागविण्यात येणा-या चेसिसवर फेब्रिकेशनचे काम करून घेणेसाठी अंदाजपत्रकातील तरतुदीस बाधील राहुन टेंडर / निविदा मा. स्थायी समिती उल्हासनगर यांची प्रशासकीय वित्तिय मान्यता घेण्याबाबत आदेश दिले आहेत. चेसिस खरेदी पोटी रू. ६६०१६३/- खर्च येणार आहे. तसेच सदर

चेसिस वर फेब्रिकेशनचे कामासाठी अंदाजे रक्कम रू. १६०००००/- इतका खर्च अपेक्षित आहे व विक्रिवर रू. २५७८०५/- असे एकूण रक्कम २५१७९६८/- इतका येणार असून सध्या मा. महासभेने वित्तिय वर्ष २००२-२००३साठी नव्याने अंदाजपत्रकास मान्यता दिली असून त्यामध्ये अंदाजपत्रक भांडवली खर्च बाजु ब २ ii व iii नविन गाडी खरेदी साठी रूपये २५००००० व अग्निशमन साहित्त्य खरेदी साठी रूपये ३००००००/- असे एकुण ५५०००००/- रूपयांची तरतुद करण्यांत आलेली आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता नविन अशोक लेलॅण्ड चेसीस १६११ अधिनियमान्या ५ (२)(२) अंतर्गत थेट खरेदीस तसेच सदर खरेदी



केलेल्या चेसीसवर काम करून घेण्यासाठी निविदा / टेंडर मागविण्यात प्रशासकीय प्रस्तावित वित्तिय मान्यतेसाठी तसेच एकूण होणारा अंदाजीत खर्च रक्कम रूपये २५१७९६८/- यांस मान्यतेसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २३</u> <u>दिनांकः- ४.७.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. नीता आहुजा.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार अग्निशमन विभागासाठी "अशोक लेलॅण्ड कॉमेट अल्को १६१९" या गाडयांच्या चेसीस मे. ऑटो मोटीव्ह मॅन्युफॅक्चरर लि. यांच्याकडुन सरकारी दर कराराच्या अनुसार निविदाशिवाय थेट खरेदी करण्यास आयुक्तांस प्राधिकृत करित आहे. तसेच त्या प्रयोजनासाठी अंदाजित रक्कम रू. ६,६०,१६२.७९ व त्या चेसीस वर फॅब्रीकेशनच्या कामासाठी अंदाजित रक्कम रू. १६,००,०००/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ९ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल दुरूस्तीकरणे कामी सर्वात लघुत्त्तम दराचे निविदाकार मे.एस. एस. इलेक्ट्रीकल्स कंपनी, डोंबिवली यांची सर्वात लघुत्त्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>दशोरे साहेब स्पष्टीकरण करा....

*<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-</u>खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंन्द्र वार्षिक, ठेकेदारी तत्त्वावर चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी निविदा मागविण्यांत आल्या होत्त्या. प्राप्त झालेल्या निविदांमधील लघुत्त्तम दराची निविदा मंजूरीस्तव स्थायी समिती समोर ठेवली आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u>हा प्रस्ताव यापूर्वी दोन वेळा स्थायी समिती समोर आला होता. पहिल्यांदा हा ठेकेदार काम करण्यास तयार नव्हता आपण या*



*प्रस्तावास मंजूरी दिल्यानंतर ही तो काम करेल किंवा नाही हे सांगता येत नाही म्हणून हा प्रस्ताव मंजूर करताना याचाही विचार केला पाहिजे.*

*<u>मा. सचिव :-</u>मंजुर करू या, त्यानंतर ते तसा अहवाल देतील ना?*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>त्याची ई.एम.डी.ची रक्कम आहे ती जपत करता येईल ना?*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):-</u>त्यांची ई.एम.डी. ची रक्कम जप्त करता येणार नाही. कारण त्यांनी अगोदरच याबाबतचे पत्र दिले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-</u>ते काम करत नसतील तर?*

*<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>सेकंण्ड लोअेस्टला देता येईल.*
*<u>श्री. दशोरे (कार्यकारी अभियंता पा. पु. वि.):-</u>मे. एस.एस. इलेक्ट्रीक हे काम करणार नसतील तर हा पस्ताव पुन्हा फेर सादर केला जाईल, सद्या हा प्रस्ताव मंजूर करू या.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*<u>विषय :-</u> खडेगोलवली येथील मलपक्रिया केंद्र चालविणे, देखभाल दुरूस्तीकरणे कामी सर्वात लघुत्त्तम दराचे निविदाकार मे.एस. एस. इलेक्ट्रीकल्स कंपनी, डोंबिवली यांची सर्वात लघुत्त्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता देणे बाबत.*

*<u>प्रस्तावना</u>*

*खडेगालवली येथील मलप्रक्रिया केंद वार्षिक ठेकेदारी तत्त्वावर चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेचे काम मे.वैभव इलेक्ट्रीक वर्क्स कल्याण यांना देण्यांत आले होते. या कामाची मुदत दि. ३१.१२.२००१ रोजी संपलेली असून पुढील कालावधीसाठी नवीन ठेकेदार नेमण्याकरिता सदर कामाचा रू. १२,५९,९०६/- मात्र अंदाजित खर्चाचा प्रस्ताव दिनांक २२.११.२००१ रोजी सादर करण्यांत आला. त्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली असून बाब क्र. ७४९ दि. २१.३.२००२ नुसार तांत्रिक मान्यता घेतलेली आहे.*

*या कामाकरिता दै. लोकमत व दैनिक धनुषधारी या दैनिक वृतपत्रातून निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार एकूण पाच ठेकेदारांनी आपल्या*

निविदा दि. २२.३.२००२ रोजी महानगरपालिकेस सादर केल्या. त्यात खालील प्रमाणे दर नमूद केले आहेत.

१. मे.ओम. इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग -अंदाजित किंमतीपेक्षा १९ टक्के जास्त.
_ सर्व्हिसेस, डोंबिवली. (रू.१४,९९,२८८/-)

२ मे. फ्रेंडस इंजिनिअरींग कॉर्पोरेशन-अंदाजित किंमतीपेक्षा ५ टक्के कमी
नवी मुंबई (रू.११,९९,९११/-)

३ मे.अश्वमेध इंजिनिअर्स ॲन्ड -अंदाजित किंमतीपेक्षा १५ टक्के जास्त
कन्सल्टंट, नाशिक (रू.१४,४८,८९२/-)



४ मे.महाबळ एन्व्हायरो इंजिनिअर्स - अंदाजित किंमतीपेक्षा १२.७ टक्के जास्त
प्रा.लि.ठाणे. (रू.१४,१९,९५४/-)

५. मे.एस.एस.इलेक्ट्रीक कंपनी - अंदाजित किंमतीपेक्षा १२.५ टक्के कमी
डोंबिवली (११,०२,४१८/-)

उपरोक्त निविदांपैकी मे.एस.एस.इलेक्ट्रीक कंपनी, डोंबिवली यांची निविदा तुलनात्त्मकरित्त्या न्यूनतम असून वाजवी दराची असल्याने स्विकारण्यास प्रस्तावित आहे. यास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली असून सदर निविदेचा प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मंजूरीकरिता स्थायी समितीसमोर सादर करण्यांत येत आहे. त्यास मंजूरी मिळावी ही विनंती.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २४</u> <u>दिनांकः- ४. ७. २००२.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. कमला शर्मा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी सर्वात लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स एस.एस.इलेक्ट्रीक कंपनी डोंबिवली यांची रूपये ११,०२,४१८/- अंतर्भुत खर्चाची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता तसेच प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. १० वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> शहराची स्वच्छता राखण्याच्या कार्यक्रमात बाधा आणणा-या व्यक्तीकडून अधिभारआकार वसुल करण्यास मान्यता देणे बाबत.

<u>श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-</u>नागरिकांमध्ये नागरी शिस्त आणण्यासाठी हा प्रस्ताव आहे. तो पारीत केला जावा. दिल्ली , नवी मुंबई

इत्यादी सर्व ठिकाणी हा प्रस्ताव अंमलात आणला आहे. उच्च न्यायालयाचे पण असे मत आहे की, नागरिकांमध्ये नागरी शिस्त असली पाहिजे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आपण काय तयारी केली आहे? आम्ही कसा प्रस्ताव पारीत करणार? शहरामध्ये कचरा कुंडया नाहीत. साफसफाई बरोबर नाही. हा प्रस्ताव चांगला आहे परंतु कचरा कुंडया तर पुरवा ना?



श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-मुंबई उच्च न्यायालयाच्या मता नुसार नागरी शिस्त लावण्याकरिता शहराचे सौदर्य व सार्वजनिक स्वच्छतेच्या कार्यक्रमात बाधा आणणा-या व्यक्तींकडून अधिभार वसुल करावयाचा आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-दुरूपयोग झाला तर? वसुली करणारी व्यक्ती कशाप्रकारे वसुली करते. पन्नास रूपयांच्या ऐवजी १०० रू. घेतले तर?

श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-दुरूपयोग होणार नाही. आपण पावती देणार आहोतच ना?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-५० ते १०० रूपयांपर्यंत अधिभार आकार वसुल केला जाणार आहे. नेमका किती अधिभार घ्यायचा हे कोण ठरविणार?

श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-त्याकामी आपणास जो वाहतुक खर्च येतो ५० ते १०० रू. पर्यंत तो वसुल केला जाईल.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने :-प्लास्टिक पिशव्यांच्या वापराबाबत मागे महासभेत ठराव पारीत केला होता. परंतु त्यांच्यावर अदयाप निर्बंध घातलेले नाहीत. प्लास्टिकच्या पिशव्या वापरात आहेत त्या आहेतच प्लास्टीक पिशव्यांच्या वापरावर निर्बंध घातल्याचे टी.व्ही वर दाखविण्यांत येते, प्लास्टीक पिशव्यांमुळे शहरात दुर्गंधी वाढते, प्रदुषण वाढते. नाल्यांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्या फेकल्या जातात त्यामुळे नाले चोकअप होतात.

मा. सदस्या श्रीमती. जयश्री सुर्वे :-प्लास्टिकच्या पिशव्या वापरात आहेत त्या आहेतच.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-महासभेच्या त्या ठरावाची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही, ती का झालेली नाही? प्लास्टिक पिशव्यांमुळे नाले, गटारे भरून नाल्याचा/ गटारांचा प्रवाह बंद होतो.

मा. सदस्या श्रीमती. किरण माने :-याबाबत मागील महासभेत झालेल्या ठरावाची त्वरीत अंमल बजावणी झाली पाहिजे.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-भंगारवाले येतात ते कच-यातुन प्लास्टिकच्या पिशव्या काढुन कचरा सर्वत्र परसवतात.

मा. सचिव :-हा प्रस्ताव समंत समजायचा?

**<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-</u>**माझा विरोध आहे.

**<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>**मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांचा या प्रस्तावास विरोध असल्याने सदरचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यात येत आहे.

--३२--

<u>विषय :-</u> शहराची स्वच्छता राखण्याच्या कार्यक्रमात बाधा आणणा-या व्यक्तीकडून अधिभारआकार वसुल करण्यास मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

''स्वच्छ व सुंदर उल्हासनगर प्रकल्प'' राबविण्यासाठी शहराची स्वच्छता राखण्याच्या कार्यक्रमास बाधा आणणा-या व्यक्तींकडुन वाहतुक खर्च व प्रशासकीय आकार वसूल करणे आवश्यक आहे. त्यासाठी रस्त्त्यावर कचरा टाकणे, रस्त्त्यात थुंकणे, नाशिवंत माल रस्त्त्यावर टाकणे इत्त्यादी गोष्टी करणा-यांकडुन खालील नमुद वाहतुक खर्च व प्रशासकीय आकार वसूल करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. प्रकार | वाहतुक खर्च व प्रशासकीय आकार रूपये |
|---|---|
| १) उघडयावर प्रतिर्विधी करणे | २०० |
| २) रस्त्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे | ५० ते ५०० |
| ३)रस्त्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी बिडी, सिगारेट फेकणे इ. | ५० ते १०० |
| ४)थुंकणे, मावा खाऊन थुंकणे, पान खाऊन थुंकणे | ५० ते ५०० |
| ५)सार्वजनिक ठिकाणी लघवी करणे | ५० |
| ६)लॉटरी विक्रेते रस्त्त्यावर कचरा फेकणे | ५० ते १०० |
| ७)दुकानदार झाडलोट करून रस्त्त्यावर कचरा फेकणे | १०० ते १००० |
| ८)पानटपरी-रस्त्त्यावर कचरा टाकणे | ५० ते ५०० |
| ९)केळीच्या वखारी निर्माण होणारा कचरा रस्त्त्यावर फेकणे | १०० ते १००० |
| १०)भंगारवाले-भंगार रस्त्त्यावर फेकणे | १०० ते ५००० |
| ११)शहाळी विक्रेते शहाळी रस्त्त्यावर फेकणे | १०० ते १००० |
| १२)मांस विक्रेते नाशवंत मांस रस्त्त्यावर फेकणे | १०० ते १००० |
| १३)टायरवाले- टायर टयुब रस्त्त्यावर फेकणे | ५० ते १००० |
| १४)रस्त्त्यावर बांधकाम साहित्त्य ठेवणे, रॅबिट टाकणे | ५०० ते ५००० |
| १५)कंपनी/कारखाने टाकाऊ माल रस्त्त्यांवर फेकणे /टाकणे | १०००ते १०००० |
| १६)गोठे /तबेले/शेण, लिद टाकणे | ५०० ते ५००० |
| १७)पाणीपुरी, भेळपुरी, पावभाजी, फळविक्रेते, भाजीपाला विक्रेते, हातगाडया | १०० ते ५०० |
| १८)हॉटेल मालक चालक रस्त्त्यावर शिल्लक/ शिळे अन्न टाकणे | ५०० ते १००० |

-------------------------------------------------------------

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या अनुसूची १४ मधील प्रकरणांच्या नियम ५ (२)प्रमाणे उपरोक्त रक्कम वसूल करण्याच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेस विनंती आहे.

--३३--

**स्थायी समिती ठराव क्र. २५ दिनांकः- ४. ७. २००२.**

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड.

ही स्थायी समिती मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९च्या अनूसूची १४ मधील, प्रकरणाचे नियम ५ (२) प्रमाणे, स्वच्छ व सुंदर उल्हासनगर प्रकल्प राबविण्यासाठी शहराचे स्वच्छता कार्यक्रमात बाधा आणणा-या व्यक्तींकडुन वरील प्रसंगासमोर सुचविल्याप्रमाणे वाहतुक खर्च व प्रशासकीय आकार निश्चितीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. ११ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> शहरातील पाणी टंचाईच्या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे टॅकरने पाणी पुरवठा करणे कामी वाहतूक खर्च आकारणेस मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-</u>हा प्रस्ताव मागच्या वेळेस सुध्दा तुम्ही आणला होता.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>महापालिका जोपर्यंत नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा करत नाही तोपर्यंत टॅकरने केलेल्या पाणी पुरवठ्याचा वाहतुक खर्च / आकार घेतला जावू नये.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u>शहरात अगोदरच पाणी येत नाही अशा परिस्थितीत टॅकरने करण्यांत येणा-या पाणी पुरवठ्याबाबत वाहतुक खर्च आकारला जावू नये.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-मागे काही दिवसापूर्वी झोपडपट्टीवाल्यांनी पाण्याबाबत मोर्चा काढला होता याचा अर्थ झोपडपट्टया मध्ये पाणी येत नाही, इमारतीमधील रहिवाश्यांचा कधी मोर्चा येत नाही यांचा अर्थ इमारतीमध्ये पाणी येते. टॅकरव्दारे केला जात असलेल्या पाणी पुरवठयापैकी फक्त ३० टक्के पाणी पुरवठा झोपडपट्टयांमध्ये केला जातो व ७० टक्के पाणी पुरवठा सोसायटया व इमारतींमध्ये केला जातो.



महाराष्ट्रामध्ये कुठेच निशुःल्क पाणी पुरविले जात नाही म्हणुन टॅकरव्दारे केलेल्या पाणी पुरवठयाचा वाहतुक आकार वसुल केला जावा. महापालिका आर्थिक टंचाईत आहे , करोडो रूपये पाणी बिलाचे देणे बाकी आहेत. टॅकरव्दारे केलेल्या पाणी पुरवठयामुळे आणखी नुकसान होवू नये म्हणुन असा आकार वसुल केला जावा.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-फ्लॅट धारक प्रतिमहा १०० रू. पाणीपट्टी पोटी भरत असतात. झोपडी धारक प्रतीमहा ४० रूपये पाणी पट्टी भरतात. फ्लॅटधारक १०० रूपयं प्रतीमहा पाणी बिल भरूनही त्यांना पुरेसा पाणी पुरवठा होत नाही.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-शहरात पाण्याचे वाटप बरोबर नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचदांनी :-इमारतींमध्ये ७० टक्के पाणी पुरवठा होतो हे कसे काढले?

श्री. दत्ता भडकवाड (आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):-आपण फक्त वाहतुक खर्च घेणार आहोत. पाण्याचे पैसे घेणार नाहीत.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-टॅकरव्दारे ७० टक्के पाणी पुरवठा इमारती व इतर विभागात होत असतो. फक्त ३० टक्के पाणी पुरवठा दुर्बल घटक झोपडपट्टयामध्ये होतो म्हणुन महापालिकेची आर्थिक स्थिती पहाता वाहतुक खर्च आकारला जावा.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-शहरात पुरेश्या प्रमाणात पाणी पुरवठा होत नसल्याने टॅकरव्दारे होणा-या पाणी पुरवठयावर वहातुक आकार बसविला जावू नये. म्हणून हा प्रस्ताव सर्व संमतीने नाकारला जावा.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-जो पर्यंत महापालिका पुरेश्या प्रमाणात पाणी पुरवठा करण्याकामी सक्षम होत नाही. तो पर्यंत हा प्रस्ताव नाकारला जावा. शहरातील पाणी समस्या दुर होत नाही तोपर्यंत हा प्रस्ताव नाकारला जावा.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड :-प्रस्ताव नाकारला जात असेल तर त्यास माझा विरोध आहे. गैर वापर होईल.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-हा प्रस्ताव नाकरण्याबाबत मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड यांचा विरोध असल्याने याबाबत बहुमताने पूढील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत येत आहे.

विषय :- शहरातील पाणी टंचाईच्या ठिकाणी

महानगरपालिकेतर्फे टॅकरने पाणी पुरवठा
करणे कामी वाहतूक खर्च आकारणेस मान्यता
देणे बाबत.

--३५--

<u>प्रस्तावना</u>

दिनांक २६.१२.२००१ रोजी मा. आयुक्त यांचे दालनात सन २००२-२००३ करिताच्या अंदाजपत्रकासंदर्भात झालेल्या प्राथमिक चर्चेत मा. आयुक्त यांनी उत्पन्नाचे स्तोत वाढविण्याबाबत निर्देश दिलेले होते त्या अनुषंघाने ते मुख्य लेखा अधिकारी यांनी दि. २८.१२.२००१ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार टॅकरव्दारे पाणी पुरवठा करतेवेळी वाहतुक खर्च आकारणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

महानगरपालिकेतर्फे गेल्या ४-५ वर्षापासून वेळोवेळी जाहीर निविदा मागवून वाहतूक दर निश्चित करून टॅकरने पाणी पुरवठा केला जात आहे. सध्या रू. २०३/- प्रती खेप या दराने ७००० लि. क्षमतेच्या टॅकरसाठी वाहतुक दर मंजुर करण्यात आला असून सरासरी १४० टॅकरची प्रती दिन वाहतुक होत असते या मंजूर दराने महानगरपालिकेला वार्षिक वाहतुक खर्च रू. १०३७३३००/- मात्र (१४० टॅकर x रू. २०३/- x ३६५ दिवस) इतका भाडे तत्त्वावर घेतलेल्या टॅकरसाठी ठेकेदाराला द्यावा लागत आहे.

सध्या खाजगी ठेकेदारामार्फत गृहनिर्माण संस्था (सोसायटी) अपार्टमेंट बंगले खाजगी सर्व प्रकारचे कार्यक्रम, धार्मीक कार्यक्रम झोपडपट्टी व दुर्बल घटक विभाग इत्त्यादी ठिकाणी टॅकरव्दारे विनाशुल्क पाणी पुरवठा केला जात आहे. हा पुरवठा विनाशुल्क असल्यामुळेच टॅकरची नगरसेवकांकडून वाढत्या प्रमाणात मागणी झालेली आहे.

उल्हासनगर वगळता या परिसरातील इतर महानगरपालिका / नगरपालिका टॅकर सेवा शुल्क पुरवित आहे. सध्या होणा-या टॅकर पाणी पुरवठयापैकी अंदाजे ३००टक्के पाणी पुरवठा झोपडपट्टी व दुर्बल घटक विभागात होत सिन उर्वरित ७० टक्के शहराच्या इतर भागात होत आहे.

टॅकरने पाणी पुरवठा सेवा विनामुल्य असल्याने महानगरपालिकेवर वाढणारा आर्थिक बोजा मोठा असून या सेवेसाठी शेजारी असलेल्या नगरपालिका तसेच महानगरपालिकाप्रमाणे वाहतुक खर्च आकारणी केल्यास हा आर्थिक बोजा महानगरपालिकेवर पडणार नाही. म्हणून टॅकर पाणी पुरवठा सेवा शुल्क करण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता मिरा भाईंदर महानगरपालिकेचा मंजूर दर आधारीत धरून ना नफा ना तोटा तत्त्वावर टॅकर आकारण्याचे प्रस्तावित आहे.

सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी आणि मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय आणि वित्तिय मान्यते करिता स्थायी समिती सभेत ठेवण्यासाठी सादर करण्यात येत आहे त्यास मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.२६</u>                    <u>दिनांकः- ४. ७. २००२.</u>

सुचकाचे नाव :-श्री. ईश्वर पमनानी.

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार शहरातील पाणी टंचाईच्या जागी लोकांना महानगरपालिकेतर्फे टॅंकरने पाणी पुरवठा करणे कामी उक्त वाहतुक खर्च आकारणेस मान्यता देत नाही.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. ३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दिः-१.८.२००२.

<u>इतिवृत्त</u>

<u>दि. १.८.२००२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक १.८.२००२ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

१ श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु):- सभापती

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
४. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
९. श्रीमती. मोकल सिमा चंदाराम
१० श्री. रूपचंदानी बच्चाराम बाछोमल
११ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
१२ श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
१३ श्री. शर्मा कमला गंगाधर
१४ श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

तर

मा. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण व श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल हे सदस्य सभेस अनुपस्थितीत होते.

सायंकाळी ४.४० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव :-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. ४.७.२००२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-मागच्या सभेत पान नं. ९ वर चिजवानी साहेब हे म्हणाले टेलिफोन विभागाकडून पैसे येतील व जे रस्ते उघडले आहे ते बनवा. ना प्राकलन तयार झाले ना काम व त्याचा येथे कुठेही उल्लेख नाही.

मा. सचिव:-ठिक आहे.
मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :- सदरचे इतिवृत सर्वांनुमते संमत करण्यांत येत आहे.

मा. सचिव:-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

--२--

विषय :- सन २००१ -२००२ करिता उल्हासनगर महानगरपालिकेचे विविध विभागाचे कार्यालयात कामासाठी प्रपत्र, पुस्तके इत्यादी छपाईचे साहित्त्य पुरविणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-कोणत्त्या तारखेला गेले ते सांगा.

श्री. बालकृष्ण (भांडार अधिकारी):-डिसेंबर २०००मध्ये.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-इथे लिहिले नाही. आम्हाला माहिती तर पाहिजे ना पुर्ण. आयुक्त साहेब प्रत्येक गोष्ट बारकाईने पाहतात. प्रशासन असे नाही चालले पाहिजे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-ठिक आहे नंतर सविस्तर आणतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-नाही आधी सांगु द्या.

श्री. बालकृष्ण (भांडार अधिकारी):-वर्तमानपत्रात दिले होते.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-पेपरची कटींग असेल ना.

श्री. बालकृष्ण (भांडार अधिकारी):-हो.

(पेपरची कटींग त्यांनी दाखविली)

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी : सदरचा प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यांत येत आहे.

विषय :- सन २००१ -२००२ करिता उल्हासनगर महानगरपालिकेचे विविध विभागाचे कार्यालयात कामासाठी प्रपत्र, पुस्तके इत्यादी छपाईचे साहित्य पुरविणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेचे भांडार विभागाव्दारे सन् २००१-२००२ करिता विविध विभागाचे कार्यालयात कामासाठी लागणारे प्रपत्र, पुस्तके इत्यादी छपाई साहित्य करून घेणेसाठी राज्यस्तरावरील वर्तमान पत्रामध्ये जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आल्या होत्त्या त्यानुसार विहित कालावधीत खालील निविदा धारकांचे निविदा प्राप्त झाल्या होत्त्या.

| | | |
|---|---|---|
| १. | मेसर्स श्रुती प्रिंटर्स | उल्हासनगर |
| २. | मेसर्स जॉली प्रिंटर्स | उल्हासनगर |
| ३. | मेसर्स कैलाश इंटरप्राईजेस | उल्हासनगर |
| ४. | मेसर्स लकी प्रिंटर्स | ठाणे |



उपरोक्त निविदाधारकांपैकी मेसर्स श्रुती प्रिंटर्स यांचे बाब क्रमांक १ ते ४ , ६ ते ९, १३ ते १५, १७ व १९ तसेच मेसर्स कैलाश इंटरप्रायझेस यांचे बाब क्रमांक ५,, १० ते १२, १६ व १८ साठी लघुत्तम दर सादर केलेले होते व वाटाघाटी केले नंतर मेसर्स श्रुती प्रिंटर्स, मेसर्स कैलास इंटरप्रायझेस यांचा असा एकूण रुपये ६,४९,८३५/- इतका खरेदी खर्च येणार असून छपाई कामाचे अ-३-(ii) व सी-अ-३-(ii) या लेखाशिर्ष खालील तरतुदीमधून खर्च करावयाचा असून मा. आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांनी सदर संविदास मान्यता दिलेली असून, मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी देखील सदरचे काम करून घेण्यास शिफारस केली आहे. व त्यानुसार पुरवठेदाराकडुन करारनामा करून

काम सुरु करण्यात आले आहे. तरी सदर कामाची स्थायी समिती सभेपूढे माहितीसाठी सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> २७ <u>दिनांकः- १.८.२००२.</u>

सुचकाचे नाव :-श्रीमती. कमला शर्मा.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. नीता आहुजा.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार सन २००१-२००२ करिता उल्हासनगर महानगरपालिकेचे विविध विभागाचे कार्यालयात कामासाठी लागणारे प्रपत्र, पुस्तके इत्त्यादी छपाई साहित्त्य पुरविणे कामी वर उल्लेख केलेल्या न्युनतम निविदाकाराशी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u>एकात्त्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र.१ मधील रस्ता क्र. १० काचोल पेट्रोल पंप ते स्मशानभुमी पर्यंतच्या रस्त्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित <u>प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>



<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-</u>बोला साहेब तुमच्यातर्फे प्रस्ताव आहे का?

<u>मा. सदस्या श्रीमती. किरण मानेः-</u>शहर अभियंता सांगा.

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>गोषवा-यात दिले आहे ते मी वाचतो. मूळ प्राकलनात रुंदीकरणाच्या भागात खोदाई व खडीकरण हे काम धरलेले होते. परंतु ज्यावेळी या रस्त्त्याची खोदाई सुरु केली त्यावेळी भुगर्भात काही भागात कच्च्या मातीचा थर लागला होता. तो काढुन टाकणे आवश्यक होता. जेणेकरुन रस्त्त्याचा पृष्ठभाग भविष्यात दबणार नाही. या रस्त्त्यातील पृष्ठभाग पूर्वीपासून वेळोवेळी दुरुस्ती

करुनही खराब होत होता. असा कच्च्या मातीचा थर काढुन त्या जागी मूरुमाची भरणी करावी लागली असून त्यावर पुन्हा खडीकरण करावे लागलेले आहे. या भागामध्ये भुगर्भात पाण्याचा प्रवाह आढळल्याने फिल्टर ड्रेन बांधावे लागले आहेत. तसेच रस्त्याची रुंदी डी.पी. प्रमाणे ६० फुट रुंदीकरीता प्राकलन तयार केलेले होते. परंतू प्रत्यक्षात जागेवर रुंदी जास्त मिळत असल्याने सुमारे ६० ते ७० फुट रुंदी पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण झालेले आहे. तसेच वालधूनी पूलापासून स्मशानभूमी पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा पाण्याच्या प्रवाहानुसार जास्त रुंदीच्या व खोलीच्या नाल्या बांधाव्या लागल्या आहेत.

_मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-_कारण काय ते सांग्रा हिंदीत सांगा. एक तरी सांगा.

_मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-_कारण सांगा हिंदीत.

श्री. चिजवानी (शहर अभियंता)यांनीं पुन्हा गोषवारा हिंदीत भाषांतर करून वरीलप्रमाणे वाचून दाखविला.

_मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-_कुणी तयार केले हे.

_श्री. चिजवानी (शहर अभियंता):-_उत्तम इंजिनियरवाल्यांनी.

_मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-_ जेव्हा त्यांनी तयार केले तेव्हा त्यांना माहित नव्हते का किती घेतले कमीशन?

_श्री. चिजवानी (शहर अभियंता):-_३ टक्के दिले कमिशन. जेव्हा हा प्रकल्प तयार होत होता तेव्हा श्री. चंद्रशेखर साहेब होते. वेळ नाही मिळाला कमी कालावधी होता म्हणुन राहिले.

_मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-_त्यांना वेळ नाही मिळाला तुम्ही काय करत होता. तुम्ही तर ज्ञानी व टक्नीकल व्यक्ती आहात. ते काय चंद्रशेखर किंवा इंजिनियर नाही. बजेटमध्ये प्रोव्हीजन होती का?तुम्ही लक्ष दिले पाहिजे होते.

_श्री. चिजवानी (शहर अभियंता):-_त्यावेळी शॉर्ट पीरीयड होता यामुळे ते राहिले.

_मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-_पैसे कुठून येणार?



_श्री. चिजवानी (शहर अभियंता):-_बजेटमध्ये प्रोव्हीजन करावी लागेल.

_मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-_ महापालिका पैसे देणार का? आय.आर.डी.पी. तील उभारलेल्या कर्जाच्या आधारे कुठले रोड आहेत.

_श्री. चिजवानी (शहर अभियंता):-_सर्व लोनचे नाही.

_मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-_कोणते आहे सांगा. दोन गोष्टी करू नका. नीट सांगा तर सर्व करू कोणते लोनचे आहे कोणते नाही ते सांगा.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-६ नंबर वर लोनवाला आहे का?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-३ नं. काय आहे ते सांगा.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-लोन नसलेला आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-विना लोन कसे ३३ रस्त्त्यांमध्ये नाही का?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-नाही. ३३ रस्त्त्यांमध्ये आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-३३ मध्ये किती लोनचे रोड आहे. ८ ,१० ,३० ते सांगा ना जरा.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-४ नं. लोन नसलेला. ५ नं. लोनवाला, ६ नं. लोनवाला, ७ नं. लोन नसलेला.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-५ नंबर.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-लोनवाला आहे. ८ नं. आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-झाले का अजुन राहिले.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-चिजवानी साहेब एक मिनिट, इथे लिहिले आहे. उपरोक्त कारणामुळे किंमतीत वाढ झाली आहे. सदर कामाची सुधारीत प्राकलनिय किंमत ४८ ,९७ ,८६३/- इतकी होत आहे. ती मुळ प्रशासकीय व वित्तिय मंजुरी प्राप्त प्राकलनीय किंमत रू. २३ ,०६ ,४९५/- च्या तुलनेत १६३टक्के ने जास्त होत आहे. म्हणजे रू. २५ ,९१ ,३६८/- एवढी प्रस्तावित वाढ होत आहे.

२५ लाख एवढी जास्त वाढ होत आहे. आयुक्त साहेब, यावर चौकशी समिती बसवावी एवढी कशी वाढ झाली एवढा फरक कसा?

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-योग्य ती कार्यवाही करू.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-जरा खुलासा करतो या ज्या रिवाईज एस्टीमेट आल्या आहेत.



मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-रोड बनवणे जरूरी आहे. यावर आमची हरकत नाही. पण किंमतीत इतकी वाढ कशी झाली? यावर चौकशी समिती बसवण्यात यावी हि आमची मागणी आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-चौकशीचे असे काही नाही हे रोड जेव्हा तयार झाले तेव्हा श्री. आरडी. शिंदे साहेब आयुक्त होते त्यावेळी जे एस्टीमेट तयार केले नंतर हे काम वाढले आता रिवाईज्ड एस्टीमेट का आले? कारण आमचे जे पुर्वी आयुक्त हाते श्री. आरडी. शिंदे साहेब त्यांनी विकास आराखडयात ऐवढी रूची दाखवली त्यानुसार एस्टीमेट बनवले पण तिथे ६० च्या जागी आता २० फुट वाढवून मिळाले, त्यामुळे ८० फुट रोड झाला. दुसरे असे की आता श्री. चिजवानी साहेबांनी सांगितले

की, स्मशानभुमी येथे फिल्टर कसा घेतले. ते बनवणे गरजेचेच होते म्हणुन तिथे वाढ झाली असे बरेच रोड आहेत. ज्यामुळे प्राकलनात वाढ झाली.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>काम वाढले ठिक पण काही प्रमाण असेल का ४० चे असेल २० फुट जास्त मिळाले तर ६० फुट झाला का?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>होईल ६० फुट होईल.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>झाले का? कुर्ला कॅम्पचा रस्ता झाला ना?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>जरा इथे चुक झाली आहे १६३ टक्के. ११२ टक्के आहे. टायपिस्ट चुक झाली.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>नाही. यावर चौकशी समिती बसवा.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>चौकशी करण्यासारखे काही नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>हा फरक आहे म्हणून चौकशी झाली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>शहराच्या हितासाठी झाले आहे. जे एस्टीमेट तयार केले ते बरोबर आहे. चौकशी करण्यासारखे काही नाही. तुम्ही उदाहरणार्थ पहा. कुर्ला कॅम्पचे रोड आहे. स्मशान भुमीच्या बाहेर त्यावेळी जेवढा फुट रस्ता तयार झाला. तुम्ही नेहरू चौक ते प्रेमचंदच्या रोडपर्यंत तिथली रूंदी पण जास्त मिळाली, प्रारूप आराखडयात दाखविला त्यापेक्षा जास्त रूंदीचा रोड मिळाला. आयुक्त साहेबांनी रिवाईज्ड एस्टीमेंट आणले. चांगली गोष्ट आहे चांगले काम होईल. तुम्ही चौकशी बाबत काही बोलुच नका.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>पास तर करा पण चौकशी करायची

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u>एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र.१ मधील रस्ता क्र. १० काचोल पेट्रोल पंप ते स्मशानभुमी पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित <u>प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.</u>

--७--

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ मध्ये रस्ता क्र. १० हा उल्हासनगर-३ येथिल काजल पेट्रोल पंप ते स्मशान भूमी चौक या रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम डांबरीकरणाने करण्याकरीता हाती घेतले होते. या कामाची प्रशासकिय व वित्तीय मिळालेली प्राकलनीय किंमत रुपये २३ ,०६ ,४९७/- इतकी होती.

या कामाची कार्यवाही करत असतांना काही अतिरिक्त बाबींची कार्यवाही करणे आवश्यक होते. ज्या बाबींची मुळ प्राकलनात तरतूद नव्हती, अशा अतिरिक्त बाबी खालील प्रमाणे आहेत. मूळ प्राकलनात रुंदीकरणाच्या भागात खोदाई व खडीकरण हे काम धरलेले होते. परंतु ज्यावेळी या रस्त्याची खोदाई सुरु केली त्यावेळी भुगर्भात काही भागात कच्च्या मातीचा थर लागला होता. तो काढुन टाकणे आवश्यक होता. जेणेकरुन रस्त्याचा पृष्ठभाग भविष्यात दबणार नाही. या रस्त्यातील पृष्ठभाग पूर्वीपासून वेळोवेळी दुरुस्ती करुनही खराब होत होता. असा कच्च्या मातीचा थर काढुन त्या जागी मूरुमाची भरणी करावी लागली असून त्यावर पुन्हा खडीकरण करावे लागलेले आहे. या भागामध्ये भुगर्भात पाण्याचा प्रवाह आढळल्याने फिल्टर ड्रेन बांधावे लागले आहेत. तसेच रस्त्याची रुंदी डी.पी. प्रमाणे ६० फुट रुंदीकरीता प्राकलन तयार केलेले होते. परंतू प्रत्यक्षात जागेवर रुंदी जास्त मिळत असल्याने सुमारे ६० ते ७० फुट रुंदी पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण झालेले आहे. तसेच वालधूनी पूलापासून स्मशानभूमी पर्यंत रस्त्याच्या दुतर्फा पाण्याच्या प्रवाहानुसार जास्त रुंदीच्या व खोलीच्या नाल्या बांधाव्या लागल्या आहेत. अशा प्रकारे जागेवर आवश्यकतेनुसार कामाच्या प्रगतीत खंड पडू नये म्हणून सदर बाबीची कार्यवाही करुन घेतलेली आहे. परंतू मूळ अंदाजपत्रकातील या बाकीवरील तरतूद पुरेशी नसल्याने सदर वाढीव कामाची तरतूद सुधारित प्राकलनात केलेली आहे. सद्या रस्त्याच्या कामाचे डांबरीकरण होऊन तो वाहतूकीस खुला आहे.

उपरोक्त कारणामुळे कामाच्या किंमतीत वाढ होत आहे. त्याप्रमाणे सदर कामाची सुधारित प्राकलनीय किंमत ४८,९७,८६३/- इतकी होत आहे. जी मूळ प्रशासकिय व वित्तीय मंजूरी प्राप्त प्राकलनीय किंमत रुपये २३,०६,४९५/- च्या तुलनेत ११२ टक्के ने जास्त होत आहे. रुपये २५,९१,३६८/- एवढया किंमतीत प्रत्यक्षात वाढ झाली आहे.

सदर सुधारित प्राकलनास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली असून मा. आयुक्तांनी प्रस्ताव मान्य केलेला आहे. तरी सुधारित अंदाजपत्रक रुपये ४८,९७,८६३/- एवढया रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

--८--

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> २८ <u>दिनांकः- १८.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. नरेंद्रकुमार ठाकुर.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. सीमा मोकल.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास टप्पा क्र. १ मधील रस्ता क्र. १० काजल पेट्रोल पंप ते स्मशानभुमी चौक पर्यंतचा रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामा कामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. २३ मधूबन हॉटेल ते राणा ट्रेडिंग या डी.टी. कालानी कॉलेज मार्गच्या रस्त्याच्या कामाच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सचिवः-</u>पास?

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. २३ मधूबन हॉटेल ते राणा ट्रेडिंग या डी.टी. कालानी कॉलेज मार्गच्या रस्त्याच्या कामाच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ मध्ये ३३ रस्त्यांचे रुंदीकरण व नुतनीकरण करणेसाठी कार्यक्रम हाती घेतला असून त्यात अनु.क्र.२३ हा मधूबन हॉटेल ते राणा ट्रेनिंग हा डी.टी. कालानी मार्गच्या ८० फुट व ४० फुट अशा दोन रुंदी असल्यामुळे रस्त्याचे दोन भागात



प्राकलन तयार केले असून त्यात २३(ए)हे ८० फुट रुंदीच्या मधूबन हॉटेल ते डी.टी. कालानी हया भागासाठी व २३ (बी)हया ४०फुट रुंदीच्या डी.टी. कालानी ते राणा टेडिंग हया भागासाठी अशी दोन प्राकलने अनुक्रमे रुपये ७५,८५,७४०/- व ३६,२६,६८०/- तयार करुन त्यांना एकत्रित रित्त्या प्रशासकिय व वित्तीय मंजूरी रुपये १,१२,१२,४२०/- इतक्या रक्कमेसाठी घेण्यात आलेली होती. कामाचा निपटारा जलद गतिने होण्यासाठी दोन वेगळया भागाचे निविदा बोलावून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन कामे करण्यांत आले. मेसर्स जे.एम. म्हात्रे कंत्राटदार यांना १७.१९ टक्के कमी दराने २३ (ए) चे काम देण्यात आले. व मेसर्स जयहिंद कस्ट्क्शन कंत्राटदार ६.१० टक्के कमी दराने २३ (बी) चे काम देण्यात आले. सदर दोन्ही

कामे प्रगतीपथावर आहेत. एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत दोन कामे सुरु असतांना खालील कारणांमुळे कामाची किंमत वाढलेली आहे.

२३(ए):- सदर रस्त्यावरील अतिक्रमणे तोडल्यानंतर त्या भागात तांत्रिक दृष्टया रस्त्याचा पृष्टभाग मजबूत करण्यासाठी नव्याने ट्रीटमेंट देण्यात आली असून रस्त्याचे पृष्टभाग जास्त जाडीचे खडीकरण करण्यात आले आहे. याकिरता फिक्सेबल पेव्हमेंट डिझाईन करुन खडीचे थर (लेयर्स)ठरविण्यात आलेले आहे. मुळ प्राकलन तयार करते वेळी कमी वेळे अभावी सदर रस्त्याचे डिझाईन करण्यास पुरेसा वेळ उपलब्ध झाले नसल्यामुळे अंदाजपत्रक तयार करतांना सदर तरतूद अंदाजपत्रकात प्रस्तावित करण्यात आली नव्हती. ही प्रक्रिया पुर्ण करुन डिझाईन प्रमाणे खडीकरणाने रस्त्याचा पृष्ठभाग मजबुत करण्यात आलेला आहे. दुतर्फा उतार (केम्बर) येण्याकरीता मुळ रस्त्याची स्थिती खराब असल्याने कॅम्बर करेक्शन साठी जास्त एल.एम.बी. टाकावा लागत आहे.

२३(बी):-मुळ रस्त्यातील अतिक्रमणे तोडल्यानंतर वाढलेल्या रुंदीतील रस्त्याचा पृष्टभाग मजबुत होण्याकरीता जास्त खडीकरण करणे आवश्यक होते. याकरीता फिक्सेबल पेव्हमेंट डिझाईन नुसार खडीचे थर (लेयर्स) ठरविण्यात आलेले आहे मुळ प्राकलनामध्ये सदरची बाब अंतर्भुत नव्हती. सदर रस्याचे काम सुरु करतांना नविन डिझाईन नुसार खडीचा थर जास्त देवून रस्त्याचा पृष्टभाग मजबुत करण्यात दुतर्फा उतार (चेंबर)येण्याकरीता मुळ रस्त्याची स्थिती खराब असल्याने चेंबर करेक्शन साठी जास्त एल.एम.बी. टाकण्यात आला आहे. चेनेज १९५नविन मोरी बांधण्यात आली आहे. डांबराच्या दरात वाढ झाल्यामुळे तसेच ४०फुट रुंदीच्या रस्त्यात नाल्याच्या स्लॅबवर चेकर्ड टाईल्स व कर्ब स्टोन लावण्याचा निर्णय मा. आयुक्त यांनी मागावून घेतल्यामुळे सदरच्या बाबीत देखील वाढ झालेली आहे.

उपरोक्त कारणांमुळे २३(ए)या रस्त्याचे मुळ प्राकलनीय किंमत असलेल्या रुपये ७५,८५,७४०/- किंमतीच्या प्राकलनास सुधारीत (रिवाईज)केल्यानंतर त्याची किंमत रुपये ८२,९५,३३१/- इतकी झालेली आहे. २३ (बी)या रस्त्याचे मुळ प्राकलनीय किंमत असलेल्या रुपये ३६,२६,६८०/- किंमतीच्या प्राकलनात सुधारित केल्यानंतर त्याची किंमत रुपये ४७,१२,४५७/- इतकी झाली असून २३ (ए) व (बी) ची एकंदर सुधारीत प्राकलनीय किंमत रुपये १,३०,०७,७८८/- इतकी होत आहे.

मधूबन हॉटेल ते राणा टेड्रिंग या रस्त्या २३ चे मुळ प्राकलन १,१२,१२,४२०/- इतक्या किंमतीचे असून सुधारित प्राकलनीय किंमत रुपये १,३०,०७,७८८/- एवढी होत आहे. सुधारित प्राकलनिय किंमतीत रुपये १७,९५,३५८/- एवढी वाढ होत असून १६.०१ टक्के ने प्रत्यक्षात वाढ होत आहे.

--१०--

सदर सुधारित प्राकलनास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली असून मा. आयुक्तांनी प्रस्ताव मान्य केलेला आहे. तरी सुधारीत अंदाजपत्रक रुपये १,३०,०७,७८८/- एवढया रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. २९</u>                    <u>दिनांकः- १.८.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. ईश्वर पमनानी.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. जयश्री सुर्वे.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. २३ मधूबन हॉटेल ते राणा ट्रेडिंग या डी.टी. कालानी कॉलेज मार्गच्या रस्त्याच्या कामाच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ५ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १३ , चोपडा कोर्ट जवळील डॉ. आंबेडकर चौक ते ब्लॉक क्र. सी. ४३ पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सचिवः-</u>पास?

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १३ , चोपडा कोर्ट जवळील डॉ. आंबेडकर चौक ते ब्लॉक क्र. सी. ४३ पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

--११--

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ मध्ये रस्ता क्र.१३ हा उल्हासनगर-३ येथिल चोपडा कोट जवळील आंबेडकर चौक ते ब्लॉक सी-४३ पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व बांधकाम डांबरीकरणाने

करण्याकरीता हाती घेतले होते. या कामाची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळालेली प्राकलनीय किंमत रुपये ३१,६८,५२२/- इतकी होती.

या कामाची कार्यवाही करत असतांना काही अतिरिक्त बाबींची कार्यवाही करणे आवश्यक होते. ज्या बाबींची तरतुद मुळ प्राकलनात समाविष्ट नव्हत्त्या, अतिरिक्त बाबी अशा आहेत की, मुळ प्राकलनात रुंदीकरणाच्या भागात खोदाई व खडीकरण धरलेले होती, परंतु ज्यावेळी या रस्त्याची खोदाई सुरु केली त्यावेळी भुगर्भात काही भागात कच्च्या मातीचा थर लागला होता. तो काढुन टाकणे आवश्यक होता. जेणेकरुन रस्त्याचा पृष्टभाग भविष्यात दबणार नाही. या रस्त्यातील पृष्टभाग पूर्वीपासून वेळोवेळी दुरुस्ती करुनही खराब होत होता. असा कच्चा मातीचा थर काढुन त्या जागी मुरुमाची भरणी करावी लागली असून त्यावर पुन्हा खडीकरण करावे लागलेले आहे. ब्लॉक सी-४३ जवळील रस्ता क्रमांक ११ व रस्ता क्रमांक १३ यांचा चौक आहे. तेथे रस्त्याची रुंदी अतिरिक्त मिळत असल्याने या चौकाता खडीकरण, डांबरीकरण, नाल्याची लांबी इत्त्यादी बाबीमध्ये वाढ झालेली आहे. या चौकात व आंबेडकर चौकात रस्त्यांच्या नाल्यांतील पाण्याचा निचरा होणेकरिता तीन मो-या व फिल्टर ड्रेन बांधाव्या लागल्या आहेत. तसेच सर्व एकात्त्कि रस्ते विकास योजनेतील रस्त्यांवर चेकर्ड टाईल्स, वॉटर टेबल, कर्ब स्टोन बसविणे करिता निर्णय मागाहून झाला होता. अशा प्रकारे आवश्यकतेप्रमाणे कामाची प्रगतीत खंड पडू नये म्हणुन सदर बाबीची कार्यवाही करून घेतलेली आहे. सद्या रस्त्याच्या कामाचे डांबरीकरण होऊन तो वाहतूकीस खुला आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वाढीव काम झाल्यामुळे मूळ प्राकलनास सुधारित करावे लागले असून सदर कामाची सुधारित प्राकलनिय किंमत ४४,८५,८९२/- इतकी होत आहे. जी मूळ प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्राप्त प्राकलनिय किंमत रू. ३१,६८,५२२/-च्या तुलनेत ४१. ५७ टक्के ने जास्त होत आहे. रू. १८,१७,३७०/- एवढया किंमतीची प्रत्त्यक्षात वाढ झाली आहे.

सदर सुधारीत प्राकलनास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली असून मा. आयुक्तांनी प्रस्ताव मान्य केलेला आहे. तरी सुधारित अंदाजपत्रक रू. ४४,८५,८९२/- एवढया रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यांत येत आहे.



<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ३० <u>दिनांकः- १८२००२</u>

सुचकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. किरण माने.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्तिमक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १३, चोपडा कोर्ट जवळील डॉ. आंबेडकर चौक ते

ब्लॉक क्र. सी. ४३ मार्गेच्या रस्ता रूंदीकरण व बांधकामा कामीच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u>एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १८ चोपडा कोर्ट, गौल मैदान आणि अमन चौकाकडील लिंक रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सचिवः-</u>पास?

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u>एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १८ चोपडा कोर्ट, गौल मैदान आणि अमन चौकाकडील लिंक रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ मध्ये रस्ता क्र. १८ हा उल्हासनगर-३ येथील चोपड कोर्ट ते गोल मैदान आणि अमन चौकाकडील लिंग रस्ता या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकाम डांबरीकरणाने



करण्याकरिता हाती घेतले होते. या कामाची प्रशासकीय व वित्तीय मिळालेली मुळ प्राकलनीय किंमत रू. ७६ ,२९ ,६५८/- इतकी होती.

या कामाची कार्यवाही करत असतांना काही अतिरिक्त बाबींची कार्यवाही करणे आवश्यक होते. ज्या बाबी मुळ प्राकलनात समाविष्ट नव्हत्त्या, त्या अतिरिक्त बाबी सुधारित प्राकलनात समाविष्ट करण्यांत आलेल्या आहेत, त्या अशा आहेत. सदर रस्ता डी पी प्रमाणे ४०'०० रूंदीचा प्रस्तावित आहे. परंतू प्रत्त्यक्षात कामाची कार्यवाही करतांना जागेवर ५० ते ५५ फूट रूंदी उपलब्ध असल्याने तितक्या रूंदीचा बांधण्यात आला आहे. तसेच एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतील सर्व रस्त्यांमध्ये फूटपाथ वर चेकर्ड टाईल्स व वॉटर टेबल व कर्ब

स्टोन लावण्याचा निर्णय मागाहून त्यावेळचे आयुक्त यांनी सर्व संमतीने घेतल्यामुळे सदर अतिरिक्त बाबींचे काम वाढले आहे. त्यावेळी कामाची प्रगतीत खंड पडू नये म्हणून सदर बाबीची कार्यवाही करून घेतलेली आहे. सद्या रस्त्याच्या कामाचे डांबरीकरण होऊन तो वाहतूकीस खुला आहे.

या कारणामुळे कामाच्या किंमतीत वाढ होत आहे. सदर कामाची सुधारित प्राकलनीय किंमत ८९,३५,९०९/- इतकी होत आहे. जी मूळ प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्राप्त प्राकलनीय किंमत रू. ७६,२९,६५८/- च्या तुलनेत १७.१५: ने जास्त होत आहे. रू. १३,१५,९७१/- एवढया किंमतीत प्रत्त्यक्षात वाढ झाली आहे.

सदर सुधारीत प्राकलनास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली असून मा. आयुक्तांनी प्रस्ताव मान्य केलेला आहे. तरी सुधारित अंदालपत्रक रू. ८९,३५,९०९/- एवढया रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u>     ३१                    <u>दिनांक:- १८.२००२</u>

सुचकाचे नाव :- श्री. महेंद्र मुलचंदानी.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. जयश्री सुर्वे.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १८ चोपडा कोर्ट, गौल मैदान आणि अमन चौकाकडील लिंक मार्गच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामा कामी सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.



<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १२ चोपडा कोर्ट ते स्मशान भुमी समोरील चौका पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सचिव:-</u>पास?

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

**विषय :-** एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १२ चोपडा कोर्ट ते स्मशान भुमी समोरील चौका पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ मध्ये रस्ता क्र. १२ हा उल्हासनगर ३ येथील चोपडा कोर्ट ते स्मशानभूमी समोरील चौक या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकाम डांबरीकरणाने करण्याकरिता हाती घेतले होते. उक्त कामाची मुळ प्राकलनीय किंमत रू. ३१ ,४९ ,२२४/- इतकी होती.

काम प्रगतीपथावर असतांना अतिरिक्त बाबींची कार्यवाही करणे आवश्यक होते. ज्या बाबी मुळ प्राकलनात समाविष्ट नव्हत्त्या, त्या अतिरिक्त बाबीं सुधारित प्राकलनात समाविष्ट करण्यात आली आहे. ते असे रस्त्याच्या महानगरपालिकेच्या तरण तलावापाठीमागील कुंपनाची भिंत जी पूर्वी फार पूर्वीची होती. तरण तलाव आत झालेल्या कच-याच्या व मातीच्या भरणीमुळे ती कुमकवत झाली होती. सदर रस्ता रूंदीकरणाच्या वेळी सदर जुनी भिंत तोडून रस्त्याचे रूंदीकरण करण्यांत आले होते. त्या जागी रिटेरिंग वॉल बांधावी लागली. या भिंतीच्या दगडी बांधकामासाठी प्राकलनात पुरेशी तरतूद नव्हती. तरण तलावाच्या कंपाऊंड मध्ये असलेल्या मातीचा भार संरक्षण भिंत सहन करील अशा पध्दतीने ती नव्याने बांधण्यात आली आहे. रस्त्याच्या या भागातील पुर्वीचे खडीकरण त्याखाली असलेलया कच्च्या मातीमुळे पूर्वीपासून खचत आहे. त्याकरिता या ठिकाणी आवश्यकतेप्रमाणे खडीकरण पुन्हा करण्यात आलेले आहे. तसेच एकात्मिक रस्ते विकास कामातील सर्व रस्त्यांमध्ये फुटपाथवर चेकर्ड टाईल्स, कर्ब स्टोन, वॉटर टेबल बसविण्याचा निर्णय मागाहून त्यावेळच्या आयुक्तांनी सर्व संमतीने घेतला होता. इत्त्यादि कामे सुधारित अंदाजपत्रकात समाविष्ट केल्यामुळे संबंधीत बाबीत मध्ये वाढ होते. सदर रस्त्याचे कामातील प्रगतीत खंड पडू नये याकरिता उपरोक्त कामाची कार्यवाही करण्यात आली असून सदर रस्त्यावर सद्या वाहतूक सुरू आहे.

सदर कामाची सुधारित प्राकलनीय किंमत ४७ ,१० ,६१२/- इतकी होत आहे. जी मूळ प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्राप्त प्राकलनीय किंमत रू. ३१ ,४९ ,२२४/- च्या तुलनेत ५२.९५: ने जास्त होत आहे. व रू.१५ ,६१ ,३८८/- एवढया किंमतीत प्रत्यक्षात वाढ झाली आहे.

सदर सुधारीत प्राकलनास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली असून मा. आयुक्तांनी प्रस्ताव मान्य केलेला आहे. तरी सुधारित



अंदालपत्रक रू. ४७ ,१० ,६१२/- एवढया रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ३२** **दिनांक:-१.८.२००२**

सुचकाचे नाव :- श्रीमती. नीता आहुजा.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. किरण माने.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १२ चोपडा कोर्ट ते स्मशान भुमी समोरील चौक मार्गेच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामा कामीच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १ , हरमन मोहटा कंपनी ते प्रिया अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सचिवः-</u>पास?

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १ , हरमन मोहटा कंपनी ते प्रिया अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.



<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ मध्ये रस्ता क्र. १ हा उल्हासनगर १ येथील हरमन मोहता कंपनी ते प्रिया अपार्टमेंट या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकाम डांबरीकरणाने करण्याकरिता हाती घेतले होते. या

कामाची प्रशासकीय व वित्तीय मिळालेली प्राकलनीय किंमत रू. ३,८८,३४,४७४/- इतकी होती.

या कामाची कार्यवाही करत असतांना काही अतिरिक्त बाबींची कार्यवाही करणे आवश्यक होते. ज्या बाबींची तरतूद मुळ प्राकलनात समाविष्ट नव्हती, मूळ प्राकलनात रूंदीकरणाच्या भागात खोदाई व खडीकरण धरलेले होती. परंतू ज्यावेळी या रस्त्याची खोदाई सूरू केली त्यावेळी या प्राकलनाच्या रस्त क्र. १(ब) या भागात अनाधिकृत बांधकामे तोडून रूंदीकरण केलेल्या जागेत चिखल, गाळ काढून टाकणे आवश्यक होता. जेणेकरून रस्त्याचा पृष्ठभाग भविष्यात दबणार नाही. अशा मातीचा थर काढून त्या जागी मूरूमाची भरणी करावी लागली असून त्यावर खडीकरण करावे लागलेले आहे. या रस्त्यात एक कल्वर्ट होता व सदर कल्व्हर्ट रूंदीकरण करणे आवश्यक होता. परंतू मुळ प्राकलनात सदर कल्वर्टसाठी तरतूद ठेवलेली नव्हती. काही भागात रस्त्याची रूंदी जास्त उपलब्ध झाल्यामुळे जेवढी रूंदी प्रत्यक्षात मिळाली तेवढया रूंदीचा भाग विकसित केलेला आहे. अतिरिक्त कामामुळे सूधारित अंदाजपत्रकात वाढ झालेली आहे. काम प्रगतीपथावर असतांना कामाच्या प्रगतीत खंड पडू नये म्हणून उक्त बाबीचे काम करून घेतले आहे. सद्या रस्त्याच्या कामाचे डांबरीकरण करण्यांत आले असून वाहतूकीस खुला आहे.

उपरोक्त कारणामुळे कामाच्या किंमतीत वाढ झालेली आहे. सदर कामाची सुधारित प्राकलनीय किंमत ४,००,५१,८५३.६४ इतकी होत आहे. ती मूळ प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्राप्त प्राकलनीय किंमत रू. ३,८८,३४,४७४/- च्या तुलनेत ३.१२: ने जास्त होत आहे. म्हणजे रू. १२,१७,३७९.६४ एवढी प्रस्तावित वाढ होत आहे.

सदर सुधारीत प्राकलनास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली असून मा. आयुक्तांनी प्रस्ताव मान्य केलेला आहे. तरी सुधारित अंदालपत्रक रू. ४,००,५१,८५३.६४ एवढया रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

--१७--

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ३३ <u>दिनांकः- १.८.२००२</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील रस्ता क्र. १, हरमन मोहटा कंपनी ते प्रिया अपार्टमेंट पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामा कामीच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ९ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> मुरली कंम्पाऊंड येथील अडथळा निर्माण करणारे म.रा.वि. मंडळाचे एल.टी. लाईन व पोल हटविणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

माहितीसाठी आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>शहरात खुप ठिकाणी असे खांब होते ते केले का?

<u>श्री. आयलानी ( कार्यकारी अभियंता विद्युत विभाग ):-</u> एम.एम.आर.डी. ए. चे लोन घेतले होते. जसे जसे एस्टीमेट पास होतात. तसे काम कले जाते.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>मागे पण तुम्ही असेच सांगितले होते.

<u>श्री. आयलानी ( कार्यकारी अभियंता विद्युत विभाग ):-</u>कोणताही पोल हटविण्यासाठी प्रथम शहर अभियंता आणि कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग त्यानंतर ते आपला अहवाल कार्यकारी अभियंता विद्युत विभाग यांचेकडे पाठवितात. ते डिझाईन व प्राकलन तयार करतात, ते प्राकलन सब डिव्हीजनल इंजिनियर म.रा.वि.मं. यांचेकडे पाठवतात आणि त्यांचेकडुन कार्यकारी अभियंता यांचेकडे जातात नंतर तिथुन सुपरीटण्डंट इंजिनियरकडे जातात नंतर चिफ इंजिनियर कडे जातात. नंतर ते प्राकलन मंजूर होऊन आल्या मार्गाने ते परत आमच्या पर्यंत येते म्हणुन वेळ लागतो.



<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>याचा खर्च किती १०० टक्के?

<u>श्री. आयलानी ( कार्यकारी अभियंता विद्युत विभाग ):-</u>१,४४,५२०.००

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>सुपरविझन चार्ज १५ टक्के आपण द्यायचे हे काम आपला ठेकेदार करणार?

श्री. आयलानी ( कार्यकारी अभियंता विद्युत विभाग ):-हो.

मा. सचिव:-पास.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषय :- मुरली कंम्पाऊंड येथील अडथळा निर्माण करणारे म.रा.वि. मंडळाचे एल.टी. लाईन व पोल हटविणे कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

महानगरपालिकेने एकात्मिक रस्ता विकास कार्यक्रमाअंतर्गतच्या रस्त्त्यासाठी एम.एम.आर.डी.ए. चे कर्ज उपलब्ध आहे. तेथील म.रा.वि. मंडळाचे रस्त्त्यात येणारे पोल हलवुन एका बाजुला लावण्याचे कार्य अंडर प्रोटेस्ट १०० टक्के खर्चावर हाती घेतले आहे. त्या कार्यक्रमा अंतर्गत मेसर्स उत्तम इंजिनिअरिंग यांच्या वर सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या विनंती नुसार फॉउडेशन क्र. पी. ६ साठी अडथळा निर्माण करणा-या म.रा. वि. मंडळाच्या एल.टी. लाईन व पोल मुरलीधर कंपाउड उल्हासनगर उड्डाण पुल येथुन हलवण्यासाठी अक्षरी रूपये एक लाख पन्नास हजार चारशे एकात्तर व पैसे पस्तीस यांचे वर्कींग इस्टमेट म.रा.वि मंडळाकडून बनवून त्यांच्या ओ. आर. सी स्कीम मध्ये १५ टक्के च्या सुपरविझन चार्चवर बनवुन निविदा सुचना काढण्यात आली. त्या निविदा सुचनेच्या प्रतिसाधात तीन मक्तेदारांनी वेळेवर म्हणजे दिनांक ३.६.२००२ रोजी दुपारी ३. ०० वाजता त्यांच्या सिलबंद निविदा सादर केल्या व त्या त्याच दिवशी सायंकाळी ४. ३० वाजता उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्त्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे. १. मेसर्स आर.टी. इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इंजिनिअरींग सर्व्हिसेस अंदाज पत्रकीय रक्कमेपेक्षा १८ टक्के जास्त. २. मेसर्स एस. के. इंजिनिअरींग सर्व्हिसेस अंदाजपत्राकिय रक्कमेपक्षा २१ टक्के जास्त. ३. मेसर्स जाधव ॲण्ड सन्स अंदाज पत्रकीय रक्कमेपेक्षा ५. ६ टक्के कमी. सदर



तुलनात्त्मक तक्त्यानुसार मेसर्स जाधव ॲण्ड सन्स यांचे दर सर्वात कमी व वाजवी आहे. वरील सर्व बाबी लक्षात घेता मेसर्स जाधव ॲण्ड सन्स यांच्या निविदेस मंजुरी दिली दिनांक १.७.२००२ रोजी करारनामा करण्यात आला. हि माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ३४ दिनांकः-१ ८ .२००२.

सुचकाचे नाव :- श्रीमती. कमला शर्मा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार मुरली कम्पाऊंड उल्हासनगर-३ येथील अडथळा निर्माण करणारे म. रा.वि. मंडळाचे एच टी. लाईन व पोल हटविणे कामी वर उल्लेखलेल्या निविदाकाराशी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिवः-विषय क्र. १० वाचून दाखवितात.

विषय :- उल्हासनगर-३ येथील फस्टगेट जवळील जुन्या ,अर्धवट अवस्थेत बांधलेल्या प्रवेशव्दाराचे ठिकाणी नव्याने प्रवेशव्दार बांधणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तिथे एवढा मोठा फलक लावला आहे. श्री. हरदास माखिजा यांचे नाव आहे. उदघाटन कधी झाले. आमची हरकत आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-पाया खोदला असेल तेव्हा फलक लावला असेल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-रामदास आठवले साहेबांनी याचे उदघाटन केले होते तसा फलक देखिल लावला आहे.



मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-फाऊंडेशन चे वेळेचा फलक असेल.

मा. सदस्य श्री. नरेंद ठाकुरः-जेव्हा नाव ठेवले असेल तेव्हा आले असेल आता नसेल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मी नाव दाखवू का साईबाबा मंदीराकडे.

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>आम्ही नाही केले आमच्या अधिकाराचे नाव नसेल.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>तिथे महापौर हरदास माखिजा असे लिहिले आहे माझी हरकत आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>हरकत घेण्यासारखे काही नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>तिथे अजून उदघाटन झालेच नाही. तिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नाव आहे तेच राहील.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>हो मागे महासभेत पास झाले तेच नाव राहील.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>शांतीनगर इथे उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रवेशव्दार आहे. तिथे छत्रपती शिवाजी महाराज असा फलक लावला होता. त्याच्या बाजूला दुनिचंद कालानी असा फलक लावला आहे. त्या प्रवेशव्दाराजा परत नाव दिले का? फस्ट गेटला परत कुणा दुस-याचे नाव दिले जाणार का?*

*<u>मा. सदस्या श्रीमती किरण माने:-</u>चौकशी करा.*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>पाहतो चौकशी करतो.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>जे नाव दिले आहे त्याला महासभेने मंजुरी दिली आहे.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>दुसरे कुणाचे नाव दिले असेल तर चौकशी करा.*

*<u>मा. सचिव:-</u>जे ठरावात आहे तेच नाव दिले जाईल.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>आमचे हेच म्हणणे आहे एकच नाव असावे दुसरे नाव नको.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>चिजवानी तुम्ही चला तुम्ही तो फलक पहा.*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>आधी मी पाहून येतो.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>मला हे सांगा हे तुम्ही पाहिले की नाही तुम्ही साईड विझीट नाही केली याचा हा अर्थ आहे. तुम्हाला माहित नाही.*



*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>साईट विझीट केली पण फलक नाही पाहिला.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>चला मी तुम्हाला दाखवतो. माझा या प्रस्तावास विरोध आहे.*

*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>तुम्हाला सोबत घेऊन जातो.*

मा.सचिव:-पास सर्वसंमतीने विरोध नाही ना कुणाचा?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषय :- उल्हासनगर-३ येथील फस्टगेट जवळील जुन्या,अर्धवट अवस्थेत बांधलेल्या प्रवेशव्दाराचे ठिकाणी नव्याने प्रवेशव्दार बांधणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील उल्हासनगर व अंबरनाथ हद्दीलगत कल्याण अंबरनाथ रस्त्यावर ऑडनन्स फॅक्टरीच्या फर्स्ट गेट जवळ तत्त्कालीन नगरपालिकेने १२ वर्षापूर्वी एक प्रवेशव्दार बांधणेसाठी काम हाती घेतले होते. त्यानंतर त्यावेळी नगरपालिकेत काही अनपेक्षीत घडामोडी झाल्यानंतर व आर्थिक स्थिती कमकुवत झाल्यामुळे सदर काम अर्धवट अवस्थेत राहीले होते. या प्रवेशव्दाराबाबत कोणताही धोरणात्तमक निर्णय नसल्यामुळे व अंदाजपत्रकात तरतुद नसल्यामुळे कोणतेही काम करण्यात आलेले नाही.

सदरील प्रवेशव्दाराला मा. भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्याकरिता प्रस्ताव महानगरपालिकेच्या महासभेत दिनांक २०६.२००१ बैठकित ठराव क्र. ७ सदर प्रस्ताव मंजुर केलेला आहे. सदरचे काम करणे करिता सदर कामाचे सविस्तर प्राकलन मे. उत्तम इंजिनिअरिंग कन्सल्टन्सी प्रा. लि. यांनी तयार करून सदर कामाचे डिझाईन सह प्राकलन सादर केलेले आहे. प्राकलनाची किंमत २०,५२,८७१/- एवढी आहे.

तरी सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यासाठी व खर्चाबाबत धोरणात्तमक निर्णय घेण्यासाठी स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.



स्थायी समिती ठराव क्र. ३५ दिनांक:-१८.२००२

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्रीमती. सीमा मोकल.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर-३ येथील फस्टगेट जवळ जुन्या अर्धवट अवस्थेत बांधलेल्या प्रवेशव्दाराचे ठिकाणी नव्याने प्रवेशव्दार बांधणेकामी रू. २० ,५२ ,८७१/- च्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजूरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिवः-</u>विषय क्र. ११ वाचून दाखवितात.

विषय :-उल्हासनगर ५ येथील एस.टी. स्टॅण्ड ते शांती प्रकाश भवन, बसंत बहार सोसायटी मार्गे रस्ता रूंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>श्री. चिजवानी हे काय आहे? का झाले ते तर सांगा?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u> १ मीटर खोदकाम करून माती काढली...

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>वाढीव काम केले का, निविदेमध्ये नव्हते रोड मध्ये बदल का जे निविदेत लिहिले त्यापेक्षा जास्त रोड पुढे गेला का?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>नाही, शाळेचे येथील काम वाढले.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>म्हणजे नवे झाले ना रिवाईज कसे म्हणता?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>रिवाईज मध्ये आणले ना.



<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>तुम्ही बसस्टॉप पर्यंत आणि नंतर लिहीता शांतीप्रकाश शाळेपर्यंत असे करतो जास्त कसे?

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>शाळेचे यात समाविष्ट केले.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>याचा अर्थ निविदात होते त्यापेक्षा जास्त काम केले ना? ते तर सांगा ना.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-माझे येथील अमर डाय...

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मला सांगा चिजवानी हे असे कसे केले? असे किती रोड आहेत? तुम्ही काम वाढवले तुम्ही बसस्टॉपच्या पुढे कसे काम लावले?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-बस स्टॉपच्या पुढे काम नाही वाढवले.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-मी तुम्हाला पुन्हा विचारतो निविदेत लिहिले तेवढे का नाही करत. परत का कामात वाढ झाली? असे किती रोडचे काम केले काय गरज भासली? कुणीतरी मागणी केली असेल?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-तिथे लहान मुले शिकतात शाळेचे येथे दलदल...

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-निविदा तयार करताना हे सर्व तुम्ही पाहिले नाही का?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-आम्ही ते नाही पाहिजे मेन रोडचे होते परंतु नंतर जसे काम करत गेलो तर हे पण त्या रोडमध्ये काम आले.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-जेव्हा निविदा काढल्या तेव्हा शाळा नव्हती का? आता शाळा झाली का?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-तसे नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-शाळेने मागणी केली का? कुणी मागणी केली ते सांगा. लवकर सांगा.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-फाईल आणतो. नागदेवकडे आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-तोपर्यंत दुसरा विषय घ्या.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-भिवापूरकर तुम्ही सांगा.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):- यात स्वामी शांतीप्रकाश कॉलेज येथे रस्त्यासाठी मुळ अंदाजपत्रकात तरतुद नाही.



मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-हे जे तूम्ही जोडले याची आज का गरज भासली, कुणाची मागणी आहे का?

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-शाळेची मुले तिकडून जातात तिकडे दलदल असायची.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-दलदल आधीपण होती जेव्हा तुम्ही निविदा काढल्या.

*<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-</u>शाळा व कॉलेजच्या विद्यार्थ्यांना खुप अडचण होऊ लागली दलदल असायची.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>तुम्हाला हे आता जाणवले का? निविदा काढते वेळेस नाही का तेव्हा पण दलदल होती?*

*<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-</u>जेव्हा काम सुरू होते तेव्हा जर एखादे काम जरूरीचे लक्षात आले ते केले जाते जरूरीजे वाटते ते काम केले जाते. लोकांना तिथे अडचण होऊ लागली विद्यार्थ्यांना त्रास होत होता. रिक्क्षा असायची शाळेत जायला पुढे त्रास व्हायचा. लोकांच्या हिताचे काम केले.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>असे तुम्हाला वाटले की कुणाची मागणी होती.*

*<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-</u>टेक्नीकल विचार केला.*

*जून महिन्याच्या पावसाळयात सर्व शाळा कॉलेज सुरू झालेनंतर ब्लॉक नं २७५ पासून कॉलेज पर्यंत रस्ता दलदलीचा व खराब झालेला होता, व पावसाचे पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नसल्यामुळे शाळकरी मुले व प्राध्यापक, शिक्षक व सदर परिसरातील नागरिकांना येण्याजाण्याचा त्रास होत होता. वस्तुस्थितीनुसार अनेक मुले त्या दलदलीमुळे अपघातास पात्र झालेली होती. ही बाब लक्षात येताच या कार्यालयाचे तांत्रिक अधिकारी व त्या परिसरातील नगरसेवक यांनी जागेची पहाणी करून सदर रस्ता सिमेंट कॉक्रिटीकरण बांधण्याचे ठरविले.*

*<u>मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर:-</u>सांगा ना मागणी होती?*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>अजून एक गोष्ट हे रिवाइज्ड एस्टीमेंटचे काम इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सुरू करण्यात यावे लवकर आदेश द्यावा.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>हे रिवाइज्ड आहे. काम आधीच रिवाइज्ड झालेले ते आधी करा.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>अमर डाय रोड येथे खड्डे भरणेचे काम आहे. अजून भरले नाही. लोकांना त्रास होतो.*
*<u>मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकल:-</u>तिथुन ॲसिडचे टॅकर जातात. रस्त्त्यात खड्डे असल्याने मोठे अपघात घडण्याची शक्यता आहे. तिथे लोक राहतात. त्या गोष्टींना प्राधान्य दिले पाहिजे तुम्ही तिकडे लक्ष का देत नाही.*



*<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>हो ते करतो.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. मोकल सीमा:-</u>असे करू नका तिथे खुप त्रास आहे.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*<u>विषय :-</u> उल्हासनगर ५ येथील एस.टी. स्टॅण्ड ते शांती प्रकाश भवन, बसंत बहार सोसायटी मार्गे रस्ता रूंदीकरण व*

सिमेंट कॉक्रिटीकरण करणे कामीचे प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त कामास स्थायी समिती ठराव क्र. ११६ , दिनांक २१/९/२००१ अन्वये रूपये ७३ ,२९ ,२७४/- एवढया रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली होती. सदरचे काम मे. डी. एस. कन्स्ट्रक्शन यांना या कार्यालयाचे पत्र क्र. उमपा/साबां/काआ/३७ , दिनांक २४/४/२००१ अन्वये कार्यारंभ आदेशदेण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे सदरचे काम प्रगतीपथावर आहे.

सदर कामाची कार्यवाही सुरू करतांना सदरच्या जागेवर १ मीटर खोदकाम (Trail pit) घेतल्यानंतर असे निदर्शनास आले की, सदरचा परिसर अत्यंत दलदल व पृष्ठभाग प्लॅस्टिक मातीचा आढळल्यामुळे सिमेंट कॉक्रिटचा रस्ता बांधतांना कॉक्रिटचा पृष्ठभाग एम. ओ. एस. टी. च्या विनिनिर्देशानुसार त्याचा पृष्ठभाग चांगल्या मातीने मजबूत करणे आवश्यक होते. त्याकरिता कठीण मुरूमाचा एक जादा थर देऊन त्यावर बोल्डरर्सचा थर प्रस्तावित करून पृष्ठभागाची जाडी वाढविण्यात आलेली आहे. सदरची बाब मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट नसल्यामुळे सुधारित अंदाजपत्रकात अंतर्भुत करण्यात आली आहे.

सदर जागी १.२ ते १.५० मीटर खाली खोदकाम करतांना जलवाहीन्या, नागरिकांच्या जलवाहीन्या, तसेच गटरलाईन आढळून आल्या आहेत. सी. सी. कॉक्रिटचा रस्ता करतांना सदरच्या जलवाहीनींना रस्त्याच्या एका कडेला जलवाहीन्यांच्या जागा बदली करणे, जलवाहीन्या सुरक्षित ठिकाणी टाकून लोकानां पाण्याची टंचाई होऊ नये ही बाब लक्षात सदरच्या जलवाहीन्या रस्त्यामधून काढून रस्त्याच्या कडेला काढण्यात आलेल्या आहे. ही बाब मुळ अंदाजपत्रकात अंतर्भुत करण्यात आली नसल्यामुळे सुधारित अंदाजपत्रकात केलेल्या कामाची बाब अंतर्भुत करण्यात आली आहे.

तसेच चैनेज नं २७५ ते स्वामी शांती प्रकाश शाळा व कॉलेज यांची एकूण अंतर ६० फुट आहे. कॉलेज पर्यंत सिमेंट कॉक्रिटचा रस्ता बांधणे तसेच गटाराची सोय करणे इत्त्यादि बाबी मुळ अंदाजपत्रकात समाविष्ट केली नव्हती. जून महिन्याच्या पावसाळयात सर्व शाळा कॉलेज सुरू झालेनंतर चैनेज नं २७५ पासून कॉलेज पर्यंत रस्ता दलदलीचा व खराब झालेला होता, व पावसाचे पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नसल्यामुळे शाळकरी मुले व प्राध्यापक, शिक्षक व सदर परिसरातील नागरिकांना येण्याजाण्याचा त्रास होत होता. वस्तुस्थितीनुसार अनेक मुले त्या दलदलीमुळे अपघातास पात्र झालेली होती. ही बाब लक्षात येताच या कार्यालयाचे तांत्रिक अधिकारी व त्या परिसरातील नगरसेवक यांनी जागेची पहाणी करून सदर रस्ता सिमेंट कॉक्रिटीकरण बांधण्याचे ठरविले. तसेच त्यापुर्वी संबंधित नगरसेवक यांनी दिनांक १८/७/२००२ रोजी दिलेल्या पत्रानुसार अवलोकन करण्यात



आले व सदरची बाब सी ४/२ पावसाळयात पहाणी केल्यानुसार एकूण लांबी ६० मीटरचे काम सुधारित अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आले.

बसंत बहार ते जंक्शन जवळ बसंत बहार अपार्टमेंट कच्छीपाडा बॅ. नं २००४ जवळ ६०० मिमि. व्यासाचे आर. सी. सी. व्हयुम पाईपचे जूनी मोरी बांधलेली होती. पावसाळया वरील भागावरून म्हणजे १) शांती प्रकाश आश्रम ते बसंत बहार सोसायटी पर्यंत. २) जुन्या बस स्टॅंड पासून बसंत बहार सोसायटी पर्यंत ३) कच्छी पाडा बॅ. नं २००४ ते बसंत बहार सोसायटी पर्यंत. या तिन्ही बाजूकडून येणारे पावसाचे पाणी तसेच नागरिकांच्या इमारतीतून नाल्यास येणारे पाणी, पाईपच्या व्यासाची क्षमता कमी असल्यामुळे पाणी पाईप मधून वाहून न जाता तिन्ही बाजूने

येणारे पाणी रस्त्यावर जमा होत होते. तसेच बाजूला झोपडपटटी असल्यामुळे साचलेले सांडपाणी लोकांच्या झोपडपटटीत घूसून आरोग्यास व झोपडपटटीवाशीयांना धोका निर्माण होत होता. त्यामुळे तिन्ही बाजूकडून येणा-या पाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी ३.२ मिटर रूंदीची कॉंक्रिट कल्व्हर्ट बांधणेचे प्रस्तावित करण्यात आले व सदरचा कल्व्हर्ट झोपडपटटी परिसरातून नेऊन खालच्या बाजूस ज्या ठिकाणी उघडा नाला वाहत होता नाल्याला जोडयात आला आहे. त्याची एकूण लांबी ४९ मिटर होत असून त्याची तरतूद सुधारित अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यांत आली आहे.

पुर्वी झालेल्या धोरणात्मक निर्णयानुसार ४० फुट रूंद रस्त्याकरिता फुटपाथ, चेकर्ड टाईल्स, आर. सी. सी. कर्ब, लाईटींगचे पोल उभे करण्याकरिता फुटपाथ मध्ये पी. व्हीत्र सी. पाईप इलेक्ट्रीकल केबल टाकणे इत्त्यादी बाबी प्रस्तावित केली आहे. सदरची तरतूद मुळ अंदाजपत्रकात विचारात घेतली नसल्यामुळे सुधारित अंदाजपत्रकात सदरची बाब अंतर्भुत करण्यात आली आहे.

मुळ अंदाजपत्रकात व सुधारित अंदाजपत्रक यावरील आर्थिक गुंतागुंत सविस्तरपणे खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| अनु. | वर्णन | मंजुर अंदाजपत्रक | सुधारित अंदाजपत्रक |
|---|---|---|---|
| १ अ | रस्त्याचे काम + गटाराचे काम सी डी वर्क (भाग ओ) | ६८,१६,६४३/- | ७८,६७,१५२/- |
| ब | शांती प्रकाशचा स्कूल रस्ता अतिरिक्त काम (भाग बी) | - | १०,५७,७०१/- |
| क | नाल्याचे अतिरिक्त काम भाग सी | - | ६,७८,७२०/- |
| २. | रस्त्याची लाईट | ४,०४,४८१/- | ४,०४,४८१/- |
| ३. | ज्क्शन विस्तार (डेव्हलमेंट) | १,०८,१५०/- | १,०८,१५०/- |
| | | ७३,२९,२७४/- | १,०१,१४,१५४/- |

सदर कामाला मा. आयुक्त साहेब यांनी शहर अभियंता यांचे सोबत दिनांक २१/९/२००१ रोजी भेट दिली असून सदर कामाची पहाणी करून सविस्तर तपासणी केलेली आहे.

सदर कामावरील खर्च C-4(ii) P-२६ या तरतुद रू. १४.०० कोटी मधून लेखा शिर्षातून भागवायचा आहे.



सुधारित अंदाजपत्रकाची किंमत रू. १,०१,१४,१५४/- एवढी होत असून मुळ अंदाजपत्रकीय किंमतीत रू. २७,८४,८८०/- ऐवढी वाढ होत आहे व ३८: वाढ होत आहे. सदर कामास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली आहे. तरी सुधारित अंदाजपत्रक म्हणजे रू. १,०१,१४,१५४/- एवढया किंमतीस सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ३६ <u>दिनांक:-१ ८ २००२</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार उल्हासनगर-५ येथील एस.टी. स्टॅण्ड ते शांती प्रकाश भवन, बसंत बहार सोसायटी मार्गेच्या रस्त्याचे रूंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे कामीचे सुधारीत प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. १२ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमाअंतर्गत रस्त्यांच्या कडेला झाडे लावणे कामी प्रशासनास व्ही.व्ही. गार्डन यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. रूपचंदानी बच्चाराम :-</u>काय आहे.

<u>मा. सचिवः-</u>झाडे लावायची आहेत रोडवर.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>रोडवर का बाजूला, चिजवानी सांगा कुठे लावणार?



<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>गोषवा-यात लिहिले आहे.

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>या गोषवा-यात तीन रोडचा समावेश केला आहे. हरमन मोहटा ते प्रिया अपार्टमेंट. शांतीनगर ते पवई चौक, मानेरा जंक्शन ते लालचक्की हे तीन रस्ते आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>झाडे लावायची आहेत.

<u>श्री. चिजवानी (शहर अभियंता):-</u>हो. आणि देखभाल दुरूस्तीसाठी पत्र द्यायचे.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-लवकर लावा. पावसाळा संपत आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-कुठे किती झाडे लावणार.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-सी ब्लॉक मध्ये एकुण १९६ शांतीनगर ते पवई १७७ मानेरा जंक्शन ते लालचक्की १७५ एकूण ५४८ आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-गोषवा-यात समाविष्ट आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-हे वेगळे आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-काय समस्या आहे कधी चालू होईल.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-नाही, चालु केले. सैंपल आज आणणार आहे. सोमवार नंतर चालु करणार जसे हे मंजुर होईल तसे सुरू केले जाईल. दोन पावसाळयासाठी त्यांना दिले जाणार आणि देखभाल दुरूस्ती तेच करणार.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचदांनीः-किती टक्के देणार दोन का तीन?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-प्रतिभुती ठेऊया दोन टक्के.

मा. सदस्य बच्चाराम रूपचंदानीः-दोन टक्के कसे? दोन वर्ष काम करणार.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-५ टक्के देणार दोन वर्षाचे मिळून.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-समजा जर ते लगेच काम सोडुन गेले तर याला जबाबदार कोण?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-त्याच्यावर कायदयान्वये कार्यवाही केली जाईल.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-५ टक्के जास्त आहेत.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-ॲग्रीमेंट केले असेल ना.



मा. सदस्य श्री बच्चाराम रूपचंदानीः-५ टक्केनी दोन पावसाळे तो काम करणार का? ५ टक्के कसे तुम्ही काढले. करारनामा किती वर्षाचा आहे.

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-२ वर्षासाठी.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-त्यात शर्त टाका ना काम सोडुन गेला नाही पाहिजे.

मा. सचिवः-शर्त कोणती टाकायची ते सांगा.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आम्हाला सांगा कोणती शर्त. तो काय काम करणार.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-भिवापुरकर तुम्ही सांगा.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता):-त्याला पार्ट पेमेंट रिलिज करणार पूर्ण पेमेंट नाही.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-ठेक्यावर देत आहे. पेमेंट त्याचे रिलीज नाही करणार जर तो अर्धवट सोडून गेला तर.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-झाडे लावणार त्याला पाणी घालणे देखभाल कोण करणार झाड तोडले तर?

श्री. चिजवानी (शहर अभियंता):-हे सर्व काम ठेकेदार करणार आहे.

मा. सदस्या श्रीमती. किरण मानेः-तारेचे कुंपण लावणार का? नासधुस होईल.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-पास करा.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

विषय :- एकात्कि रस्ते विकास कार्यक्रमाअंतर्गत रस्त्त्यांच्या कडेला झाडे लावणे कामी प्रशासनास व्ही.व्ही. गार्डन यांच्याशी निविदा शिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना

एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ मध्ये एम. एम. आर. डी. ए. कडून कर्ज उपलब्ध करून खालील रस्त्त्या रूंदीकरणाची व बांधकामाची कामे हाती घेतली आहे.



| अ.क्र. | रस्ता | एकंदर प्राकलनीय किंमत (लाखात) | झाडे लावण्याच्या कामावरील किंमत |
|---|---|---|---|
| १ | हरमन मोहता ते प्रिया अपार्टमेंट पर्यंतचा रस्ता. | ४०४.५२ | १,७५,३३९/- |
| २ | शांतीनगर ते पवई चौक | ३१९.०३ | १,५८,३२१/- |
| ३ | मानेरा जंक्शन ते लाल चक्की | २९६.३२ | १,५६,४५०/- |

या कामांच्या एकंदर प्राकलनात झाडे लावणेचे कामाचा भाग अंतर्भूत आहे. सदर कामाकरिता यापूर्वी निविदा कार्यवाही झालेली नाही. सदर रस्त्यांची कामे आता पूर्णत्त्वास असल्याने सदर झाडे लावण्याची कामे या पावसाहयात हाती घेणेकरिता सदर कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याने निविदा मागविली होती. खालील निविदाकारांनी सदर निविदा भरलेली असून त्यांचे नावांसमोर त्यांनी भरलेले दर नमुद आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव | निविदा दर |
|---|---|---|
| १ | मे. मोतीरामानी हिरो | ९.००: जास्ती |
| २ | मे. श्री. कृष्णा कन्स्ट्रक्शन | १२.०८: जास्ती |
| ३ | मे. जय अंबे कन्स्ट्रक्शन | १६.२३: जास्ती |

उपरोक्त निविदामध्ये मे. मोतीरामानी हिरो यांची ९: जास्त दराची निविदा सर्वात कमी दराचर निविदा आलेली आहे.

सदर दर वाजवी पेक्षा जास्त वाटत असल्याने मे मोतीरामानी हिरो यांना दर कम करण्याकरिता वाटाघाटीकरिता बोलविले होते. परंतू त्यांनी दर कमी करण्यास असमर्थता दर्शविलेल्यामुळे तसे याबाबत त्यांनी दिनांक १२/७/२००२ चे पत्र या कार्यालयास पाठविलेले आहे. मे व्ही. व्ही. गार्डन्स हे सदर काम ३: कमी प्राकलनीय दराने करण्यास तयार असून याबाबत त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १२/०७/२००२ च्या पत्राने कळविले आहे.

निविदा प्रक्रियेत ९: जास्त प्राकलनीय दरापेक्षा ३: कमी प्राकलनीय दराने महानगरपालिकेचा फायदा होत असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२) अंतर्गत मे व्ही. व्ही. गार्डन्स यांना ३: ने कमी दराने सदर काम करण्याकरिता मंजुरी मिळून मा. आयुक्त यांचेशी संविदा करण्यास मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.



**स्थायी समिती ठराव क्र. ३७** **दिनांक:-१.८.२००२**

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेअनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत रस्त्यांच्या कडेला झाडे लावण्यांच्या कामी मे. व्ही. व्ही. गार्डन या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्रशासनास प्राधिकृत करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. १३ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा विभागा अंतर्गत विविध ११ कामांकरीता प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>मा.सचिवः-</u>पास.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यात येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा विभागा अंतर्गत विविध ११ कामांकरीता प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहराच्या विविध भागात खाली नमुद केलेली कामे वित्तिय अंदाजपत्रक सन २००२ मधून करण्यासाठी नगरसेवक यांनी विनंती केली आहे.



| अ.क्र. | कामाचे नांव | कलम | प्राकलनाची अंदाजीत रक्कम | करारनामा दिनांक | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.१७ उल्हासनगर-५ कलम मध्ये साईनाथ नगर, साईनाथ कॉलनी, पांडव नगर ते झुलेलाल टॉवर पर्यंत १०० मी. मी. व्यासाची जी. आय. पाईप लाईन टाकणे बाबत. | कलम ६७ | ३,०८,८००/- | २५. ५. ०१ | मे. सुदेश एंटरप्राईजेस |
| २. | प्रभाग क्र. १७ उल्हासनगर-५ मध्ये रविंद्र नगर पर्यंत १०० | कलम ६७ | १,४४,१००/- | २९. ५. ०१ | मे. सुदेश एंटरप्राईजेस |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मि.मि. व्यासाची जी. आय. पाईप लाईन टाकणे बाबत. | | | | |
| ३. | प्रभाग क्र. २१, उल्हासनगर-५ येथे भाटीया चौक ते श्रीकृष्ण अपार्ट. पर्यंत ५० मि. मि. व्यासाची जी. आय. पाईप लाईन टाकणे बाबत. | कलम ७३ | १६,६५०/- | १.१.०२ | मे. आदर्श म. का. स. स. |
| ४. | प्र. क्र. २१, उल्हासनगर-५ मनाली अपार्ट ते भाटीया रोड पर्यंत ५० मि. मि. व्यासाची जी. आय. पाईप लाईन टाकणे बाबत. | कलम ७३ | १२,५००/- | १.१.०२ | मे. आदर्श म. का. स. स. |
| ५. | पटेल नगर येथील कुंपण बांधकाम करणे, तसेच पटेलनगर बुस्टर उपविभागीय कार्यालय मधील बूस्टर व पाले येथील रिडींग रूमचे शटर बसविणे. | कलम ७३ ड | १,२८,९२०/- | १९.६.२००२ | मे. प्रभात म. का. स. स. |
| ६. | प्र. क्र. २५, उल्हासनगर-४ से. ३० मेन रोड ते एकता कॉलनी श्रीराम नगर पर्यत ६५ मि. मि. व्यासाची जी. आय. पाईप लाईन टाकणे बाबत. | कलम ७३ ड | ९९,२६५/- | १९.६.०२ | मे. वंदना म. का. स. स. |
| ७. | प्र. क्र. ११, उल्हासनगर-५ येथे ओ. टी. कॅम्प : येथे पंप रूम बांधणे बाबत. | कलम ७३ ड | ५२,८००/- | १४.६.०२ | मे. धनलक्ष्मी म. का. स. स. |
| ८. | प्र. क्र. १०, उल्हासनगर-५ येथे से. ४० ते कैलाश कॉलनी पर्यंत पाईप लाईन दुरूस्ती करणे बाबत. | कलम ७३ड | ६५,४१०/- | १७.६.०२ | मे. गुरूनानक म. का. स. स. |
| ९. | सिव्हील हॉस्पीटल, उल्हासनगर-४ येथील पंपाला एम.एस.ग्रील बसविणे बाबत. | कलम ७३ड | ११,०१५/- | १७६.०२ | मे. अनंत म. का. स. स. |
| १०. | प्र. क्र. ५४, उल्हासनगर-४ येथील बॅरेक १४४७,१४४८ ओटी. चौक येथे सेंट्रल हॉस्पीटल पासुन ५० मि. मि. व्यासाची जी. आय. पाईप लाईन टाकणे बाबत. | कलम ७३ ड | ६६,१५०/- | २.१.०२ | मे. वंदना म. का. स. स. |



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११. | प्र. क्र. ११, उल्हासनगर-५ येथे गायकवाड पाडा जवळील स्लूईस व्हॉलला एम.एस. प्लेट कव्हर बॉक्स बसविणे बाबत. | कलम ७३ ड | ३४,१२५/- | २२.५.०२ | मे. शारदा म. का. स. स. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (क) आणि ७३ (ड) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपनिबंधक ठाणे यांचे कडे मजुर कामगार संस्थला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती. त्यानुसार उपनिबंधक ठाणे यांनी

काम वाटप करून दिल्या नंतर मजुर कामगार सहकारी संस्था यांचेशी करारनामा करण्यात आला आहे.

तरी सदर माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३८ दिनांकः-१ ८ २००२

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा.

अनुमोदकाचे नाव :- श्री. बच्चाराम रूपचंदानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरात पाणी पुरवठा विभागा अंतर्गत ११ विविध कामी वर उल्लेखिल्याप्रमाणे प्रशासनाने केलेल्या सांविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने मंजुर

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. ३५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दि:-२३ ८ २००२.

इतिवृत्त

### दि. २३ ८ २००२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २३ ८ २००२ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

१ श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु):- सभापती

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
४. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
९. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाछोमल
१० श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
११ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
१२ श्री. शर्मा कमला गंगाधर
१३ श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल
१४ श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम

तर

१. श्रीमती. मोकल सिमा चंदाराम, २. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल , हे सदस्य सभेस अनुपस्थितीत होते.

सायंकाळी ५.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

मा. सचिव :-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. १८.२००२ चे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :- दि.१८.२००२ रोजीच्या सभेच्या इतिवृतांतातील पृष्ठ क्र.२२ वर विषय क्र. १० चा ठराव एकमताने मंजुर झाल्याची नोंद आली आहे. प्रत्यक्षात या ठरावाबाबत मी विरोध दर्शविलेला असताना ठराव एकमताने मंजुर झाल्याची नोंद कशी केली?

मा. सचिवः-मी आपणांस विचारणा केली होती की, विरोध नाही ना कुणाचा? प्रथम आपण विरोध केला होता परंतु नंतर ठिक आहे असे म्हंटले होते.

मा. सभापती(श्रीमती ज्योती कालानी):-होय बरोबर आहे आपण त्या प्रस्तावास संमती दर्शविली होती.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-महापालिकेचा फलक तेथे लावण्यांत आला आहे. त्यावर मा. महापौर, उपमहापौर यांचे नाव लिहिले आहे. अधिका-यांची सुध्दा त्यावर नावे लिहिली आहेत.



श्री. भिवापुरकर (कार्यकारी बांधकाम विभाग):-कोनशिला (foundation stone) बसविली होती. प्रवेशव्दार बांधण्यासाठी काम हाती घेतले होते, अर्धवट अवस्थेतील काम

धोकादायक स्थितीत असल्यामुळे तेथे प्रवेशव्दाराचे नव्याने बांधकाम करणे आवश्यक आहे.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-नुसते भुमीपुजन झाले होते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-आपण काय म्हणाला होतात, आम्ही तपासून येवू. आपण अहवाल दिला का? माजी महापौर श्री. हरदास माखिजा यांचे तेथे फलकावर नाव लिहिलेले आहे.

श्री. भिवापुरकर (कार्यकारी बांधकाम विभाग):-गटनेत्त्यांचीही त्यावर नावे लिहिली आहेत. ऑफीशियली काम झालेले नाही. काम सुरू करायचे आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-आपले म्हणणे आहे की, ऑफीशियली काम झाले नाही तर?

श्री. भिवापुरकर (कार्यकारी बांधकाम विभाग):-या प्रवेशव्दाराबाबत धोरणात्त्मक निर्णय त्यावेळी झालेला नसल्यामुळे व कामासाठी अर्थसंकल्पात तरतुद नसल्याने कोणतेही काम करण्यात आले नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-आम्ही संमती दिली होती ती नावासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावासाठी आपण तिथे श्री. दुनीचंद कालानी नांव देखील होते. तुम्ही म्हणाला होता की नाही एकच नाव दिले जाईल त्यास मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांची संमती होती दिले याला नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-नावास संमती दिली होती त्याबाबत आम्ही कुठे नाही म्हणतो?

मा.सचिवः-त्यावेळचा विषय नावासाठी ठराव नव्हता.

मा. सदस्य श्री. महेंद्र मुलचंदानीः-हे सायंकाळी ५. २५ वाजता स्थायी समिती सभागृहात उपस्थित झाले.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-मी सभेचे मत आजमावून श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी घेतलेली हरकत व त्या परिस्थितीनुसार जे घडले त्यात फरक आहे आणि माझे व सभेचे मत आजमावून या विषयाबाबत जी नोंद आली ती बरोबर आहे तरी सदर सभेचे दि. १८.२००२ रोजीचे उर्वरित इतिवृत जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा.सचिवः-विषय क्र.२ वाचून दाखवितात.

विषयः- उल्हासनगर शहरातील विविध ठिकाणी पाणी पुरवठा विभागाअंतर्गत ३० कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती याची सभेच्या कार्यवृतांतात नोंद करणे बाबत.

मा. सचिवः- ठिक आहे?

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-सर्वसाधारण निधीतून केले आहे?

*श्री. भिवापुरकर (कार्यकारी बांधकाम विभाग):-*हे काम मागे मंजुर झालेले आहे.



*मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-*या बाबत धोरण काय ठरविले आहे? सर्वसाधारण निधीतून सरासरी किती. रक्कमेची कामे केली जातात?

*श्री. दशोरे(उप अभियंता पाणी पुरवठा विभाग):-*मागील वर्षाची व या वर्षाची (२००१-२००२ व २००२-२००३) तरतुद संपली आहे.

*मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-*पाण्यासाठी उपोषण केले होते तेथे अदयाप जलवाहिनी टाकली नाही. उल्हासनगर कॅम्प नं. ४ व ५ मधुन पाणी समस्येबाबत एवढा मोठा मोर्चा काढला होता.

*मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-*कॅम्प नं. ४ व ५ मध्ये पाण्याची फार मोठी समस्या आहे. तेथे जलवाहिनी टाकण्याचे काम कधी होईल?

*मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-*श्री. भडकवाड साहेबांनी त्यावेळी आम्हाला १५ दिवसाचे आश्वासन दिले होते. याबाबत १५ दिवसात योग्य ती कार्यवाही करू असे श्री. भडकवाड साहेबांनी आश्वासन दिले होते, ही काय पध्दत आहे कामाची?

*श्री. दशोरे(उप अभियंता पाणी पुरवठा विभाग):-*त्याकामाबाबत प्राकलन तयार करून, त्यास मंजुरी घेवून कार्य आदेश सुध्दा दिलेले आहेत.

*मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-*ते काम अदयाप का होवू शकले नाही, आमच्या विरोधी पक्षनेत्यांनी उपोषण केले होते.

*श्री.डेग्मंवार (कार्यकारी अभियंता):-* हे काम लवकरात लवकर करू.

*मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-*प्रशासनाची इच्छा काय आहे? आम्ही अमरण उपोषण केले पाहिजे का? पिण्यास पाणी नाही अशा परिस्थितीत काय करायचे? आम्ही तक्रारी देतो तुम्ही प्रश्न सोडवत नाही.

*मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-*कॅम्प ४ व ५ मध्ये पाणी येत नाही, त्याबाबत काय करायचे?कधी काम होणार एवढा मोर्चा येऊन सुध्दा काम झाले नाही हे काम कसे झाले?

*श्री. दशोरे(उप अभियंता पाणी पुरवठा विभाग):-*३-४ कामे आहेत, एक महिनाभरात होतील.

*मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-*एक महिन्याचा कालावधी खुपच जास्त होतो.

*मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-*श्री. भडकवाड साहेबांनी १५ दिवसांची वेळ दिली होती. असे त्यांनी शिवसेना जिल्हा प्रमुखासमोर आश्वासन दिले आहे. इस्टीमेंन्ट डी. डी.आर कडे दिले आहे असे त्यांनी आम्हास सांगितले आहे. तरी काम का होत नाही.

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:</u>-प्राकलने तयार करुन शिफारशीसाठी लेखा विभागाकडे पाठविली जातात परंतु लेखाविभागांकडुन त्यास समंती दिली जात नाही, आयुक्त साहेब आपली भेट होत नसल्यामुळे ही प्राकलने तशीच्या तशी तेथे पडुन राहतात, उप-आयुक्त सुध्दा भेटत नाहीत, लेखा अधिकारी त्यावर लिहितात की पैसा नाही.....*



*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):</u>-सर्वसाधारण निधीतून कामे करण्याबाबत माझ्या निर्देशनास आणून दिल्यानंतर याबाबत पूर्नासमायोजन करण्याबाबत मी कार्यकारी अभियंत्त्यास लेखी निर्देश दिलेले आहेत.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):</u>- निधी पूर्नसमायोजनाबाबत मी आजच सर्व विभागांना पत्र पाठविले आहे.*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):</u>-कोणताही विभाग प्रमुख आपल्या विभागाचा निधी (सरेंडर) समर्पीत करु इच्छिणार नाही. एक कोटी मधून २५ लाख रुपयांचा निधी काढुन घ्या ना?*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):</u>-विभाग प्रमुखांचे मत आजमावून घेतल्याशिवाय मला असे करता येणार नाही, मी पत्र दिले आहे. त्याचे उतर आल्यानंतर मी करून घेईन.*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):</u>-प्राधान्य दया, टेलिफोन करून मागवून, माझ्याकडे पाठवा.*

*<u>मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):</u>-मुख्य लेखा अधिकारी, कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग) आपण दोघेही येथे आहात, निधी समायोजने बाबत आपण येथेच निर्णय घ्या ना...*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>२-२ लाखाचा नगरसेवक निधी ठरवून देण्यांत आलेला आहे, नगरसेवक निधीतील कामाबाबत कुण्या नगरसेवकाने पत्र दिलेले नाही की, माझ्या प्रभागात या निधीतून अमुक अमुक हे काम केले जावे. सार्वजनिक बांधकाम विभागात नगरसेवक निधीतील कामा बाबतजे कंन्ट्रोल रजिस्टर ठेवले आहे त्यामध्ये नोंद करून याकामांची प्राकलने अकाऊंटस क्लीअरींगसाठी लेखा विभागात पाठविली जातात.*

*नगरसेवक निधीतून २ लाखाची कामे करायची आहेत ती प्राकलने सुध्दा लेखा विभागात अदयाप पडून आहेत.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):</u>-सर्व नगरसेवकांना माहित पडले पाहिजे की मी कोणते व किती रक्कमेचे काम लिहून दिले आहे.  यासाठी मी पत्र दिले आहे.*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>नगरसेवक निधी २ लाख रूपये निश्चित केलेला असताना...*

*<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>एखादे तातडीचे काम करून घेण्यासाठी नगरसेवक निधीची तरतुद केली जाते. एकाच कामासाठी २ लाख रूपये खर्च करणे*

उचीत नाही. १०-१५ हजार रूपये एक-एक कामासाठी खर्च करू शकता. नगरसेवक निधी बाबत जो शासन निर्णय आहे त्यामध्ये असे लिहिले आहे.

<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):</u>-आपण सुचविलेल्या कामांपैकी कोणत्त्या कामास प्राधान्य दयावे हे नगरसेवकांनी लिहून देणे आवश्यक आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती. माने किरण:</u>-तुम्ही सांगावयास पाहिजे ना? काही नगरसेवक जूने आहेत काही नवे आहेत, त्यांना माहित नाही म्हणून आपण सांगावयास पाहिजे होते.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>आम्हास तांत्रिक ज्ञान नाही, आम्ही लिहून दिले की अमुक एक काम झाले पाहिजे. आम्ही जनप्रतिनीधी आहोत.

--५--

<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):</u>-काही वेळा नगरसेवकांना माहित नसते आम्ही कोणते काम सुचविले आहे. व ते किती लाखाचे आहे, काही वेळा एखादया प्राकलनावर लिहिले जाते की, (at verious places)विविध ठिकाणी म्हणजे नेमके कुठे? प्राकलनावर त्यांनी ठराविक (specific) अशा जागेचा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):</u>-अमुक एका इमारती पासून अमुक एका इमारती पर्यंत असा स्पष्ट (Specific)उल्लेख असला पाहिजे.

<u>मा. सभापती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>(specific) उल्लेख कसा करणार? आता पावसाचे दिवस आहेत, नगरसेवक निधीतील कामाबाबत आम्ही दोन महिन्यापुर्वी पत्र दिले आहे, जेव्हा आम्ही पत्र दिले तेव्हाची स्थिती व आताची स्थिती एकच असेल असे नसेल तीच स्थिती राहील असे नसेल, त्यात वाढ ही होवू शकते यासाठी विविध ठिकाणी या शब्दाचा उल्लेख केला जातो. व २ लाख रूपयांमध्ये जेवढे काम होईल तेवढे केले पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>समजा बॅरेक क्र६६३ते ६७१प्रभाग क्र. ३८ येथे एखादे काम करताना एखादा तुकडा सुटला असेल, लहानसे काम राहीले असेल तर ते सुध्दा केले जावे.

विचारा, अशा प्रकारे कामे यापुर्वी केली नाहीत का?

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा. वि):-</u>जेथे १०० फुटाचे, ५० फुटाचे काम आहे. तेथे त्या कामाबाबत लोकेशन दिले जाते. व जेथे त्यापेक्षा लहान लहान कामे असतात त्याबाबत विविध ठिकाणी असा उल्लेख केला जातो.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>आपणास या महापालिकेत किती वर्षे झाली?
<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी):</u>-या महापालिकेत ४ वर्षे झाली व संबंधित अभियंत्त्यांचे वेळोवेळी हा मुददा निर्दशनास आणून दिला आहे.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u> प्रत्त्येक सदस्याचे प्रभागात ५०-५० हजाराचे काम झाले पाहिजे असा आम्ही निर्णय घेतलेला आहे, त्यासाठी वारंवार आम्ही तुम्हास सांगितले पाहिजे का?

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी)</u>:-आपण निर्णय घेतला असेल तर तो आमच्या निर्दशनास आणून दिला असता तर.....*

*<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-</u>हे आपल्या वारंवार निर्दशनास आणून देण्यांत आले आहे. २ लाखाचे काम, जे मोठे काम असते त्याचे ठिकाणचा (Location चा) उल्लेख केला जातो. व जेव्हा छोटे छोटे काम असते तेव्हा विविध ठिकाणी असा उल्लेख केला जातो.*

*<u>मा. सदस्या श्रीमती. कमला शर्मा :-</u>काम तर काहीच होत नाही.*

*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी)</u>:-अमुक अमुक असे धोरण ठरले आहे असे सांगावे म्हणजे आम्ही हरकती /आक्षेप घेणार नाही.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>यापुर्वी अशा प्रकारची कामे झाली आहेत.*



*<u>श्री. शेंडे (मुख्य लेखा अधिकारी)</u>:-आता ती प्राकलने माझ्याकडे नाहीत. मुख्यलेखा परिक्षक यांचेकडे पाठविली आहेत.*

*<u>श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक)</u>:-शासनाच्या गाईड लाईन्स आहेत, जेथे कॅपीटल वर्क आहे तेथे त्याचे लोकेशन्स देणे जरूरीचे आहे.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>छोटया छोटया कामांसाठी आम्ही काही करू शकत नाही का?*

*<u>श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक)</u>:-सर्वसाधारण निधीमधून.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>प्रभागामध्ये २ लाखाचे काम जर तुम्ही करून देवू शकत नसाल तर आम्ही नगरसेवक म्हणुन निवडून येण्यात काय फायदा?*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>दुस-या महापालिकेमध्ये सर्वसाधारण निधी बाबत दुसरा स्वतंत्र विभाग असतो, आपल्या महापालिकेत याबाबत दुसरा स्वतंत्र विभाग नाही.*

*<u>श्री. काळे (मुख्य लेखा परिक्षक)</u>:-शासनाच्या निर्देशाप्रमाणे कोणत्त्याही एका ठिकाणी एकावेळी ५० हजारापेक्षा अधिक रक्कमेचे काम करता येत नाही फक्त अधिकृत झोपडपटटयांमध्ये सार्व-शौचालये बांधणे या सारख्या कामी एका ठिकाणी नगरसेवक निधीतून २ लाख पर्यंतचे काम करता येईल.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>२ लाखाचा नगरसेवक निधीची तरतुद कशासाठी केलीत?*

*<u>मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-</u>तुम्हाला असे वाटते तर तुम्ही सगळयांना बोलावून बैठक घ्यावयास पाहिजे होती.*

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-आम्ही निवडून येवून ६-७ महिने झाले. प्रभागामध्ये कामे होत नाहीत त्याबाबत आम्ही लोकांना काय सांगायचे?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-असे असेल तर अर्थसंकल्प तयार करताना याबाबत आम्ही विचार केला असता, पूढील वर्षाचा जेव्हा आम्ही अर्थसंकल्प तयार करू त्यावेळी याबाबत तरतुद ठेवू.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-समजा जेव्हा एखादे सार्वजनिक शौचालय अचानकपणे तुटते त्यावेळी काय करणार?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील विविध ठिकाणी पाणी पुरवठा विभागाअंतर्गत ३० कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती याची सभेच्या कार्यवृतांतात नोंद करणे बाबत.

प्रस्तावना



उल्हासनगर शहराच्या विविध भागात खाली नमुद केलेली कामे वित्तीय अंदाजपत्रक सन २००१-२००२ व २००२-२००३ मधुन करण्यासाठी नगरसेवक यांनी विनंती केली आहे आणि सर्वसाधारण निधीतून मंजूर झाले आहे.

| अ.क्र. | कामांचे नांव | प्राकलनाची अंदाजीत रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | उल्हासनगर-३ वॉर्ड क्र.१२ मध्ये रूक्मणी निवास ते बॅ.क्र. १०६५ रू. नं.७ पर्यंत ४० मी. मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत वॉर्ड क्र.१२ (नगरसेवक निधी) | २५,९००/- | २७.२.०१ | मे. लुणंगदेव म.का.स.सं. |
| २. | उल्हासनगर-१ मधील सफेवय लॅन्ड अपार्टमेंट ते नवीन दुरसंचार कार्यालय पर्यंत ३'' व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकण्याबाबत वॉर्ड क्र.३१/६० (सर्वसाधारण निधी) | रू.२६,७२५/- | २९.३.०१ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |
| ३. | उल्हासनगर महानगरपालिकेच्या अग्निक्षमण दल केंद्रात ५० मी.मी. व्यासाची नळजोडणी करणे बाबत (सर्वसाधारण निधी) | रू.३,७१०/- | ६.१२.०१ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | उल्हासनगर-२ येथे सुलिस व्हॉल्वचे चेंबरसाठी ए.एस.कव्हर टाकणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.१० ,८९०/- | ३१.१२.०१ | मे. ज्योती म.का.स.सं. |
| ५. | उल्हासनगर-३ येथे गुलराज अपार्टमेंट ते रतन पॅलेस जवळ बॅ. नं. १०७५साठी ५० मी. मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. वॉर्ड क्र.१२ (नगरसेवक निधी) | रू.१५ ,०४०/- | ३१.१२.०१ | मे.शिवमुद्रा म.का.स.सं. |
| ६. | उल्हासनगर-२ येथे फायर ब्रिगेट/ यु.एम.सी रेस्ट हाऊस ते साईनाथ अपार्टमेंट आणि चोपडा कोर्ट पाठीमागे ते त्रिपाठी अपार्टमेंट पर्यंत ५० मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. वॉर्ड क्र.६० (नगरसेवक निधी) | रू.६७ ,८१२/- | १६.२.०२ | मे. ज्योती म.का.स.सं. |
| ७. | उल्हासनगर-१ येथे वार्ड क्र. ४ मध्ये वाल्मिक नगर कमला नगर येथे ८० मी. मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधी) | रू.१ ,९९३५०/- | २१.३.०२ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |

--८--

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८. | उल्हासनगर-१ बॅरेक नं. २४५ साठी ४० मी. मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. वॉर्ड क्र.६५ (नगरसेवक निधी) | रू.३३५०२/- | २१.३.०२ | मे.गितांजली म.का.स.सं. |
| ९. | उल्हासनगर-२ येथे महालक्ष्मी ज्वेलर्स ते जेसन्स बॅरेक क्र. ३४६ ते ३५२साठी ५० मी. मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. वॉर्ड क्र.६५ (नगरसेवक निधी) | रू.१५ ,७५४/- | २१.३.०२ | मे. गितांजली म.का.स.सं. |
| १०. | उल्हासनगर-१ येथे फीश मार्केट पासुन ते भगवंती नावानी स्टेजच्या पाठीमागे ४० मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. (नगरसेवक निधी) | रू.९३ ,२००/- | २१.३.०२ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११. | उल्हासनगर-२ येथे शेरावाली अपार्टमेंट ते तेजुमल सोसायटी (बॅरेक क्र. ५३५ पर्यंत)५० मी. मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. वॉर्ड क्र.६७ (नगरसेवक निधी) | रू.४७,६२०/- | २१.३.०२ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |
| १२. | उल्हासनगर-३ मध्ये धोबीघाट चौक बॅरेक नं. ७३५ करिता ५० मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. वॉर्ड क्र.१० (नगरसेवक निधी) | रू.१८१९४/- | २७.३.०२ | मे. लुणंगदेव म.का.स.सं. |
| १३. | उल्हासनगर-३ येथे वार्ड क्र. ६० मध्ये डि.एड. कॉलेज ते शांतीसागर बंगला पर्यंत ५० मी.मी.व २५ मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.१९,६००/- | २७.३.०२ | मे.आशा म.का.स.सं. |
| १४. | उल्हासनगर-३ येथे अस्तित्त्वात असलेली १५० मी.मी. एम.एस. जलवाहिनी साठी सम्राट अशोक नगर साईबाबा मंदिरजवळ क्रॉस कनेक्शन करणे. वॉर्ड क्र. १३ (नगरसेवक निधी) | रू.३९,६७९/- | २८.३.०२ | मे. स्नेहल म.का.स.सं. |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५. | उल्हासनगर-३ येथे बॅरेक नं. ८९५ पांचमुखी अपार्टमेंट सेक्शन २१साठी १०० मी.मी. व ५० मी.मी. व्यासाची आणि सिंधुयुथ सर्कल जवळ दिनेश अपार्टमेंट सेक्शन २२ करिता १०० मी. मी. व ५० मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.४८,१९८/- | २.४.०२ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |
| १६. | उल्हासनगर-३ येथे कवरराम चौक ते बॅरेक नं. ९५० पर्यंत | रू.१२,४११/- | ३.४.०२ | मे.लुणंगदेव म.का.स.सं. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ५ मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. वॉर्ड क्र.५६ (नगरसेवक निधी) | | | |
| १७. | उल्हासनगर-२ मध्ये तरूण ट्रेडर्स ते राजावीर दवाखान्यापर्यंत ५० मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. वॉर्ड क्र.६७ (नगरसेवक निधी) | रू.१६,११०/- | ३.४.०२ | मे. लुणंगदेव म.का.स.सं. |
| १८. | पाणी पुरवठा उपविभाग उत्तर क्षेत्र उल्हासनगर-३ या कार्यालयातील मजुरांच्या खोलीवर नविन सिमेंटची पत्रे बसविणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.१३,६००/- | २४.४.०२ | मे.आद्या म.का.स.सं. |
| १९. | उल्हासनगर-३ येथे धरम पॅलेस ते बॅरेक क्र. ९७० पर्यंत ५० मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. वॉर्ड क्र.५६ (नगरसेवक निधी) | रू. १,३७,५२३/- | ६.५.०२ | मे. लुणंगदेव म.का.स.सं. |
| २०. | उल्हासनगर-३ येथे किर्पो सोसायटी ते नेनुमल सोसायटी ओ.टी. ३ पर्यंत पाईपलाईन बदली करणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू. १,१२,२०३/- | २०.५.०२ | मे. विक्की राज म.का.स.सं. |
| २१. | उल्हासनगर-३ येथे पंजाबी कॉलनी सुभाष नगर (आदर्श मेडीकल स्टोअर्स) ते भारतीय संस्कार आश्रम पर्यंत ८० मी. मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.३८,३५९/- | २७.५.०२ | मे. शिवमुद्रा म.का.स.सं. |



| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२. | उल्हासनगर-३ येथे कमला अपार्टमेंट ते बॅरेक नं.११५४ प्रांत कार्यालय जवळ ८० मी. मी.व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.७५,०३०/- | ११.६.०२ | मे. वंदना म.का.स.सं. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३. | उल्हासनगर-३ येथे फर्निचर बाजार ते हरिद्वार अपार्टमेंट पर्यंत ८० मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे बाबत. वॉर्ड क्र.६८ (जुना) (नगरसेवक निधी) | रू.९१,०००/- | ११६.०१ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |
| २४. | उल्हासनगर-३ येथे वार्ड क्र. ५९ (जुना)मध्ये दुषित पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता बुध्दविहार ते हनुमान मंदिर (महालक्ष्मी ट्रान्सपोर्ट) कौशल नगर येथे ५० मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.५५,६२५/- | ११६.०१ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |
| २५. | स्टॉफ क्वाटर्स ओ.टी उल्हासनगर-३ येथील छताची गळती दूर करणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.२,२११६७/- | १३६.०१ | मे. अनंत म.का.स.सं. |
| २६. | उल्हासनगर-२ प्र.क्र. ५ मध्ये बजरंग आईस फॅक्टरी ते संत आशाराम आश्रम पर्यंत २५ मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.२१,७५०/- | १७६.०१ | मे. सुरेश प्लाबिंग वर्कस |
| २७. | उल्हासनगर-३ येथे पांचमुखी अपार्टमेंट बॅरेक नं. ९०१ सेक्शन २१ पर्यंत १००मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणे व सिंधीयुथ सर्कल जवळ सेक्शन २२ करिता ५० मी. मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.७३,६३४/- | २०६.०१ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |
| २८. | उल्हासनगर-१ येथील जी.एस. आर. परिसरमध्ये ५० मी. मी. व्यासाची सी.आय. डबल फ्लेन्ज-स्लुईस व्हॉल्व बदलणे (सर्वसाधारण निधी) | रू.४५,५५५/- | २०६.०१ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |
| २९. | उल्हासनगर-३ येथे बालकनजी बारी ते बॅरेक नं. ६७३ पर्यंत पाईप लाईन बदलणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू. ८६,४११/- | २८६.०१ | मे. बजरंगबली म.का.स.सं. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | उल्हासनगर-३ येथे कमला अपार्टमेंट सरस्वती नगर पवई पर्यंत ५० मी.मी. व ८० मी.मी. व्यासाची जी.आय. जलवाहिनी टाकणे बाबत. (सर्वसाधारण निधी) | रू.५९,५४२/- | १०.७.०२ | मे. वंदना म.का.स.सं. |

उपरोक्त कामांना मा.आयुक्त, यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम,१९४९ चे कलम ७३ डी अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उपनिबंधक, ठाणे यांच्याकडे मजूर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती त्यानुसार उपनिबंधक ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर मजुर कामगार सहकारी संस्था यांच्याशी करारनामा करण्यात आला आहे. तरी सदर माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३९ दिनांकः-१३.८.२००२

सुचकाचे नाव :-श्री. रोहडा श्यामसुंदर
अनुमोदकाचे नाव :-श्री. पमनानी ईश्वर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहराच्या विविध ठिकाणी पाणी पुरवठा विभागा अंतर्गतचे ३० कामी प्रशासनाने केलेल्या सांविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृतांतात नोंद करीत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा. सचिव :-विषय क्र. ३ वाचून दाखवितात.

विषयः- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत टप्पा क्र. १ मधील सी ब्लॉक जवळील गुरूव्दारा ते डी.टी. कालानी कॉलेज या रस्त्याचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-३३ रस्त्यांचे जे काम चालु आहे त्यातील हे काम आहे काय? किती झाले आतापर्यंत?

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा. वि):-१२ रस्त्याचे काम झाले आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-आणखी किती रस्त्याचे बाकी आहे? आता किती रस्त्यांची आपण मंजुरी आणली आहात?

श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा. वि):-आता दोन रस्त्याचे हे प्रस्ताव आहेत. आणखी ३ प्रस्ताव येण्याची शक्यता आहे. एक शांतीनगर ते पवई, दुसरा बोटक्लब ते विठ्ठलवाडी, व



मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-प्राकलनीय रक्कमेपेक्षा किती वाढ आहे. १२. २० टक्के?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत टप्पा क्र. १ मधील सी ब्लॉक जवळील गुरूव्दारा ते डी.टी. कालानी कॉलेज या रस्त्याचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा-१ अंतर्गत सी-ब्लॉक जवळील गुरूव्दारा ते डी.टी. कालानी कॉलेज या रस्त्यांचे अंदाजपत्रकास रू. ३५,२७,७५५/- एवढया रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्राप्त झालेली आहे. स्थापत्त्य कामासाठी रू. २८,६०,२११/- एवढया रक्कमेचे निविदा मागविली असून मे. स्वराज्य कंन्स्ट्रक्शन यांना निविदा रक्कमेच्या १५.४०टक्के कमी दराने काम देण्यात आले आहे. सदरचे काम प्रगतीपथावर असतांना काही बाबीमध्ये वाढ झालेली आहे. मुळ प्राकलनात रस्त्याची रूंदी ४० फुट गृहित धरून अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. प्रत्त्यक्षात रस्त्याची रूंदी ४० फुटावरून ६० फुटा पर्यंत प्राप्त झाली आहे. व त्याप्रमाणे रस्त्याचे रूंदीकरण करण्यात आले आहे. अतिरिक्त रस्त्यांचे रूंदीकरणामुळे खर्चात वाढ झालेमुळे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

सी ब्लॉक जवळील गुरूव्दारा ते डी.टी कालानी कॉलेज चे मुळ प्राकलन ३५,२७,७५५/- इतक्या किंमतीचे असून सुधारित प्राकलनीय किंमत रू. ३९,५८,१९४/- एवढी होत आहे. सुधारित प्राकलनीय किंमतीत रू. ४,३०,४३९/-एवढी वाढ होत असून १२.२०टक्के ने प्रत्त्यक्षात वाढ झाली आहे.

सदर सुधारित प्राकलनास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली असून मा. आयुक्तांनी प्रस्ताव मान्य केलेला आहे. तरी सुधारित अंदाजपत्रक रू. ३९,५८,१९४/- एवढया रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४० दिनांक:-२३.८.२००२

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत टप्पा क्र. १ मधील सी ब्लॉक जवळील गुरूव्दारा ते डी.टी. कालानी कॉलेज

या रस्त्याचे रू३९,७८,१९४/- रक्कमेच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी सामिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१३--

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

विषयः- एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील राधास्वामी सतसंग हॉल ते ओ.टी. पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>मंजूर करू परंतु काम कधी होईल?

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u>एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा क्र १ मधील राधास्वामी सतसंग हॉल ते ओ.टी. पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय <u>मान्यता देणे बाबत</u>

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम टप्पा -१ मध्ये रस्ता क्र. ८ हा उल्हासनगर ३ येथील राधा स्वामी सतसंग हॉल ते ओटी चौक पर्यंतच्या रस्त्यांचे रूंदीकरण व बांधकाम डांबरीकरणाने करण्याकरिता हाती घेतले होते. या कामाची प्रशासकीय व वित्तिय मिळालेली प्राकलनिय किंमत रू. ४०,३७,७६८/- इतकी होती.

या कामाची कार्यवाही करत असतांना काही अतिरिक्त बाबींची कार्यवाही करणे आवश्यक होते. ज्या बाबींची तरतुद मुळ प्राकलनात समाविष्ट नव्हती, अतिरिक्त बाबी अशा आहेत की, ओटी चौकाकडील भागात या रस्त्याची नाली अस्तित्त्वात असलेल्या चोकातील सिमेंट कॉक्रिटच्या रस्त्याच्या कडेला असलेल्या नालीशी मिळवावी लागली. या ठिकाणी सिमेंट कॉक्रिटचा ब्लॉक टाकणे आवश्यक होते जेणे करून चौकातील सिमेंट कॉक्रिट रस्ता एकसंघ राहील. सदर सिमेंट कॉक्रिट ब्लॉकची तरतूद या कामाच्या मुळ प्रशासकीय मान्यता प्राप्त प्राकलनात नव्हती. मूळ रस्त्याचा दुतर्फा उतार व्यवस्थित (Chamber Correction) करणे आवश्यक होते. त्यामुळे रस्ड चे काम वाढले आहे.

तसेच सर्व एकात्मिक रस्ते विकास योजनेतील रस्त्यांवर चेकर्ड टाईल्स, वॉटर टेबल, कर्व स्टोन बसविणे करिता निर्णय मागाहून झाला होता. अशा प्रकारे आवश्यकतेप्रमाणे कामाची प्रगतीत खंड पडू नये म्हणुन सदर बाबींची कार्यवाही करून घेतलेली आहे. सद्या रस्त्याच्या कामाचे डांबरीकरण होऊन तो वाहतुकीस खुला आहे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे वाढीव काम झाल्यामुळे मूळ प्राकलनास सुधारित करावे लागले असून सदर कामाची सुधारित प्राकलनीय किंमत रू४२ ,०४७१३/- इतकी होत आहे. ती मूळ प्रशासकीय व वित्तिय मंजुरी प्राप्त प्राकलनीय किंमत रू. ४० ,३७ ,७६८/- च्या तुलनेत ४.१० टक्के ने जास्त होत आहे. रू. १ ,६८ ,९४७/- एवढया किंमतीचा प्रत्यक्षात वाढ झाली आहे.

सदर सुधारीत प्राकलनास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली असून मा. आयुक्तांनी प्रस्ताव मान्य केलेला आहे. तरी सुधारित अंदाजपत्रक रू. ४२ ,०४ ,७१३/- एवढया रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समितीपुढे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

--१४--

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ४१ <u>दिनांकः-२३.८.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. मुलचंदानी महेंद्र.

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमा अंतर्गत टप्पा क्र. १ मधील रस्ता क्र. ८ राधास्वामी सत्संग हॉल ते ओ.टी. चौक पर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण व बांधकामाचे रू४२ ,०४ ,७१३/- रक्कमेच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

विषयः- उल्हासनगर महानगरपालिका भुयारी गटार योजनेअंतर्गत भुयारी गटार योजनेचे देखभाल दुरूस्तीकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा :-</u>कसले काम आहे? सांगा.

श्री.एस.जी.डेग्मवार(कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-उल्हासनगर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेची देखभाल दुरूस्ती करणे, चोकअप काढणे इत्यादीचे वार्षिक अंदाजपत्रक तयार केलेले आहे.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण :-कुणी येत नाही, कामे होत नाही श्री. कारचे साहेब असताना मी तक्रार दिली होती ते काम झाले नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-गाडया नादुरूस्त असतात त्याचे काय?

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-हा प्रस्ताव प्राकलन तयार करण्यासाठी आहे. नंतर निविदा मागविली जाईल?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-आता काम करत आहेत का? की पुरे झाले आहे?

श्री. एस.जी.डेग्मवार (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-दि.१.९.२००२ ते ३.८.२००३ या कालावधीसाठी आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-त्यासाठी काय आमची परवानगी पाहिजे?

मा. सचिव:-१ सप्टेंबर पासून काम चालु होणार आहे?

--१५--

श्री. दशोरे(कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-हे प्राकलन आहे, हे नविन प्राकलन १ सप्टेंबर २००२ पासून सुरू करण्यांत येवून ते ३१ ऑगस्ट २००३ पर्यंतच्या कालावधीसाठी असेल.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-निविदेचा जो कालावधी आहे तो....

श्री. दशोरे(कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-निविदेचा कालावधी १२ महिन्याचा आहे.

मा.सचिव:-ठिक आहे?

मा. सदस्या श्रीमती. माने किरण / श्री. दिलीप गायकवाड:-भुयारी गटार योजना पुर्णपणे अयशस्वी ठरली आहे. यासाठी हे काम करणार?

श्री. एस.जी.डेग्मवार (कार्यकारी अभियंता पा.पु.वि):-ड्रेनेज चेंबर्सची सफाई करून घेतली जाईल. चोकअप काढुन घेता येईल.

मा. सदस्या श्रीमती. माने किरण:-मागच्या आठवडयातच जवळ जवळ २५ वेळा मी तक्रार दिली आहे त्याचे काय झाले? चेंबर्स सफाईसाठी कुणी येतच नाही, ते तुडुंब भरून वाहतात. सफाई कामी तुम्ही त्यांना सांगा.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर महानगरपालिका भुयारी गटार योजनेअंतर्गत भुयारी गटार योजनेचे देखभाल दुरूस्तीकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या भुयारी गटार योजनेची देखभाल दुरूस्तीकरिता महानगरपालिकेने पत्र क्र. UMC/WS & SD/Ex.Engg/2301 दि.३.११.२००१ नुसार वेगवेगळया ठेकेदारांना काम करणेचे आदेश दिलेले होते. तथापि सदरहू काम करण्याचा कालावधी निविदा शर्तीनुसार दि. ३०.७.२००२ रोजी संपत आहे.

भविष्यात पुढील काळात भुयारी गटार योजनेचे देखभाल दुरूस्तीचे काम करण्यासाठी माहे ऑगस्ट २००२मध्ये निविदा मागविणे अत्यंत जरूरीचे असल्याने पाणीपुरवठा व मलनिःस्सारण विभागाने भुयारी गटार योजनेचे देखभाल दुरूस्तीचे रू.१८.७० लक्ष किंमतीचे वार्षिक अंदाजपत्रक तयार केलेले असून सदर अंदाजपत्रकाचा कालावधी दि. १.९.२००२ ते ३०.८.२००३ आहे. सदरहु काम करण्यासाठी महानगरपालिकेच्या २००२ ते २००३ वार्षिक अंदाजपत्रकात रू.३२.०० लाखाची तरतुद केलेली आहे.

भुयारी गटार योजनेच्या अंदाजपत्रकातील दरसुची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००१/२००२ च्या दरसुचीनुसार आधारभुत असून महानगरपालिकेच्या हददीतील क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी एअरटेक मशिन (Sewere cleaning machine) पोहचणार नाही अशा अरूंद रस्ते, गल्ली व बॅरेकसाठी तयार केलेले आहे.



भुयारी गटाराच्या देखभाल दुरूस्तीच्या वार्षिक अंदाजपत्रकात मेनहिल चेंबर साफ करणे/ तुटलेले चेंबर दुरूस्त करणे, चेंबरना फ्रेम व कव्हर बसविणे तसेच इत्यादी किरकोळ कामांचा समावेश आहे.

वरील भुयारी गटार योजनेच्या देखभाल दुरूस्तीच्या वार्षिक अंदाजपत्रकासाठी मुख्यलेखा अधिकारी व मुख्यलेखा परिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यतेकरिता स्थायी समितीसमोर सादर करण्यात येत आहे. त्यास मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ४२ दिनांकः-२३.८.२००२

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील भुयारी गटार योजनेकामी रू.१८. ७० लक्ष या अदांजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

विषयः- वाहन विभागातील रूग्णवाहिका व शववाहिनीचे दर वाढविणेस मान्यता देणे बाबत.

<u>श्री. कारचे (उपायुक्त अ.ब्रा.विभाग):</u>-आपल्या महापालिकेच्या वाहन विभागात असलेल्या रूग्णवाहिका व शववाहिनीचे दर १९९२ मध्ये निश्चित केलेले असून मुंबई पर्यंतच्या भाडयासाठी २०० रू. भाडे निश्चित केले असून त्यामध्ये अद्याप वाढ
केलेली नाही. शासन निर्णयानुसार ना नफा ना तोटा या धोरणानुसार हा प्रस्ताव असून प्रतिक्षाशुल्क म्हणून रू.३०/- एवढा आकार वसुल करण्याचा प्रस्ताव आहे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>आपणाकडे रूग्णवाहिका किती आहेत?

<u>श्री. कारचे (उपायुक्त अ.ब्रा.विभाग):</u>- रूग्णवाकिा एक, शववाहीनी एक.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>त्या सुस्थितीत आहेत काय?

<u>श्री. कारचे (उपायुक्त अ.ब्रा.विभाग):</u>-होय.



<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>शववाहिनी?

<u>श्री. कारचे (उपायुक्त अ.ब्रा.विभाग):</u>-शववाहिनी एक.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>सुस्थितीत आहेत का?
<u>श्री. कारचे (उपायुक्त अ.ब्रा.विभाग):</u>-होय.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> वाहन विभागातील रूग्णवाहिका व शववाहिनीचे <u>दर वाढविणेस मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिका वाहन विभागात असलेल्या रूग्णवाहिका व शववाहिकासाठीचे दर तात्त्कालीन नगरपालिका असतांना स्थायी समिती ठराव क्रमांक १८२ दिनांक २३.७.१९९२ अन्वये खालील प्रमाणे निश्चित करण्यात आले होते.

| अनुक्रमांक | महापालिका हददीसाठी | सदयाचे दर |
|---|---|---|
| १ | उल्हासनगर | रू.५०. ०० |
| २ | कल्याण | रू.७५.०० |
| ३ | ठाणे | रू.१००.०० |
| ४ | मुंबई उपनगरे | रू.२००.०० |

सद्याचे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पहाता तसेच वाढत्त्या महागाईचा वेग वाढते डिझेल व पेट्रोल दर व गाडयांच्या सुटया भागाच्या वाढत्त्या किंमती या सर्व बाबींचा विचार करता उल्हासनगर महानगरपालिकेने रूग्ण वाहिका व शववाहिका यांचे दर वाढविण्याचा प्रस्ताव खालील प्रमाणे तयार केलेला आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक जिरूफी/१०. ००/प्र.क्र.९०/२००० /आरोग्य-३ मंत्रालय, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ ३२, दिनांक १० जुलै २००१ अन्वये शासनाने विहित केल्याप्रमाणे ना नफा ना तोटा तत्त्वावर रूग्णवाहीका व शववाहिका यांचा दर उल्हासनगर शहरासह इतरत्र सर्व ठिकाणी प्रति कि.मी. रू.५.०० मुख्यालयापासुन ते मुख्यालया पर्यंत निश्चित करण्यांत आलेले आहेत. तसेच प्रतिक्षा शुल्काचा दर वाहन घटनास्थळी पोहचल्याच्या एक तासानंतर प्रति तास रू. ३०.०० करण्यात येणार आहे. सदर सुधारीत दरास मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांना मंजुरी दिली असल्याने मा. स्थायी समितीपुढे मंजूरीसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४३</u> <u>दिनांक:-२३.८.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.
अनुमोदकाचे नाव :-श्री. किरण बी. माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिकेच्या वाहन विभागातील रूग्णवाहिका व शववाहिनीचे वर नमुद केलेल्या वाढीव दरास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका



<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

विषय:- उल्हासनगर शहरातील विविध जागी दिवाबत्ती बसविणेकामी लघुत्त्तम दराचे निविदाकार मेसर्स जाधव ॲन्ड सन्स कल्याण यांची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता देणे बाबत.

विद्युत विभागाचा प्रस्ताव आहे.

<u>मा.सभापती श्रीमती. जयोती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील विविध जागी दिवाबत्ती बसविणेकामी लघुत्तम दराचे निविदाकार मेसर्स जाधव ॲन्ड सन्स कल्याण यांची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस <u>मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

महानगरपालिकेने शहरात विविध जागी दिवाबत्ती बसविण्याकरिता फ्री प्रेस व नवशक्ती या दोन वर्तमान पत्रात निविदा सुचना सिलबंद निविदा मागविलेल्या होत्त्या.

तसेच सदर निविदा दर निर्धारीत करण्याकरिता मागविलेली होती त्यामुळे त्यांच्यात एक विशेष अट घातलेली होती की, महानगरपालिकेला वर्षभरात नवीन दिवाबत्ती लावण्याचे जे कार्य वेळो वेळी उदभवतील त्यासाठी हि निविदा आहे त्यामुळे दिलेल्या विविध ॲटमच्या परिमाणात कितीही फेरबदल होऊ शकतो व एकूण किंमतीमध्ये पंचवीस टक्के पर्यंत फेरबददल होऊ शकतो.

त्याच्या प्रतिसाधात १ मे.बी.जे. इलेक्ट्रीक कंपनी , नासिक, २. मे. जाधव एण्ड संन्स, कल्याण ३. मे. पैन इलेक्ट्रीकल मुंबई, ४.मे. परेश इलेक्ट्रीक स्टोर, मुंबई, ५. मे.जे.डी.इलेक्ट्रीक वर्क्स, कलयाण ६. मे. इलेक्ट्रो मॅकेनिक्स , ठाणे ७. मे. जे.जे. इलेक्ट्रीक, नवी मुंबई. ८. व्ही. ईलेक्ट्रकल्स, पिंपरी पुणे यांना कोरे निविदाचे प्रपत्र खरेदी केले होते.

त्यानंतर फक्त मे. जाधव एण्ड सन्स, कल्याण या निविदा धारकांनी वेळेवर म्हणजे दिनांक १६.८.२००२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत सिलबंद निविदा सादर केल्या.

ती निविदा दिनांक १७.८.२००२ रोजी १५. ३० वाजता उघडण्यात आली. मे. जाधव एण्ड सन्स कल्याण यांनी निविदा रक्कम रूपये ४५,४९,९३७.५० पेक्षा ८.६७ टक्के कमी असे दर दिले असून त्याचे दर वाजवी आहे.

वरील सर्व बाबी लक्षात मे. जाधव एण्ड संन्स, कल्याण यांची निविदा ८.६७ टक्के कमी दराने कराराच्या दिनांका पासून एक वर्षा करिता स्विकृत करून लागणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४४</u> <u>दिनांकः-२३.८.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. श्यामसुंदर रोहडा

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरात नविन दिवाबत्ती बसविणे कामी आयुक्त किंवा प्राधिकृत अधिकारी देतील त्या कार्य आदेशाच्या दिनांका पासुन पुढील एका वर्षाच्या कालावधीसाठी मे. जाधव अण्ड



सन्स कल्याण यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून प्रशासनास त्यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

विषय:- गरजु विद्यार्थ्यांना रेनकोट पुरविणे कामी संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>मा.सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>आमचा या प्रस्तावास विरोध आहे. पावसाळयाचा आता फक्त महिना राहिला आहे. पावसाळा संपत असताना रेनकोट देण्यात काय फायदा आहे?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी सभागृहातुन बाहेर पडले.

<u>मा. सदस्या श्रीमती. माने किरण:</u>-त्यांना गणवेश, वहया पुस्तके दया... पावसाळा संपत असताना रेनकोट देण्यात काय फायदा?

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>विरोधी पक्षाने प्रस्तावास विरोध केल्याने सदरचा प्रस्ताव मतासाठी टाकत आहे.

<u>मा.सचिव:-</u>प्रस्तावाच्या बाजुने जे सदस्य असतील त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने मते :-</u>
१. श्रीमती. ज्योती कालानी
२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. ठाकुर नरेंद केवलराम (कुमारी)
४. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
५. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
६. श्री. रामरख्यानी मोहनदास नारायण
७. श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
८. श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
९. श्री. शर्मा कमला गंगाधर
१०. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम

<u>मा.सचिव:-</u>प्रस्तावाच्या विरोधात जे सदस्य असतील त्यांनी आपले हात वर करावेत.
<u>प्रस्तावाच्या विरोधात मते :-</u>
१. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
२. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण

३. श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल



<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव बहुमताने समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> गरजु विद्यार्थ्यांना रेनकोट पुरविणे कामी <u>संविदेस मान्यता देणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकांचे महिला व बालकल्याण समिती करीता शहरातील (१)प्रत्येक प्रभागासाठी १०० रेनकोट (७६ x १०० = ७६००)प्रमाणे गरीब गरजु निराधार, प्राथमिक शाळेतील शिक्षण घेणा-या, ६ ते ९ वर्ष वयोगटातील मुलामुलींना रेनकोट वाटप करण्यासाठी ठराव क्रमांक २ दिनांक २५.६.२००२ पारित केला होता तसेच लाभार्थींची निकष यादी तयार करणेसाठी मा. आयुक्त यांना अधिकार देण्यात आले होते तसेच सदर ठराव सर्वसाधारण महासभेने ठराव क्रमांक १७ दिनांक १९.७. २००२ अन्वये मंजुरी दिली.

त्यानुसार भांडार विभागाने प्रस्ताव तयार करून ६ ते ९ वर्ष वयोगटातील मुलामुलींना ३२'', ३४'' व ३६'' आकारातील रेनकोट वाटप करणेसाठी (रिलाईबेल कंपनीचे) राज्यस्तरावरील दैनिक वर्तमानपत्रात नवशक्ती व फ्री प्रेस जरनल मध्ये दिनांक १.८.२००२ रोजी जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात येऊन निविदा मागविण्यात आल्या होत्त्या. त्यानुसार विहित कालावधीत म्हणजे दिनांक ९.८.२००२ रोजी दुपारी तीन वाजेपर्यंत खालील निविदाधारकांचे निविदा प्राप्त झाल्या.

१. मे. रिलाईबेल रेनवेअर कंपनी मुंबई २. मे. नोव्हेल्टी फुटवेअर मुंबई.
सदरहु निविदा हया त्याच दिवशी दुपारी ४.०० वाजता उप आयुक्त (भांडार)

मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखाधिकारी, खरेदी अधिकारी उल्हासनगर महानगरपालिका तसेच मे. नोव्हेल्टी फुटवेअर मुंबई यांचे उपस्थितीत उघडण्यात आले होते. त्यानुसार त्यांचे दर खालील प्रमाणे प्राप्त झाले.

| | मे. रिलाईबल कंपनी | नोव्हेल्टी फुटवेअर |
|---|---|---|
| | रूपये / प्रति नग | रूपये / प्रति नग |
| ३२'' | १५४/- | १४९/- |
| ३४'' | १५७/- | १५२/- |
| ३६'' | १६०/- | १५५/- |

त्यानुसार मे. नोव्हेल्टी फुटवेअर मुंबई यांचे लघुत्त्तम दर प्राप्त झाले होते व त्याची निविदा किंमत रू. ११,५५,१७४/-इतकी होते. व दिनांक १४.८.२००२ रोजीचे लघुत्त्तम पुरवठादारांशी झालेले वाटाघाटी नुसार त्यांनी अजून ५ टक्के निविदा रक्कमेपैकी कमी केली (५७७६०/-) व एकुण कामाची रक्कम १०९७४३०/- इतकी झाली (एकुण ७६०० रेनकोट साठी) तसेच रेनकोटवर मोफत महानगरपालिकेचे मोनोग्राम/माहिती छापुन देण्यास तयार झाले. परत त्यांना दिनांक १७.८.२००२ रोजी वाटाघाटीसाठी बोलविले असता त्यांनी प्रत्येक रेनकोट किंमत रूपये १४४.३३/- प्रती रेनकोट प्रमाणे व मोफत लोगो/माहिती छापण्यास तयार असून एकूण रू.१०९६९०८/- इतका रेनकोट खरेदीसाठी खर्च होईल व तो महिला व बालकल्याण समिती या लेखाशिर्ष सी४ (३)(रू.२५ लाख) या मधील तरतुदी मधुन करावयाचा असून सदर प्रस्तावास मुख्य लेखाधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी सदर काम करून

घेण्याची शिफारस केलेली असून त्यास मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सदर संविदास मान्यता दिलेली आहे.

सदर बाब स्थायी समितीपुढे प्रशासकीय व वित्तिय मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

--२१--

<u>स्थायी समिती ठराव क्र. ४५</u> <u>दिनांक:-२३.८.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा.
अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंद ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील गरजू व निराधार विद्यार्थ्यांना रेनकोट पुरविणे कामी मे. नॉवेल्टी फुटवेअर- मुंबई यांची वाटाघाटी अंतीची लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून प्रशासनास त्यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे. तसेच अंर्तभुत खर्च रू. १०,९६,९०८/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>बहुमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुर:-</u>मध्यवर्ती जकात नाका स्थलांतरीत करण्यासाठी जकात ठेकेदारास आपण २० तारखेची मुदत दिली होती, २० तारीख तर होवून गेली. मधवर्ती जकात नाका अदयाप स्थलांतरीत का झाला नाही?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):</u>-मध्यवर्ती जकात नाका स्थलांतरीत करण्याचे काम २० तारखे पर्यंत व्हावयास पाहिजे होते. किती टक्के काम झाले? किती टक्के राहिले?

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा. वि):-</u>३५ टक्के काम झाले आहे.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर)</u>:-फक्त ३५ टक्के?

<u>मा. सदस्य श्री. नरेंदकुमार ठाकुर:-</u>निविदेचे काम झाले आहे. आणखी किती दिवस लागतील?

<u>श्री. भिवापुरकर (कार्यकारी अभियंता सा.बा. वि):-</u>१० दिवस लागतील.

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-**श्री. भडकवाड साहेब, ठेकेदाराकडून काही पत्र आले आहे का? आयुक्त साहेबांना सांगा.... कमीत कमी सांगायला तर पाहिजे ना? काय लिहिले आहे? ठेकेदाराचे म्हणणे आहे की ही जागा आम्हास सोयीची नाही. खाजगी जागेत आम्ही स्थलांतरीत करू. आम्हास थोडी वेळ दयावी.

**मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-**मुदत वाढीबाबत लिहिले आहे, आम्ही मुदत वाढ देणार नाही याबाबत आम्ही शहर अभियंत्यांना लिहिले आहे. हे काम किती प्रगतीपथावर आहे? जकात नाक्याचे काम आम्ही करून घेऊ. आमची जबाबदारी आहे.

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-**आमच्या असे ऐकवित आहे की ठेकेदार म्हणतो की आम्ही मध्यवर्ती जकात नाका स्थलांतरीत करणार नाही.



**मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-**त्यांनी तशी विनंती केली आहे, आपण हे जे म्हणत आहात ती गोष्ट कधीची आहे?

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-**२-३ दिवसा पुर्वीची..

**मा. उपआयुक्त (श्री. दत्ता भडकवाड):-**आपण हे जे बोलत आहात ते......

**मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-**ठेकेदार म्हणतो आहे आम्ही खाजगी जागा घेवू जेव्हा जागा मिळेल तेव्हा मध्यवर्ती जकात नाका स्थलांतरीत करू.

**मा. आयुक्त (श्री. बा.र. पोखरकर):-**त्यांना जर जायचे असेल तर जाऊ दया आमचे काम त्यांना हटविण्याचे राहिल.

सायंकाळी ६. ०० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दि:-३.१०.२००२.

इतिवृत्त

### दि. ३.१०.२००२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरूवार दिनांक ३.१०.२००२ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या

पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

<u>१ श्रीमती. कालानी ज्योती सुरेश (पप्पु):- सभापती</u>

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
४. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. मुलचंदानी महेंद्र परसराम
९. श्रीमती. मोकल सिमा चंदाराम
१० श्री. रूपचंदानी बच्चाराम बाछोमल
११ श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
१२ श्री. लिंगे सुर्यकांत (बबन)
१३. श्री. वलेचा पृथ्वी व्यापारीलाल
१४. श्री. शर्मा कमला गंगाधर

तर

१. श्री. रामरख्यानी मोहनदास, २. श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल हे सदस्य सभेस अनुपस्थितीत होते.

सायंकाळी ४ . ४० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव :-</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. २३.८.२००२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

<u>मा. सभापती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>दि. २३.८.२००२ रोजीच्या सभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> स्वीमिंग पुल जवळ मध्यवर्ती जकात नाका येथे विद्युतीकरणाकामी प्रशासनाने गावदेवी मजुर कामगार सहकारी संस्था यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद <u>करणे बाबत.</u>

<u>मा. सभापती (श्रीमती. ज्योती कालानी):</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.



<u>विषय :-</u>स्वीमिंग पुल जवळ मध्यवर्ती जकात नाका येथे

विद्युतीकरणाकामी प्रशासनाने गावदेवी मजुर कामगार सहकारी संस्था यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

महानगरपालिकेने स्विमींग पुल जवळ मध्यवर्ती जकात नाक्याची उभारणी केलेली आहे. या जकात नाक्यात विद्युतीकरण व आजुबाजू लाईट लावण्यास रूपये १,३५,०००,०० च्या प्राकलन विद्युत विभागाने सादर केले होते. हे कार्य मजुर कामगार सहकारी संस्थेच्या शिफारशीनुसार करण्याची मंजुरी दिनांक १८.७.२००२ रोजी देण्यात आली. ठाणे जिल्हा मजुर कामगार सहकारी संस्थाच्या संघ मर्यादित यांच्या मार्फत कार्य करण्याचे शिफारीश केली त्यानुसार दिनांक २२.८.२००२ रोजी गावदेवी मजुर कामगार संस्था यांना स्विकृती पत्र देवून दिनांक ३१.८.२००२ रोजी करार करण्यात आली ही माहिती स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ४६ <u>दिनांकः-३.१०.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. पृथ्वी वलेचा.

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार स्वीमींग पुलजवळ मध्यवर्ती ७जकात नाका येथे विद्युतीकरणाकामी प्रशासनाने गावदेवी मजुर कामगार सहकारी संस्था यांच्याशी केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ३ वाचनु दाखवितात.

<u>विषय :-</u> गोल मैदान येथे ट्रॉन्सफार्मर व एच. टी व एल. टी लाइन्स व पोल हलविण्याकरिता संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-</u> हे जे ट्रान्सफार्मर लावले आहेत. ते लावण्याबाबत एम.एस.ई.बी. ने महापालिकेकडुन परवानगी घेतली होती का?

<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत):-</u>मला माहित नाही. विद्युत विभागाकडुन याकामी परवानगी दिली जात नाही.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>काय आहे?

<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत):-</u>गोल मैदान परिसरात एम.एस.ई. बीने जे ट्रान्सफार्मर लावले आहेत. त्याकामी त्यांनी परवानगी घेतली आहे काय? असे त्यांचे म्हणणे आहे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>परवानगी कुणाला? एम.एस.ई.बी.ला?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u> एम.एस.सी. बी. कडुन प्रस्ताव आला आहे का? त्यांनी आमच्याकडुन ट्रान्सफार्मर लावण्याकामी परवानगी घेतली आहे का? नसेल तर ट्रान्सफार्मर हटविण्याकामी आम्ही पैसे का दयायचे?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>आम्ही परवानगी देवू त्यानंतर त्या लोकांनी ट्रान्सफार्मर लावले पाहिजे. आपल्या मतानुसार ते कसे करतात?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>त्या लोकांनी परवानगी घ्यावयास पाहिजे होती. त्यांनी परवानगी घेतली आहे काय?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>असे झाले आहे काय?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-</u>आपण त्यांना परवानगी दिली आहे काय? जे ट्रान्सफार्मर आपण आता बाजुला हटवू इच्छित आहात त्याचे बाबत एम.एस.ई.बी ने यापुर्वी परवानगी घेतली आहे काय?

<u>मा. सभापती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>हे ट्रान्सफार्मर तर फार वर्षापुर्वी लावलेले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी :-</u> हे ट्रान्सफार्मर कोणत्त्या वर्षी लावले आहेत.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>कधी लावले आहेत?

<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत):-</u>मला माहित नाही.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>रस्ते रूंद करायचे असल्याने व हे ट्रान्सफार्मर रस्त्त्याच्यामध्ये येत असल्याने ते हटविले पाहिजेत.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचदांनी:-</u>त्याबाबत माझी काही एक हरकत नाही परंतु त्यांनी परवानगी घेतली आहे काय? परवानगी घेतली नसेल तर त्यांनी स्वत: आपल्या खर्चाने हे ट्रान्सफार्मर हटविण्याचे काम केले पाहिजे, आम्ही पैसे का दयायचे?

*<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत):-</u>त्याचा निविदेशी काही संबंध नाही त्याची वेगळी परवानगी घेतली पाहिजे.*

*<u>मा. सभापती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>ट्रान्सफार्मर लावण्यासाठी आमच्याकडे प्रस्ताव आला होता.*



*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u> हा धोरणात्त्मक निर्णय दयायचा आहे कारण एम.एस.ई.बी वाले प्रत्त्येक कामासाठी पैसे मागतात. वायरिंग लावायची असेल तर म्हणतात ५०० रू. भरा. एखादे काम करायचे असेल तर अमुक एवढे पैसे भरा हे कोणत्त्या कायदयात लिहिले आहे. व ट्रान्सफार्मर हटविण्यासाठी आम्ही पैसे का भरायचे?*

*<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-</u>किती ट्रान्सफार्मर आहेत?*

*<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत):-</u>तीन.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आम्ही मंजुरी देतो परंतु एम.एस.ई.बी. ला याबाबत विचारणा करा व यापुढे आम्ही असे करू देणार नाही.*

*<u>श्री. मुकेश आयलानी (कार्यकारी अभियंता विद्युत):-</u>याबाबतची परवानगी नगररचना विभागाकडुन दिली जाते असे मला वाटते.*

*<u>मा. सभापती (श्रीमती. ज्योती कालानी):-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*<u>विषय :-</u> <u>गोल मैदान येथे ट्रॉन्सफार्मर व एच. टी व एल. टी लाइन्स व पोल हलविण्याकरिता संविदेस मान्यता देणे बाबत.</u>*

*<u>प्रस्तावना</u>*

*महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गतच्या रस्त्त्यासाठी एम.एम.आर.डी.ए.चे कर्ज उपलब्ध आहे तेथिल म.रा.वि.मंडळाचे रस्त्त्यात येणारे ट्रान्सफार्मर व पोल एका बाजुला लावण्याचे कार्य निषेध व्यक्त करुन १०० टक्के खर्च व १५ टक्के सुपरविझन चार्जच्या अंतुर्गत हाती घेतलेले आहे.*

*बांधकाम विभागाच्या विनंती नुसार म.रा.वि.मंडळाला पत्र क्रमांक २६० दिनांक २६.१२.०१ अन्वये गोल मैदान परिसरात बनविलेल्या मार्गात येणारे ट्रान्सफार्मर व पोल योग्य ठिकाणी हलविण्यासाठी देण्यात आले.*

*त्या पत्राच्या अनुषंगाने मुख्य अभियंता म.रा.वि.मंडळ यांनी पत्रक्रमांक ४३९० दिनांक १२.८.२००२ अन्वये गोल मैदान वासवाणी टॉवर ६३० के.व्ही. ऐ. खीयलदास ६३० के.व्ही.ऐ. आणि स्टेजच्या मागे ३९५ के.व्ही.ऐ. ट्रान्सफार्मर व फिडर क्रमांक ९ व ५.२२ के.व्ही.ऐ.एच.टी. व एल.टी. लाईन्स व पोल हलविण्याकरीता रुपये १५,७७,४१० /- च्या प्रस्तावास १५ टक्के सुपरविझन चार्ज अंतर्गत मंजुरी दिली व कार्यकारी अभियंता म.रा.वि.मंडळ विभाग क्रमांक १ यांनी मागणी पत्र क्रमांक ११०१४ १२.८.२००२अंतर्गत रुपये २,०८,२००२ /- सुपरविझन चार्जस साठी पाठविले होते.*

त्यानंतर म.रा.वि.मंडळाकडुन मंजुर प्राकलनामध्ये साहित्त्य + मजुरी + जुने साहित्त्य काढण्याचे चार्जेस घेऊन निविदा रक्कम रुपये १३,२२,०७२.१५ निर्धारीत करुन नवशक्ती (मराठी)व नवभारत (हिंदी)या दोन वर्तमान पत्राात सुचना देऊन निविदा मागविण्यात आल्या.

त्याच्या प्रतिसादात १) मे.एक्स के. इंजिनिअरींग सर्व्हीसेस कल्याण. २) मे. बी.जे. इलेक्ट्रीक कंपनी नाशिक, व ३)मे. जयेश इंजिनिअरींग कॉर्पोरेशन मुंबई यांनी कोरे निविदेचा प्रपत्र खरेदी केले.



सदर निविदाधारकांनी वेळेवर म्हणजे दिनांक २.९.२००२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत इशारा रक्कमेसह सिलबंद निविदा सादर केल्या व ते त्याच दिवशी दिनांक २.९.२००२ रोजी सांयकाळी ४ वाजता उघडण्यात आले त्याचा तुलनात्त्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

१) मे. एक्स के. इंजिनिअरींग सर्व्हिसेस कल्याण निविदा रक्कम रुपये १३,२२,०७२.१५ पेक्षा ९.९ टक्के जास्त.

२) मे. बी.जे. इलेक्ट्रीक कंपनी नाशिक निविदा रक्कम रुपये १३,२२,०७२.१५ पेक्षा ६.६७ टक्के जास्त.

३) मे. जयेश इंजिनिअरींग कॉर्पोरेशन मुंबई निविदा रक्कम रुपये १३,२२,०७२,१५ पेक्षा १२ टक्के जास्त.

मे.बी.जे. इलेक्ट्रीक कंपनी सदर निविदेत सर्वात कमी असुन ही निविदा रक्कम रुपये १३,२२,०७२.१५ पेक्षा ६.६७ टक्के जास्त होती त्यामुळे त्याच्याशी वाटाघाटी करण्यात आली त्या वाटाघाटीत त्यांनी त्यांचे दर १.१७ टक्के कमी करुन निविदा रक्कमेपेक्षा ५.५ टक्के जास्त असे लेखी दिले आहेत.

म.रा.वि.मंडळाच्या सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावाचा सखोल अध्ययन करुन पुढील कारणामुळे १) म.रा.वि.मंडळाची खरेदी एकत्रीत व मोठ्या प्रमाणात असतात त्यामुळे ठेकेदारांना तो दर मिळणार नाही २) कनझुमर ईस्टीमेट मध्ये म.रा.वि.मंडळ ४ टक्के वाहतुक खर्च व १. ५ टक्के टी व पी खर्च जोडत नाही ते जोडले पाहिजे , अशी शिफारीश केली की सदर निविदा दर निविदा रक्कमेपेक्षा ५. ५ टक्के जास्त असून हे सुसंगत आहे.

परंतु कार्यकारी अभियंता (विद्युत) यांच्या मताने तिन्ही निविदाधारकांना पत्र क्रमांक उमपा/ विद्युत / २३५, दिनांक ६.९.२००२ अन्वये पुनः विचार करुन सुधारीत दर देण्यासाठी विनंती करण्यात आली. सदर पत्राच्या प्रतिसादात तिन्ही ऐजेन्सीने पुढीलप्रमाणे सुधारीत दर दिले आहेत.

१) मे. एक्स के. इंजिनिअरींग सर्व्हिसेस कल्याण निविदा रक्कम रुपये १३,२२,०७२.१५ पेक्षा ०.०५ टक्के कमी.

२) मे. बी.जे. इलेक्ट्रीक कंपनी नाशिक निविदा रक्कम रुपये १३,२२,०७२.१५ पेक्षा ५.५ टक्के जास्त.

३) मे. जयेश इंजिनिअरींग कॉर्पोरेशन मुंबई निविदा रक्कम रुपये १३,२२,०७२,१५ पेक्षा ११ टक्के जास्त.

सदर तुजनात्मक तक्त्यानुसार मे. एक्स के. इंजिनिअरींग सर्व्हीसेस यांचे सुधारीत दर सर्वात कमी व निविदा रक्कम रुपये १३,२२,०७२.१५ पेक्षा ०.०५ टक्के कमी आहे.

वरील बाबी लक्षात घेता मे. एक्स के. इंजिनिअरींग सर्व्हीसेस यांची निविदा, निविदा रक्कम रुपये १३,२२,०७२.१५ पेक्षा ०.०५ टक्के कमी स्विकृती करणेस स्थायी समितीपुढे सादर.



<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ४७ <u>दिनांक:-३.१०.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. श्यामसुंदर रोहडा.

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. सीमा मोकल.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार गोलमैदान वासवाणी टॉवर ६३० के.व्ही. ए. खीयलदास ६.३० के. व्हि. ए आणि स्टेजच्या मागे ३१५ के.व्हि. ए ट्रान्सफार्मर व फिडर क्र. १ व ५ २२ के. व्हि. एच.टी. व एल.टी. लाईन्स व पोल हलविण्याकरिता प्रशासनाने मे. एक्स के इंजिनिअरिंग सार्व्हिसेस या लघुत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे तसेच अंतर्भूत खर्च रू. १३,२२,०७२.१५ यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**मा.सचिवः-**विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

**विषय :-** उल्हासनगर महानगरपालिकेचे जकात वसुली अभिकर्त्ता यांना जकात वसुलीसाठी चेक पोस्ट बांधणेस परवानगी देणे बाबत.

**मा.सचिवः-**सात जागी चेक पोस्ट बांधावयाचे आहेत. ताप्तुरत्त्या स्वरूपी व लाकडी केबीन्स बसवायच्या आहेत.

**श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय):-**आणखी चार जागांबाबत त्यांनी पत्र दिले आहे हे पत्र सभा सूचना निघाल्यानंतर त्यांच्याकडुन आलेले आहे.

**मा.सदस्य श्री. विनोद तलरेजाः-**ती चार ठिकाणे कोणती आहेत?

**श्री. दत्ता भडकवाड (उपायुक्त मुख्यालय)** यांनी चार ठिकाणे वाचून दाखविलीत.

१. आर. के. बिल्डर शॉप समोर, महापालिका उद्यान, व्ही.टी.सी. ते मानेरा उल्हासनगर-४
२. हरी ओम किराणा स्टोअर शेजारी, व्ही.टी.सी मानेरा रोड उल्हासनगर-४
३. प्रफुल्ल कम्युनिकेशन जवळ, व्ही.टी.सी. ते मानेरा रोड, उल्हासनगर-४
४. साई सोनेश्वर स्टोअर शेजारी, व्ही.टी.सी ते मानेरा रोड, उल्हासनगर-४



**मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-**ही चार ठिकाणे सुध्दा त्यामध्ये जोडली जावीत.

**मा.सभापती (श्रीमती ज्योती कालानी):-**जकात अभिकर्त्ता मे. कोनार्क इन्फास्ट्रक्चर यांनी सुचविलेली आणखी चार ठिकाणे समाविष्ट करून सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

**विषय :-** उल्हासनगर महानगरपालिकेचे जकात वसुली अभिकर्त्ता यांना जकात वसुलीसाठी चेक पोस्ट बांधणेस परवानगी देणे बाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिकेने सन २००२-२००३ या वर्षासाठी जकात वसुली करणेसाठी मे कोनार्क इं. प्रा. लि. यांची अभिकर्ता म्हणुन नेमणुक केलेली आहे. सदर कंपनीने त्यांच्याकडील पत्रान्वये खालील ठिकाणी तात्पुरत्त्या स्वरूपात जकात चेक पोस्ट बांधणेसाठी महापालिकेकडे परवानगी मागितलेली आहे.

१.स्मशान भुमीजवळ, आरटी नाका नं.१४, उल्हासनगर २
२.मानेरा गाव चौक, उल्हासनगर ४
३.स्वामी शांती प्रकाश शाळेमागे, उल्हासनगर ५
४.एमएसईबी गोडावूनच्या समोर,फॉलोवर लाईन उल्हासनगर ३
५. गायकवाड पाडा, उल्हासनगर ५

६. शिवमंदीर रोड, उल्हासनगर ५
७. सपना टॉकी, तळमजला, उल्हासनगर ३
८. आर. के. बिल्डर शॉप समोर, महापालिका उद्यान, व्हीटीसी. ते मानेरा उल्हासनगर-४
९. हरी ओम किराणा स्टोअर शेजारी, व्हीटीसी मानेरा रोड उल्हासनगर-४
१०. प्रफुल्ल कम्युनिकेशन जवळ, व्हीटीसी. ते मानेरा रोड, उल्हासनगर-४
११. साई सोनेश्वर स्टोअर शेजारी, व्हीटीसी ते मानेरा रोड, उल्हासनगर-४

सदरच्या ठिकाणी सध्या चेकपोस्ट नसल्याने जकात चुकवेगिरी करण्याचा प्रयत्न वरील ठिकाणावरून होत असतो. महापालिकेने दिलल्या निविदे सुचनेतील अट क्रमांक १६ नुसार ठेकेदारास नवीन जकात चेकपोस्ट बांधावयाचे असल्यास त्यासाठी स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. सदरच्या चेकपोस्टमुळे वाहतुकीस कोणताही अडथळा होता कामा नये व महापालिकेस आवश्यकता भासेल त्यावेळी सदरचे चेकपोस्ट हटविण्यात येतील. सदर चेकपोस्टचा वापर केवळ जकातीचे वसुली संबंधी कामासाठी केला जाईल व सदरचे चेक पोस्ट हे तात्पुरत्त्या लाकडी किंवा प्लायवुडच्या केबिनच्या स्वरूपात राहतील या अटींवर जकात वसुली अभिकर्त्यास चेक पोस्ट बांधण्यासाठी मंजुरी देणेस हरकत नाही. जकात वसुली अभिकर्त्याचा कालावधी संपुष्टात आल्यास सदरचे चेकपोस्ट जसे असतील तशा स्वरूपात महापालिकेस हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील. तरी मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे सविनय सादर.

<u>स्थायी समिति ठराव क्र. ४८</u> <u>दिनांक:-३ १० २००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड.

--८--

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार वर उल्लेख केलेल्या ११ जागी उल्हासनगर महानगरपालिकेचे जकात वसुली अभिकर्ता यांना जकात वसुली करिता चेकपोस्ट बांधणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

मा.सचिव:-विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

विषय :- खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-कोण आहे? सांगा, कोण स्पष्टीकरण करेल.

मा.सदस्य श्री. महेंद्र मुलचंदानी हे स्थायी समिती सभागृहात उपस्थित झाले.

श्री. चौधरी (उप अभियंता मॅकेनिक पा.पु.वि):-खडेगोलवली येथील मल प्रक्रिया केंद्र देखभाल व दुरूस्ती करणे कामी देण्याचा प्रस्ताव आहे.

मा.सचिव:-अगोदर आपण सभागृहास आपला परिचय करून दया.

श्री. चौधरी (उप अभियंता मॅकेनिक पा.पु.वि):-मी. श्री. डी.बी. चौधरी उप अभियंता मॅकेनिक.

श्री.कांबळे (उप अभियंता सिव्हील पा.पु.वि):-मी श्री. कांबळे उप अभियंता सिव्हील.

मा.सभापती (श्रीमती. ज्योती कालानी):-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणेकामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.



प्रस्तावना

खडेगोलवली येथील उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीचे मलप्रक्रिया केंद्र वार्षिक तत्त्वावर चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे हे काम खाजगी संस्थाकडुन निविदा मागवून करण्यांत येते. सध्या हे काम करित असलेले ठेकेदार मे. वैभव इलेक्ट्रीक वर्क्स, कल्याण यांचा कामाचा कालावधी संपलेला असून नविन ठेकेदार नियुक्त होईपर्यंत पुर्वीच्याच ठेकेदाराने काम सुरू ठेवले अशी निविदेत अट असल्यामुळे त्यांनी काम पुढे सुरू ठेवले आहे. पुढील १२ महिन्यांच्या कालावधीसाठी ठेकेदार नियुक्त करावयाचा असल्यामुळे या कामासाठी ठेकेदार नियुक्त करावयाचा असल्यामुळे या कामासाठी नविन अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्याकरिता रू.१९ ,११ ,८५८/- मात्र इतका खर्च अंदाजित आहे.

सदर प्रस्तावास मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्त यांनी दि. ९.९.२००२ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यतेकरिता तसेच नविन निविदा मागविणेची परवानगी मिळणे करिता स्थायी समिती समोर सादर करण्यांत येत आहे. त्यास मंजुरी मिळणेची विनंती आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> ४९ <u>दिनांक:-३.१०.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. ईश्वर पमनानी

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंन्द्र चालविणे देखभाल व दुरूस्ती कामी रू. १९,११,८५८/-च्या अंदाजित रक्कमेस प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर महानगरपालिका भुयार गटार योजनेची देखभाल दुरूस्ती कामी मे संध्या कन्स्ट्रक्शन कंपनी या न्यूनत्तम दराच्या निविदाकाराशी <u>प्रशासनास संविदा करणेस मान्यता देणे बाबत.</u>



<u>मा.सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>भुयारी गटारांबाबतच्या तक्रारींची दखल घेतली जात नाही. गाडी ना दुरूस्त असते. ती दुरूस्त केली जात नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचदांनी:-</u>प्रशासन काय पाहाते?

***श्री.कांबळे (उप अभियंता सिव्हील पा.पु.वि):-***यापुर्वी ५ कॅम्पांसाठी वेगवेगळे ठेकेदार होते. आता ५ कॅम्पासाठी एकच ऐजन्सी/ ठेकेदार नेमण्याचा प्रस्ताव आहे, या निविदेतून लेबर पार्ट वेगळा केला आहे. त्याचे वेगळे प्राकलन तयार करून ते काम मजुर कामगार सहकारी संस्थेला दिले आहे, हे लेबर एअरटेक मशिनवर काम करतात.

***मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-*** लेबर कसे देता? समजा दोन-तीन नगरसेवकांनी तक्रार करुन लेबरची मागणी केली तर हे लेबर कसे देणार?

***श्री.कांबळे (उप अभियंता सिव्हील पा.पु.वि):-*** सायमलटेनीसली लेबर पुरविले जातात.

***मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-***ऐअर टेक मशिन आता आपणाकडे फक्त एकच आहे. दुस-या मशिनसाठी अर्थसंकल्पात तरतुद केली आहे.

***मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-***आपण जी निविदा काढली आहे त्यामध्ये लिहिले असेल ना की २० मजूर पाहिजेत की २५-३० मजुर पाहिजेत कसे समजायचे?

***श्री.कांबळे (उप अभियंता सिव्हील पा.पु.वि):-***जेथे ऐअर टेक मशिन जात नाही अशा अरूंद गल्यामधील ड्रेनेज चोकअप काढण्याकामी चालु वर्षासाठी २००२-२००३साठी जी निविदा तयार केली आहे त्या निविदेमध्ये प्रत्येक कॅम्पासाठी मजुराची तरतुद ठेवली आहे. कॅम्प १ साठी ५ मजुर, २ साठी ५ मजुर, ३ साठी ८ मजुर, ४ साठी ८ मजुर, ५ साठी ५ मजुर एकुण ३१. तसेच या व्यतिरिक्त १० मजुर पाईप लाईन खोदाई व ट्रेन्चमधून पाईप काढण्यासाठी प्रस्तावित केले आहे असे ३१ + १० =४१ मजूर याकामी प्रस्तावित केले आहे.

***मा.सदस्या श्रीमती. किरण माने:-***एका प्रभागासाठी ५ तरी मजुर पाहिजेत ना? तुम्ही सांगता तसे मजूर नसतात.

***मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-*** आम्हाला सविस्तर माहिती दया.

***मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-***टॅकर ना दुरूस्त असतो, पाईप कमी असतो.

***मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-***पाईप कमी असतो. त्यामुळे त्याचा फायदा काय?

***मा.सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-*** हे लोक सहकार्य देत नाही. काही गल्ल्या अरूंद आहेत. तेथे गाडया जात नाहीत, पाईप कमी लांबीचा असल्याने चोकअप काढता येत नसल्याने गाडया परत येतात.

***मा. सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे:-***७०-८० फुट लांबीचा पाईप आहे तो कमीत कमी १४० फुट लांबीचा पाईप असला पाहिजे.



***श्री.कांबळे (उप अभियंता सिव्हील पा.पु.वि):-***६० मीटर म्हणजे १८० फुट लांबीचा पाईप खरेदी करण्याचा प्रस्ताव दिलेला आहे.

मा.सदस्य श्री. किरण माने:-पाईप पुरेसा नसल्यामुळे गाडी परत जाते. मग फायदा काय? काम होत नाही, तक्रारीची दखल घेतली जात नाही.

मा.सदस्य श्री. सुर्यकांत लिंगे:- ६० मिटरचाच पाईप आपण का खरेदी करत आहात? त्यापेक्षा जास्त लांबीचा पाईप खरेदी करण्याचे आपण प्रस्तावित का केले नाही कारण गोषवारा तर आपणच तयार केला आहे. पाईपची लांबी कमी असल्यामुळे चोकअप काढण्याचे काम होत नाही त्यामुळे लोक ओरड करतात.

श्री.कांबळे (उप अभियंता सिव्हील पा.पु.वि):- मला माहित नाही जे गोषवायात आहे ते मी वाचत आहे.
मा.सदस्य श्री. रोहडा श्यामसुंदर:-पाईपची लांबी जास्तीत जास्त किती असते?

मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-प्रस्ताव मंजुर करा, ८० फुटाच्या जागी किती फुट लांबीचा पाईप पाहिजे ते आपण प्रस्तावित करा, टिप्पणी लिहा.

श्री.कांबळे (उप अभियंता सिव्हील पा.पु.वि):-१८० फुट लांबीचा पाईप खरेदी करण्याचा प्रस्ताव दिला आहे.

मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:- तो का येत नाही?

मा.सदस्य श्री. दिलीप गायकवाड:- गाडी नेहमी बंद असते काही उपयोग होत नाही.

मा.आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-मजूर किती ठिकाणी पाहिजेत, किती मजूर लागतात याचे प्राकलन कुणी तयार केले? आपणास माहित असेल ना? तुम्ही अभ्यास करून यावयास पाहिजे होते.

श्री.कांबळे (उप अभियंता सिव्हील पा.पु.वि):-हे प्राकलन माझ्या अगोदरच्या कनिष्ठ अभियंत्यांनी तयार केले आहे?

मा.आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-परंतु तुम्ही त्याचा अभ्यास करावयास पाहिजे होता ना?

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर महानगरपालिका भुयार गटार योजनेची देखभाल दुरूस्ती कामी मे संध्या कन्स्ट्रक्शन कंपनी या न्यूनत्तम दराच्या निविदाकाराशी प्रशासनास संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका भुयार गटार योजनेची दुखभाल दुरूस्ती करिता महानगरपालिकेने पत्र क्र. युएमसी डब्लु.एस. ॲन्ड एस.डी. /एक्स इंजिनिअर /२३०/ दि.३.११.२००१ नुसार वेगवेगळया ठेकेदारांना कॅप वाईज काम करण्याचे आदेश दिलेले होते. निविदा शर्तिनुसार सदरहु काम करण्याचा कालावधी दिनांक ३०.८. २००२ रोजी संपला आहे. म्हणून संबंधीत ठेकेदारांना एक महिन्याची दिलेली मुदत वाढ ३०.९.२००२ रोजी संपत आहे. यास्तव पुढील कालावधीसाठी नविन एकत्र ठेकेदार नेमण्याचा सदर कामाचा रुपये १८,७३,९६०/- मात्र अंदाजित खर्चाचा

प्रस्ताव दिनांक ३०.७.२००२ रोजी सादर करण्यात आला व त्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

--१२--

भुयारी गटार योजनेच्या देखभाल दुरुस्तीच्या वार्षिक अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी हा प्रस्ताव स्थायी समिती, उल्हासनगर महानगरपालिका मध्ये पाठविला व त्यास स्थायी समितीने ठराव क्र. ४२ , दिनांक २३/८/२००२ नुसार प्रशासकिय व वित्तीय मंजुरी दिलेली आहे.

यास्तव, महानगरपालिकेने दिनांक १.९.२००२ च्या दैनिक नवभारत व दिनांक १/९/२००२ रोजी दैनिक विकास च्या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहिर निविदा सुचनेनुसार एकूण तिन ठेकेदारांनी आपल्या निविदा दिनांक १६.९.२००२ रोजी महानगरपालिकेस सादर केल्या त्यात खालील प्रमाणे दर नमुद केलेले आहेत.

१) मे. प्रकाश एन. रामसिंगानी -- अंदाजित किंमतीपेक्षा २% पेक्षा जास्त<br>उल्हासनगर-४ (रुपये १९,११,४३९=२०)

२) मे. संध्या कंस्ट्रक्शन ---- अंदाजित किंमतीपेक्षा ३.८०% पेक्षा कमी<br>उल्हासनगर-३ (रुपये १८,०२,७४९=५२)

३) मे. आशिष कंस्ट्रक्शन ---- अंदाजित किंमतीपेक्षा २२% पेक्षा जास्त<br>अंबरनाथ (रुपये २२,८६,२३१=२०)

उपरोक्त निविदेपैकी मेसर्स संध्या कंस्ट्रक्शन कं. उल्हासनगर यांची निविदा तुलनात्त्मकरित्त्या न्युनत्तम असून वाजवी दराची असल्याने स्विकारण्यास प्रस्तावित आहे. यांस लेखा शाखा व मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर निविदेचा प्रस्ताव प्रशासकिय व वित्तीय मंजुरी करीता स्थायी समिती समोर सादर करण्यांत येत आहे. त्यास मंजुरी मिळावी ही विनंती.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ५० <u>दिनांक:-३.१०.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्रीमती. किरण माने.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिका भुयार गटार योजनेची देखभाल दुरूस्ती कामी प्रशासनास मे. संध्या कन्स्ट्रक्शन कंपनी या न्युनतम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत प्रशासनाने चार कामी केलेल्या संविदांची माहिती नोंद <u>करणे बाबत.</u>

--१३--

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत प्रशासनाने चार कामी केलेल्या संविदांची माहिती नोंद <u>करणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे केलेले कामे करणे साठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतुद ठेवलेल्या सन् २००१-२००२ च्या निधीतुन कामे करणेसाठी मा. महापौर/उपमहापौर/स्थायी समिती/नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| | उल्हासनगर-३ येथील इंडस्ट्रियल एरिया माता मंदिर जवळ जूना पिंटो पार्क एरिया जवळ नाला दुरूस्ती करणे व बांधणे (म.न.पा. निधी) | १,९९,८६७/- | ३.९.२००२ | हरे क्रिष्णा म.का. |
| २ | उल्हासनगर १ येथील प्र.क्र. ५ मध्ये हजेरी शेडजवळ सहा बैठकीचे शौचालय बांधणे. (गलिच्छ वस्ती निधी) | १,९९,९५०/- | ३.९.२००२ | श्री. विनायक म.का. |
| ३ | प्र. क्र५ मध्ये संभाजीनगर येथे मश्चिद किराणा स्टोअर्स जवळ समाज मंदीर बांधणे. (गलिच्छ वस्ती निधी) | १,९८,५५०/- | ३.९.२००२ | श्री. विनायक म.का.सो. |

४ उल्हासनगर-१ ते ५ मधील रस्त्यातील
खड्डे भरणेकरिता मटेरियल सप्लाय करणे.
(मनपा निधी) १५,९८,००/- ६.९.२००२ कुप्लेश्वर म.का.सो.

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तिय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप निबंधक ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

--१४--

<u>स्थायी समिती ठराव क्र.५१</u> <u>दिनांक:- ३.१०.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रूपचंदानी.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वर नमुद केलेल्या चार कामी ठेकेदाराशी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करित आहे.

सुचकाची <u>सही/-</u>

अनुमोदकाची <u>सही/-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u>विषय क्र. ८ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर १ शहाड येथील रेल्वे पुलाखाली बॉक्स

कलवर्ट व नाले बांधणेकामी प्रशासनास मे. ओ.एस. कंन्स्ट्रक्शन या न्यूनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सायंकाळी ४. ५५ वाजता स्थायी समिती सभागृहात उपस्थित झाले.

__मा.सचिवः-__प्रस्ताव मंजुर ?

__मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-__सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

__विषय :-__ उल्हासनगर १ शहाड येथील रेल्वे पुलाखाली बॉक्स कलवर्ट व नाले बांधणेकामी प्रशासनास मे. ओ.एस. कंन्स्ट्रक्शन या न्यूनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदा करणेस मान्यता देणे बाबत.

--१५--

__प्रस्तावना__

उपरोक्त उल्हासनगर-१ शहाड येथील रेल्वे पुलाखाली बॉक्स कल्व्हर्ट आणि नाली बांधणे अत्त्यंत आवश्यक आहे. कारण पावसाळयात शहाड रेल्वे स्टेशन जवळील गुलशननगर झोपडपट्टीमधून येणारे पाणी वाहून जाण्यासाठी सदर पुलाखालून छोटया नालीतून पाणी जाण्यासाठी मार्ग अपुरा पडत असल्यामुळे सदर परिसरात पाणी साचून येणा-या जाणा-या नागरिकांचे अतोनात हाल होतात. त्यामुळे सदर ठिकाणी बॉक्स कलव्हर्ट बांधणे आवश्यक आहे. सदरचे काम एम एम आर डी ए लोन प्रकल्पातून करावयाचे आहे. सदर कामाची अंदाजित प्राकलनीय किंमत रू. १२ ,७४ ,४७८/- इतकी होत आहे. सदर कामासाठी दिनांक ११.९.२००२ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदा खालील तीन एजन्सीने भरल्या असून त्त्यांची नावे व निविदेत भरलेले दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | एजंन्सीचे नांव | दर |
|---|---|---|
| १. | मे. ओ एस आर कन्स्ट्रक्शन | २. ५ टक्के ने जास्त |
| २. | मे. जय भारत कन्स्ट्रक्शन | ३ टक्के ने जास्त |
| ३. | मे. श्री. क्रिष्णा कन्स्ट्रक्शन | १२ टक्के ने जास्त |

उपरोक्त तीन एजंन्सीने भरलेल्या निविदेतील सर्वात कमी दर असलेली एजंन्सी मे ओ एस कन्स्ट्रक्शन यांनी भरलेले दर २. ५ टक्के सर्वात कमी असल्याने त्यांना वाटाघाटीकरिता दिनांक १९.९.२००२ रोजी बोलविले असता वाटाघाटीनंतर त्यांनी निविदेचे दर कमी केले असून (अंदाजपत्रकीय दराने) काम करण्यास सहमती दर्शविलेली आहे. त्यानुसार मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस केली असून मा. आयुक्तांनी मंजुरी प्रदान केली आहे. तरी मे ओ एस कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दराने (ॲट पर रेट) काम करण्यांस सहमती दिल्यानुसार स्थायी समितीपुढे मान्यता मिळणेसाठी प्रस्तावित करण्यांत येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ५२</u> <u>दिनांकः- ३.१०.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. महेंद्र मुलचंदानी

अनुमोदकाचे नाव :-श्री. दिलीप गायकवाड.

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर-१ शहाड येथील रेल्वे पुलाखाली बॉक्स कल्वर्ट व नाले बांधणे कामी प्रशासनास मे. ओ.एस. आर.



कंन्स्ट्रक्शन या न्युनत्तम दराच्या निविदाकाराशी संविदेस मान्यता देत आहे. तसेच अंतर्भुत खर्च रू. १२,७४,४७८/- यास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देत आहे.

सुचकाची <u>सही-</u>

अनुमोदकाची <u>सही-</u>

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

सायंकाळी ४. ५७ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका

दि:-१३.१२.२००२.

**इतिवृत्त**

दि. १३.१२.२००२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक १३.१२.२००२ रोजी सायंकाळी ४. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

१. मा.सभापती :-श्रीमती. ज्योती कालानी.

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
४. श्री. ठाकुर नरेंद केवलराम (कुमारी)
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. मुलचंदानी महेंद
९. श्री. रूपचंदानी बच्चाराम बाछोमल
१० श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
११ श्री. लिंगे सुर्यकांत
१२ श्री. शर्मा कमला गंगाधर
१३ श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल
१४ श्रीमती. मोकल सीमा

तर

१. श्री. रामरख्यानी मोहनदास,२. श्री. वलेचा पृथ्वी हे सदस्य सभेस अनुपस्थितीत होते.

सायंकाळी ४. ५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>मा. सचिव :-</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दिनांक ११.११.२००२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-पृष्ठ क्र. २७ वर जो ठराव आहे त्याचे सुचकाचे व अनुमोदकाचे नाव लिहिलेले नाही.

मा. सचिव:-संगणक चुक आहे, तो ठराव क्र. ६३ असून त्या ठरावाचे सुचकाचे नाव श्रीमती. आहुजा नीता व अनुमोदकाचे नाव श्री. बच्चाराम रूपचंदानी असे आहे ती नावे आम्ही लिहुन घेऊ.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-संत गाडगे बाबा स्वच्छता अभियाना कामी औषधे व साहित्य खरेदी करण्याबाबतचा जो प्रस्ताव होता त्याचे काय झाले?



मा.सचिव:-औषधे व साहित्य खरेदी करण्याचा जो प्रस्ताव होता त्याबाबतचा ठराव पारीत झालेला आहे. इतिवृत्तांताचे पृष्ठ क्र.२०-२१ वर त्याची नोंद आलेली आहे, उर्वरीत दि.११.११.२००२ रोजीचे इतिवृत्त ठिक आहे?

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-मागील सभेचे दि.११.११.२००२ रोजीचे इतिवृत्तांतील ठराव क्र६३ वर लिहायची राहुन गेलेली सूचक अनुमोदकाची नावे लिहुन सदरचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिव:-मा.सभापती महोदयांचे निर्देश आहेत की सभेचे कामकाज चालु करण्यापुर्वी, आपल्या महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त पदावर रूजु झालेले श्री. रामनाथ सोनावणे हे या सभागृहात बसलेले आहेत त्यांचे स्वागत केले जावे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी श्री. रामनाथ सोनावणे, अतिरिक्त आयुक्त यांना पुष्पगुच्छ देवून त्याचे स्वागत केले.

मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-स्थायी समिती सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी स्थायी समितीच्या वतीने अतिरिक्त आयुक्त श्री. रामनाथ सोनावणे यांना पुष्पगुच्छ देवून त्याचे स्वागत केले आहे, स्थायी समितीचे आम्ही सर्व सदस्य त्यांचे स्वागत करतो, ते एक सक्षम अधिकारी आहेत ते आपल्या कार्य कुशलतेंची छाप दाखवून देतील.

त्यानंतर मा. आयुक्त श्री. बा.र. पोखरकर यांनी श्री. रामनाथ सोनावणे यांना पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत केले.

मा. सचिव:-विषय क्र. २ वाचून दाखवितात.

विषय:-खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी मे. ओम इंडस्ट्रियल इंजिनियरींग यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत.

श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):-आपल्या मलप्रक्रिया केंन्द्राचा मैला तेथे गोळा करून त्यावर प्रक्रिया केली जाते. हे काम ज्या संस्थेस दिले होते त्याचा निविदा कालावधी संपला आहे, नविन निविदा निघे पर्यंत तेच कार्यरत आहेत.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-निविदा कालावधी कधी संपला त्याची सविस्तर माहिती दिली जावी.

श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):- खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंन्द चालविणे, देखभाल दुरूस्ती करण्याचे काम ते करणार आहेत, दुरूस्ती कामी जे काही सुटे भाग लागतील त्या कामीचा सर्व खर्च ते करतील.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-त्यांच्या कामाबाबत आपण समाधानी आहात काय?

श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):-मागील वर्षी त्यांना काम देण्यांत आले होते व अजूनही ते कार्यरत आहेत.

मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-त्याच्या अगोदर हे काम कोण पहात होते?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-त्याच्या अगोदर हे काम कोण पहात होते?

--३--

श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):-आता ही काम चालु आहे, वैभव इलेक्ट्रीकल्स हे काम करत आहेत मध्यंतरी काही तरी अडचण होती त्यामुळे आर्थिक अडचण असल्याचे आपणास सांगण्यात आले होते.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-त्यांची तक्रार आहे की, जो पंपींग स्टेशन कार्यरत आहे तो पुर्ण दिवसभर कार्यरत राहिला पाहिजे.

श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):-।कामी निविदा भरण्यास कुणी पुढे येत नाही, फक्त एकच निविदा प्राप्त झालेली आहे, ठेकेदारांना वेळेवर पेमेंट दिले जात नाही. म्हणुन निविदा भरण्यास कुणी पुढे येत नाही.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-८ दिवस पाणी पुरवठा बंद होता.

श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):-ठेकेदारांना ठराविक वेळेत पेमेंट दिले पाहिजे. वेळेवर पेमेंट दिले तर ठेकेदार निविदा भरतील व कामही करतील.

मा. सदस्य श्री बच्चाराम रूपचंदानी:-नटबोल्ट आणुन देण्याची क्षमता नाही तर ७० लाखाचे काम कसे घेत आहेत?

श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):-भविष्यात त्यांच्या कामाची अंतीमक्षमता काय राहिल?

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-८-८ दिवस आमचे ड्रेनेज पंपीग स्टेशन बंद रहाते. ते आपणांस माहित आहे का? त्याचे काम समाधानकारक आहे असे आपण कसे म्हणता? जर आपण सांगितले असते की, अमुक अमुक ही अडचण आहे तर

त्या हिशोबाने या प्रस्तावाबाबत आम्ही चर्चा केली असती, एका नट बोल्टसाठी आम्हास फोन करावा लागतो व दिवसभर तो नटबोल्ट आणून देवू शकत नाही.

<u>मा. सदस्य श्री.नरेंद्रकुमार ठाकुरः-</u> कार्यकारी अभियंता हे नगरसेवकाचे म्हणणे ऐकुन घेण्यास तयार नाहीत. आयुक्त साहेबांनी त्यांना पी.सी आणावयास सांगितले तर ते पी.सी. घवून येत नाहीत.

<u>मा. आयुक्त श्री. बा. र. पोखरकरः-</u>निविदा स्विकारण्याबाबत चर्चा केली पाहिजे.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः</u>-ती संस्था काय करते? पूर्ण दिवसभरात ते एक नटबोल्ट आणु शकत नाहीत?

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>या संस्थेस काम करता येत नाही. महापालिकेस अडचणीत आणतात, त्रास देतात अशा संस्थास Black List मध्ये टाकले पाहिजे. वारंवार असे मुददे आमच्या समोर येतात.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u> Black List मध्ये टाकण्याची कार्यवाही करण्या अगोदर त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली पाहिजे. सध्या निविदा स्विकृत करण्या कामीचा पस्ताव मी आपल्या समोर ठेवला आहे. निविदा स्विकृत केल्यानंतर याबाबत विचार करता येईल आपला मुददा काय आहे?

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u>पाईप लाईन टाकण्याबाबतच्या एका कामाबाबत आम्ही आपणाकडे आलो होतो, पीसी मागवून घेण्याबाबतचा आपण जो निरोप दिला होता तो सांगण्यासाठी मी कार्यकारी अभियंत्त्यांच्या चेंबरमध्ये गेलो होतो परंतु आपला निरोप घेण्यास हे लोक तयार नाहीत. नगरसेवकांचे ऐकुन घेत नाहीत. या कामाची निविदा



निघाली, कार्य आदेश दिले गेले परंतु त्यांनी काम चालु केले नाही, त्यांची आर्थिक स्थिती बरोबर नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>जो माणुस नटबोल्टसाठी १० दिवस लावतो.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>हा विषय मलप्रक्रिया केंद्र चालविण्याबाबतच्या संविदेचा आहे. पंपिंग स्टेशनबाबतचा नाही.

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>या सभेत विषय क्र. ९ वर सदर ठेकेदारासंबंधी दुसरा विषय आहे. त्यांच्या संविदेचा कालावधी संपलेला असुन त्यास मुदतवाढ दयायची आहे. तर अशा ठेकेदाराचे आम्ही कसे समर्थन करायचे?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>त्यावर नंतर चर्चा करू तो ठेकेदार सक्षम नाही. नटबोल्ट लावून देवू शकत नाही तर काम कसे करणार? आपण निविदेची पूर्ण फाईल आपल्याकडे उपलब्ध आहे का?

<u>श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):-</u>ती सध्या येथे माझ्याकडे उपलब्ध नाही. आपणांस पाहिजे तर ती मी मागुन घेईल.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-पुढच्या सभेत सविस्तर माहिती असलेली फाईल उपलब्ध करा. त्याचबरोबर त्यांचा जो पुर्व इतिहास आहे तो समोर ठेवला जावा. हे लोक निविदा भरतात व काम करत नाहीत. महापालिकेस अडचणी निर्माण करतात.सदरचा प्रस्ताव अपुर्ण माहितीमुळे आजच्या सभेच्या कार्यसुचीवरून सर्वानुमते वगळण्यांत येत आहे.

विषय :- खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी मे. ओम इंडस्ट्रियल इंजिनियरींग यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत.

मा. सचिव:-विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अनु. क. | कामाचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | मा. महापौर, मा. उप-महापौर आणि काही समितीचे सभापती यांच्या केबिनला पी.व्ही.सी.टाईल्स लावून विकास करणे (महापालिका निधी १) | १,००,२००/- | ८/११/२००२ | मे. स्टॅंडर्ड म.का. सोसा. |



| अनु. क. | कामाचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| २ | उल्हासनगर-३ येथील पॅनल नं. १९ मध्ये पंचशिलानगर येथे १० बैठकीचे शौचालय बांधेणेबाबत (महापालिका निधी ८६) | ३,९०,७५०/- | ७/११/२००२ | मे. हुशार म.का.सोसा. |
| ३ | उल्हासनगर-३ येथील प्र. क्र.७ मध्ये प्रेस बाजार मागे सी.सी. पायवाटा आणि नाल्या बांधणे (महापौर निधी ८९) | १,९९,९००/- | ८/११/२००२ | मे. ॐ म.का.सोसा. |
| ४. | उल्हासनगर-३ येथील प्र. क्र. ७ मध्ये | | | |

भवानीनगर येथे सी.सी पायवाटा
आणि नाल्या बांधणे (महापौर निधी ९१) १,९९,९००/- ७/११/२००२ मे ॐ म.का.सोसा.

५ उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील
उप-आयुक्त (सु.ज)उप-महापौर आणि
संगणकासाठी रूम.पार्टीशन करून विकास
करणे बाबत.(महापालिका निधी ९४) २,१७,९८०/- ८/११/२००२मे. स्टँडर्ड म.का.सोसा.

६. प्रभाग क्र. ७ मध्ये गुरूव्दारा समोर
सी.सी. पायवाटा बनविणे आणि बॅ. क्र.
७३२,७०३ येथे शौचालय दुरूस्ती करणे
(नगरसेवक निधी १०१) १,९९,४५०/- ७/११/२००२ मे. अल्का मकासोसा

७ प्रभाग क्र. २२ मध्ये (भाजी मार्केट)
बॅ.नं. ३१८,३१४,२८८आणि बॅ. नं.
३५५ जवळ सी.सी. पायवाटा आणि
नाल्या, मुतारी बांधणे
(नगरसेवक निधी १२०) १,९९,८००/- ७/११/२००२ मे अल्का मकासो.

८ उल्हासनगर-३ येथील प्र क्र. १९ मध्ये साई
रेचलदास दरबार जवळ, खन्ना कंम्पाऊंड
आणि विविध ठिकाणी सी.सी. पायवाटा आणि
नाली बांधणे. (नगरसेवक निधी १३३) १,९९,९३७/-७/११/२००२ मे. अल्का मकासो.

९. उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र. २४
मध्ये मेनका सोसा ते गोवर्धन किराणा
स्टेट बॅंक जवळ नाली बांधणे
(नगरसेवक निधी १३६) १,९९,५४५/ ८/११/२००२ मे जनसेवा म.का.सोसा.

१०. उल्हासनगर-३ येथील प्र क्र २४
मध्ये बॅ नं.८५८,८६३,८६६ येथे
सी.सी. एम.२५० ने आणि नाली बांधणे.
(नगरसेवक निधी १५६) १,९९,९४०/- ७/११/२००२ मे गौदेवी म.का.सोसा.

११ उल्हासनगर-१ येथील कमला नेहरूनगर
धोबीघाट येथे शाहुचे घराजवळ ते शिवसेना
ऑफीस प्र.क्र.३ पर्यंत एम-२५० रोड व
नाली बांधणे
(नगरसेवक निधी १५८) १,९९,३५०/- ७/११/२००२ मे शिव म.का.सोसा.

१२ प्रभाग क्र. ८ मध्ये ओ.टी. सेक्शन येथे
मुतारी आणि कचरा कुंडी बांधणे.
(नगरसेवक निधी १७५) १,९९,३००/- ७/११/२००२ मे अल्का म.का.सोसा.



| अनु. क. | कामाचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १३ | उल्हासनगर-५ येथील प्र क्र. ११ मध्ये कॅनरा बॅंक ते बॅ.नं. २०१० मागे सी.सी.एम-२५० पॅसेज आणि नाली बांधणे (महापौर निधी १९१) | ९९,९००/- | १३/११/२००२ | मे हरे रामा म.का.सोसा. |

१४ उल्हासनगर-५ येथील बॅ.न्नं.२०८६ ,
२०७४ येथे नाल्या दुरूस्ती करणे बाबत.
(१९४)(महापालिका निधी) ९९ ,०००/- १३/११/२००२ मे हरे क्रिष्णा म.का.सोसा.

१५ उल्हासनगर-५ येथील प्र. क्र. ११ मध्ये
बॅ.न्नं. १९३७ ते प्रेम सदन पर्यंत सी.सी.
एम. -२५० रस्ता पॅसेज बांधणे
(१९८)(महापौर निधी) ९९ ,९००/- १३/११/२००२ मे शिव म.का.सोसा.

१६ उल्हासनगर-२ येथील यात्री निवासचा
विकास करणे
(महापालिका निधी ९२) ९८ ,५५०/- ७/११/२००२ मे स्टॅंडर्ड म.का.सोसा.

---

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६६</u> <u>दिनांकः- १३.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा
अनुमोदकाचे नाव :-श्रीम. सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील १६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः</u>-विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.
<u>विषय :-</u>उल्हासनगर शहरातील भुयारी गटार योजने अंतर्गत ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.



<u>विषय :-</u>उल्हासनगर शहरातील भुयारी गटार योजने अंतर्गत ११

विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील विविध भागात खाली नमुद केलेली कामे वित्तिय अंदाजपत्रक सन २००२-२००३ मधुन करण्यासाठी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे. आणि सर्वसाधारण निधीतून मंजूर झाले आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | प्राकलनाची अंदाजित रक्कम | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | एअरटेक मशिनवर कामगारांचा पुरवठा करणे बाबत | १,९९,३११/- | ३.९. २००२ | हरे रामा म.का. सो. सं मर्यादित |
| २ | बॅ.क्र. १९७०,१९७१,२००१,१९३४ मध्ये एस.डब्लु पाईपलाईनचा पुरवठा करणे व टाकणे | १,५९,०८६/- | ५.९. २००२ | धनलक्ष्मी म.का.सं. सं. मर्यादीत |
| ३ | बॅक्र. २०८६,२०६७,२०७०,२०५८,२०८५,२०३८,२०१५,२०१८ मध्ये एस. डब्लु. पाईप लाईन टाकणे व चेंबर्स ची दुरूस्ती करणे. | १,९३५४५/- | ११०. २००२ | हरे कृष्णा म.का.सं. स मर्यादीत |
| ४ | बॅ.क्र. ७८८ मानेरा गाव ते हिरापुरी चौक येथे मेन होल चेंबर्स दुरूस्ती करणे बाबत. | ७५८९३/- | ११०. २००२ | हरेरामा म.का.स. सं मर्यादीत |
| ५ | मानेरा गांव ते हिरापुरी चौक बॅ. नं. ६१६,५९३,६१५,६९७ कॅम्प नं. ४ येथील एस. डब्लु. पाईप दुरूस्ती करणे बाबत. | १५६४२८/- | ११०. २००२ | हरेरामा म.का.सं. मर्यादीत |
| ६ | पॅनल क्र. १४ येथिल मेन होल चेंबर्स दुरूस्ती करणे व फ्रेम कव्हर्स पुरवठा व बसविणे बाबत. | ४९,०४४/- | १८.१०. २००२ | हरेरामा म.का.स. संस्था मर्यादीत |
| ७ | पॅनल क्र. १३ येथील मेनहोल चेंबर्स दुरूस्ती करणे व फ्रेम कव्हर्स पुरवठा व बसविणे बाबत. | ४९,०४४/- | १८.१०. २००२ | हरेरामा म.का.स. संस्था मर्यादीत |
| ८ | पॅनल क्र. १३ येथील बॅ. क्र.१६९२ व १६९४ मध्ये एस. डब्लु पाईप लाईन टाकणे व इंस्पेक्शन चेंबर्स बांधणे बाबत. | १,२५,३३५/- | १८.१०. २००२ | हरेकृष्ण म.का.स. मर्यादीत |
| ९. | पॅनल क्र. २५ येथील बॅ.क्र.९४८,९४१ मध्ये भुयारी गटार योजनेतर्गत हाऊस कनेक्शन दुरूस्ती करणे बाबत. | १,९९,९२५/- | २५.१०. २००२ | शिव. म.का. संस्था |
| १०. | पॅनल क्र. १३ येथील बॅ.क्र.१६९४-९५ मध्ये इंस्पेक्शन चेंबर्सची दुरूस्ती करणे आर.सी.सी फ्रेम कव्हर्स पुरवठा करणे व बसविणे बाबत. | ९२०३०/- | ७.११. २००२ | हरेकृष्ण म.का.सं. मर्यादीत |
| ११ | पॅनल क्र. ११ सी सेक्शन २५ उल्हासनगर-५ येथील एस.डब्लु.पाईप लाईन टाकणे व चेंबर्स बांधणे बाबत. | ८२२९१/- | १५.११. २००२ | हरेरामा म.का.सं मर्यादीत |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६७</u> <u>दिनांकः- १३.१२.२००१</u>

सुचकाचे नाव :-श्री. नरेंदकुमार ठाकुर
अनुमोदकाचे नाव :-श्रीम. सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील भुयारी गटारी योजनेअंतर्गत वरील ११ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ७ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> विविध पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>या प्रस्तावावर चर्चा करायची आहे.

<u>मा. सचिवः-</u>प्राकलनास मंजुरी देत आहात ना?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>डेगमवार साहेब, या कामाच्या निविदेच्या कालावधी कधी पुर्ण होतो? कालावधी कधी संपतो? त्यावेळी आपण हा प्रस्ताव चर्चेस का आणला नाही? या कामास जून्या ठेकेदारास मुदत वाढ का देत आहात? नविन निविदा मागविल्या जाव्यात. एक दोन आठवडयासाठी मुदत वाढ का दयायची.

<u>श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):-</u>माझ्याकडे सध्या माहिती उपलब्ध नाही.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>गोषवारा पहा

*मा. सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:-नविन व्यवस्था होईपर्यंत तर मुदत वाढ दिली पाहिजेच ना? १५ दिवसात नविन निविदेची कार्यवाही पूर्ण होईल ३०.९.२००२ ला मागील ठेकेदाराचा निविदा कालावधी संपलेला असताना प्रस्ताव तयार करण्यास ऐवढा वेळ का?*

*मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-श्री. डेगमवार, सविस्तर माहिती दया. तुम्ही तयारी करून येत नाहीत. यापुढे सर्व खाते प्रमुखांनी कागपत्र व माहितीसह तयारी करून सभेत आले पाहिजे.*



*श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):-पूर्ण फाईल येथे बरोबर आणलेली नाही. फक्त गोषवारा आहे.*

*मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-तुम्ही या प्रस्तावाबाबत पुर्ण तयारी करून यावयास पाहिजे होते.*

*मा. सदस्य श्री. विनोद तलेरजा:-पुर्ण तयारी करून यावयास पाहिजे होते ते असेच आले आहेत, पावणे दोन महिन्यामध्ये आपण निविदा का मागविली नाही?*

*मा. सदस्य श्री. बच्चराम रूपचंदानी:-नविन निविदेची प्रक्रिया पुर्ण करा व १५ जानेवारी पर्यंत यांना मुदत वाढ दया.*

*मा. सदस्य श्री. विनोद तलरेजा:-होय, १५ जानेवारी पर्यंतच मुदत वाढ दया.*

*मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-१५ दिवसात नविन निविदेची प्रक्रिया पुर्ण होणार नाही. एक महिन्यापर्यंतचा कालावधी लागेल.*

*मा. सचिव:-त्यांनी फाईल आणलेली नाही.*

*श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता):-फाईल, आता घेवून येतो.*

*मा. सचिव:-ठिक आहे? प्रस्ताव मंजुर.*

*मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*विषय :- विविध पंपिग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी प्राकलनास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देणे बाबत.*

*प्रस्तावना*

*उल्हासनगर शहराच्या पाणी वितरण व्यवस्थेसाठी विविध ठिकाणी बसविण्यात आलेले पंपिंग स्टेशनस् बारा महिन्यांच्या कालावधीसाठी ठेकेदारी पध्दतीने चालविण्याकरिता अंदाजित खर्चाचे रू. २४,६९,७८५/- मात्रचे प्राकलन तयार करण्यांत आले आहे. सध्या हे काम मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्व्हीसेस, डोंबिवली ही संस्था करित असून त्याचा कालावधी दि. ३०.९.२००२ रोजी संपलेला आहे. तथापि निविदेतील अटीनुसार, पुढील ठेकेदार नियुक्त होईपर्यंत पुर्वीच्या ठेकेदाराने काम सुरू ठेवावयाचे असल्याने सदर ठेकेदाराने काम सुरू ठेवलेले आहे.*

म्हणुन नविन निविदा मागवुन नविन ठेकेदार नियुक्त करण्यासाठी सदर प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.

या प्रस्तावास मुख्यलेखा अधिकारी व मुख्यलेखा परिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्त दि. १६.११.२००२ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव प्रशासकीय व वित्तिय मान्यतेकरिता स्थायी समिती समोर सादर करण्यांत येत आहे. त्यास मंजुरी मिळणेची विनंती आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र६८</u> <u>दिनांकः- १३.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :-श्रीम. किरण माने

--१०--

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील विविध पंपींग स्टेशन चालविणे, देखभाल व दुरुस्ती करणे कामी रुपये २४,६९,७८७/- मात्र च्या अंदाजित प्राकलनास प्रशासकिय वित्तीय मान्यता देत आहे.

तसेच दिनांक १.१०.२००२ पासून नविन कंत्राटदारांची नेमणुक होईपर्यंत सध्या कार्यरत असलेले ठेकेदार मे. ओम इंजिनिअरींग सर्व्हिसेस, डोंबिवली यांना त्या प्रयोजनार्थ पुर्वीच्या संविदेतील अटी व शर्तीवर मुदतवाढ देऊन प्रशासनास त्यांच्याशी थेट संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ६ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत २ विद्युतीकरण करणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत २ विद्युतीकरण करणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

महापालिकेने खालील दर्शविलेल्या कार्याची निविदा मागवून मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली होती. त्यांच्याशी मागील पंधरवडयात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये करार केलेले आहे.

| अ. क्र. | कार्याचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | सर्वात कमी दराचे निविदा धारकांचे नाव | दर | मंजुरीचा दिनांक | कराराचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत हरमन मोहता ते सी. ब्लॉक कलव्हर्ट हजारे बंगलो वाया नाका नं. ४ उल्हास १/ ३ दिवाबत्ती बसविणे बाबत. | रू.६,११,८२१.०० | मे. बि.जे. इलेक्ट्रीकल कं. नाशिक | अंदाजपत्रकीय रक्कमे पेक्षा ११.२ टक्के कमी | १२.११.२००२ | २२.११.२००२ |
| २. | एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गत हरमन मोहता ते सी. ब्लॉक कलव्हर्ट वाया नाका नं. ४ उल्हास १ येथे म.रा.वि. मंडळाचे पोल हलवण्याबाबत. | रू.९,८१,८९१.९५ | मे.बि.जे. इलेक्ट्रीकल कं. नाशिक | अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २ टक्के कमी | १२.११.२००२ | २२.११.२००२ |



सदर माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ६९</u> <u>दिनांकः- १३.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. रोहडा श्यामसुंदर

अनुमोदकाचे नाव :-श्रीम. किरण माने

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत २ विद्युतीकरण करणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तात नोंद करीत आहे

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> महापालिका मुख्य लेखा परिक्षकाचे माहे एप्रिल २००२ ते ऑगस्ट, २००२पर्यंतचा लेखा छाननी अहवाल विचारात घेऊन योग्य आदेश देणे बाबत.

विषय क्र. ७ व ८ एकच आहे फक्त लेखा परिक्षणाचा कालावधी वेगळा आहे.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>विषय एकच आहे. लेखापरिक्षणाचा कालावधी वेगवेगळा आहे, हे जे कर्मचारी आहेत. ज्यांच्यावर आपणास कारवाई करावयाची आहे. त्यांच्यावर जी कारवाई करायची ती कोणत्त्या पुराव्याच्या आधारावर?

<u>श्री. घोलप (प्रभारी मुख्य लेखा परिक्षक):-</u>या कर्मचा-यांनी मिळकत कराच्या पावतीव्दारे वसुल केलेली रक्कम महापालिकेच्या कोषागारात भरण्यासाठी रोखपाल यांचेकडे जमा करावयास पाहिजे होती परंतु प्रत्यक्षात त्यांनी ती रक्कम महापालिका कोषागारात भरली नाही. तसेच भरण्यास विलंब केला आहे.

--१२--

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>अशा कर्मचा-यांवर कारवाई केली पाहिजे याकामी आम्ही आयुक्तांना प्राधिकृत करीत आहोत त्यांनी या कर्मचा-यांना निलंबित करावे किंवा पोलिसात त्यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करावा. परंतु एका गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो दिनांक ७.१२.२००२च्या दैनिक लोकमतच्या अंकात आयुक्तांनी दिलेल्या निवेदनाचे एक वृत छापुन आले आहे. लोकप्रतिनिधी वसुली वाढविण्याकामी आम्हाला सहकार्य देत नाहीत असे आयुक्तांचे निवेदन आहे. आयुक्तांनी शासनास असे लिहुन पाठविणे चुकीचे आहे. कर वसुली कामी लोकप्रतिनिधी आपल्या कामात अडथळा थोडाच आणतात.

कात्रण हवे असेल तर माझ्याकडे आहे ते मी आपणास दाखवु शकतो श्री. विनोद तलरेजा यांनी दैनिक लोकमत वृतपत्राचे दि. ७.१२.२००२ रोजीचे कात्रण आयुक्तांना सादर केले.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>नगरसेवकांविरूध्द अशा प्रकारचे वृत वर्तमानपत्रामध्ये आले नाही पाहिजे.

<u>मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-</u>अशा प्रकारची माहिती मी कुठल्याही पत्रकाराला दिलेली नाही.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड/ श्री. विनोद तलरेजाः-</u>ठिक आहे, याची इतिवृतात नोंद घ्या.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>विषय क्र.७ पुढील प्रमाणे सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- महापालिका मुख्य लेखा परिक्षकाचे माहे एप्रिल २००२ ते ऑगस्ट, २००२ पर्यंतचा लेखा छाननी अहवाल विचारात घेऊन योग्य आदेश देणे बाबत.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १०५ व कलम १०६(१) अ नुसार माहे एप्रिल २००२ ते ऑगस्ट २००२ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल सोबत सादर केलेला आहे. कृपया वरील अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ व कलम १०६(१) अ नुसार माहे एप्रिल २००२ व ऑगस्ट २००२ पर्यंत या कालावधीचा जमा खर्चाचा अहवाल .

वित्तिय वर्ष २००२ -२००३ च्या "अ" व "क" अर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व ऑगस्ट २००२ पर्यत पहिल्या पाच महिन्या मध्ये प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शविलेले आहे.

| अर्थसंकल्प | अपेक्षीत जमा |
|---|---|
| "अ" | १,०९,०३,६०,००० |
| "क" | ४८,८५,७५,००० |
| एकुण | १,५७,८९,३५,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत .

| | | |
|---|---|---|
| १ | महसूल जमा | १,३२,१२,५१,००० |
| २ | शासकीय अनुदान | ३,७७,००,००० |
| ३ | कर्ज ( भांडवली) | ५,००,००,००० |
| ४ | अनामत रकमा/दायित्त्वे इ . | १२,९०,५०,००० |
| | एकूण | १,५३,८०,०१,००० |
| | प्रारभिंक शिल्लक | ४,०९,३४,००० |
| | | १,५७,८९,३५,००० |



वित्तीय वर्ष २००२-२००३ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रु १,३२,१२,५१,००० अपेक्षित धरलेली होती माहे ऑगस्ट २००२ पर्यंत समप्रमाणात रु . ५५,०५,२०,५०० महसूल उत्पन्न अपेक्षित होते . प्रत्यक्षात रु २८,११,८२,३००/- (२१:) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे ऑगस्ट २००२ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षानिहाय खालील प्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष अर्थ संकल्प ७अ८ | | अंदाजित | माहे ऑगस्ट २००२ पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष (रु . १००पुर्णांकांत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जकात कर | ५३,७५,००,००० | २२,३९,५८,००० | १८,९२,३२,३०० | ८४ ५ : |
| २ | मालमत्ता कर | २७,२०,००,००० | ११,३३,३३,३०० | २,९६,५८,२०० | २६ : |
| ३ | एम आर टी पी वसुली | ६३,०५,००० | २६,२७,१०० | १८,१७,९०० | ६९ : |
| ४ | महानगरपालिकेस | १३,४५,०० | ५,६०,४०० | ५४०० | १ : |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मालमत्तेपासून प्राप्त झालेले उत्पन्न | ० | | | |
| ५ | मार्केट | ३५,००,००० | १४,५८,३०० | १,०८,८०० | ७ : |
| ६ | रुग्णालय फी | २,१८,००० | ९०,८०० | ६९,००० | ७६ : |
| ७ | परवाना व इतर फी | ९७,७८,००० | ४०,७४,१०० | ६७,३९,००० | १६५ : |
| ८ | संकिर्ण | ४१,८०,०००० | १७,४१,७०० | १४,११,००० | ८१ : |
| | एकूण-अ | ८३,४८,२६,००० | ३४,७८,४३,७०० | २२,९०,४१,६०० | ६६ : |
| | अर्थ संकल्प “क” | | | | |
| ९ | पाणी पुरवठा देयके | ४३,००,००,००० | १७,९१,६७,००० | ४,५८,१९,६०० | २६ : |
| १० | मालमत्ताकर | ५,६०,००,००० | २,३३,३३,००० | ५७,९९,०००० | २५ : |
| ११ | परवाना/ इतर फी | ३,२०,००० | १,३३,००० | ४,३३,३०० | ३२६ : |
| १२ | संकिर्ण | १,०५,००० | ४३,८०० | ८८,८०० | २०३ : |
| | एकूण - ७क८ | ४८,६४,२५,००० | २०,२६,७६,८०० | ५,२१,४०,७०० | २६ : |
| | एकूण- “अ” व “क” | १,३२,१२,५१,००० | ५५,०५,२०,५०० | २८,११,८२,३०० | ५१ : |

“अ” व “क” अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु. १,५७,८९,३५,०००/- (ारंभिक शिलकेसह) अपेक्षित केलेले असून प्रत्यक्षात ऑगस्ट २००२ पर्यंत रु ३७,९९,८५,७०० उत्पन्न प्राप्त झालेले आहे . (२४:) . महसूल उत्पन्न माहे ऑगस्ट २००२ पर्यंत केवळ ५१: प्राप्त झालेले असल्यामुळे उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करणे अथवा खर्चात काटकसर करणे या व्यतिरिक्त पर्याय नाही .

<u>खर्च :-</u>

माहे एप्रिल २००२ ते ऑगस्ट २००२ या कालावधीमध्ये रु . ३६,०१,५४,६४४ खर्च लेखांकित झालेला आहे.



खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान झालेले आहे झालेला खर्च हा सक्षम प्राधिकाराच्या पुर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पिय तरतूदी अधिन आहे.

माहे ऑगस्ट २००२ चे तसेच पर्यंतची जमा/खर्चाची पत्रे सोबत जोडलेली आहेत.

लेखा परिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या गंभीर बाबी (मुबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०६ (१) अ च्या तरतुदीप्रमाणे ) :-

मालमत्ता कर विभाग

<u>आक्षेप कमांक १. श्री. जे. के. इसराणी, लिपिक, मालमत्ता कर विभाग यांनी केलेला अपहार</u>

<u>१) रक्कम रु . २०८६५/- चा अपहार</u>

श्री. जे. के. इसरानी , लिपीक यांनी पुस्तक कमांक ५७ मधील खालील पावत्यान्वये

एकूण रक्कम रु . २०८६५/- (रुपये वीस हजार आठशे पासष्ट फक्त )वसूल केले आहेत . परंतु सदरची रक्कम महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा केलेली नसल्याने दिनांक २७/५/२००२च्या अर्धसमास ज्ञापनाव्दारे मालमत्ता करविभागाकडून याबाबत खुलासा मागविला असता सदरची रक्कम दिनांक २९/५/२००२रोजी महानगरपालिकेच्या कोषागारात जमा केल्याचे त्यांनी त्यांचे दिनांक २४/६/२००२चे पत्रान्वये कळविले आहे.

सदरची रक्कम जवळ जवळ दीडवर्षानी व लेखा परिक्षणाने निदर्शनास आणून दिल्यानंतर भरणा केली आहे . परंतु रक्कम उशिरा भरण्याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही.

| अक | पा . क | दिनांक | वसुलीची रक्कम रु . |
|---|---|---|---|
| १ | ५६९२ | १/१२/२००० | ३४९८ |
| २ | ५६९३ | ,, | २८८४ |
| ३ | ५६९४ | ,, | १२७० |
| ४ | ५६९५ | ,, | १७०० |
| ५ | ५६९६ | ,, | १३३५ |
| ६ | ५६९७ | ६/१२/२००० | १६८८ |
| ७ | ५६९८ | ,, | ३११२ |
| ८ | ५६९९ | ,, | ४०९७ |
| ९ | ५७०० | ७/१२/२००० | १२८१ |
| | | एकुण | २०८६५ |

<u>आक्षेप कमांक २ . श्री . जे . के . इसराणी, रोखपाल, मालमत्ताकर विभाग यांनी केलेला तात्पूरता अपहार</u>

<u>१) रक्कम रु . २००००/- चा तात्पूरता अपहार</u>

श्री . जी .के . वानखेडे यांनी दिनांक ७/२/२००१ रोजी श्री . रवि मेलखुंडे बॅरेक नंबर ए ४३१ वार्ड नंबर ४० खाता कमांक ४७८/३८८ उल्हासनगर ४ यांचेकडून पुस्तक कमांक १९६ मधील पावती कमांक १९५६४ अन्वये रु . २० ,०००/- (रुपये वीस हजार फक्त) चा धनादेश कमांक ९०२४०९ स्विकारलेला आहे व सदर धनादेश न वटता बॅंकेतून परत आल्यानंतर संबंधीत लिपीक श्री . जी .के .वानखेडे यांनी दिनांक ७/३/२००१ रोजी सदर धनादेशाच्या बदल्यात रोख रक्कम रुपये २०००० (रुपये वीस हजार फक्त) कर विभागातील रोख पाल श्री . जे .के इसरानी यांचेकडे जमा केली .परंतु श्री इसरानी यांनी सदरची रक्कम दिनांक १७/७/२००१ रोजी महापालिकेच्या कोषागारात भरलेली आहे श्री . इसरानी यांनी ही रक्कम ४ महिने उशीरा भरलेली आहे .. तसेच रक्कम उशिरा भरण्याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही ..

<u>२) रक्कम रु . २५००० चा तात्पूरता अपहार</u>



श्री . नरेश बी माखीजा यांनी दिनांक २०/१/२००१ रोजी श्री . तुळशीराम टी मुलचंदानी ५२/१६६६ बॅरंक नंबर १७१८ हरीजनपाडा उल्हासनगर ५ याचेकडून पुस्तक कमांक १४४ मधिल पावती कमाक ०१४३७१ अन्वये रु . २५०००/- (रुपये पंचविस हजार फक्त)चा धनादेश कमांक १२२९२७ स्विकारलेला आहे व

सदर धनादेश न वटता बॅंकेतून परत आल्यानंतर श्री नरेश एम मारवीजा यांनी धनादेशाचा बदल्यांत मालमत्ता धारकाकडून रोख रक्कम वसूल करून दिनांक २९/१/२००१ रोजी रोखपाल श्री . जे . के . इसरानी यांच्याकडे जमा केली . सदरची रक्कम श्री . इसरानी यांनी दिनांक २७/३/२००१ रोजी महानगरपालिकेच्या कोषागारात भरल्याचे त्यांनी त्यांचे दिनांक २४/६/२००२ च्या पत्रान्वये कळविले आहे . सदरची रक्कम जवळजवळ दोन महिने नंतर भरणा केलेली आहे . रक्कम उशिरा भरण्याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही.

**<u>आक्षेप क्रमांक ३ :- श्री . अनिल खतुराणी लिपिक, मालमत्ता कर विभाग यांनी रु . २०००/- रकमेचा अपहार केल्याबाबत</u>**

श्री . अनिल अे खतुराणी, लिपीक यांनी पावत्ती क्रमांक ९४७५१, दिनांक १९/३/२००० अन्वये वसुल केलेली रक्कम रुपये २०००/- (रुपये दोन हजार मात्र) महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा केलेली नसल्याने श्री . अनिल अे खतुराणी ,यांनी केलेल्या अफरातफरीची रक्कम त्यांचेकडून तात्काळ वसुल करुन ती महापालिकेच्या कोषागारात भरणा करुन तसा अहवाल लेखा परिक्षणास देणेबाबत अर्ध समास ज्ञापन पत्र क्रमांक उमपा / लेपवि / कर विभाग / असज्ञा / ७०, दिनांक २४/७/२००२ अन्वये करनिर्धारक आणि संकलक , मालमत्ता कर विभाग यांना कळविले आहे. परंतु त्यांनी काहीही कार्यवाही केलेली नाही . .

**<u>आक्षेप क्रमांक ४ :- श्री . दामोदर टी . शर्मा, लिपिक, मालमत्ता कर विभाग यांनी रु . २०३७/- रकमेचा अपहार केल्याबाबत</u>**

श्री . दामोदर टी शर्मा, लिपीक यांनी पावत्ती क्रमांक ९९१११ दिनांक १०/४/२०००
व ९९१७९ ,दि . ३/५/२००० अन्वये वसुल केलेली रक्कम अनुक्रमे रु १६६७ व रु ३७० एकूण रु .२०३७ (रुपये दोन हजार सदोतीस मात्र)
महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा केलेली नसल्याने श्री . दामोदर टी शर्मा, यांनी केलेल्या अफरातफरीची रक्कम त्यांचेकडून तात्काळ वसुल करुन ती महापालिकेच्या कोषागारात भरणा करुन तसा अहवाल लेखा परिक्षणास देणेबाबत अर्धसमास ज्ञापन पत्र क्रमांक :उमपा / लेपवि / करविभाग / असज्ञा / ७१ दिनांक १३/८/२००२ अन्वये करनिर्धारक व संकलक मालमत्ता कर विभाग यांना कळविल्यानंतर सदरची रक्कम
श्री . दामोदर टी . शर्मा यांनी दिनांक ९/८/२००२ रोजी व त्यावरिल व्याजाची रक्कम रु . ४९८ दिनांक १६/८/२००२ रोजी महापालिकेच्या कोषागारात भरणा केल्याचे करनिर्धारक व संकलक यांनी कळविले आहे .

**<u>पाणी पुरवठा विभाग</u>**

**<u>आक्षेप क्रमांक ५</u>**

**<u>श्री . एन . ए डोंगरे, टपाली, पाणी पुरवठा देयक विभाग उल्हासनगर ५ यांनी रुपये ५८६३७/- रकमेचा अपहार केल्याबाबत .</u>**

श्री . एन . ए . डोंगरे, टपाली यांनी खाली दर्शविलेल्या पावत्त्यांव्दारे रक्कम रुपये ५८६३७ (रुपये अठ्ठावन्न हजार सहाशे सदोतीस) वसुल करुन ती महानगरपालिकेच्या कोषागारात भरणा न केल्याने दिनांक १६/६/२००२ च्या अर्धसमास ज्ञापनाव्दारे पाणी पुरवठा विभागाच्या निदर्शनास आणले होते .

अपहार रकमेचा तपशिल

| अनु . क्रमांक | पावती क्रमांक | दिनांक | ग्राहक क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ११९६७८ | २५/४/०१ | यु-३-८७७९ | २००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | १२९६७९ | २५/४/०१ | यु-३-१२४८७ | २९२० |
| ३ | १२९५७९ | १८/७/०१ | यु-३-५७१५ | ५००० |
| ४ | १२९५८३ | ९/८/०१ | यु-३-१३८४९ | ४००० |
| ५ | १२९५८४ | ९/८/०१ | यु-३-१२६४२ | ५००० |
| ६ | १२९५८६ | १/९/०१ | यु-३-५४६६ | ४०२ |
| ७ | १२९५८७ | १/९/०१ | यु-३-५६०७ | २१३ |
| ८ | १२९५८८ | १/९/०१ | यु-३-४३४३ | ४०२ |
| ९ | १३३५०४ | १०/९/०१ | यु-३-६०४० | ७४८ |
| १० | १३३५०५ | १२/९/०१ | यु-३-७४३२ | ३२२८ |
| ११ | १३३५१९ | १३/१०/०१ | यु-३-३७० | ४०७१ |
| १२ | १३३५१३ | २०/१०/०१ | यु-३-१३२७० | २४८९ |
| १३ | १३३५१४ | २५/१०/०१ | यु-३-४३२४ | १२०० |
| १४ | १३३५१५ | २६/१०/०१ | यु-३-१६७० | १४२ |
| १५ | १३३५२२ | २६/१०/०१ | यु-३-२०७२ | ५००० |
| १६ | १२९५८९ | ३/११/०१ | यु-३-१५४७ | १३९६ |
| १७ | १२९५९० | ३/१२/०१ | यु-३-३७६० | ३८७ |
| १८ | १३३५३७ | ४/१२/०१ | यु-३-१०३२३ | ४०० |
| १९ | १३३५३८ | ५/१२/०१ | यु-३-६९७५ | ४०० |
| २० | १३३५३९ | ५/१२/०१ | यु-३-६९५५ | ४०० |
| २१ | १३३५४० | ५/१२/०१ | यु-३-९५३४ | २९५ |
| २२ | १३३५४१ | ५/१२/०१ | यु-३-१२६०७ | १५०० |
| २३ | १३३५२१ | २७/१२/०१ | यु-३-६१८५ | ८८ |
| २४ | १२९५९१ | १२/१/०२ | यु-३-३७६५ | ५००० |
| २५ | १२९५९२ | ९/२/०२ | यु-३-५१०३ | १९४४ |
| २६ | १२९५९३ | ९/०२/०२ | यु-३-२१७२ | १९४४ |
| २७ | १२९२९४ | १०/२/०२ | यु-३-४५४७ | १९४४ |
| २८ | १२९५९५ | १०/२/०२ | यु-३-१६२६ | १०४४ |
| २९ | १२९५९६ | १४/२/०२ | यु-३-५७१८ | १२९६ |
| ३० | १२९५९७ | १४/२/०२ | यु-३-२३१८ | ३४१ |
| ३१ | १२९५९८ | १८/२/०२ | यु-३-८१७८ | १९८५ |
| ३२ | १२९५९९ | २५/२/०२ | यु-३-१६ | १४५८ |
| | | | एकूण | ५८६३७ |

अपहाराची वर उल्लेखिलेली रक्कम रुपये ५८६३७ श्री. डोंगरे यांनी खाली दर्शाविलेल्याप्रमाणे पालिका कोषागार कार्यालयात भरलेली आहे.

अपहाराची रक्कम भरणा केल्याचा तपशिल

| अनुक्रमांक | अपहाराची रक्कम भरणा केल्याचा दिनांक | भरणा करण्यांत आलेली रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | २/३/२००२ | ४१५९/- |
| २ | १२/७/२००२ | १६४१३/- |
| ३ | १५/७/२००२ | ८८८८/- |

| | | |
|---|---|---|
| ४ | १७/७/२००२ | २९१७७/- |
| | एकुण | ५८६३७/- |

परंतु खालील खुलासा पाणी पुरवठा विभागाने अद्याप केलेला नाही .

१) श्री . डोंगरे, हे टपाली या चतूर्थ श्रेणीतील पदावर काम करत असताना त्यांना वसुलीचे काम कोणत्त्या नियमान्वये दिलेले होते .

२) पावती पुस्तक क्रमांक १२९७ (अनुक्रमांक १ व २ उल्लेखिलेल्या पावात्त्या) हे श्री . के. एम बागुल यांना दिनांक ११/९/२००० रोजी दिले होते श्री. बागुल यांनी सदरहु पुस्ताकातील १२९६०१ पासुन १२९६३९ पर्यंत पावत्त्या फाडलेल्या आहेत व न वापरलेल्या

--१७---

पावत्त्यासहित ( १२९६४० पासून १२९७०० ) पावती पुस्तक अधिक्षक, श्री शेख यांना दिल्याचे दिसते . परंतु श्री . शेख यांनी पुस्तक प्राप्त झाल्याच्या स्वाक्षरीवर दिनांक घातलेला नाही मात्र ह्याच पावती पुस्तकातील पावत्त्या श्री . डोंगरे यांनी उपयोगात आणून अपहार केला आहे. श्री. डोंगरे यांना हे पावती पुस्तक दिल्याची त्यांची स्वाक्षरी घेतलेली नाही .

३) तसेच १२९६ क्रमांकाचे पावती पुस्तक श्री. बा-हाते यांना देण्यात आले होते . श्री बा-हाते यांनी या पुस्तकातील पावती क्रमांक १२९५०१ पासून १२९५६६ पर्यंत पावत्त्या उपयोगात आणल्या आहेत व अशत: उपयोगात आणलेले पावती पुस्तक श्री . शेख , अधीक्षक , यांना परत दिल्याची तसेच श्री . शेख यांनी स्विकृत केल्याची नोंद दिसते म्हणजेच १२९६ व १२९७ ही अशंत: शिल्लक असलेली पावती पुस्तके श्री . शेख यांच्याकडे असताना पावती पुस्तक क्रमांक १२९६ श्री डोंगरे यांना

कोणी व केव्हा दिले व त्याची रजिस्टरमध्ये नोंद का केली नाही तसेच पावती पुस्तक क्रमांक १२९७ हे श्री. डोंगरे यांना दिल्यानंतर त्यांची स्वाक्षरी का घेतली नाही. याचा शोध घेऊन त्यास जबाबदार असलेल्या कर्मचा-यांच्या नावासहित अहवाल लेखापरिक्षणास सादर करावा.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७०</u> <u>दिनांक:-१३ . १२. २००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

हि स्थायी समिती वरील प्रमाणे मुख्य लेखा परिक्षकांचे माहे एप्रिल २००२ ते माहे ऑगस्ट २००२ पर्यंतच्या जमाखर्चाच्या लेख्यांच्या छाननी अहवालाची नोंद करीत आहे व प्रशासनाला या सरकारी वर्षाच्या अवधीत जमाखर्चाचे पुर्नसमायोजन करणे करीता योग्य पाऊले उचलणेस निर्देशित करीत आहे.

तसेच अहवालातील काही नियमबाहय प्रकारासंबंधी मुख्य लेखा परिक्षकांचे महानगरपालिका कर्मचा-यांच्या वर्तणुकीच्या आक्षेपाबाबत प्रशासनास शास्ती लादण्याची कार्यवाही किंवा इष्ट वाटेल तर पोलिसांकडे गुन्हा नोंदणीचे आदेश देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

**<u>एकमताने मंजुर</u>**

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**<u>मा. सचिवः-</u>**विषय क्र. ८ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> महापालिका मुख्य लेखा परिक्षकाचे माहे एप्रिल २००२ ते ऑक्टोबर २००२ पर्यंतचा लेखा छाननी अहवाल विचारात घेऊन योग्य आदेश देणे बाबत.

**<u>७मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>**सदरचा प्रस्ताव पुढीलप्रमाणे सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

--१८--

<u>विषय :-</u> महापालिका मुख्य लेखा परिक्षकाचे माहे एप्रिल २००२ ते ऑक्टोबर २००२ पर्यंतचा लेखा छाननी अहवाल विचारात घेऊन योग्य आदेश देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १०५ व कलम १०६(१) अनुसार माहे ऑक्टोंबर २००२ व ऑक्टोंबर २००२ पर्यंतचा जमा खर्चाचा अहवाल सोबत सादर केलेला आहे .कृपया वरील अहवाल मा. स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ व कलम १०६(१) अ नुसार माहे ऑक्टोंबर २००२ व ऑक्टोंबर २००२ पर्यंतच्या कालावधीचा जमा खर्चाचा अहवाल .

वित्तिय वर्ष २००२ -२००३ च्या ७अ८ व ७क८ अंर्थसंकल्पात अंदाजित केलेले उत्पन्न व ऑक्टोंबर २००२ पर्यत पहिल्या सात महिन्या मध्ये प्राप्त झालेले उत्पन्न हे पुढे दर्शाविलेले आहे .

| अर्थसंकल्प | अपेक्षित जमा |
|---|---|
| “अ” | १,०९,०३,६०,००० |
| “क” | ४८,८५,७५,००० |
| ७एकुण | १,५७,८९,३५,००० |

अपेक्षित जमेमध्ये खालील बाबी अंतर्भूत आहेत .

| | | |
|---|---|---|
| १ | <u>महसूल जमा</u> | १,३२,१२,५१,००० |
| २ | शासकीय अनुदान | ३,७७,००,००० |
| ३ | कर्ज ( भांडवली) | ५,००,००,००० |
| ४ | अनामत <u>रकमा</u>/दायित्त्वे इ . | १२,९०,५०,००० |
| | एकूण | १,५३,८०,०१,००० |
| | प्रारभिंक शिल्लक | ४,०९,३४,००० |
| | | १,५७,८९,३५,००० |

वित्तीय वर्ष २००२-२००३ च्या अर्थसंकल्पात महसूल जमा रक्कम रु १,३२,१२,५१,००० अपेक्षित धरलेली होती माहे ऑक्टोंबर २००२ पर्यंत समप्रमाणात रु . ७७,०७,३०,००० महसूल उत्पन्न अपेक्षित होते. प्रत्यक्षात रु. ४२,०२,०६,०००/- (२१:) महसूल उत्पन्न प्राप्त झाले.

माहे ऑक्टोंबर २००२ पर्यंत अपेक्षित असलेली जमा व प्रत्यक्ष जमा लेखा शिर्षानिहाय खालील प्रमाणे आहे.

| लेखा शिर्ष<br>अर्थ संकल्प ७अ८ | | अंदाजित | माहे ऑक्टोंबर २००२ पर्यंत अपेक्षित | प्रत्यक्ष (रु १००० पुर्णांकांत) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जकात कर | ५३,७५,००,००० | ३१,३५,४२,००० | २८,७४,१४,००० | ९२ : |
| २ | मालमत्ता कर | २७,२०,००,००० | १५,८६,६७,००० | ४,४०,५०,००० | २८ : |
| ३ | एम आर टी पी वसुली | ६३,०५,००० | ३६,७८,००० | २६,७६,००० | ७३ : |
| ४. | महानगरपालिकेस मालमत्तेपासून प्राप्त झालेले उत्पन्न | १३,४५,००० | ७,८५,००० | २१,००० | ३ : |



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | मार्केट | ३५,००,००० | २०,४२,००० | १,४४,००० | ७ : |
| ६ | रुग्णालय फी | २,१८,००० | १,२७,००० | ९३,००० | ७३ : |
| ७ | परवाना व इतर फी | ९७,७८,००० | ५७,०४,००० | ७०,४३,००० | १२३ : |
| ८ | सांकिर्ण | ४१,८०,००० | २४,३८,००० | १९,५६,००० | ८० : |
| | एकूण-अ | ८३,४८,२६,००० | ४८,६९,८३,००० | ३४,३३,९७,००० | ७१ : |

| अर्थ संकल्प “क” | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | पाणी पुरवठा देयके | ४३,००,००,००० | २५,०८,३३,००० | ५,६७,१०,००० | २३ : |
| १० | मालमत्ताकर | ५,६०,००,००० | ३,२६,६७,००० | ८५,०७,००० | २६ : |
| ११ | परवाना/ इतर फी | ३,२०,००० | १,८७,००० | ५,९४,००० | ३१८ : |
| १२ | सांकिर्ण | १,०५,००० | ६१,००० | ८९,००० | १४६ : |
| | एकूण -७क८ | ४८,६४,२५,००० | २८,३७,४८,००० | ६,५९,००,००० | २७ : |
| | एकूण- ७अ८ व ७क८ | १,३२,१२,५१,००० | ७७,०७,३१,००० | ४०,९२,९७,००० | ५३ : |

"अ" व "क" अंदाजपत्रकात एकूण उत्पन्न रु . १,५७,८९,३५,०००/- ( प्रांरभिक शिलकेसह)अपेक्षित केलेले आहे. प्रत्यक्षात ऑक्टोंबर २००२ पर्यंत रु ५३४६१६०००/- उत्पन्न दर्शाविलेले आहे. परंतु या रकमेमध्ये खालील अतिरिक्त रक्कमा समाविष्ठ आहेत.

१ नोव्हेंबर १९९९ पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना सुधारित वेतनाच्या थकबाकीच्या रकमा प्रदान करण्या करिता वेतन राखीव निधीतून रुपयाची गुंतवणूक त्यावरील व्याजासह रु .. ९७,२६,८२७/- काढलेली रक्कम .

२ कर्मचा-यांना दिवाळीपूर्वी वेतन आदाईसाठी तसेच सण अग्रीमसाठी तरतूद म्हणून दि. ६/११/२००२ रोजी देय असलेली जकात वसुलीचा घेतलेला आगावु हप्ता रु. १,०९,०९,०८७/- .

त्यामुळे माहे ऑक्टोंबर २००२ मध्ये प्राप्त झालेले प्रत्यक्ष उत्पन्न रु . ७,७८,३६०००/- आहे . म्हणजेच माहे ऑक्टोंबर २००२ अखेरचे उत्पन्न रु . ४७,३०,४७,०००/- आहे . (३०:) :महसूल उत्पन्न माहे ऑक्टोंबर , २००२ पर्यंत केवळ ५३: प्राप्त झालेले असल्यामुळे उत्पन्नात वाढ होण्यासाठी आवश्यक ती उपाय योजना करणे अथवा खर्चात काटकसर करणे या व्यतिरिक्त पर्याय नाही .

याकरिता खालील उपाययोजना करणे आवश्यक आहे .

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १०४ नुसार सन २००२-२००३ या आर्थिक वर्षासाठी मंजूर केलेला खर्च सम प्रमाणात कमी करणे किंवा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १५० नुसार सन २००२-२००३ या आर्थिक वर्षात कोणत्याही करात अनुपूरक कराधान लादून वाढ करणे .



<u>खर्च :-</u>

माहे एप्रिल २००२ ते ऑक्टोंबर २००२ या कालावधीमध्ये रु . ४९,९१,८२,१६० खर्च लेखांकित झालेला आहे .
खर्चाचे पूर्व लेखापरिक्षण होत असते तसेच लेखा परिक्षणात उपस्थित केलेल्या आक्षेपांचे निराकरण झाल्यावरच देयकाचे प्रदान झालेले आहे झालेला खर्च हा सक्षम प्राधिकाराच्या पुर्व मंजुरीने झालेला असून तो अर्थसंकल्पिय तरतूदी आधिन आहे.

माहे ऑक्टोंबर २००२ चे तसेच पर्यंतची जमा/खर्चाची पत्रे सोबत जोडलेली आहेत .

<u>लेखा परिक्षणामध्ये निर्दशनास आलेल्या गंभीर बाबी ;मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०६ ;१द्ध अ च्या तरतुदीप्रमाणे .</u>

## <u>सार्वजनिक आरोग्य विभाग</u>

**आक्षेप कमांक :- १ <u>सार्वजनिक आरोग्य विभागातील श्री . रमेश कुडीया लिपीक, यांनी रु . ९४,३६३/- (रुपये चौ-याणव हजार तीनशे त्रेसष्ठ फक्त ) रकमेचा केलेला अपहार :-</u>**

सार्वजनिक आरोग्य विभागाचे सन २००१-२००२ व २००२-२००३ या आर्थिक वर्षाचे जन्म मृत्यू दाखले फी, जन्म मृत्यू अर्ज , कत्तलखाना फी तसेच फेरीवाले फी इत्यादी जमा रक्कमांचे लेखा परिक्षण केले असता

त्यांच्या कार्यक्षेत्रातील कॅम्प कमांक १ ते ५ च्या स्वच्छता निरिक्षकांनी वसुल केलेल्या रकमांचा भरणा आरोग्य विभागातील लिपीक श्री . रमेश कुडीया यांचेकडे जमा केला असता त्यांनी रु . ९४ ,३६३/- (रुपये चौ-याण्णव हजार तीनशे त्रेसष्ट मात्र) रक्कम महापालिका कोषागारात न भरता कायम अपहार केल्याचे आढळून आल्याने सदरची अपहारित रक्कम संबंधीताकडून तात्काळ वसुल करुन महापालिकेच्या कोषागारात भरणा करण्याबाबत तसेच सदरच्या रकमेच्या अपहाराबाबत संबंधीतावर योग्य ती कारवाई करण्याबातचा अहवाल मा . आयुक्त यांना सादर करण्याबाबत लेखा परिक्षण विभागाचे अर्ध समास ज्ञापन पत्र कमांक उमपा / लेपवि / आवि / असज्ञा / ३७ / दि . १६/११/२००२ अन्वये उप आयुक्त (आरोग्य ) यांना कळविल्यानंतर त्यांनी श्री . रमेश कुडीया यांचेकडून वरिल रक्कम वसुल करुन दिनांक २१/११/२००२ रोजी महानगरपालिकेच्या कोषागारात जमा केल्याचे त्यांचे पत्र कमांक उमपा / आवि / आस्था ६४१ / दिनांक २७/११/२००२ अन्वये कळविले आहे .

<u>मालमत्ता कर विभाग</u>

**<u>आक्षेप कमांक :- २ रक्कम रु . १७०००/- चा धनादेश न वटता सदरची रक्कम मालमत्ता धारकाच्या खात्त्यावर जमा दाखविल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत .</u>**

मालमत्ताकर विभागाचे सन २०००-२००१ ते २००१-२००२ या आर्थीक वर्षांच्या कालावधीचे लेखा परिक्षण करतांना श्री . व्ही . व्ही . कानडे , लिपीक (से नि ) यांनी पावती पुस्तक कमांक ३०७ मधिल पावती कमांक ०३०६१९ दि <u>२७/३/००१</u> व्दारे श्रीमती केसरबेन ए . ढेढीया मुरबाड रोड येथील शॉप वार्ड नंबर १ खाता नंबर ११९/८७ उल्हासनगर १ यांचेकडून मालमत्ता करापोटी रक्कम रुपये १७०००/- चा धनादेश कमांक ८९१७९० दिनांक २७/३/२००१ (विजया बॅंक उल्हासनगर ३ ब्रॅंच) व्दारे स्विकारल्याचे उपरोक्त पावती वरील नोंदीवरुन तसेच सदरचा धनादेश न वटता दि. ३१/३/२००१ रोजी परत आल्याचे नोंदवहीवरुन दिसून आले मात्र वरील मुळ पावतीवर ब्वचनजमतपेमक शिक्का मारुन सदरची रक्कम वरिल खातेदाराच्या खात्त्यावर जमा दाखविली आहे. सदरच्या पावतीची (कार्बन) दुय्यम प्रत पावती पुस्तकातच आहे.



उपरोक्त धनादेश न वटता बॅंकेकडून परत आल्याने त्याच्या बदल्यात मालमत्ता धारकाने रक्कम रुपये १७०००/- पावती कमांक ०६८६१० दिनांक १५/२/२००२ रोजी रोखीने भरले आहेत व सदरच्या मुळ पावतीवर ब्वचनजमतपेमक शिक्का मारुन सदरची रक्कम वरिल खातेदाराच्या खात्त्यावर जमा दाखविली आहे.

वरील धनादेश न वटता परत येऊनही त्याची खातेदाराच्या खात्त्यावर जमा नोंद का घेण्यांत आली याचा खुलासा करण्याबाबत तसेच उपरोक्त धनादेश न वटल्यामुळे त्याऐवजी रोखीने वसुल केलेली रक्कम तब्बल ११ महिन्यानंतर वसुल केली आहे. तरी सदरची रक्कम वसुल करण्यास इतका विलंब का झाला याचा खुलासा करण्याबाबत व उपरोक्त ग्राहकाच्या खाती दोन्ही पावत्त्यांव्दारे वसुल केलेली रक्कम जमा दाखविल्याने रुपये १७०००/- चे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याने याबाबत संबंधीतांवर योग्य ती कारवाई करुन दि . २७/३/२००१ रोजी ग्राहकाच्या खाती जमा दर्शविलेली नोंद रदद करुन तसे केल्याचे लेखा परिक्षणास कळविण्याबाबत लेखा परिक्षण विभागाचे अर्ध समास ज्ञापन पत्र कमांक उमपा / लेपवि / मालमत्ता कर विभाग / असज्ञा / ७३ / दिनांक २७/९/२००२ अन्वये उप-आयुकत (महसुल) यांना कळविले आहे. परंतु त्यांनी कोणतीही कार्यवाही

केलेली नाही .

आक्षेप कमांक :- ३

रक्कम रु . १५,९६६/- <u>(रुपये पंधरा हजार नऊशे सहासष्ठ फक्त) चा धनादेश न वटता सदरची रक्कम मालमत्ता धारकाच्या खात्त्यावर जमा दाखविल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याबाबत</u>

मालमत्ता कर विभागाचे सन २००१-२००२ या आर्थीक वर्षाच्या कालावधीचे लेखा परिक्षण करतांना श्री . अनिल खतुराणी टॅक्स कलेक्टर यांनी पावती पुस्तक कमांक ५२१ मधिल पावती कमांक ५२०२६ दि १८/८/२००१ व्दारे मुरली पी . रुपानी यांचेकडून यु-४-शिट नंबर ३ near victor system येथील मालमत्ता वार्ड नंबर ३० खाता नंबर ५३७२ उल्हासनगर ३ या मालमत्तेच्या करापोटी रक्कम रुपये १५९६६/- चा धनादेश कमांक १०१५४० दिनांक १८/८/२००१ (ओवोरसिस बॅंक कमर्सीयल ३ ब्रॅच) व्दारे स्विकारल्याचे उपरोक्त पावती वरील नोंदीवरुन दिसुन आले. तसेच सदरचा धनादेश न वटता दि . २४/८/२००१ रोजी परत आल्याचे नोंदवहीवरुन दिसून आले. मात्र वरील मुळ पावतीवर व्वचनजमतपेमक शिक्का मारुन सदरची रक्कम वरिल खातेदाराच्या खात्त्यावर जमा दाखविली आहे.

वरील धनादेश न वटता परत येऊनही त्याची खातेदाराच्या खात्त्यावर जमा नोंद का घेण्यांत आली याचा खुलासा करण्याबाबत तसेच सदरचा धनादेश न वटल्याने त्याच्या बदल्यात खातेदाराकडून रोख रक्कम का वसुल केली नाही याचा खुलासा करण्याबाबत व उपरोक्त ग्राहकाच्या खाती पावतीव्दारे वसुल केलेली रक्कम जमा दाखविल्याने रु . १५९६६/- चे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले असुन महापालिकेची फसवणूक केली असल्याने संबंधितावर योग्य ती कारवाई करण्याबाबत

मा . आयुक्त यांना अहवाल सादर करण्यासाठी व सदरच्या खातेदाराने मालमत्ताकराची वरिलप्रमाणे रक्कम भरलेली नसल्याने ती त्यांच्या खात्त्यातून कमी करावी तसा अहवाल लेखा परिक्षणास देण्यासाठी लेखा परिक्षण विभागाने अर्ध समास ज्ञापन पत्र कमांक उमपा / लेपवि / मालमत्ताकर विभाग / असज्ञा / ७६ / दिनांक २७/११/२००२ अन्वये उप-आयुक्त (महसुल) यांना कळविले आहे . परंतु त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

आक्षेप कमांक :- ४

<u>मालमत्तेचे खाते नसतांना मालमत्ता करापोटी रु . १५,२६०/- (रुपये पंधरा हजार दोनशे साठ फक्त) स्विकारल्याबाबत</u>

सन २०००-२००१ सालचे मालमत्ता कर विभागाचे लेखा परिक्षण करतांना मालमत्ता कर वसुली लिपीक श्री . भगवान उदासी यांनी



पावती कमांक ००२२४७ दिनांक <u>१९/१०/२०००</u> पावती बूक कमांक २३ व्दारे श्री . अर्जुनदास के . बालानी, नियर एस एन एच स्कूल प्लांट नंबर १, २, ३ वार्ड कमांक ३० खाते कमांक ८०६ उल्हासनगर यांचे कडून मालमत्ता करा पोटी रु . १५२६० (रुपये पंधरा हजार दोनशे साठ मात्र)कु वसूल केल्याचे दिसून आल्याने व पावती वर “Chif From D.M.C.” असा उल्लेख केला असल्याने “Chif From D.M.C.” म्हणजे काय याचा खुलासा करण्याबाबत व वसुल केलेली रक्कम ही सन १९८१-८२ ते १९८५-८६ सालची थकबाकी असल्याचे पावतीवरील नोंदी वरुन दिसून

आल्याने परंतु संगणकीय खाते पहाता खाते वहीत श्री अर्जूनदास बालानी यांच्या नांवाऐवजी खाते नंबर ८०६ मनिषा शिवाजी भागवत या नावाचे खाते असल्याचे दिसुन आल्याने व वसुल केलेली रक्कम वरील खात्त्यात जमा दाखविलेली नसल्याने सदरची रक्कम कोणत्त्या खात्त्यात जमा केली आहे . याचा खुलासा करण्याबाबत तसेच खालील अभिलेख लेखा परिक्षणास दोन दिवसात उपलब्ध करून देण्याबाबत लेखा परिक्षण विभागाचे अर्ध समास ज्ञापन पत्र क्रमांक उमपा / लेपवि / मालमत्ता कर वि / असज्ञा / ७४ / दिनांक २९/१०/२००२ अन्वये मालमत्ता करविभागास कळविले आहे . परंतु त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

खातेदारास देण्यांत आलेली मागणी नोटीस

१ असेसमेंट रजिस्टर सन १९८१ -१९८२

२ फिल्डबूक

३ मागणी रजिस्टर

४ तत्सम अभिलेख

**आक्षेप क्रमांक :- ५ <u>मालमत्तेचे खाते नसतांना मालमत्ता करापोटी रक्कम रु . १९०६५/- ( रुपये एकोणीस हजार पद्मासष्ठ मात्र ) स्विकारल्याबाबत</u>**

सन २०००-२००१ सालचे मालमत्ता कर विभागाचे लेखा परिक्षण करतांना मालमत्ता कर वसुली लिपीक श्री . भगवान उदासी यांनी पावती क्रमांक ००२२४८ दिनांक <u>१९/१०/२०००</u> (पावती बूक क्रमांक २३) व्दारे श्री . अर्जुनदास बालानी, नियर एस एन एच स्कूल प्लाट नंबर १७० ग्रिन एरिया वार्ड क्रमांक ३० खाते क्रमांक ८०२ उल्हासनगर ३ यांचे कडून मालमत्ता करा पोटी रु . १९०६५ वसूल केल्याचे दिसून आल्याने तसेच वरिल पावती वर “Chif From D.M.C.” असा उल्लेख केला असल्याने “Chif From D.M.C.” म्हणजे काय याचा खुलासा करण्याबाबत . तसेच सन १९८१-८६ सालची थकबाकी असल्याचे पावतीवरील नोंदी वरुन दिसून आल्याने व उपरोक्त संगणकीय खाते पहाता खाते वहीत श्री अर्जूनदास बालानी यांच्या नांवाऐवजी खाते नंबर ८०२ श्री . गुनहा यांचे खाते असल्याचे दिसुन आल्याने व वसुल केलेली रक्कम वरील खात्त्यात जमा दाखविलेली नसल्याने सदरची रक्कम कोणत्त्या खात्त्यात जमा केली आहे . याचा खुलासा करण्याबाबत . तसेच खालील प्रमाणे अभिलेख लेखा परिक्षणास दोन दिवसात उपलब्ध करून देण्याबाबत लेखा परिक्षण विभागाचे अर्ध समास ज्ञापन पत्र क्रमांक उमपा / लेपवि / मालमत्ता करवि / असज्ञा / ७५/ दिनांक २९/१०/२००२ अन्वये मालमत्ता कर विभगस कळविले आहे . परंतु त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

१ खातेदारास (श्री . अर्जनदास बालानी )
यांना देण्यांत आलेली मागणी नोटीस

२ असेसमेंट रजिस्टर सन १९८१ -१९८२

३ फिल्डबुक

४ मागणी रजिस्टर

तत्सम अभिलेख





सुचकाचे नाव :-श्री. सुर्यकांत लिंगे

अनुमोदकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

हि स्थायी समिती वरीलप्रमाणे मुख्य लेखा परिक्षकांचे माहे एप्रिल २००२ ते माहे ऑक्टोबर २००२ पर्यंतच्या जमाखर्चाच्या लेख्यांच्या छाननी अहवालाची नोंद करीत आहे व प्रशासनाला या सरकारी वर्षाच्या अवधीत जमाखर्चाचे पुर्नसमायोजन करणे करीता योग्य पाऊले उचलणेस निर्देशित करीत आहे.

तसेच अहवालातील काही नियमबाहय प्रकारासंबंधी मुख्य लेखा परिक्षकांचे महानगरपालिका कर्मचा-यांच्या वर्तणुकीच्या आक्षेपाबाबत प्रशासनास शास्ती लादण्याची कार्यवाही किंवा इष्ट वाटेल तर पोलिसांकडे गुन्हा नोंदणीचे आदेश देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने मंजुर</u>

सभापती / पिठासीन अधिकारी<br>
स्थायी समिती सभा<br>
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ९ वाचुन दाखवितात.

<u>विषय :-</u> मानेरा जंक्शन ते लालचक्की मार्गे व्हिनस चौक उल्हासनगर-४ येथील पोल हलविणेकामी मे. जाधव ॲण्ड सन्स कल्याण यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृत योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>हे जे दर आहेत ते सर्वात कमी आहेत का?

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> मानेरा जंक्शन ते लालचक्की मार्गे व्हिनस चौक उल्हासनगर-४ येथील पोल हलविणेकामी मे. जाधव ॲण्ड सन्स कल्याण यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृत योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम अंतर्गतच्या रस्त्यासाठी एम.एम.आर.डी.ए.चे कर्ज उपलब्ध आहे तेथील म.रा.वि. मंडळाचे रस्त्यात येणारे ट्रान्सफार्मर व पोल एका बाजुला लावण्याचे कार्य निषेध व्यक्त करून १००टक्के खर्च व १५ टक्के सुपरविझन चार्जच्या अंतर्गत हाती घेतलेले आहे.

बांधकाम विभागाच्या विनंती नुसार म.रा.वि. मंडळाला पत्र क्रमांक २६० दिनांक २६.१२.२००१ अन्वये मानेरा जंक्शन ते लाल चक्की व्हाया विनस चौक उल्हासनगर-४ येथे म.रा.वि. मंडळाचे पोल योग्य ठिकाणी हलविण्यासाठी देण्यात आले.

त्या पत्राच्या अनुषंगाने मुख्य अभियंता म.रा.वि मंडळ यांनी पत्र क्रमांक ५७२७दिनांक १६.११.२००२ अन्वये मानेरा जंक्शन ते लाल चक्की व्हाया विनस चौक उल्हासनगर-४ येथे म.रा.वि. मंडळाचे पोल हलविण्या करीता रूपये १७,७८,६००/- च्या प्रस्तावास १५ टक्के सुपरविझन चार्ज अंतर्गत मंजुरी दिली.

त्यानंतर म. रा. वि. मंडळाकडुन मंजुर प्राकलनामध्ये साहित्य + मजुरी+ वाहतुक खर्च + टी. एस.पी.चार्जेस + जुने साहित्य काढयाचे चार्जेस घेवून निविदा रक्कम रूपये १५,८३,६५१. ३८ निरधारीत करून नवशक्ती (मराठी) फ्री प्रेस (इंग्रजि) व नवभारत (हिंन्दी) या तीन वर्तमान पत्रात सुचना देवून निविदा मागविण्यात आल्या.

त्याच्या प्रतिसादात १. मे. जाधव ॲण्ड सन्स, कल्याण २. मे.एक्स के इंजिनिअरींग सर्व्हीसेस, कल्याण व ३. मे. बी. जे. इलेक्ट्रीक कंपनी, नाशिक यांनी कोरे निविदाचे प्रपत्र खरेदी केले.

खालील निविदा धारकांनी वेळेवर म्हणजे दिनांक ३. १२.२००२ रोजी दुपारी ३ वाजे पर्यंत इसारा रक्कमेसह सिलबंद निविदा सादर केल्या व ते त्याच दिवशी दिनांक ५.१२.२००२ रोजी सायंकाळी ३. ०० वाजता उघडण्यात आले त्याचा तुलनात्त्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

१. मे. जाधव ॲण्ड सन्स, कल्याण निविदा रक्कम रूपये १५,८३,६५१. ३८ पेक्षा ३ टक्के जास्त.
२. मे. एक्स के. इंजिनिअरींग सर्व्हीसेस कल्याण व
३. मे. बी. जे. इलेक्ट्रीक कंपनी नाशिक यांनी कोरे निविदाचे प्रपत्र खरेदी केले.

सदर तुलनात्त्मक तक्त्यानुसार मे. जाधव एण्ड सन्स कल्याण यांचे दर सर्वात कमी आहेत परंतु अंदाजपत्रकीय रक्कम १५,८३,६५१.३८ पेक्षा ३ टक्के जास्त आहे. यासाठी सदर ऐजन्सीला पत्र क्र. उमपा / विद्युत/३६७ दिनांक ५.७.२००२ देवून ६.१२.२००२ रोजी दुपारी १२. ०० वाजता वाटाघाटी साठी बोलविण्यात आले. वाटाघाटी नंतर एजन्सी ने हे कार्य निविदा रक्कमेवर काम करण्याचे मान्य केले.

वरील वाटाघाटीचे परिणाम लक्षात घेवून मे. जाधव ॲण्ड सन्स, कल्याण यांनी दिलेले सुधारित दर at par with निविदा रक्कम रू. १५,८३,६५१. ३८ वाजवी असून यांच्या निविदेस मंजुरी देवून लागणा-या खर्चास मान्यतेसाठी प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७२</u> <u>दिनांक:- १३.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्रीम. सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार मानेरा जंक्शन ते लालचक्की व्हाया व्हीनस चौक मार्गे उल्हासनगर-४ येथिल पोल हटविणे कामी मे. जाधव व सन्स यांची



सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून त्यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. १० वाचुन दाखवितात. मंजुर?

<u>विषय :-</u> मा. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सपना गार्डन उल्हासनगर -३ येथे कारंजाच्या सुशोभित करण्यास ाठी व तेथे प्रकाश योजने अंतर्गत सजावट करणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>आमदार पुर्ण उल्हासनगर शहराचे आहेत. सपना गार्डनचे काम होत आहे ही चांगली गोष्ट आहे. सपना गार्डन व गोल मैदान या व्यक्तीरिक्त आमदारांनी आमच्या विभागाचा सुध्दा विचार करावा अशी आमची विनंती आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकलः-</u>बिर्ला मंदीर येथे जे गेट आहे तेथे जाण्यास खुप त्रास होतो. तेथे सुध्दा चांगले गार्डन आहे.तेथे सुध्दा अशा प्रकारचे काम झाले पाहिजे.

<u>मा. सदस्या श्रीमती. माने किरणः-</u>शहरात सगळीकडे समान कामे झाली पाहिजेत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>हे शहर तुमचे आणि आमचे आहे ना?

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u>आपण आम्हास सांगाल तर त्यावर विचार करता येईल.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- मा. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सपना गार्डन उल्हासनगर -३ येथे कारंजाच्या सुशोभित करण्यासाठी व तेथे प्रकाश योजने अंतर्गत सजावट करणेकामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

## प्रस्तावना

महापालिकेने खालील दर्शविलेल्या कार्याची निविदा मागवून मंजुरी दिली होती. त्यांच्याशी मागील पंधरवडयात मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये करार केलेले आहे.



| अ. क्र. | कार्याचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | सर्वांत कमी दराचे निविदा धारकांचे नाव | दर | मंजुरीचा दिनांक | कराराचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सपना गार्डन उल्हासनगर-३ येथे कारंजाच्या सुशोभित करण्यासाठी व तेथे प्रकाश योजने अंतर्गत सजावट करणे बाबत. | रू.४,०९,०४६.५० | मे. नारायण इलेक्ट्रीक वर्कस मुंबई | At par with the estimated value | २.११.२००२ | ६.१२.२००२ |

सदर माहिती मा. स्थायी समितीच्या अवलोकनार्थ सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ७३ दिनांकः- १३.१२.२००२

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. नरेंदकुमार ठाकुर

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार मा. आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सपना गार्डन उल्हासनगर -३ येथे कारंजाच्या सुशोभित करण्यासाठी व तेथे प्रकाश योजने अंतर्गत सजावट करणेकामी मे. नारायण इलेक्ट्रीक वर्क्स यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून त्यांच्याशी संविदेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५. २० वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

<u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

दि:-२०.१२.२००२.

<u>इतिवृत्त</u>

<u>दि. २०.१२.२००२ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २०.१२.२००२ रोजी सकाळी ११. ३० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्त्या.

१. <u>मा. सभापती :-श्रीमती. ज्योती कालानी.</u>

२. श्रीमती. आहुजा नीता प्रकाश
३. श्री. गायकवाड दिलीप दशरथ
४. श्री. ठाकुर नरेंद्र केवलराम (कुमारी)
५. श्री. तलरेजा विनोद चंदीराम
६. श्री. पमनानी ईश्वर सतरामदास
७. श्रीमती. माने किरण बाळकृष्ण
८. श्री. मुलचंदानी महेंद्र
९. श्रीमती. मोकल सीमा
१० श्री. रूपचंदानी बच्चाराम बाछोमल
११ श्री. रोहडा श्यामसुंदर जानीलाल
१२ श्री. लिंगे सुर्यकांत
१३ श्री. वलेचा पृथ्वी
१४ श्री. शर्मा कमला गंगाधर
१५ श्रीमती. सुर्वे जयश्री सुनिल

तर

मा. सदस्य श्री. रामरख्यानी मोहनदास, हे सभेस अनुपस्थितीत होते.

मा. सचिव :- सभेचे कामकाज सुरू करण्यापुर्वी आपल्या महापालिकेत नव्याने प्रतिनियुक्तीवर आलेले सहाय्यक आयुक्त यांची प्रभाग अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आलेली आहे ते श्री. गुरव हे सभागृहास आपली ओळख करून देतील.

मा. आयुक्त (श्री. बा. र. पोखरकर):-श्री. गुरव आपण आपली ओळख करून दया.

श्री. रविंद्र गुरव (प्रभाग अधिकारी):-मी श्री. रविंद्र गुरव येथे नेमणुक होण्यापुर्वी मी सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय येथे कक्ष अधिकारी म्हणुन कार्यरत होते.

त्यानंतर माझी येथे प्रतिनियुक्तीवर प्रभाग अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यांत आलेली असुन प्रभाग क्र. २ चा कार्यभार माझ्याकडे सोपविण्यांत आला आहे.

दुपारी ११.५५ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

--२--

मा. सचिवः-विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

मागील सभेचे दि. १३.१२.२००२ रोजीचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी :-मागील सभेचे दि. १३.१२.२००२ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यांत येत आहे.

मा. सचिवः-विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता पा. पु. विभाग):-२० बंदुकधारी सुरक्षा रक्षकांची सेवा पुरविणेबाबत निविदा मागविण्यांत आली होती. मे. अनिल सिक्युरीटी सर्व्हीसेस यांच्याशी संविदेस मान्यते बाबत हा प्रस्ताव आपणासमोर ठेवला आहे.

मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-निविदेतील दर यापुर्वीच्या निविदेतील दरापेक्षा कमी आहेत की अधिक आहेत?

श्री. डेगमवार (कार्यकारी अभियंता पा. पु. विभाग):-प्राप्त झालेल्या निविदेतील दर प्राकलनिय दरापेक्षा १३ टक्के कमी आहेत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर महानगरपालिका २० बंदुकधारी सुरक्षा रक्षकांची सेवा पुरविणे कामी मेसर्स अनिल सेक्युरिटी ॲण्ड पर्सनल सर्व्हिसेस यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन संविदेस मान्यता देत आहे.

प्रस्तावना

महानगरपालिकेने पाणी पुरवठा व जलनिःसारण विभागातर्फे विविध ठिकाणचे बुस्टर पंपींग स्टेशन पाण्याच्या साठवण टप्या, कॅश कलेक्शन केंद्र व उल्हासनगर महानगरपालिकेची महत्त्वाची ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेसाठी सालाबादप्रमाणे या वर्षाकरिता (येत्त्या बारा महिने) अंदाजित प्राकलन रू.१० ,७४ ,३२२ .०० याला दि.११ ११ . २००२ च्या स्थायी समीती सभा ठराव क्र ५५ अन्वये प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्राप्त करून रितसर निविदा सुचना प्रसिध्द करून मोहरबंद निविदा मागविल्या त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांचे समक्ष उघडण्यात आल्या त्यांचा तपशील पुढील प्रमाणे १. मे. अनिल सिक्युरीटी व पर्सोनल सर्व्हिस ठाणे अंदाजित प्राकलनाच्या १३ टक्के कमी (रू.९ ,३४ ,६६० .१४)२ मे. बॉम्बे इटीलीजट सिक्युरिटी मुंबई ७४ अंदाजित प्राकलनाच्या ३४. ०० जास्त (रू. १४ ,३९५९१ ४८)

उपरोक्त विवेचन आणि तुलनात्त्मक तक्ता पहाता मे. अनिल सिक्युरिटी व पर्सोनेल सार्विस ठाणे यांचे कामाचे दर खर्चात कमी असुन रास्त आहेत तसेच त्यांनी गेल्या वर्षाच्या त्यांचे दरापेक्षा आणखी ७१टक्के कमी दर दिलेले आहेत तसेच गेली तीन वर्षापासुन आपल्या येथे योग्यरित्त्या कार्यरत आहेत.

तसेच या प्रकरणास लेखा शाखा व लेखा परिक्षण यांची मान्यता असून मा. आयुक्त यांनी सदर बाब आता प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेस तयांची



निविदा रू.९३४६६०.१४ (१३टक्के कमी) स्थायी समिती सभेत पाठविण्यास परवानगी दिलेली आहे. सबब सदर प्रकरण मान्यतेस स्थायी समिती सभेत आम्ही सादर करीत आहोत.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ७४ <u>दिनांक:-२० १२ २००२</u>

सुचकाचे नाव :- श्रीम. कमला शर्मा

अनुमोदकाचे नाव :- श्रीम. सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिकेला २० बंदुकधारी सुरक्षा रक्षकांची सेवा पुरविणे कामी मेसर्स. अनिल सिक्युरिटी ॲण्ड पर्सोनल सर्व्हीसेस यांची सर्वात लघुत्त्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन प्रशासनास त्यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ३ वाचुन दाखवितात.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>ही कामे झालेली आहेत की होणार आहेत?

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>''आशाराम बापु'' येणार आहेत. त्यांच्या कार्यक्रमासाठी फार मोठया प्रमाणावर लोक येणार आहेत. तेथे जाण्याचा रस्ता खराब आहे तो ठिकठाक करणे जरूरीचे आहे.

<u>मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-</u>अमर डाय येथील रस्ता अजुन तसाच आहे. त्या रस्त्त्यावर किती तरी खड्डे पडले आहेत ते भरले जात नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u> रस्त्त्यातील खड्डे भरण्याचे राहून गेले आहेत. त्या रस्त्त्यावर खड्डे भरण्याचे राहिले आहेत ते भरले जावेत.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>त्या रस्त्त्यावर मोठ मोठे खड्डे आहेत तेथे ॲसीडचा एखादा टॅंकर पडला तर कित्त्येक लोक मरण पावतील शहाड फाटक ते चार्ली वेफर पर्यंतचा रस्ता खुप खराब आहे. पावसाळयापुर्वी तेथील खड्डे भरलेले होते त्यानंतर खड्डे भरले नाहीत.

<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u> ठिक आहे. याकडे लक्ष दिले जावे.

<u>मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकलः-</u>एवढे खड्डे आहेत की, तेथुन रिक्क्षा सुध्दा जावू शकत नाही,  सामान्य व्यक्ती सुध्दा पायी जावू शकत नाही. या रस्त्त्याच्या



दुरूस्ती बाबत मागच्यावेळी बोलले होते परंतु अदयाप त्याची दुरूस्ती झालेली नाही, ॲसीडचे टॅंकर पल्टी होण्याची शक्यता आहे.
<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानीः-</u>या प्रस्तावातील काम कोणत्त्या  लेखा शिर्षातुन करण्यांत येणार आहे?

<u>श्री. भिवापुरकर( कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग):-</u>स्थायी समिती सभापती निधीतुन.

<u>मा.सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>महापालिकेच्या निधीतून केले तर खुपच चांगले होइल.

<u>मा. सदस्य श्री. नरेंद्रकुमार ठाकुरः-</u>मा. सदस्य श्री. बच्चारामजी, महापालिका निधीतून हे काम केले तर चालेल काय?

<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपंचदानीः-</u>स्थायी समिती निधीतून असे गोषवा-यामध्ये कुठेच लिहिले नाही.

*<u>श्री. भिवापुरकर( कार्यकारी अभियंता सा.बा. विभाग):-</u>या प्रस्तावात प्रस्तावित केलेले काम लेखा शिर्ष ब.४;ग्प्ग्द्रुच.प्प मधुन करण्याचे प्रस्तावित केले आहे. हे शिर्ष स्थायी समिती सभापती निधीशी संबंधित आहे.*

*<u>मा.सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>हे कुणाला माहित आहे?*

*<u>मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकल:-</u>अमर डाय केमीकलवाला जो रस्ता आहे तो केवळ खड्डे भरून होणार नाही पुर्ण डांबरीकरण करावे लागेल. या रस्त्त्याचे काम या प्रकरच्या निधीतुन केले जावे.*

*<u>मा. सदस्य श्री. नरेंद्र कुमार ठाकुर:-</u>त्या रस्त्त्यात विविध जागी खड्डे भरावयाचे राहून गेलेले आहेत. ते पुर्ण केले जावेत.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>विरोधी पक्षीयांची कामे होत नाहीत.*

*<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-</u>तेथून ॲसीडचे टॅकर जा-ये करतात. एखादेवेळी जर तेथे एखादा मोठा अपघात झाला त्यात लोक मरण पावले तर त्यास जबाबदार कोण? आम्ही त्यास जबाबदार राहणार नाही म्हणुन या रस्त्त्याचे पुर्ण डांबरीकरण करावे लागेल.*

*<u>मा. सदस्य श्री. बच्चाराम रूपचंदानी:-</u>आम्ही जे सांगतो ते आपण गांभीर्यपुर्वक ऐकुन घ्या.*

*<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.*

*<u>विषय :-</u> उल्हासनगर २ येथे कुंगवाणी निवासाच्या समोरचे एन.आर. टेलर्स,शाळा क्र. २४ मार्गेच्या रस्त्त्यावरील खड्डे बी.एम. आणि ए.सी ने भरणे कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.*

--५--

*<u>प्रस्तावना</u>*

*उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार मा. स्थायी समिती, सभापती यांचे दिनांक १६.१२.२००२ च्या पत्रानुसार बी.एम.आणि ए.सी. ने रस्ता बनविणेसाठी मागणी केलेली आहे. त्यानुसार संबंधित कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असून, सदरचा रस्ता खराब आहे व रस्त्त्यात अनेक खड्डे पडलेले आहे. त्यामुळे स्थानिक रहीवाशांना येण्याजाण्यासाठी त्रास होतो. तसेच जड वाहनास येण्याजाण्यास त्रास होतो तरी सदरच्या रस्त्त्यावरील खड्डे बी. एम. ने भरण्यासाठी अंदाजित खर्च रूपये १,९९,७३०/- इतका अपेक्षित आहे. सदर काम महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील लेखा शिर्ष C –4(XIX)P-II मधुन करावयाचे आहे. या लेखा शिर्षात तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार सदर रू. १,९९,७३०/- किंमतीचे सदर काम करून घेणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अंतर्गत रूपये १०.०० लक्ष पर्यंत मा. आयुक्त यांना अधिकार असल्याने*

सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान केली आहे व सदरचे काम मे. डी.एस.कन्स्ट्रक्शन यांना देण्यासाठी मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस मान्य केली आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२)अन्वये मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७५</u> <u>दिनांकः-२०.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :- श्रीम. कमला शर्मा

अनुमोदकाचे नाव :- श्रीम. सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-२ येथे कुंगवाणी निवासाच्या समोरचे एन.आर. टेलर्स,शाळा क्र. २४ मार्गेच्या रस्त्यावरील खड्डे बी. एम. आणि ए.सी ने भरणे कामी प्रशासनास मेसर्स डी. एस.कंन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिवः-</u>विषय क्र. ४ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर २ येथील भाई मंगतराम चौक ते कलवर्ट बॅरेक क्र. ५७५ बी.एम. आणि ए.सी. ने रस्ता बांधणे कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.



<u>मा. सचिव :-</u>मंजुर?

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>हे सुध्दा काम झाले आहे की होणार आहे?
<u>मा. सदस्य श्री. विनोद तलरेजाः-</u>स्थायी समिती सभापती निधीतुन हे काम प्रस्तावित केले आहे.

<u>मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाडः-</u>(अमरडाय केमिकलच्या) त्या रस्त्याची खुपच दुर्दशा झाली आहे. त्या रस्त्यासाठी आम्हास निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. भाभी ज्योती कालानी व आमदार साहेबांना घेवून जातो त्यांनी पहावा.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकल:-त्या रस्त्याचे थोडेसेच काम आहे ते केले पाहिजे. नविन रस्ता आहे, मध्येच काम आहे.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-त्या कामासाठी आपण नगरसेवकांनी सुध्दा निधी उपलब्ध करून दिला पाहिजे.

मा. सदस्या श्रीमती. सीमा मोकल:-परंतु तेवढयाने ते काम होणार नाही.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-फक्कड मंडली पर्यंतचा रस्ता झाला आहे. ३ महिन्यामध्ये आपण दुस-या वेळा रस्त्याचे काम मंजुरीस आणले पावसाळयात सुध्दा काम केले होते ठिक आहे. पावसाळयात खड्डे पडले असतील परंतु जिकडे जरूर आहे तिकडे काम होत नाही. परंतु आम्ही ११ महिन्यापासुन या रस्त्याचे कामाबाबत बोलत आहोत ते काम होत नाही. तेथुन ॲसीडचे टॅंकर जातात. अपघात झाला तर अनेक लोक मरतील म्हणुन त्या रस्त्याचे काम झाले पाहिजे नाहीतर आम्ही उपोषणास बसु.

मा. सदस्या श्रीमती. सिमा मोकल:-आम्हास तेथील लोक त्रास देतात. मी एक वर्षापासुन ओरड करीत आहे. सभापती महोदया आपण याबाबत काहीतरी करा, आपलया निधीतून किंवा आमदार निधी उपलब्ध करून दयाल व आमच्याबरोबर आजच याल तर बरे होईल.

मा. सदस्य श्री. दिलीप गायकवाड:-होय. भाभी (ज्योती कालानी) आपण प्रत्यक्ष जागेवर येवून पहाणी करून आम्हास निधी उपलब्ध करून दया.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-यानंतर महासभा असल्याने आम्ही त्याकामी व्यस्त आहोत. पुढच्या एखादया दिवशी आपण जावू परंतु आपण सुध्दा याकामी आपला निधी उपलब्ध करून दयावा.

सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर २ येथील भाई मंगतराम चौक ते कलवर्ट बॅरेक क्र. ५७५ बी.एम. आणि ए.सी. ने रस्ता बांधणे कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार मा. स्थायी समिती, सभापती यांचे दिनांक १६.१२.२००२ च्या पत्रानुसार बी.एम.आणि ए.सी. ने रस्ता बनविणेसाठी मागणी केलेली आहे. त्यानुसार संबंधित कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी प्रत्यक्ष



जागेवर जाऊन पाहणी केली असून, सदरचा रस्ता खराब आहे व रस्त्यात अनेक खड्डे पडलेले आहे. त्यामुळे स्थानिक रहीवाशांना येण्याजाण्यासाठी त्रास होतो. तसेच जड वाहनास येण्याजाण्यास त्रास होतो तरी सदरच्या रस्त्यावरील खड्डे बी. एम. ने भरण्यासाठी अंदाजित खर्च रूपये १,८३,७००/- इतका अपेक्षित आहे. सदर काम महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील लेखा शिर्ष C –4(XIX)P-II मधुन करावयाचे आहे. या लेखा शिर्षात तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार सदर रू. १,८३,७००/-

किंमतीचे सदर काम करून घेणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अंतर्गत रूपये १०.०० लक्ष पर्यंत मा. आयुक्त यांना अधिकार असल्याने सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान केली आहे व सदरचे काम मे. डी.एस.कन्स्ट्रक्शन यांना देण्यासाठी मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस मान्य केली आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२)अन्वये मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ७६ <u>दिनांक:-२०.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :- श्रीम. कमला शर्मा

अनुमोदकाचे नाव :- श्रीम. सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-२ येथील भाई मंगतराम चौक ते कलवर्ट बॅरेक क्र. ५७५ बी.एम. आणि ए.सी. ने रस्ता बांधणे कामी प्रशासनास मेसर्स डी. एस.कंन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही-

अनुमोदकाची सही-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठसीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. ५ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर.१ येथील झुलेलाल मंदीर चौक ते साईबाबा मंदीर चौक पर्यंतच्या रस्त्याचे खड्डे बी.एम. आणि ए.सी. ने भरणे कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर.१ येथील झुलेलाल मंदीर चौक ते साईबाबा मंदीर चौक पर्यंतच्या रस्त्याचे खड्डे बी.एम. आणि ए.सी. ने भरणे कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.



<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार मा. स्थायी समिती, सभापती यांचे दिनांक १६.१२.२००२ च्या पत्रानुसार बी.एम.आणि ए.सी. ने रस्ता बनविणेसाठी मागणी केलेली आहे. त्यानुसार संबंधित कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असून, सदरचा रस्ता खराब आहे व रस्त्यात अनेक खड्डे पडलेले आहे. त्यामुळे स्थानिक रहीवाशांना येण्याजाण्यासाठी त्रास होतो. तसेच जड वाहनास येण्याजाण्यास त्रास होतो तरी सदरच्या रस्त्यावरील खड्डे बी. एम. ने भरण्यासाठी अंदाजित खर्च रूपये ७५,७२५/- इतका अपेक्षित आहे. सदर काम महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील लेखा शिर्ष C –4(XIX)P-II मधुन करावयाचे आहे. या लेखा शिर्षात तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार सदर रू. ७५,७२५/- किंमतीचे सदर काम करून घेणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अंतर्गत रूपये १०.०० लक्ष पर्यंत मा. आयुक्त यांना अधिकार असल्याने सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान केली आहे व सदरचे काम मे. डी.एस.कन्स्ट्रक्शन यांना देण्यासाठी मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस मान्य केली आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२)अन्वये मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७७</u> <u>दिनांकः-२०.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :- श्रीम. कमला शर्मा

अनुमोदकाचे नाव :- श्रीम. सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-१ येथील झुलेलाल मंदीर चौक ते साईबाबा मंदीर चौक पर्यंतच्या रस्त्यावरील खड्डे बी.एम. आणि ए.सी. ने भरणे कामी प्रशासनास मेसर्स डी. एस.कंन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ६ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर.१ येथील मुरबाड नाका ते फकडमंडली चौका पर्यंतच्या रस्त्याचे खड्डे बी.एम. आणि ए.सी. ने भरणे कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर१ येथील मुरबाड नाका ते फकडमंडली चौका पर्यंतच्या रस्त्याचे खड्डे बी.एम. आणि ए.सी. ने भरणे कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार मा. स्थायी समिती, सभापती यांचे दिनांक १६.१२.२००२ च्या पत्रानुसार बी.एम.आणि ए.सी. ने रस्ता बनविणेसाठी मागणी केलेली आहे. त्यानुसार संबंधित कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असून, सदरचा रस्ता खराब आहे व रस्त्यात अनेक खड्डे पडलेले आहे. त्यामुळे स्थानिक रहीवाशांना येण्याजाण्यासाठी त्रास होतो. तसेच जड वाहनास येण्याजाण्यास त्रास होतो तरी सदरच्या रस्त्यावरील खड्डे बी. एम. ने भरण्यासाठी अंदाजित खर्च रूपये ९९,८७५/- इतका अपेक्षित आहे. सदर काम महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील लेखा शिर्ष C –4(XIX)P-II मधुन करावयाचे आहे. या लेखा शिर्षात तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार सदर रू. ९९,८७५/- किंमतीचे सदर काम करून घेणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अंतर्गत रूपये १०.०० लक्ष पर्यंत मा. आयुक्त यांना अधिकार असल्याने सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान केली आहे व सदरचे काम मे. डी.एस.कन्स्ट्रक्शन यांना देण्यासाठी मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस मान्य केली आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२)अन्वये मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ७८ दिनांक:-२०.१२.२००२

सुचकाचे नाव :- श्रीम. कमला शर्मा

अनुमोदकाचे नाव :- श्रीम. सिमा मोकल

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर-१ येथील मुरबाड नाका ते फकडमंडली चौका पर्यंतच्या रस्त्यावरील खड्डे बी.एम. आणि ए.सी. ने भरणे कामी प्रशासनास मेसर्स डी. एस. कंन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. ७ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद <u>करणे बाबत.</u>

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद <u>करणे बाबत.</u>

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अनु. क. | कामाचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | उल्हासनगर येथील रेखा अपार्टमेंट मार्गे बॅ.८५ ,८६ सम्राट अपार्टमेंट देवजी पॅलेस जवळ सी.सी. पायवाटा व नाली आणि चेंबर लाईन, शौचालयाची बॅ.नं.२७ जवळ दुरूस्ती करणे (नगरसेवक निधी ९६) | १ ,९९ ,८५०/- | ८/११/२००२ | स्वराज्य म.का.सोसा. |
| २ | प्र. क्र६ मध्ये बॅ.नं.२०९ ,२१७ ,२४९ व बॅ.२०४ जवळ सी सी पायवाटा व नाली बांधणे व बॅ.२१४ जवळ कचराकुंडी बनविणे (महापालिका निधी ९८) | १९९९१५/- | ८/११/२००२ | सागर म.का.सोसा. |
| ३ | प्र.क्र४ बॅ.क्र.१२९ ,१३६ ,१३७ , १५१ ,१५२ जवळ? सी सी पायवाटा व नाली बांधणे नळ कनेक्शन बाजूस करणे (नगरसेवक निधी ८९) | १ ,९९ ,५००/- | ८/११/२००२ | रेणुकामाता म.का.सोसा. |
| ४. | प्र.क्र.१२ (ब)बॅ.नं. १७६१ ,१७६२ ,१६२४ येथील ठिकाणी सी सी एम-२५० चा रस्ता तसेच नाली बांधणे (नगरसेवक निधी ११२) | १९८७००/- | ८/११/२००२ | गऊदेवी म.का.सोसा. |

५ प्र.क्र. २१ ( ) ब्लॅ.नं. ३३ ,३४ ,३५
व विविध ठिकाणी सी सी पायवाटा
व शौचालय दुरूस्ती करणे
(नगरसेवक निधी १३४) १९९१००/- ८/११/२००२ स्वराज्य म.का.सोसा.



| अनु. क. | कामाचे नांव | प्राकलनिय किंमत | करारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| ६. | प्रभाग नं.२ ( ) जेठानी घराजवळ प्रेमीबाई धर्मशाळेजवळ सतरामदास घराजवळ व एस.एस. लुल्ला शाळेजवळ आणि विविध ठिकाणी सी सी पायवाटा व नाली बांधणे (नगरसेवक निधी १३५) | १९९५५०/- | ८/११/२००२ | जनसेवा मकासोसा |
| ७ | प्र. नं.२१ (ब) ब्लॅ ६९ पारवानी भवन पाठी मागे ब्लॅ. ६३ ,६४ ,५२ ते १०४ व तुटलेले संडासच्या पॅसेजवर एम-२५० ने सी सी पायवाटा बांधणे (नगरसेवक निधी १३७) | १९९९५०/- | १९/११/२००२ | सागर मकासो. |
| ८ | प्र. क्र. ४ (क) बहादुर यादव ते जगदीश सिंग घर व मनोज सिंग, गजाधर यादव घर, वसंत पटेल, राम प्यारे घराजवळ सी सी पायवाटा व नाली बांधणे (नगरसेवक निधी १४३) | १९९५००/- | ८/११/२००२ | जयहिंद मकासो.सा. |
| ९. | प्र. क्र. ५ (ब) ब्लॅ६१७ ,६९३ ते ५९५ ,८७ ,८८ मार्गे ब्लॅ. २९३ आणि स्कुल क्र. २४ जवळ सी. सी पायवाटा व नाली बांधणे (नगरसेवक निधी १४४) | १९९५५०/- | ८/११/२००२ | मे जनकुश म.का.सोसा. |
| १०. | प्र. १८ (ब) जागृती कॉलनी रेल्वे ट्रेक येथे सी सी पायवाटा व नाली बांधणे (नगरसेवक निधी १५४) | १ ,९९ ,२६०/- | ८/११/२००२ | जयहिंद म.का.सोसा. |
| ११ | प्र. क्र.१९ (अ)शांतीनगर येथील मोहटा देवी मंदीर जवळ रस्ता एम-२५० ने व नाली बांधणे नाली बांधणे (नगरसेवक निधी १५५) | १ ,९९ ,७८७/- | ८/११/२००२ | जकनुश म.का.सोसा. |
| १२ | प्र. क्र.१० दुनिचंद कॉलेज पासुन | | | |

नाथा यांच्या घरापर्यंतचा रस्ता
डांबरीकरण करणे (बीएम व एसी)
(नगरसेवक निधी १५९) ९९९००/- १८/११/२००२ मुम्बादेवी म.का.सोसा.

१३ प्र. २५ (क) बॅ.९४५,४१,४८ मध्ये
विविध ठिकाणी सी सी पायवाटा
आणि नाल्या बांधणे
(नगरसेवक निधी १६७) १९९९००/- ११/११/२००२ जयहिंद म.का.सोसा.



| अनु. क. | कामाचे नांव | प्राकलनिय किंमत | कारारनामा दिनांक | एजेन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १४ | प्र.१३ ओम नगरमध्ये मंदिर ते बॅ. ७१९ पर्यंत रस्ता बी.एम. आणि ने बनविणे (महापौर निधी २०५) | ९९९,००/- | २१/११/२००२ | स्टॅण्डर्ड म.का.सोसा. |
| १५ | प्र. १३ बॅ. अे ७१२ ते आयप्पा मंदिर तबेल्यामार्गे रस्ता बी.एम आणि एसी ने बनविणे (महापौर निधी २०६) | ९९,९००/- | २१/११/२००२ | स्टॅन्डर्ड म.का.सोसा. |
| १६ | प्र. १४ येथील सत्त्यासाई हायस्कुल व नॅशनल कॉलेज (ब्राम्हणपाडा) पर्यंत रस्त्यातील टेलीफोन विभागाने खोदलेल्या रस्त्याची दुरूस्ती करणे (महापालिका निधी २०७) | २०००००/- | २०/११/२००२ | गुरूदेव म.का.सोसा. |

---

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करून दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ७९</u> <u>दिनांक:- २०.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. बच्चाराम रुपचंदानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील १६ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१३--

मा. सचिवः-विषय क्र. ८ वाचून दाखवितात.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत १० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरातील खाली नमुद केलेली कामे करणेसाठी महानरगपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००३-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत | करारनामा दि | एजेंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर- येथील प्र. क्र. १३ मधील स्वामी त्रिलोकदास गार्डन दुरूस्ती करून विकास करणे. ( महानगरपालिका निधी ८४) | ६१ ,४५०/- | २२/११/२००२ | श्री गंगा म. का.सोसा |
| २ | नागरि सुविधा विषयक विकास कामांच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत उल्हासनगर-५ येथील प्रभाग क्र १३ मध्ये महात्त्मा फुलेनगर मध्ये १० बैठकिचे शौचालय बांधणे | ४ ,१२ ,१००/- | २२/११/२००२ | मे रवि किरण म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (नागरीसुविधा ८७) | | | |
| ३ | उल्हासनगर -५ येथील प्र क्र. १३ मधील ब्लॉक नं ८१५ ते ८१९ नाली दुरूस्त करणेबाबत . (महानगरपालिका निधी ९३) | ५९,०००/- | २२/११/२००२ | मे श्री गंगा म. का. सोसा. |
| ४ | उल्हासनगर-४ येथील प्र क्र. १६ मध्ये बॅ १५७०, ७२, ७३, १६३८ जवळ सी सी पायवाटा आणि नाली बांधणे (नगरसेवक निधी १३२) | १,९९,९३७/- | २२/११/२००२ | मे श्री गंगा म. का. सोसा. |
| ५ | उल्हासनगर -५ येथील प्रभाग क्र. १३ मध्ये करूणधा अपार्टमेंट जवळ बॅ क्र. २१२१ पासुन २१२६ पर्यतचा रस्ता सी सी एम-२५० ने बनविणे व साईटच्या नाल्या बनविणे. (नगरसेवक निधी १४९) | १,९९,०००/- | २२/११/२००२ | मे श्री गंगा म. का. सोसा. |

--१४--

| अ. क्र. | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत | करारनामा दि | एजेंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| ६ | प्र.क्र ६ मध्ये श्री क्रिष्णा मंदिर ते मिलन शॉप आणि सभोवतालचा एरिया, शास्त्रीनगर येथे सी सी पायवाटा आणि नाली व नाला बनविणे ने रस्ता बांधणे (नगरसेवक निधी १८२ ) | १,९९,५००/- | २२/११/२००२ | मे सुर्या ज्योत म. का. सोसा. |
| ७ | सी सी पायवाटा व नाली बनविणे बाबत प्रेस बाजारात आणि विविध ठिकाणी (नगरसेवक निधी १८३) | ९५,७५०/- | २२/११/२००२ | मे श्री मॉ म. का. सोसा. |
| ८ | उल्हासनगर-५ येथील बॅ नं २१२६ हिल लाईन पोलीस स्टेशनजवळ ओपन प्लाटला संरक्षक भिंत बांधणेबाबत. (महापालिका निधी २००) | १,९०,०००/- | २२/११/२००२ | मे श्री गंगा म. का. सोसा. |
| ९ | कुर्ला कॅम्प उल्हासनगर-४ येथील आरक्षित प्लॉट दुरूस्तीबाबत. (महापालिका निधी २०३) | ३,००,०००/- | २२/११/२००२ | मे सिध्दनाथ म. का. सोसा. |
| १० | उल्हासनगर- येथील महात्त्मा फुलेनगर, अंकल गॅरेजच्या मागे आर पी आय ऑफिसच्या समोर (दुर्बल घटक योजनेतून) नाला | ९९,०००/- | २२/११/२००२ | मे श्री गंगा म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | बनविणे व दुरूस्ती करणे. (दुर्बल घटक निधी २१०) | | | |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित.

**<u>स्थायी समिति ठराव क्र.</u> ८०** **<u>दिनांक:- २०.१२.२००२</u>**

सुचकाचे नाव :- श्री. सुर्यकांत लिंगे
अनुमोदकाचे नाव :- श्री. ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील १० विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१५--

<u>मा. सचिव:-</u>विषय क्र. ९ वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन् २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत | करारनामा दि | एजेंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | प्र क्र. २२ मध्ये हिंदुस्थान साडी सेंटर, बॅ क्र. ३२६,२७,३०,३४८,३५५ आणि माता मंदिर जवळ सी सी पायवाटा, नाल्या आणि शौचालय | १,९९,९६०/- | २/१२/२००२ | मे अल्का म. का. सोसा. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | दुरूस्ती करणे. (नगरसेवक निधी १६३) | | | |
| २ | उल्हासनगर-४ येथील प्र क्र. १३ मध्ये सेक्शन २५ बॅ नं १६९० येथे समाज मंदिर बांधणे (महापालिका निधी २०८) | १,९९,०००/- | ३/१२/२००२ | मे श्री गंगा म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र. ८१</u> <u>दिनांकः- २०.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा
अनुमोदकाचे नाव :-श्री. ईश्वर पमनानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही/-
अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

--१६--

<u>मा. सचिवः-</u>विषय क्र. १० वाचून दाखवितात.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-</u>सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

<u>विषय :-</u> उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती नोंद करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील खालील नमुद केलेली कामे करणेसाठी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय तरतूद ठेवलेल्या सन २००२-२००३ च्या निधीतून कामे करणेसाठी नगरसेवक यांनी विनंती केलेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत | करारनामा दि | एजेंन्सीचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर-४ येथील मराठ | १,९९,७८/- | १८/११/२००२ | मे राज लक्ष्मी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | सेक्शन, सितास्तम नगर, रामनगर येथे चेकर्स टाईल्स लावणे आणि नाली बांधणे (नगरसेवक निधी १२७) | | | म. का. सोसा. |
| २ | उल्हासनगर-४ येथील प्र क्र. १५ मध्ये समता नगर येथे चेकर्स टाईल्स लावणे आणि नाली बांधणे. (नगरसेवक निधी १२९) | १,९९,४३८/- | १८/११/२००२ | मे राज लक्ष्मी म. का. सोसा. |

उपरोक्त कामांना मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(डी) अंतर्गत प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार उप-निबंधक यांचेकडे मजुर कामगार संस्थेला काम वाटप करून देण्यासाठी शिफारस केली होती व उप-निबंधक,ठाणे यांनी काम वाटप करुन दिल्यानंतर सदर मजुर कामगार संस्थेशी करारनामा करण्यात आले आहे. तरी सदरची माहिती स्थायी समितीकडे माहितीसाठी प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ८२ दिनांकः- २०.१२.२००२

सुचकाचे नाव :-श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :-श्री. पूथ्वी वेलचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत वरील २ विविध कामी प्रशासनाने केलेल्या संविदेची माहिती आजच्या सभेच्या कार्यवृत्तांत नोंद करित आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

एकमताने

सभापती / पिठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

--१७--

मा. सचिवः-विषय क्र. ११ वाचून दाखवितात.

विषय :- खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी मे. ओम इंडस्ट्रियल इंजिनियरींग यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत

मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानीः-सदरचा प्रस्ताव सर्वानुमते समंत करण्यांत येत आहे.

विषय :- खडेगोलवली येथील मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे कामी मे. ओम इंडस्ट्रियल इंजिनियरींग यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असून संविदेस मान्यता देणे बाबत.

प्रस्तावना

खडेगोलवली येथिल मलप्रक्रिया केंद्र बारा महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने चालविणे, देखभाल व दुरूस्ती करणे याकामासाठी रू. १९,११,८५८/- मात्र अंदाजित खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यांत आला त्यास स्थायी समिती ठराव क्र. ४९ दि. ३.१०.२००२नुसार प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळाली असून बाब क्र८५७ दि. १९.१०.२००२ नुसार तांत्रिक मान्यता मिळाली आहे.

सदर कामाकरिता पाणीपुरवठा विभागातर्फे दि. २६.१०.२००२ रोजी राज्यस्तरीय दैनिक आपला वार्ताहर व जिल्हास्तरीय दैनिक नगरन्युज या वृतपत्रातून निविदासुचना प्रसिध्द करण्यांत आली त्या निविदा सुचनेनुसार दि. ११.११.२००२ रोजी दुपारी १३.०० वाजेपर्यंत खालील तीन ठेकेदारांनी, महापालिकेस निविदा सादर केल्या त्यात खालीलप्रमाणे दर होते.

| | |
|---|---|
| १ मे. ओम इंडस्ट्रीयल इंजिनिअरींग सर्व्हिसेस - डोंबिवली (पश्चिम) | अंदाजित किंमतीपेक्षा १९.५ टक्के कमी (रू.१५,३९,०४६.००) |
| २. मे. कल्पतरू इंजिनिअर्स मुंबई | अनुभव प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यामुळे निविदा उघडण्यात आली नाही. |
| ३. मे. वैभव इलेक्ट्रक वर्क्स, कल्याण | अंदाजित किंमतीपेक्षा ३टक्के (रू.१८,५४,५०२.००) |

उपरोक्त निविदांपैकी मे. ओम इंडस्ट्रियल इंजि. सर्व्हिसेस, डोंबिवली यांची अंदाजित किंमतीपेक्षा १९.५ टक्के कमी दराची (रू. १५,३९,०४६.००) न्युनतम निविदा स्विकारण्याचे प्रस्तावित आहे. यांस मुख्यलेखा अधिकारी/ मुख्यलेखापरिक्षक यांची शिफारस असून मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेसाठी स्थायी समितीसमोर सादर करण्यांत येत आहे. त्यास मंजुरी मिळण्याची विनंती आहे.

--१८--

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ८३ <u>दिनांकः- २०.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :- श्री. श्यामसुंदर रोहडा

अनुमोदकाचे नाव :- श्री. दिलीप गायकवाड

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार खडेगोलवली येथिल मलप्रक्रिया केंद्र चालविणे, देखभाल व दुरुस्त करणे कामी मे. ओम इंडस्ट्रियल इंजिनियरिंग सर्व्हिसेस डोंबिवली यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृत योग्य असून प्रशासनास त्यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मा.सचिव:-</u>आणखी एक प्रस्ताव यामध्ये समाविष्ट करावयाचा आहे. त्याचा गोषवारा सभा सूचनेबरोबर आपणास प्रस्तुत करण्यांत आलेला आहे. सभा सूचनेसोबत देण्यांत आलेल्या गोषवा-यामध्ये विषय क्र. ७ लिहिलेला तो गोषवारा आहे परंतु सभा सूचनेमध्ये तो आलेला नाही ८ वा जो गोषवारा आहे तो सभा सूचनेवर ७ व्या क्रमांकावर घेण्यांत आलेला आहे.

तसेच प्रशासनाकडून दुसरा एक प्रस्ताव आयत्त्यावेळच्या विषयान्वये आणण्यांत आलेला आहे आपणां सर्वांची संमती असेल तर तो कार्यसूचीवर समाविष्ट करण्यांत येईल.

<u>मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी:-</u>सभा सूचनेवर घ्यावयाचा राहून गेलेला प्रस्ताव व प्रशासनाच्या वतीने आयत्त्यावेळच्या विषयान्वये आणलेला प्रस्ताव सर्वानुमते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करण्यांत येत असून ते सर्वानुमते समंत करण्यांत येत आहेत.

<u>आयत्त्यावेळचा विषय:-</u>

<u>विषय :-</u> उल्हासनगर२ येथील भैयासाहेब आंबेडकर नगर चौक ते बॅ. क्र५८८ पर्यंतच्या रस्त्त्याचे खड्डे बी.एम. आणि ए.सी. ने भरणे कामी प्रशासनास निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करणे बाबत.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त संदर्भाधिन विषयानुसार मा. स्थायी समिती, सभापती यांचे दिनांक १६.१२.२००२ च्या पत्रानुसार बी.एम.आणि ए.सी. ने रस्ता बनविणेसाठी मागणी केलेली आहे. त्यानुसार संबंधित कनिष्ठ अभियंता व उप-अभियंता यांनी प्रत्त्यक्ष



जागेवर जाऊन पाहणी केली असून, सदरचा रस्ता खराब आहे व रस्त्त्यात अनेक खड्डे पडलेले आहे. त्यामुळे स्थानिक रहीवाशांना येण्याजाण्यासाठी त्रास होतो. तसेच जड वाहनास येण्याजाण्यास त्रास होतो तरी सदरच्या रस्त्त्यावरील खड्डे बी. एम. ने भरण्यासाठी अंदाजित खर्च रूपये १,२४,९७५/- इतका अपेक्षित आहे. सदर काम महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकातील लेखा शिर्ष C–4(XIX)P-II मधुन करावयाचे आहे. या लेखा शिर्षात तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार सदर रू. १,२४,९७५/- किंमतीचे सदर काम करून घेणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम

१९४९ चे अंतर्गत रूपये १०.०० लक्ष पर्यंत मा. आयुक्त यांना अधिकार असल्याने सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता प्रदान केली आहे व सदरचे काम मे. डी.एस.कन्स्ट्रक्शन यांना देण्यासाठी मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखा परिक्षक यांनी शिफारस मान्य केली आहे. तरी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ चे कलम २(२)अन्वये मान्यता मिळण्यासाठी स्थायी समिती पुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र. </u> ८४ <u>दिनांक:-२०.१२.२००२</u>

सुचकाचे नाव :- श्री. नरेंद्र ठाकुर

अनुमोदकाचे नाव :- श्री. पृथ्वी वलेचा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर.२ येथील भैयासाहेब आंबेडकर नगर चौक ते बॅ. क्र.५८८ पर्यंतच्या रस्त्यावरील खड्डे बी.एम. आणि ए. सी. ने भरणे कामी प्रशासनास मेसर्स डी. एस. कंन्स्ट्रक्शन या कंत्राटदाराशी निविदाशिवाय थेट संविदेस प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>आयत्यावेळचा विषय:-</u>

<u>विषय :-</u> एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प टप्पा क्र.१ मधील रस्त्यांमध्ये झेब्रा कॅासिंग, लेज पेंटींग कामी मे. सरटेक कन्स्ट्रक्शन यांच्याशी संविदेस मान्यता देणे बाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेने एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या रस्त्यांच्या कामांपैकी खाली नमुद असलेली रस्त्यांची कामे एम.एम.आर.डी.ए. कडून दोन टपपामध्ये कर्ज उभारणी करून हाती घेतलेली आहेत.



या कामांकरीता मुळ एकंदरीत अंदाजपत्रकात असलेली तरतुद व सविस्तर प्राकलनाप्रमाणे येणारी प्राकलनिय किंमत नमुद आहे.

टप्पा क्र.१

| अ.क्र. | रस्त्याचे नांव | मंजुर सुधारीत | सविस्तर |
|---|---|---|---|

| | | अंदाजपत्रकातील अदांजित रक्कम | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|
| १ | रस्ता क.१ गोलमैदान भोवताली | ३ ,५६ ,४१९/- | ३ ,५३ ,७४७/- |
| २ | रस्ता क.२(अे)गोल मैदान ते नेहरू चौक | १ ,३३ ,१४७/- | १ ,३३ ,१४७/- |
| ३ | रस्ता क.३(बी)नेहरू चौक ते शिवाजी चौक | ३ ,८८ ,१०८/- | २ ,२५ ,७१२/- |
| ४ | रस्ता क.३ झुलेलाल ते रेड कॉस | ३ ,५८ ,९५७/- | ३ ,५८ ,९५७/ |
| ५ | ओ.टी. ते व्हिनस पर्यंतचा रस्ता | ३ ,३८ ,०००/- | २ ,८८ ,६५२/- |
| | 'अ'एकुण | | १३ ,३९ ,२१५/- |
| अ.क. | रस्त्याचे नांव | मंजुर सुधारीत अंदाजपत्रकातील अदांजित रक्कम | सविस्तर प्राकलनिय किंमत |
| १ | रस्ता क.१ हरमन मोहता ते प्रिया अपार्टमेंट | ५६३ ,०००/- | ६ ,४३ ,७२८ |
| २ | रस्ता क.३ शांतीनगर ते पवई | ५ ,५० ,०००/- | ५ ,५९ ,८८१/- |
| ३ | रस्ता क.५ मानेरा ते लालचक्की | ३ ,६२ ,६५६/- | ४ ,७० ,३२७/- |
| ४ | रस्ता क.१८ कोर्ट ते गोल मैदान सोनेसर अपार्टमेंट मार्ग लिंक ते अमन चौक | ३ ,९८ ,०००/- | २ ,९९ ,४८९/- |
| 'अ' एकुण | | | १९ ,७३ ,४२५/- |

सदर लेन पेंटींग व झेब्रा क्रॉसिंगची करण्याचे या रस्त्यांच्या स्थापत्त्य कामामध्ये समाविष्ठ केलेली नव्हती. परंतु या कामांकरीता प्रत्येक रस्त्यांच्या एंकदरीत प्राकलनिय किंमतीमध्ये उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे तरतुद ठेवलेली होती. त्यामुळे लेन पेंटींग व झेब्रा क्रॉसिंगच्या कामाचे वेगळे सविस्तर प्राकलनिय तयार झाल्यानंतर सदर पेंटींग चे काम हाती घेण्याकरीता निविदा प्रकीया करण्यात आले. या निविदांप्रकीयेत उपरोक्त रस्तांकरीता रूपये ३३ ,१२ ,६४०/- करीता एक निविदा मागविण्यात आली होती. खालील निविदाकारांनी त्यांचे समोर दर्शविलेल्या दराने निविदा भरल्यानंतर सर्वात कमी दराच्या निविदाकार मे.सरटेक कन्स्ट्रक्शन ,नवी मुंबई यांनी भरलेले दर वाजवी पेक्षा जास्त वाटत असल्याने त्यांना दर कमी करणे करीता वाटाघाटीस शहर अभियंता ,कार्यकारी अभियंता(साबा) मुख्य लेखा अधिकारी ,मुख्य लेखा परिक्षक यांच्या समवेत बोलविण्यात आले होते. या वाटाघाटी मध्ये मे.सरटेक कन्स्ट्रक्शन नवी मुंबई यांनी त्यांनी भरलेल्या ४.७५: जास्तीचा दर कमी करून तो ०.५०: कमी दराने करण्यास अनुकुलता दर्शविलेली होती. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचे वरील पत्र कॅ.ीत्ैम्त्द्द२००२६०८७ दिनांक ९/१२/२००२ नुसार लेखी

कळविलेले आहे. सदर दर वाजवी असल्याने सरटेक कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्रशासना तर्फे ग्राहय धरण्यात आलेली आहे.तरी एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रमामधील एम.एम.आर.आर.डी. कडून प्राप्त झालेल्या कर्जातून करावयाचे आहे. तरी मे.सरटेक कन्स्ट्रक्शन नवी मुंबई यांच्या ० ७०: कमी दराच्या निविदास मान्यता मिळणेसाठी स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ८५ <u>दिनांकः- १०.१२.२००१</u>

सुचकाचे नाव :- श्री. विनोद तलरेजा

अनुमोदकाचे नाव :- श्रीम. निता प्रकाश अहूजा

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार एकात्मिक रस्ते विकास टप्पा क्र.१ मधील रस्त्त्यामध्ये झेब्रा कॉसिंग, लेज पेंटींग करणे कामी मेसर्स सरटेक कंन्स्ट्रक्शन नवी मुंबई यांची सर्वात लघुत्तम दराची निविदा स्विकृती योग्य असुन प्रशासनास त्यांच्याशी संविदेस व अंतर्भुत खर्चास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

<u>एकमताने</u>

सभापती / पिठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

दुपारी १२.०५ वाजता सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती श्रीमती. ज्योती कालानी यांनी जाहिर केले.

प्रकाश पं. कुकरेजा
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका.